Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

SRDESAI SMARK GRANTH 1938 G.K.V.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

1938

४३म
४६

Stock Verification-2024

Stock Verification-2024

Stock Verification-2024

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गो. स. सरदेसाई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

1938

सरदेसाई स्मारक ग्रंथ

संपादक

श्रीपाद रामचंद्र टिकेकर

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे,

श्रीसमर्थ-सदन, बनाम हॉल लेन, गिरगांव, मुंबई.

१९३८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Published for Sardesai Memorial Committee by Keshav Bhikaji Dhawale, Shri Samarth Sadan, Benham Hall Lane, Girgaon, Bombay 4

Printed By
R. R. Bakhale, at the Bombay Vaibhav Press, Girgaon, Bombay 4

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२८७०४

28704

हा स्मारक ग्रंथ

न्या. मुकुंदराव रामराव जयकर,

M. A., LL. B., Bar-at-Law, LL. D.

यांचे हस्तें

ता. १ ऑक्टोबर, १९३८ रोजीं

रियासतकार रा. ब. **गोविंद सखाराम सरदेसाई,** बी. ए.

यांस मुंबईंत अर्पण केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्मारक ग्रंथ १७ मे, १९३८ रोजीं म्हणजे त्यांच्या ७३ व्या वाढदिवशीं रियासतकार सरदेसाई यांस अर्पण करण्याची योजना होती. पण ती अनेक कारणांसाठीं पुढें ढकलावी लागली. आज ती सफल होत आहे. तींत अनेकांचें विविध प्रकारचें सहाय्य आम्हांस झालें. रा. ब. गोविंदराव सरदेसाई यांचेबद्दल त्यांस वाटत असलेला आदरभाव अशा प्रकारें त्यांनीं व्यक्त केला आहे असेंच आम्ही मानतों. त्या त्या सर्वांचे आभार मानणें अवश्य आहे. परंतु येथें वैयक्तिक उल्लेख कुणाचा करीत नाहीं. लेखकांनीं निबंध पाठवून हा स्मारक ग्रंथ आमचेकडून पुरा करवून घेतला व प्रकाशक यांच्या सद्भावनेनें तो प्रसिद्ध झाला, याबद्दल मात्र लेखक-प्रकाशकांचे आभार मानले पाहिजेत.

ता. १ ऑक्टोबर, १९३८
प्रार्थना समाज,
मुंबई ४

भा. वि. जाधव
अध्यक्ष,
सरदेसाई स्मारक समिति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रा. ब. गोविंद सखाराम सरदेसाई

ग्रंथलेखन

इंग्लंड देशाचा विस्तार [सेलीकृत एक्स्पॅन्शन ऑफ इंग्लंडचें भाषांतर] (१८९३)

उताणा रुपया [पिच अँड टॉस]	वैठे खेळ	(१८९५)
ब्रिज		(१८९५)
व्हां तेथें (२१)		(१८९६)
संकेत [व्हिस्ट]		(१८९६)
चेंडू फळी		(१८९६)
चक्कर नांवाचा खेळ		(१८९६)
टेनिस, गोल्फ इत्यादि खेळ		(१८९६)

मुसलमानी रियासत [हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास] (१८९९)

शालोपयोगी भारतवर्ष (१९००)

मराठी रियासत (पूर्वार्ध-१७०७ पर्यंत) (१९०२)

शालोपयोगी भारतवर्ष (द्वितीयावृत्ति) (१९०८)

ब्रिटिश रियासत (पूर्वार्ध-१७०० ते १७२७ पर्यंत) (१९०८)

ग्रीस देशाचा इतिहास (१९०८)

मुसलमानी रियासत (भाग १, सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति) (१९१०)

बालोपयोगी महाराष्ट्राचा इतिहास (१९१०)

मराठी रियासत (पूर्वार्ध-सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति) (१९१५)

मराठी रियासत (मध्यविभाग-१) १७०७-१७४०) (१९१७)

मराठी रियासत (मध्यविभाग-२) १७४०-१७५०) (१९२१)

मराठी रियासत (मध्यविभाग-३) १७५०-६१) (१९२२)

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या सोप्या गोष्टी (१९२३)

ब्रिटिश रियासत (पूर्वार्ध-द्वितीयावृत्ति) (१९२३)

मराठी रियासत (मध्यविभाग (१) द्वितीयावृत्ति) (१९२५)

मराठी रियासत (मध्यविभाग (४) १७६१-१७७४) (१९२५)

Main Currents of Maratha History
(Patna University Lectures) (१९२५)

सरदेसाई घराण्याचा इतिहास (पूर्वार्ध-भाग १ व २-कोल्हापूरकर गो. स. सरदेसाई यांचेसह संपादन) (१९२५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नानासाहेब पेशवे (१९२६)

शिवसंस्मृति (संपादक) (१९२७)

Shivaji Souvenir [Editor] (१९२७)

मुसलमानी रियासत भाग १ तृतीयावृत्ति (१९२७)

मुसलमानी रियासत भाग २ तृतीयावृत्ति (१९२८)

मराठी रियासत (उत्तर विभाग, १–१७७४–१७८३) (१९२९)

सरदेसाई घराण्याचा इतिहास उत्तरार्ध खंड १ ला (१९२९)

इंग्लिश भाषेची गृहशिक्षा–द्वितीयावृत्ति (१९२९)

सरदेसाई घराण्याचा इतिहास (उत्तरार्ध–खंड २ रा) (१९२९)

पेशवे दप्तर–निवडक कागदपत्र (संपादक) भाग १ ते ४५ (१९३०–३४)

मराठी रियासत (उत्तर विभाग २–१७८४–१७९५) (१९३०)

शालोपयोगी भारतवर्ष १८ वी आवृत्ति (१९३१)

मराठी रियासत (उत्तर विभाग ३–१७९५–१८४८) (१९३२)

चित्रमय हिंदी राजवंश (१९३२)

Main Currents of Maratha History
(2nd Edition Revised and Enlarged) (१९३२)

ऐतिहासिक पत्रव्यवहार (कृ. पां. कुळकर्णी व या. म. काळे
यांचेसह संपादन) (१९३३)

Hand Book to the Records in the Alienation Office (१९३३)

श्यामकान्तचीं पत्रें (१९३४)

बालोपयोगी महाराष्ट्राचा इतिहास
सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति (१९३५)

राजे शहाजी (मराठी रियासत) (१९३५)

शककर्ता शिवाजी (मराठी रियासत) (१९३५)

उग्रप्रकृति संभाजी (मराठी रियासत) (१९३५)

शालोपयोगी भारतवर्ष (२० वी आवृत्ति) (१९३६)

अव्वल मराठशाहीचें अंतःस्वरूप (रा. ब. श्री. ग. परांजपे स्मारकनिधि
व्याख्यानमालेंतील व्याख्यानें, नागपूर विश्वविद्यालय) (१९३६)

स्थिरबुद्धि राजाराम (मराठी रियासत) (१९३६)

Poona Affairs (Poona Residency Correspondence)
(Malet's Embassy) (१९३६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानचा प्राथमिक इतिहास	(१९३७)
ब्रिटिश रियासत उत्तरार्ध मुद्रणप्रत	(१९३८)
महादजी शिंदे यांचीं पत्रें	(१९३८)
Poona Residency Correspondence	(१९३८)
Palmer's Embassy } Close's Embassy }	In Press

२   १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

पृष्ठ

मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या [पांडुरंग स. पिसुर्लेकर] १७

मराठी राज्यांतील न्यायपद्धति [ना. गो. चापेकर] ३९

मराठे, रजपूत व शीख [ना. के. बेहेरे] ४५

महत्पूर लढाईच्या वेळचा पत्रव्यवहार [सरदार मा. वि. किबे] ५७

'राजनीति' अमात्यांची कशी ? [वि. भि. कोलते] ६५

त्रिंबकजी डेंगळे [वि. स. वाकसकर] ८१

परकीयांचें व धर्मभ्रष्टांचें हिंदुकरण [अ. स. अळतेकर] ९१

मराठेशाहींतील फौजा [नानासाहेब शिंदे] ९७

मराठ्यांचे माळव्यांतील दोन प्रबळ शत्रू [चिं. ब. लेले] १०९

रामटेक येथील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख [वा. वि. मिराशी व ल. रा. कुळकर्णी] ११५

मराठशाही लष्कर (इ. स. १७९५) [वि. गो. दिघे] १३५

देवाजीपंत चोरघोडे यांचें एक वाङ्मय स्मारक [स. ल. कात्रे] १४३

राजपूत–मराठे युद्ध [मा. वि. गुजर] १५७

नानासाहेब पेशवे यांचा द्वितीय विवाह [य. खु. देशपांडे] १७३

शिवभारतकार (अनुपुराणकर्ता) कवीन्द्र परमानन्द आणि त्याचे वंशज [कृ. ना. देशपांडे] १७७

रियासतकार सरदेसाई [श्री. रा. टिकेकर] १८७

सूचि २०१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्मारक ग्रंथांतील लेखांचा सारांश

मराठ्यांचा गोव्याकडील स्वाऱ्या—प्रो. पांडुरंगराव पिसुर्लेंकर यांच्या लेखांत श्री छत्रपति शिवाजीपासून शाहू महाराजांपर्यंतच्या सर्व छत्रपतींचे गोव्यांशीं व गोवेंकर फिरंग्यांशीं संबंध कसकसे आले तें विस्तारें करून सांगितलें आहे. [पृ. १७

मराठी राज्यांतील न्यायपद्धति—श्री. ना. गो. चापेकर यांनीं प्रचलित ब्रिटिश न्यायपद्धतीशीं मराठ्यांच्या न्यायपद्धतीचीही तुलना केली आहे. मराठी राज्यांत 'कायदे' नव्हते, ते करण्याची जरूरी कोणाला भासली नाहीं; कामाच्या पद्धती (प्रोसीजर) चे कांहीं नियम ठरले नव्हते; वकिलांचा वर्ग निर्माण झाला नव्हता;...एकंदरींत न्याय करण्याच्या पद्धतीला शास्त्रीयता प्राप्त झाली नव्हती, तरी मराठी राज्यांत लोकांवर अन्याय होत असे असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं. [पृ. ३९

मराठे, रजपूत व शीख—मराठे व्यवहारी, धूर्त व थोडे भित्रे होते. 'आज वाचलों, तर उद्यां काम करूं' असें त्यांचें धोरण होतें. परस्वापहरणांत मराठ्यांना पाप वाटत नव्हतें, या मराठ्यांच्या गुणावगुणांशीं रजपुतांच्या गुणावगुणांची प्रो. ना. के. बेहेरे यांनीं तुलना केली आहे. रजपूत चांगले धडधाकट असत; मरूं किंवा मारूं या वृत्तीनें ते रणावर जात; समरभूमीवरून ते कधीं पळत नसत. त्यांनीं दुसऱ्याचा मुलूख कधींच लुटला नाहीं.

शीखांचें राज्य स्वतंत्रतेच्या इच्छेनें नसून धार्मिक भावनेनें प्रेरित होतें, म्हणून त्यांचें राज्य अल्पकाल टिकलें....

अशा प्रकारें मराठे, रजपूत व शीख या तीनही लोकांच्या गुणावगुणांची छाननी बेहेरे यांनीं मार्मिकपणें केली आहे. [पृ. ४५

महत्पूर लढाईच्या वेळचा पत्रव्यवहार—इंग्रज व होळकर यांच्या फौजा महत्पूर येथें झुंजल्या. त्या झुंजींत होळकरांचा पराभव झाला, त्याचीं कारणें काय हें कांहीं खासगी पत्रांतून व्यक्त होत आहे. होळकरांचे कारभारी **तात्या जोग** यांनीं लिहिलेलीं बारा पत्रें सरदार माधव विनायक किबे यांनीं संपादिलीं आहेत. सामाजिक दृष्ट्याही हीं पत्रें अभ्यसनीय आहेत. [पृ. ५७

'राजनीति' अमात्याची कशी?—आज्ञापत्राचा आरंभ व शेवट, त्यांतील कांहीं भाग, वतनासंबंधींचा उल्लेख इत्यादिकांवरून राजनीतीचा लेखक रामचंद्रपंत खास नव्हे, असें प्रो. कोलते यांचें म्हणणें आहे. शिवाय आज्ञापत्रांत ताराबाईची मुक्तकंठानें स्तुति आढळते. म्हणून "आज्ञापत्र" रामचंद्रपंतानें लिहिलेलें नव्हे. तें नीलकंठ मोरेश्वर प्रधान यानें लिहिलेलें असावें असें प्रो. कोलते यांस वाटतें. [पृ. ६५

त्रिंबकजी डेंगळे—राव बाजीच्या अमदानींत पंढरपुरीं गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचा खून ज्या डेंगळ्यानें करविला त्या डेंगळ्याचें चरित्र श्री. वि. स. वाकसकर यांनीं थोडक्यांत सांगितलें असून पटवर्धन व प्रभाकर शाहीर यांचीही थोडीशी माहिती त्यांनीं दिली आहे. [पृ. ८१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परकीयांचें व धर्मभ्रष्टांचें हिंदुकरण—परकीयांचें व धर्मभ्रष्टांचें हिंदुकरण अगदीं प्राचीन कालापासून चालत आलें आहे. "**कृण्वन्तो विश्वमार्यम्**" हा मंत्र आर्यांनीं अगदीं सार्थ करून दाखविला होता. इ. स. ११ व्या शतकांत मात्र ब्राह्मण शुद्धीकरणाविरुद्ध जाऊं लागले. ती वृत्ति सुमारें ९ शतकें टिकली. हें डॉ. अळतेकर यांनीं दाखविलें आहे. [पृ. ९१

मराठेशाहींतील फौजा—सरंजामी पद्धतीमुळें एकंदर 'दौलतीचें' नुकसान कसें ओढवलें वगैरे विवेचन ज० नानासाहेब शिंदे यांनीं केलें आहे "मूळ सत्ता छत्रपतींचीं, सर्वाधिकार पेशव्यांचा, मनसबा फडणिसांचा व तरवार सरदारांची" अशी चार ठिकाणीं मराठी दौलतीच्या सत्त्वाची वाटणी झाल्यानें एकतंत्री कारभार अशक्य होऊन बसला.

कवायती कंपूचा आश्रय केल्यानें मराठ्यांचे हित झालें कीं नुकसान झालें, यासंबंधींची चर्चा त्यांनीं समतोल दृष्टीनें केली आहे. [पृ. ९७

मराठ्यांचे माळव्यांतील दोन प्रबल शत्रू—गिरधरबहादूर व दयाबहादूर या दोघा काका पुतण्यांशीं मराठ्यांच्या लढाया केव्हां केव्हां व कसकशा झाल्या तें श्री. चिं. ब. लेले यांनीं उपलब्ध साधनांच्या आधारानें स्पष्ट केलें आहे. [पृ. १०९

रामटेक येथील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख—रामटेक येथील एका शिलालेखासंबंधीं पुष्कळ विद्वानांनीं लिहिलें असलें तरी तो संपूर्ण शिलालेख अद्याप कुणीच छापला नसल्यानें प्रो. वा. वि. मिराशी व श्री. ल. रा. कुळकर्णी या उभयतांनीं तो चिकित्सक दृष्टीनें संपादून छापला आहे. त्यांतील निर्दिष्ट देवळांची व स्थळांची यादी वेगळी जोडल्यानें व त्या शिलालेखाचा कालनिर्णय ठरविल्यानें हा लेख अभ्यासकांस अत्यंत उपयोगी होईल. लेखकद्वयांच्या मतें हा शिलालेख रामदेवराव यादवाच्या वेळचा आहे. [पृ. ११५

मराठेशाही लष्कर—पेशवे दरबारचा इंग्रजी वकील मॅलेट हा खर्ड्याच्या लढाईंत हजर होता. त्यानें मराठी लष्कराची एकंदर व्यवस्था पाहिली आणि तिजबद्दल विस्तृत व विवेचक रिपोर्ट वरिष्ठास सादर केला. त्याचा हा अनुवाद श्री. वि. गो. दिघे यांनीं केला आहे. "पायदळ व तोफखाना बाळगल्यामुळें मराठ्यांच्या हालचाली पूर्वीच्या चपळाईनें होणें शक्य नाहीं...आपल्यासारख्या राष्ट्राशीं मराठ्यांची गाठ पडली तर तोफखाना व पायदळें त्यांना मारकच ठरतील" हें मॅलेटचें भाष्य होतें. [पृ. १३५

देवाजीपंत चोरघोडे यांचें एक वाङ्मयस्मारक—पेशवाईंतील साडेतीन शहाण्यांपैकीं एक देवाजीपंत चोरघोडे यांच्या आश्रितानें रचलेलें 'पुरंजनचरित' हें प्रथमच प्रसिद्ध करण्याचें श्रेय श्री. सदाशिव लक्ष्मण कात्रे यांस दिलें पाहिजे. नाटक रचनेचा काळ व नाटककाराविषयीं माहिती यांची थोडक्यांत चर्चा कात्रे यांनीं केली आहे. [पृ. १४३

राजपूत-मराठे युद्ध—१७५४-५६ मध्यें झालेल्या राजपूत-मराठे युद्धाचा सविस्तर वृत्तांत श्री. मा. वि. गुजर यांनीं संगतवार जुळवून सांगितला आहे. राजपूत मराठे यांचे पूर्वापार संबंधही लक्षांत यावे म्हणून त्यांनीं थोडासा इतिहास आरंभीं दिला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोघांचा शत्रू एक–उद्दिष्टही पण एकच–मात्र त्याला नामोहरम करण्याचे मार्ग निराळे; उद्दिष्ट गाठण्याचीं साधनें अगदीं भिन्न–इतकीं कीं परस्पर विरोधी. [पृ. १५७

नानासाहेब पेशवे यांचा द्वितीय विवाह—नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूस द्वितीय संबंध कारणीभूत झाला असे म्हणणें आहे, त्यांत तथ्य कां नसावें तें श्री. य. खु. देशपांडे यांनीं सकारण दाखविलें आहे. [पृ. १७३

शिवभारतकार (अनुपुराणकर्ता) कवीन्द्र परमानन्द आणि त्याचे वंशज—शिवभारतकार कवीन्द्र परमानन्द हा कोण, कुठला, पुढें त्याचा वंश कसकसा झाला, त्यांच्या पुत्रपौत्राचे पराक्रम कोणते वगैरे तपशीलवार माहिती कृ. ना. देशपांडे (कोल्हापूरकर) यांनीं दिली आहे. [पृ. १७७

रियासतकार सरदेसाई—रियासतकार सरदेसाई याचें थोडक्यांत चरित्र सांगून त्यांच्या कार्याची ओळख श्री. रा. टिकेकर यांनीं करून दिली आहे. रियासतकारांचें बालपण कसें गेलें, त्यांनीं बडोद्यास काय कार्य केलें व तेथून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा प्रपंच कसा फोफावला इत्यादि माहिती या परिचयपर लेखांत आहे. [पृ. १८७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदेसाई स्मारक ग्रंथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या

[लेखक—पांडुरंग स. पिसुर्लेकर, गोवें]

सतराव्या शतकाच्या मध्यार्धांत पोर्तुगीज अंमलाखालील गोवा प्रांताच्या सीमा आजच्या इतक्या विस्तृत नव्हत्या. कारण त्यांत केवळ तिसवाडी, बार्देज व साष्ट ह्या महालांचा अंतर्भाव होत असे. ह्यालाच पोर्तुगीज लोक 'जुनी काबिजाद' असें म्हणतात.

शिवाजीनें कुडाळ, भतग्राम व पेडणें ह्या दक्षिण कोंकणांतलि प्रदेशांत स्वारी केल्यावर तेथील लखम सांवत (कुडाळ), केशव नाईक व केशव प्रभू (पेडणें), रवळू शेणवी (भतग्राम) वगैरे विजापुरकराच्या सत्तेखालील देसायांनीं शिवाजीशीं दोन हात केले. पण त्या नरश्रेष्ठापुढें त्यांचा निभाव लागला नाहीं, म्हणून पोर्तुगीज अंमलाखालील गोवा प्रदेशांत त्यांस पळून जावें लागलें. हे देसाई पोर्तुगीज प्रांतातून बाहेर पडून केव्हां केव्हां आपल्या पूर्वीच्या देसकतीमध्यें पुंडावा माजवीत असत.

अशा एका प्रसंगीं लखम सांवत व त्याचा पुतण्या नारोबा सांवत ह्यांनीं फिरंग्याच्या शिकवणीनें ता. १५ सप्टेंबर, १६६७ रोजीं वेंगुर्ल्यावर हल्ला करून पोर्तुगीजांचे अंतस्थ शत्रू जे डच, त्यांच्या कांहीं व्यापाऱ्यांस उपद्रव दिला. त्यामुळें डच लोकांनीं शिवाजीकडे तक्रार केली आणि त्या लोकांच्या प्रेरणेनें शिवाजीनें ता. २० नोव्हेंबर, १६६७ रोजीं बार्देजवर स्वारी केली. तीन दिवसांत शिवाजीच्या सैन्यानें बार्देज लुटला आणि तेथील पुष्कळ 'रयेत लोक खेलबानां मई व अवरता व कचेबचे'† धरून नेले. शिवाजीनें सुमारें १६०० लोक कैद करून नेले. त्यांत पुष्कळशा स्त्रिया व तरुण मुलीहि होत्या. वेंगुर्लें येथील डच अधिकाऱ्यानें लिहिलेल्या एका पत्रामध्यें असें म्हटलें आहे कीं, शिवाजीनें बार्देजमधील ज्या बायका धरून नेल्या त्या आपल्या शिपायांस विकण्यासाठीं !§

शिवाजीच्या ह्या स्वारीची सूचना गोवेंकर सरकारास पांच दिवस पूर्वीं हेरांकडून मिळाली होती. तीस अनुसरून फिरंग्यांनीं शक्य तों बंदोबस्त ठेविला. गोंवेंकराच्या सैन्यांत रेवडें व नादोडें येथील राणे त्याचप्रमाणें गोव्यांत वास्तव्य करणारे कुडाळ, भतग्राम, पेडणें वगैरे महालांतील देसाई यांचें सैन्य होतें. ह्या देसायांपैकीं कांहीं देसायांचीं कुटुंबें बार्देजमध्यें असत. तीं त्यांनीं शिवाजीच्या भीतीनें तावडतोब गोवा बेटांत नेऊन ठेविलीं.

---

† शिवाजी व पोर्तुगीज यांमध्यें स. १६६७ त झालेला तह–*Shivaji Souvenir* p. 125.

§ Dr. Bal Krishna कृत *Shivaji the Great*, Vol. 1, Part II, p. 573-

२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोर्तुगीज लोकांस न जुमानतां शिवाजीचें सैन्य बार्देजमध्यें घुसून दोन तीन दिवसांत तेथील पुष्कळ गांव त्यानें लुटले. मराठ्यांनीं त्या प्रदेशांत इतका धुमाकुळ मांडला कीं, खासा विजरईस आपलें निवडक सैन्य घेऊन शिवाजीच्या प्रतिकारासाठीं बार्देजमध्यें जावें लागलें. तेथें ता. २२ नोव्हेंबर रोजीं त्याची शिवाजीच्या सैन्याशीं गांठ पडून लढाई झाली. मराठयांच्या सैन्यांत सहा हजार लोक असून त्यांत एक हजार घोडेस्वार होते. पण हें सैन्य निरनिराळ्या जागीं विखुरलेलें असल्यामुळें पोर्तुगीजांस तात्पुरता जय मिळाला.

विजरई कोंदि द सां विसेंत यानें ता. २९-१२-१६६७ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे कीं, "शत्रूशीं लढाई देतांना आपणाजवळ अवघे ८४ लोक होते; असें असूनहि आपण त्यास जिंकला व पळवून लाविला. त्यामुळें त्यानें आपणाजवळ तहाची याचना केली आणि आपण आपल्या मर्जीप्रमाणें त्याज़कडे तह केला.§" केवळ मूठभर पोर्तुगीज सैन्याकडून आपण शिवाजीस जिंकल्याबद्दल दुसऱ्या एका पत्रांत ह्या विजरईनें आत्मप्रौढीपर उद्गार काढले आहेत.¶

खरी गोष्ट ही कीं, शिवाजीनें बार्देजवर जी स्वारी केली तिचा उद्देश केवळ त्या प्रदेशावर छापा घालून तेथें जाऊन राहिलेल्या कुडाळकर देसायांस धरून न्यावें व तेथें शक्य ती लूट मिळवावी, असा होता.† शिवाजीस बार्देजमध्यें थोडीबहुत लूट मिळाली. पण त्याचे शत्रू जे सांवत वगैरे कोंकणांतील देसाई ते बार्देजहून निघून त्यापूर्वीच गोव्यांत जाऊन राहिले होते. त्यामुळें ते त्याच्या हातीं लागले नाहींत.$

विजरई कोंदि द सां विसेंत व मराठे यांची लढाई झाल्यावर ता. २२ रोजीं शिवाजी डिचोली येथें गेला व तेथून त्यानें तहाच्या वाटाघाटीस सुरवात केली. शिवाजीनें पोर्तुगीजांस सांगितलें कीं, आपण जी बार्देजमध्यें स्वारी केली ती वेंगुर्लें येथील डचांच्या सांगणेवरून.‡ गोवेंकरानें डचांकडे तद्विषयीं तक्रार केल्याचे कागदपत्र गोवें दप्तरांत उपलब्ध आहेत.

---

§ प्रस्तुत लेखकाचा A Incursâo de Shivaji em Bardez शीर्षक *Heraldo* मध्यें ता. २९-७-१९३७ रोजीं छापलेला लेख.

¶ गोवें दप्तरांतील *Livro de Chaul* No. 1.

† उपरनिर्दिष्ट A Incursâo de Shivaji हा लेख व डॉ. बाळकृष्णकृत *Shivaji the Great*, Vol. 1.

$ शिवचरित्र कार्यालयाकडून प्रसिद्ध झालेल्या *English Records on Shivaji*, 1931, पृ. ११९ मध्यें एका पत्रांत शिवाजीच्या बार्देजवरील स्वारीचें कारण निराळेंच दिलें आहे. पण ह्या कारणास इतरत्र पुरावा मिळत नाहीं. (लेखकानें उपरोक्त A Incursâo de Shivaji em Bardez ह्या लेखांत यद्विषयीं चर्चा केली आहे.)

‡ गोवें दप्तरांतील Livro dos Reis Visinhos 1662–1668, fl. 73. लेखकाचा Agentes Hindus da Diplomacia Portuguesa, पृ. ४५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाजी व पोर्तुगीज यांमध्यें ११ डिसेंबर, १६६७ रोजीं तह ठरला. त्या तहाअन्वयें मराठ्यांनीं बार्देजमधील कैद करून नेलेले लोक पोर्तुगीजांकडे परत केले. पोर्तुगीजांनीं लखम सांवत (कुडाळ), केशव नाईक (पेडणें), मल सेणवी (भतग्राम) वगैरे कोंकणांतील देसाई गोव्यांत राहत होते, यांचा बंदोबस्त करण्याची शिवाजीस हमी दिली.

स. १६६७ नंतर शिवाजीचा गोव्यास फारसा उपद्रव झाला नाहीं $. तो शूर व मुत्सद्दीहि असल्यामुळें विजापुरकर व मोगल यांच्याशीं लढत असतां गोवेंकरांचें शत्रुत्व पत्करण्यास तो तयार नव्हता. ही गोष्ट खुद्द पोर्तुगीज विजरई आंतोनियु द मेल द कास्त्रु यास माहीत होती.† पोर्तुगीज लोकांस शिवाजीची योग्यता मात्र पूर्णपणें कळून चुकली होती. प्रत्यक्ष विजरई कोंदि द सां विसेंत यानें आपल्या एका पत्रांत म्हटलें आहे कीं, "शिवाजीची धूर्तता, शौर्य, चपळाई व शहाणपण पाहतां त्याची सीझरशीं व अलेक्झांडरशीं तुलना करतां येईल."§

शिवाजीच्या उलट संभाजीनें फिरंग्यांचें वैर संपादन केलें. स. १६८३ मधील जुलई महिन्यांत ता. २२–२३ च्या रात्रौ पोर्तुगीजांच्या **कोरला** (Morro de Chaul) ह्या किल्ल्यावर संभाजीनें लोक पाठवून तो किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. ह्या वेळीं कोरल्याचा किल्ला मराठ्यांच्या हातांत पडायाचा. पण ऐन प्रसंगीं तेथील किल्लेदारास सिद्दी याकूतखान याजकडून सैन्याची कुमक आल्यामुळें सदरहु किल्ला काबीज करणें मराठ्यांस शक्य झालें नाहीं.¶ संभाजी व पोर्तुगीज यांची लढाई उत्तर कोंकणांत चालू असतां गोव्याहून पोर्तुगीजांस मदत होई. यासाठीं गोवेंकरास खुद्द गोमांतकांत तंबी देण्याच्या हेतूनें मराठ्यांनीं **थोरलें जुवें** (santo Estevão) ता. २४-११-१६८३ रोजीं घेतलें. पण २६ तारखेस त्यांस तें सोडावें लागलें. ता. ११-१२-१६८३ रोजीं गोव्यांतील साष्ट व बार्देज हे दोनहि महाल संभाजीनें काबीज केले. तत्कालीन कांहीं पोर्तुगीज लेखांत ह्या लढाईचें विस्तृतपणें वर्णन केलेलें आढळतें.

$ कांहीं पोर्तुगीज व इंग्रजी कागदपत्रांवरून दिसतें कीं, स. १६६८ मध्यें शिवाजीनें साष्ट व बार्देज ह्या फिरंग्यांच्या प्रदेशावर स्वारी करण्याचा प्रयत्न केला होता. पण ही गोष्ट शिवाजीनें नाकबूल केली. (लेखकाचा *Shivaji*, p. 27–28; Sir J. Sarkar, *Shivaji*, 1929, p. 243–244; *English Records on Shivaji*, p. 125–6).

† ता. ११-६-१६६३ चें पत्र (लेखकाचा *Shivaji*, पृ. ७)

§ *Cf.* "...as astucias, o valor, a actividade, e a prudencia militar deste homem se pode igoalar com a dos Cesares e Alexandres." (*Oriente Portugues*, nos. 7, 8 e 9, p. 309).

¶ गोवें दप्तरांतील Livro de assentos do Conselho do Estado, de 28-4-694, fls. 16–17.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा एका लेखांत मराठ्यांनीं मडगांव येथील कित्येक कॅथोलिक बायकांवर बलात्कार केल्याची माहिती असून त्यांत असे उद्गार काढलेले आहेत कीं, अशा तऱ्हेचीं क्रूर कृत्यें हिंदुस्थानामध्यें पूर्वी केव्हांच घडलीं नसतील !‡

लढाईच्या प्रसंगीं स्त्रियांवर शत्रूच्या सैन्याकडून अत्याचार होणें विशेष नवलाची गोष्ट नव्हे. पण मराठ्यांकडून खुद्द संभाजीच्या समोर असा प्रकार कां झाला याचें कारण कळत नाहीं. बंगालमध्येंहि मराठ्यांच्या एका स्वारींत अशाच तऱ्हेचीं कृत्यें घडल्याचें सर जदुनाथ सरकार लिहितात.$ मराठे शिपाई गोव्यांतील कॅथोलिक बायकांवर किती अमानुषपणें बलात्कार करीत त्याबद्दल अद्यापि इकडे आख्यायिका ऐकूं येतात.¶

फिरंगी लोक मराठ्यांच्या हद्दींत जाऊन तेथील अनेक स्त्रीपुरुषांस धरून आणीत आणि त्यांस पुष्कळ वेळां कॅथोलिक धर्माची दीक्षा देत. पण ते त्यांस गुलाम म्हणून विकीत नसत. त्याच्या उलट स्थिति मराठ्यांमध्यें अनेकदां दृष्टीस पडे. शिवाजीच्या बार्देजवरील स्वारींत मराठ्यांनीं धरून नेलेल्या स्त्रियांस आपल्या शिपायांस पगाराबद्दल शिवाजी विकत देणार आहे, असें वेंगुर्लें येथील डचांनीं लिहून ठेविल्याचें वृत्त मागें आलेंच आहे. पण तशी गोष्ट घडल्याबद्दल आधार नाहीं. उलट शिवाजी हा शत्रूच्या बायकांस अत्यंत आदरानें वागवी, ह्याबद्दल खुद्द शिवाजीचा पोर्तुगीज चरित्रकार **ग्वार्द** याची साक्ष आहे.§ पण संभाजीनें बार्देजमधील कॅथोलिक धर्माच्या ज्या तरुण मुली कैद करून नेल्या त्यांपैकीं कित्येकांस गुलाम म्हणून अरबांस विकण्यांत आलें अगर मुशाहरा-बद्दल शिपायांस दिलें, ह्याविषयीं पोर्तुगीज अधिकाऱ्यांनीं संभाजी छत्रपतीकडे तक्रार केल्याची माहिती गोवें दप्तरांत मिळाली आहे.

संभाजीचें सैन्य बार्देज व साष्ट ह्या गोमंतकांतील प्रदेशांत सुमारें एक महिना होतें. ह्या अवधींत त्यास तेथें पोर्तुगीज सरकारकडून फारसा विरोध झाला नाहीं. ह्या सरकारच्या हातांत केवळ **रायतुर**चा किल्ला व गोवा बेट राहिलीं होतीं. पण हीं स्थळेंसुद्धां मराठ्यांच्या ताब्यांत खात्रीनें जाणार, असें खुद्द पोर्तुगीज विजरई कोंदि द आल्व्होर ह्यास वाटत होतें. एका समकालीन पोर्तुगीज ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, संभाजीच्या सैन्यापुढें आपलें आतां कांहीं चालत नाहीं, हें पाहून कोंदि द आल्व्होर यानें जुनें गोवें येथील सेंट झेवियर याचें शव उघडून त्याच्या हातांत आपला राजदंड दिला व ह्यापुढें गोव्याचें रक्षण करण्याचें आपणास सामर्थ्य राहिलें नसल्यामुळें सेंट झेवियर यानें त्याचें संरक्षण करावें अशी प्रार्थना केली ! †

‡ लेखकाचा *Sambhaji*, पृ. ४९

$ Sir J. Sarkar, *The Fall of the Mughal Empire*, Vol. 1, p. 87.

¶ व्यंकटराव याच्या गोव्यांतील स्वारीच्या वेळची अशी एक आख्यायिका लहानपणीं आपण ऐकल्याबद्दल प्रो. धर्मानंद कोसांबी यांनीं आम्हांस सांगितलें.

§ Cosme da Guarda, *Vida do Sevagi*, 1730, p. 69.

† लेखकाचा *Sambhaji*, p. 52 व *Tumulo de S. Francisco Xavier*, p. 7.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोव्यांत असा प्रकार चालला असतां, मोगलांकडील सरदार सिद्दी याकूतखान यानें शाहा आलमकडे फिरंग्यांच्या मदतीस गोवें येथें जाण्यासाठीं परवानगी मागितली.$ याकूतखानाची विनंति मान्य करून मोगलाचें सैन्य गोव्यांत उतरलें. हें वर्तमान संभाजीस कळल्यावर त्यानें फिरंग्यांशीं तह करण्याचें योजून ता. ३ जानुआरी, १६८४ ह्या दिवशीं आपले वकील गोव्यास पाठविले. तीन दिवसानंतर फिरंग्यांतर्फे मानुयल साराइव्ह द आल्बुकेर्कि हा वकील मराठ्यांकडे गेला आणि सात तारखेस पोर्तुगीज व संभाजी यांमध्यें तह ठरला. 'जेधे शकावली'त व पोर्तुगीज साधनांमध्यें ह्या तहाविषयीं जी माहिती मिळते ती आम्ही इतरत्र दिलीच आहे.§

बार्देज व साष्ट हे दोनहि पोर्तुगीजांचे महाल मराठ्यांच्या ताब्यांत २६ दिवस होते. अखेरच्या सहा दिवसांत संभाजीनें रायतुरच्या किल्ल्यासहि वेढा घातला होता. पण तह होण्याचें निश्चित झाल्यावर मराठ्यांचें सैन्य गोव्यांतून निघून गेलें. ह्या वेळीं संभाजीचा मुक्काम फोंडें येथें होता.‡ तेथून छत्रपति घाटावर गेला. संभाजीच्या ह्या गोव्यावरील स्वारीस इकडील कॅथोलिक लोक 'व्हडलें राजीक' म्हणजे 'थोरली स्वारी' असें म्हणतात.

शिवाजीच्या बार्देजवरील स्वारीच्या प्रसंगीं जसे कित्येक राणे-देसाई फिरंग्यांच्या बाजूनें मराठ्यांविरुद्ध लढले, तसेंच संभाजीच्या स्वारीच्या प्रसंगींहि झालें. संभाजीच्या अंमलांतील बांदोडकर (फोंडें) देसाई दुलबा नाईक हा तर आपल्या सुमारें सत्तर लोकांसह पोर्तुगीज विजरई कौंदि द आल्व्होर यास लढाईच्या वेळीं येऊन मिळाला व ह्या शूर (?) कृत्याबद्दल पोर्तुगीजांनीं त्याची पाठ थोपटली आहे.¶ दुलबा नाईकाप्रमाणें रेवडें, नादोडें व पीर्ण (बार्देज) येथील सत्रोवा राणे यानेंहि संभाजीविरुद्ध लढून फिरंग्यांकडून शाबासकी मिळविली.† ह्या राण्याचें घराणें मूळपासून गोवेंकर सरकारास इमानी होतें. कुडाळकर देसाई, खेम सांवत, फोंडेंकर दुलबा नाईक प्रभृति संभाजीच्या शत्रूंस फिरंग्यांच्या शिफारसीमुळें पुढें स. १६८८ त मोगलांच्या सैन्यांत मातबर नोकऱ्या मिळाल्या.

संभाजीनें गोवेंकराशीं तह केला खरा पण तो केवळ शहाआलम आपल्या पाठीवर आला म्हणून. वास्तविक पाहतां कवि कलश व अकबर यांनीं फिरंग्याशीं संभाजीतर्फे केलेला तह पेशव्यास मुळींच रुचला नाहीं. पेशवा कवि कलशाचा अंतस्थ द्वेष करी व सदरहू तह कलुशाच्या प्रेरणेनें

$ गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध माहिती.

§ लेखकाचा *Sambhaji*, पृ. ५४–५५, व *Prince Akbar and the Portuguese*, १९२८, पृ. ४–५

‡ *Cf.* "शाहाआलम कोंकणांत चालोन आला तेव्हां त्याची (संभाजीची) स्वारी फोंडें प्रांतांतून माघारी जाहली..." (सांखळीवर देसाई राणे यासी संमत पत्र).

¶ लेखकाचा *Sambhaji*, पृ. ३५ व गोवें दप्तरांतील *Livro dos reis visinhos*, No. 4, fl. 92

† गोवें दप्तरांतील *Livro das moncöes*, No. 63, fl. 337

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यामुळें तो पाळला जाऊं नये अशी पेशव्याची इच्छा असावी, असें एका तत्कालीन पोर्तुगीज सरदारानें लिहिलें आहे. ¶

तहाच्या पूर्ततेसाठीं गोवेंकरानें स. १६८४ च्या मार्च महिन्याचे अखेरीस आपला वकील रायगडावर संभाजीकडे पाठविला. हा वकील फ्रेइ आंतोनियु द सां जुजे नामक पाद्री होता. त्याबरोबर रामकृष्ण नाईक नांवाचा हुशार ब्राह्मणहि गेला. संभाजी तहास मान्य झाला. पण मूळ तहनाम्यांत उल्लेख नसलेलीं दोन नवीन कलमें फिरंग्यांनीं पाळावीं, असा आग्रह त्यानें धरिला. तीं कलमें म्हणजे–(एक) गोवें लगतचें आजदीप बेट फिरंग्यानें सोडावें व (दुसरें) फिरंगी सरकारानें संभाजीस एक 'पोख्ती भेटी' द्यावी, व ह्या नजराण्याची किंमत एक लाख होनपेक्षां (म्हणजे ३॥ लाख रु.) कमी नसावी, अशीं होतीं.

संभाजीच्या मतें हीं दोनहि कलमें जरी प्रस्तुत तहनाम्यांत लिहिलेलीं नसलीं तरी तीं तहाच्या वेळीं पोर्तुगीज वकील मानुयल साराइव्ह द आलबुकेर्कि यानें कबूल केलीं होतीं. शेवटीं, ता. ६ सप्तंबर, १६८४ रोजीं पोर्तुगीजांचा पाद्री वकील व संभाजी छत्रपति यांमध्यें ठरलें कीं, छत्रपतीचे वकील गोव्यास जाऊन रायगडावर परत येईतोंपर्यंत लढाई तहकूब ठेवावी. ‡

संभाजीचे वकील डिसेंबर, १६८४ मध्यें गोव्यास पोंचले. ते दोघे इसम असून एकाचें नांव सिदोजी फर्जंद व दुसऱ्याचें रंगाजी लकिमिदार (लक्ष्मीधर ?) असें होतें. रंगाजी लक्ष्मीधरास पोर्तुगीज भाषा अवगत असून त्यानें ह्या भाषेंत लिहिलेलीं पत्रें आम्हांस उपलब्ध झालीं आहेत. गोव्यांत आलेल्या ह्या संभाजीच्या वकिलांस इकडील सरकारानें कैदेंत टाकिलें† व अशा रीतीनें संभाजी व पोर्तुगीज यांमध्यें झालेल्या सदर तहास मूठमाती मिळाली.

संभाजीच्या मृत्यूनंतर (मार्च, १६८९) महाराष्ट्रांतील जनतेमध्यें मोगलांच्या सत्तेविरुद्ध जो नवीन जोम उत्पन्न झाला त्याचा प्रतिध्वनि गोव्यालगतच्या देसायांमध्यें देखील उमटलेला दिसतो. **मणेरी, सांखळी, सत्तर फोंडें, चंद्रवाडी** येथील देसाई 'स्वामीचें राज्य देव ब्राह्मणाचें विश्रामस्तान 'ह्या तत्त्वानें मोहित होऊन राजारामाच्या सैन्यामध्यें दाखल झाले.§

राजाराम जिंजीस जात असतां त्याला पकडण्यासाठीं मोगलांचीं फर्मानें जिकडे तिकडे सुटलीं होतीं. गोवेंकरासहि नबाब बहादुरखानाकडून ह्याविषयीं पत्र आलें. कुडाळकर देसाई ह्या वेळीं गोव्यांत राहात होता. मोगलांचें सैन्य लवकरच कुडाळ येथें जाणार आहे त्यास मदत करण्यासाठीं खेम सांवतास तयार राहाण्यासाठीं त्याच पत्रीं आज्ञा झाली होती.

¶ Joseph de Mello e Castro चें ता. १९-६-१६८४ चें पत्र (गोवें दप्तर).

‡ लेखकाच्या *A Portugeuse Embassy to Raigad* ह्या निबंधांत ह्याविषयीं सविस्तर माहिती दिली आहे.

† गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध माहिती.

§ लेखकाचा *Rajaram*, पुरवणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बहादुरखान याच्या आज्ञेप्रमाणें फिरंग्यांनीं खेम सांवतास सैन्य घेऊन मोगलांच्या मदतीस कुडाळकडे जाण्यास सांगितलें. पण सांवताची आई वारून अद्याप बारा दिवस झाले नव्हते. त्यामुळें खेम सांवतानें बाबू देसाई व झांबा सांवत यांस आपल्या सैन्यासह पुढें पाठविलें आणि त्यानंतर कुडाळ मराठ्यांकडून सोडण्याकरितां मोगलांच्या सैन्यास तो स्वतः जाऊन मिळाला. §

राजारामास पकडण्यासाठीं मोगलांनीं पुष्कळ खटपट केली तरी त्यानें जिंजी गांठलीच. मराठ्यांचा राजा जिंजीस पोंहोचण्यापूर्वी थोडे दिवस हा किल्ला शिवाजीच्या एका जांवयानें ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा प्रयत्न निष्फळ होऊन सदर किल्ला राजारामाच्या हातीं आला. ‡

राजारामाची सत्ता जिंजीकडे प्रस्थापित झाल्यामुळें मोगलांचें बरेंचसें सैन्य कोंकणांतून निघून गेलें. त्यामुळें इकडील जनतेस मोगलांविरुद्ध लढाई करण्यास जास्त जोम आला.

मोगल आणि मराठे ह्यांच्या चालू लढ्यांत फिरंगी सरकारचें राजकारण दुटप्पी होतें. एके बाजूस मराठ्यांच्या विरुद्ध आपण मोगलांस मदत करण्यास तयार असल्याचें मोगलांच्या अधिकाऱ्यांस भासवावें. तर दुसऱ्या बाजूस आपणास मोगलांपेक्षां मराठे जास्त प्रिय म्हणून मराठ्यांस सांगत सुटावें. इतकें मात्र खरें कीं, मुसलमानांकडून वेळोवेळीं होणाऱ्या कटकटींमुळें राजारामाचें राज्य आपल्या राज्याच्या शेजारीं असणें फिरंगी सरकारास हितावह वाटत असे. †

राजाराम जिंजीस असतां रामचंद्रपंत अमात्य व संताजी घोरपडे यांनीं मोगलांविरुद्ध चालविलेल्या लढ्यांत कोंकणांतील कित्येक देसायांनीं जातीनें भाग घेतला होता. संभाजीच्या कालापासून मराठ्यांना गोवेंकरांचा राग होताच. त्यामुळें ता. १५-११-१६९४ च्या पूर्वी कांहीं दिवस रावजी शामराज याची एक तुकडी बार्देजमध्यें घुसून तेथील लोकांकडून त्यानें माणसी तीन रुपये पट्टी सक्तीनें वसूल केली. ¶ अशाच तऱ्हेची आणखी एक मराठ्यांची स्वारी गोमांतकांतील साष्टी महालांत ता. २५ एप्रिल, १७१७ रोजीं झाली. ह्या स्वारींत **कुंकळ्ळी, वेरडें व मडगांव** हीं तीन गांवें मराठ्यांनीं लुटलीं. $

---

§ कित्ता, पृ. २

‡ Yvonne Robert Gaebele, कृत *Une Parisienne aux Indes aux XVIIe. siecle*, 1937, p. 70 हा फ्रेंच ग्रंथ.

† लेखकाचा *Rajaram*, पृ. ५; *Arquivo das Colonias*, Lisboa, 1917, Vol. I, p. 135.

¶ लेखकाचा *Rajaram*, p. 4.

$ लेखकाचा *Como se Perdeu Ba,caim*, पृ. ४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७१७ पासून, सुमारें बावीस वर्षें मराठ्यांच्या टोळ्यांनीं गोव्यास उपद्रव दिला नाहीं. सन १७३९ त मराठ्यांची पुनः गोव्यांकडे स्वारी झाली. ह्या मोहिमेची विस्तृत हकीकत आम्ही इतरत्र दिली आहे.§

सन १७३७ त उत्तर कोंकणामध्यें पेशव्यांनीं पोर्तुगीजांशीं लढाई चालू केली व गोव्यांतून तिकडे रसद पोंहचत असे तीस पायबंद घालण्यासाठीं गोव्यावरहि हल्ला केला.§

" वसईपेक्ष्या गोवें जागा बंका ऐसा कितेकांचा निशा होत. तेथें फौजा गेल्यानें कांहीं येक येत्न नाहीं. व फिरंगी लोक येक पैसा कांहीं देणार नाहींत. याबद्दल गोंवेस फौजा रवाना केल्या नव्हत्या. वसईचा बहूत जोरा पाहिला. गोंवेची मदत वरचेवरी पोंहचती याबदल सांवताच्या मुलकांत व कानडे याच्या मुलकांत फौजांनीं राहून शाहा मात्र द्यावयाबद्दल अजम वेंकटराऊ वगैरे सरदार निकामी केला असें पाहून पाठविलें. त्याणी जाऊन येका येकांच जेव्हां तंबी पोंहचहून साष्टी बारदेशाची खंडणी बसविली असें यैकोन माहाराज छत्रपतीस्वामी आदीकरून अवघे सरदारलोक वगैरे यांसी अपूर्व वाटलें. वसईपेक्षां गोवें हलका यैसें दिसोन आलें त्यामुळें सर्वास उमेद जाहली..." अशी माहिती शाहू छत्रपतीच्या दरबारांतील एक सरदार रामकृष्ण चिमणाजी याच्या पत्रांत आहे. पत्रावर मिती नाहीं. पण त्याचें पोर्तुगीज भाषांतर ता. २८ आक्टोबर, १७३९ रोजीं झालें होतें. ह्या पत्रांतील संदर्भावरून स. १७३९ मधील पेशव्यानें केलेल्या गोव्यावरील स्वारीचें कारण स्पष्ट कळून येतें.

मराठ्यांकडून गोव्यावर हल्ला होणार ह्याची जाणीव पोर्तुगीज अधिकाऱ्यांस पूर्वीच होती. संवदेकराचा फोंडें येथील सर सबनीस नरसिंगराव ह्यानें ता. २३ जानुआरी, १७३९ रोजीं दुपारच्या सहा वाजतां गोवेंकरास लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्यांत त्यानें म्हटलें आहे, कीं गोव्यांतील साष्टीवर हल्ला करण्यास निघालेलें मराठ्यांचें सैन्य खानापुरास ज्या तासास पोंचलें त्या तासापासून आपण वेळोवेळ त्याची हालचाल फिरंगी सरकारास कळवीत आहों.¶

वस्तुस्थिति अशी होती कीं, मराठ्यांचें सैन्य गोव्यांत जेव्हां घुसलें तेव्हां शत्रूस विरोध करण्याइतकें सैन्य फिरंगी सरकाराकडे राहिलें नव्हतें.

मराठ्यांचें सैन्य ता. २३ जानुआरी रोजीं दुपारच्या तीन वाजतां दिगी घाटांतून उतरून कुंकळ्ळीच्या बाजूनें रात्रौ साष्टींत शिरलें. मराठे मडगांवजवळ बिनविरोध पोंहोचले आणि त्यांनीं तिकडे आपला तळ दिला. मराठ्यांकडे चार हजार घोडेस्वार, सहा हजार पायदळ, आणि सुमारें दोन हजार पेंढारी इतकें सैन्य होतें. मराठ्यांचे मुख्य सरदार व्यंकटराव घोरपडे (बाजीरावाचा मेहुणा) व दादाजीराव भावे नरगुंदकर हे होते.

---

§ लेखकाचे *Come se Perdue Ba,caim* व *Maratas em Ba,caim* हीं दोन पुस्तकें. रा. य. न. केळकरकृत 'वसईची मोहीम' ह्या ग्रंथांत स. १७३९ मध्यें पेशव्यानें गोव्यावर केलेल्या स्वारीचें वर्णन आहे.

¶ गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध माहिती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांच्या सैन्यानें २६ जानुआरीस मडगांव शहर घेतलें व साष्टींत आपला अंमल बसविला. पोर्तुगीजांकडे केवळ रायतूर व मुरगांव येथील किल्ले राहिले. ता. २ मार्चला फोंडें येथील किल्ला संवदेकराकडून मराठ्यांनीं घेतला. ता. ५ मार्चला श्रीमंत बाजीरावाच्या आज्ञेवरून सांवतवाडीकर भोसले यांनीं बार्देजवर स्वारी केली आणि तो महाल काबीज केला. त्यामुळें साष्ट व बार्देज हे दोनहि महाल रायतूर व मुरगांव येथील किल्ले वगळून मराठ्यांनीं ताब्यांत घेतले.

मराठ्यांनीं फोंडें घेतल्यावर त्यांस गोवें बेट घेण्यास फारसें अशक्य नव्हतें. त्यांनीं थोडे दिवस जास्त जोर धरला असता तर गोव्याची राजधानी देखील मराठ्यांच्या हातांत पडणें कठीण नव्हतें. गोवेंकराची ह्या वेळीं किती भयंकर तारांबळ उडाली होती त्याची कल्पना तत्कालीन पोर्तुगीज लेखांवरून सहज येते. पोर्तुगीज अधिकाऱ्यांची तर खात्री झाली होती कीं, आतां मराठे हे गोव्यांत शिरल्याखेरीज राहाणार नाहींत ! त्यामुळें फिरंग्यांनीं मोठ्या त्वरेनें तेथील संपत्ति व पुष्कळ श्रीमान कुटुंबें मुरगांवास पोंहोचतीं केलीं. ह्या गोष्टीचा उल्लेख दादाजीरावानें चिमणाजी अप्पास लिहिलेल्या एका पत्रांतहि मिळतो. सदर पत्रांत म्हटलेलें आहे. "...गोमंतकीच्याहि मनसबेवर आहूं. परंतु गोवेंतील वितविशई कुली मुरगांवास गेला. उरतां वरें मात्र राहिलीं आहेत. चौघा सरदाराचें मतें जसें होईल तसें पाहूं..." §

उपरोक्त उताऱ्यावरून प्रत्यक्ष सरदार दादाजीराव भावे यास गोवें काबीज करण्यांत लुटीखेरीज दुसरें एखादें उच्च ध्येय असल्याचें दिसत नाहीं. महाराष्ट्रधर्मरक्षणासाठीं (?) पोर्तुगीजांच्या विरुद्ध संग्राम करणाऱ्या मराठ्यांस त्याच सत्तेखालीं असलेल्या गोव्यांतहि महाराष्ट्र धर्माची पताका फडकावण्याची दृढ इच्छा कां झाली नाहीं हें कोडें उकलण्यानें वसई मोहिमेच्या इतिहासावर देखील प्रकाश पडणार आहे. पोर्तुगीज लेखांवरून कळून येतें कीं, सरदार दादाजीरावाचें पोर्तुगीजांशीं अंतस्थ सूत्र होतें आणि त्यानें फिरंग्यांकडून पैसे घेऊन त्यांचा 'भाईचार' जोडला होता. इतकेंच नव्हे तर गोवेंकर अद्यापि हतबल झाले नाहींत, हें व्यंकटरावादि कित्येक सरदारांस दाखविण्यासाठीं रायतुरचा किल्ला तह होई तोंपर्यंत फिरंग्यांनीं लढवावा अशी दादाजीरावानें आपल्या शत्रूस (!) सल्ला दिली आणि फिरंग्यांची कुमक बिनविरोध सदरहु किल्ल्यांत जावी म्हणून वाटेंतील एका चौकीवरील पहारा देखील काढून टाकला.$ एका समकालीन पोर्तुगीज लेखांत म्हटलें आहे कीं, ह्या कृत्यास दादाजीरावाच्या पक्षाचे कित्येक मातबर सरदार अनुकूल होते.

खुद्द दादाजीराव व त्याचा मुलगा सरदार भास्करराव यांचीं कित्येक पत्रें उपलब्ध झालीं आहेत त्यांवरूनसुद्धां दादाजीरावाच्या फितुरीपणाविषयींचा आरोप संभाव्य वाटतो. गोव्याचा

§ रा. ब. सरदेसाईकृत पेशवे दप्तरांतील निवडलेले कागद, भा. १६, पृ. ११५; लेखकाचा *Maratas em Baçaim*. p. 68.

$ लेखकाचा *Como Se Perdeu Baçaim*, पृ. ९७, १०५ व १२२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विजरई मार्केज द लौरिसाल ह्यास लिहिलेल्या एका पत्रांत सरदार दादाजीराव म्हणतो:—"पेसर्जी इजनेब घांटाखालीं आलेवख्ती म।। दौलत अंतोन कारनेल अलकास§ वेदोर जराल द फजंद व दोतोर जुजे पेद्र माऊस¶ हे दोघ फिदालक मुलाजमतेस आले होते त्यांनीं अजराहे येखलासीने सांगितले बमोजिब जंजिरा (गोवा बेट) लेंच नरगुंद यावजे खातिरेंत आणून हरदु जागा थरु समजोन मदतयाविनसीं जंजिरेच्या बच्याव करून अजमराव प्रधानजीची फौज काढून येखलासी राखून मकानेस आलों हे मोहिबांस मालूम जाहलें असेल..." स. १७३९ मध्यें चिमणाजी अप्पास पाठविलेल्या एका पत्रांत जो दादाजीराव लिहीत होता कीं, 'फिरंगी म्हणजे पापात्मे. त्यांचा नाश होणें हें अपूर्व नाहीं $ तोच दादाजीराव सदर विजरई लौरिसाल यास लिहितो कीं, 'फिरंगी लोक येखलासीस बरे, इमानचे पुरे, क्रियेचे खरे, येक कडेचे माणसानें वचन दिल्हेलें तुमचे आगा देखील तफावत न पाडतां निभावणारे असें आम्हीं घाटाखालीं आले समंई बहुतांचें तोंडें आइकून दरम्याने होऊन नके बातेने उपराला करून इंदीचा (गोव्याचा) बचाव केला..." दादाजीरावाचा चिरंजीव सरदार भास्करराव यानें तर गोव्यांतील विठोजी शेणवी धुमे यास एका पत्रांत असें लिहिलें होतें कीं, "कैलासवासी वडिलांनीं सर्वांच्या श्नेहापेक्षां इंदीचा (म्हणजे पोर्तुगीज अंमलाखालील प्रांताचा) श्नेह विशेशात्कारें जोडिला आहे. फिरंगी लोक सजन. वचनाचे खरे. क्रियेचे पुरे. श्नेहास बरे. मर्दुमीस धुरंधर. त्यांचे उपमेस पृथ्वीवर कोण आहे असे कैलासवासी वडील आम्हांस पदोपदीं सांगत होते ती गोष्ट आमच्या निदर्शनास आली." सरदार भास्करराव गोवेंकराच्या चिटणीसास लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतो—"अजम दादाजीराव इंदीचे काजकामास येऊन इंदीची मेहरबानी संपादिली होती..." दुसऱ्या एका पत्रांत भास्करराव लिहितो; "...दादाजीराऊ कैलासवासी याणी सर्वांसी अमित्रपण करून मोहिबाचा भाईचारा केला...वडिलीं आम्हास सांगितलें कीं आम्ही अजम फिरंगी याची जोड केली आहे. ते तुमच्या कार्यास येतील..." दादाजीराव व व्यंकटराव ह्या दोघां प्रमुख सरदारांच्या मतांमध्यें अंतर होतें. व्यंकटरावास वाटत होतें कीं, आपण फिरंग्यांस पूर्णपणें जिंकून आपणास वाटेल तसा तह करण्यास त्यांस भाग पाडूं. पण दादाजीरावास फिरंग्याशीं जास्त कटकट न करितां आपला कार्यभाग साधून घेण्याचा होता. शिवाय बार्देज, साष्ट व फोंडें पेशव्यानें काबीज केल्यानंतर गोव्यालगतच्या प्रदेशांत पेशव्याचा हात पूर्णपणें रिघूं नये, एतदर्थ खुद्द कोल्हापुरास व साताऱ्यास खटपटीहि चालू झाल्या.

वाडीकर सांवत म्हणूं लागला कीं, आपण फिरंग्यांचे शिवशेजारी. तेव्हां त्याची मैत्री आपणास सोडतां नये! सावंतवाडीकराचेतर्फे देवबा सेणवी, जिवाजी शेणवी सबनीस, यसू सेणवी हवालदार व जिवाजी पुंडलीक ह्यांनीं गोवेंकरास कळविलें कीं, पेशव्याची स्वारी

---

§ Antonio Carneiro de Alca,coa Vedor Geral da Fazend.

¶ Jose Pedro Emaus.

$ पे. द., खं. १६, पृ. ११५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation

जी पोर्तुगीजांच्या प्रांतांत झाली आहे, तीस आपण अनुकूल नसून त्या प्रांतांतून मराठे केव्हां परत निघून जातील ह्याची आपण वाट पाहात आहोंत.§ ता. १३-४-१७३९ च्या एका पत्रांत जयराम सांवत भोसले व रामचंद्र सांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ हे गोवेंकरास लिहितात;—" इस्तादांचा व इजानेबांचा पुरातन श्नेह चालला त्यास बारदेस घेऊंस कारण म्हणावें तर मराठ्यांची सबलता पाहिली आण संवदेकर यांचीं ठाणीं अवघी घेतली. फुडां बारदेस घ्यावया कार्यावर ते आले तेव्हां इजानेबांस येसे दिसोन आलें कीं, बारदेस मराठ्यांचें हातीं पडलेने इस्तादासहि बेर नव्हे. येसें समजोन बारदेस घ्यावा लागला. तेव्हां आपलेच फौजेनसीं मराठ्यांची फौज न आणितां घेऊन आजवर राखला. मराठ्यांची फौज काय निमित्य न आणिली म्हणाल तर इस्तादचा व इजानेबाचा कदीम दोस्ती. तेव्हां तें राज्य आमचें व हें राज्य इस्तादाचें येसें समजोन आपल्या फौजेनसी घेऊन राहिलों. फुडां तरी बारदेस मराठ्यांस सहसा देणार नाहीं हा मोहिबांचा खातीरनिशा असों द्यावा. परंतु खासगत फौज ठेऊन बारदेस राखावा लागला. तेव्हां फौजेस खर्च लागला तो याविसींचा भावार्थ पूर्वपत्रीं मोहिबांस लिहून गेलेंच आहे. तेणेप्रमाणे मोहिबीं कार्य केलेने मोहिबाचा व रा॥ व्यंकटराऊ याचा तह होऊन व्यंकटराव यांची फौज वर घांटी जाई पावेतों बारदेस आम्हाकडे असावा. तदनंतर तुमचे स्वाधीन करूं. "$

छत्रपति शाहूच्या दरबारांतील नारोराम मंत्री, रामकृष्ण चिमणाजी प्रभृति मुत्सद्द्यांचा ओढा फिरंग्यांकडे होता. रामकृष्ण चिमणाजीनें गोवेंकरास कळविलें होतें कीं, फिरंग्यांनीं मराठ्यांविरुद्ध जोर धरला तर तहाच्या प्रसंगीं त्यास फायदा होण्याचा संभव आहे. तो एका पत्रांत म्हणतो कीं, 'आपण तेथेंहि जोरावरी करून आम्हांस येथें बोलावयास खुशाली होये ते गोष्ट केली पाहिजे'!

खुद्द शाहू छत्रपतीला देखील वाटत होतें कीं, " गोवें बंदर फार उत्तम. नासूं नये. बंदर नासलेमुले साहेबास फाईदा आहे येसे नाहीं. फिरंगी यांसच असलेमुले फाइदाच आहे. आण बंदरी चिजबस्त मिळती..." ¶

गोव्याकडील प्रांत व विशेषतः फोंडेचा किल्ला पेशव्यानें हस्तगत केल्याचें वृत्त करवीरकर संभाजी छत्रपतीस कळल्यावर त्यास राग आला व प्रस्तुत स्वारींत मराठ्यांनीं काबीज केलेला प्रांत सोडून देऊन त्यांनीं तेथून निघावें ह्याविषयीं त्यानें हट्ट धरला ! संभाजीनें गोवेंकरास सन १७३९ च्या अखेरीस लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे, " वसई प्रांतास राजश्री बाजीराव यांणीं आज च्यार वर्षे अंअमारतपन्हासी कथला करून वसई घेऊन तो मुलूक काबीज केला. गतवर्षी गोवें प्रांतास फौज रवाना करून आजार दिल्हा. इतकें जाले असोन तुम्हीं कांहीं इज्यानिबास लेहून पाठविलें नाहीं. या मुळें तुम्हाकडीलच नासाडी जाली आणि फोंडे तर्फेस त्याचीं ठाणी बसली. हाली बाजीराव यांणी फोंडे प्रांताची जिले आपले तावीन करावी

§ गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध माहिती.

$ कित्ता.

¶ लेखकाचा *Como Se Perdeu Ba,caim*, पृ. १२१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणिजे आपण बहूत प्रकारें चाकरी करून दाखऊ म्हणोन कितावती पाठविल्या आहेत त्यास तुम्हाकडील मजकूर राजश्री रंगो नारायण यांणी जाहीर केला जे तुम्ही या राज्यासी दुसरा विचार धरीत नाहीं. मवैन यखलासी चालावी हे उमेद बहूत धरितां त्यावरून खुशाली होऊन फोंडे प्रांत तमाम खासगीकडे ठेवावा यैसा निश्चय जाला आणि तुम्हांस बाजीरायाचा आजार लागो नये याबद्दल या तर्फेच्या फौजासहित राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यांसी या तर्फेस रवाना केले आहेत. लौकरी येऊन पावतात. तें ठिकाण बहुतां दिवसांचें आहे. तें जगवावें हाच आमचा निश्चय आहे..."

उपरोक्त उद्धृत केलेल्या उताऱ्यांवरून मराठ्यांच्या बाजूचे कित्येक प्रमुख मुत्सद्दी व अधिकारी लोक गोवेंकर फिरंग्यांशीं किती सहानुभूतिपूर्वक वागत होते हें कळून येईल. प्रस्तुत लढाईच्या वेळीं व तदनंतर झालेल्या तद्विषयक वाटाघाटी संबंधाच्या प्रसंगीं गोव्यांतील कित्येक हिंदु पुढारी फिरंग्यांच्या बाजूनें वावरतांना दिसतात. विठोजी शेणवी धुमे, बहुगुण कामत वाघ, वेंकट कामत, उपी कामत, बाबुलो सेणवी सुखटणकर, सांतू सेणवी डांगी, बाबुराव देसाई, ह्याबळू पै घांटये प्रभृति गोवेंकर हिंदु लोक फिरंग्यांचें हित साधण्याच्या उद्देशानें मराठ्यांकडे राजकारणें लावीत असत. पण फिरंगी लोकांची हिंदूंविषयीं वर्तणूक प्रायः विरोधीपणाची होती. ती इतकीं कीं, व्यंकटरावाच्या स्वारीच्या वेळीं हिंदु लोकांस सरसकट गोव्यांबाहेर हांकून लाऊन त्यांची सर्व संपत्ति जप्त करावी, अशा मताचा एक वर्ग फिरंगी अधिकाऱ्यांत होता ! § गोमांतकांतील जुन्या काबिजादींचें बहुतेक क्रिस्तीकरण शिवजन्मापूर्वीच झालें होतें हें खरें. पण व्यापार उदीम किंवा इतर व्यवसायामुळें त्या काबिजादींतील प्रदेशामध्यें अद्याप हजारों हिंदु लोक वसती करून राहिले होते, असें डच प्रवासी बाल्‌ देऊस (स. १६६२), फ्रेंच प्रवासी थेवेनो (स. १६६६), इटालियन प्रवासी जेमेली–कारेरि (स. १६९५), कॅप्टन आलेक्झांडर ह्यामिल्टन (१८ वें शतक) वगैरेंच्या प्रवासवृत्तांवरून व खुद्द पोर्तुगीज लोकांनीं लिहून ठेविलेल्या हकीकतींवरून दिसून येतें. सन १७०३ मधील १९ जानुआरीस लिहिलेल्या एका पोर्तुगीज लेखावरून कळून येतें कीं, ह्या कालीं केवळ गोवा बेटांत तीस ते चाळीस हजार हिंदु लोकांची वसती होती.$ त्यांस उघडपणें आपला धर्म आचरण्यास मनाई होती. गोव्यांतील देवळें पूर्वीच पाडलीं गेलीं होतीं आणि नवीन देवळें बांधण्यास परवानगी नव्हती. लग्नविधि वगैरे सोहळे पोर्तुगीज अमलाबाहेर जाऊन करावे लागत. पण सर्वांमध्यें हिंदु लोकांस जास्त दुःखकारक वाटणारी गोष्ट म्हटली म्हणजे पोरक्या मुलांस सक्तीनें कॅथोलिक धर्माची दीक्षा देण्यांत येत असे ही होय. ह्याबाबत पुष्कळ वेळां हिंदु लोक तक्रार करीत. पण धर्मसमीक्षणसभे (Inquisition) पुढें कोणाचें कांहीं चालत नसे !

फिरंगी लोकांवर व्यंकटरावानें जय मिळविल्यावर तहाच्या वेळीं हिंदु लोकांस स्वधर्माचरणास स्वातंत्र्य असावें; गोवा शहरांत एक हिंदु लोकांचें देऊळ असावें; धर्मसमीक्षण सभा (Inquisition) बंद करण्यांत यावी; हिंदूवरील 'शेंडी कर' काढण्यांत यावा, वगैरे

§ लेखकाचा *Como Se Perdeu. Ba,caim*, पृ. १२१.

$ लेखकाचा *A In cursão de Shivaji em Bardez.*

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोमांतकस्थ हिंदु लोकांच्या हितार्थ कांहीं भाषा व्यंकटरावाच्या कारभाऱ्याकडून बोलण्यांत आली. पण पुढें तहाचें काम दादाजीरावाच्या मध्यस्थीनें चालू झाल्यामुळें ह्या मुद्द्यांस महत्त्व देण्यांत आलें नाहीं.

व्यंकटरावाचा कारभारी गोविंदराव ठाकूर हा सावंतवाडीचा असल्यामुळें तो गोव्याचा माहितगार होता. त्यामुळें गोव्यांतील हिंदु लोकांस धार्मिक स्वातंत्र्य नसल्यामुळें किती त्रास पोंहोचत असे ह्याची कल्पना गोविंदपंतांस होती. पण दादाजीरावास किंवा खुद्द पेशव्यांस गोमंतकासारख्या दूरच्या प्रदेशांतील धार्मिक प्रश्नास विशेष लक्ष देण्याची आवश्यकता भासत नव्हती व ही गोष्ट पोर्तुगीज विजरईस पूर्णपणें ठाऊक होती. यद्विषयीं विजरई कोंदि द सांदोमील यानें लिहिलें आहे कीं, "गोव्यांतलि हिंदु लोकांस धर्मस्वातंत्र्य असावें ह्या मुद्द्यावर मराठे भर देतील असें वाटत नाहीं. गेल्या वर्षी वेंकटरावानें इकडे केलेल्या तहनाम्यांत ह्या विषयासंबंधानें कोणतेंच कलम घातलें नाहीं. सांतू सेणवी याकडून बाजीरावानें पाठवून दिलेल्या तहाच्या खर्ड्यांतहि ह्या बाबतींत एक शब्द देखील लिहिलेला नव्हता. भोसल्यांच्या तहाच्या वेळीं बाजीराव व चिमणाजी अप्पा यांनीं ह्या मुद्द्याची आठवण जरी काढली तरी त्यांनींच त्याकडे दुर्लक्ष्य केलें. ह्या सर्व अनुभवसिद्ध गोष्टी लक्ष्यांत आणतां मला वाटत नाहीं कीं, केवळ धर्मस्वातंत्र्याच्या मुद्द्याकरितां मराठ्यांस इतका फायदेशीर असलेल्या ह्या तहास त्यांच्याकडून विरोध होईल."§

विजरईनें लिहिल्याप्रमाणें खरोखर मराठ्यांकडून गोव्यांतील धर्मस्वातंत्र्याच्या मुद्द्यावर भर देण्यांत आला नाहीं. मग ह्या गोष्टीस विजरईनें निर्दिष्ट केलेलें उपरोक्त कारण झालें असेल किंवा दुसरी एखादी अंतस्थ भानगड उपस्थित झाल्यामुळें पेशव्यांस सदर मुद्द्याकडे काणाडोळा करणें अवश्य वाटलें असेल. इतकें मात्र खरें कीं, दादाजीरावानें चिमणाजी अप्पास लिहिलेल्या पत्रांत गोमंतकांत 'हिंदुधर्म चालवावा' असा ठराव झाल्याचें वृत्त कळविलें होतें.† पण ह्याविषयीं सदर तहनाम्यांत एक शब्द देखील आढळत नाहीं.‡ पुढें इंचबर्डच्या मध्यस्थीनें बाजीराव व पोर्तुगीज यांमध्यें तहाच्या वाटाघाटीस पुनः सुरुवात झाली त्या वेळीं श्रीमंतांनीं 'साष्टी बारदेशांत महाराष्ट्र धर्म ज्यांचा ते करितील त्यांस फिरंगी यानें चालवावें देखील गोवियांत महाराष्ट्र धर्म चालवावा' असें कलम तहाच्या खर्ड्यांत घातलें होतें.$ पण हेंहि कलम पेशव्यानें तहाच्या प्रसंगीं गाळलें !¶

ता. २ मे १७३९ रोजीं वेंकटराव व दादाजीराव ह्यांनीं गोवेंकराकडे जो तह केला, त्यांत 'फिरंगी याच्या मुलकामधें फौजा मुकाम जाहल्या आहेत त्या उठोन जाण्याच्या खर्चास फिरंगी यांही सध्यां द्यावे रुपये लाख सात' असा ठराव केला होता.

---

§ लेखकाचें *A Restauracão de Bardez e Salcete*, पृ. ३२

† पे. द. भा. १६, पृ. ११५.

‡ लेखकाचें *Como se Perdeu Ba,caim* पुरवणी मराठी.

$ लेखकाचें *Restauracão de Bardez e Salcete*. पृ. ८४.

¶ कित्ता, पृ. ४८–५०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या तहान्वयें मराठ्यांच्या सैन्यानें साष्ट व बार्देज हे महाल फिरंग्यांच्या स्वाधीन केले. फिरंग्यांकडून सर्व खंडणी वेळेवर न मिळाल्यामुळें वेंकटरावानें साष्टींतील दोन गांव-कुंकळ्ळी व व असोळणें–आपल्या ताब्यांत ठेविले. पण तेहि पुढें ता. २३ नव्हेंबर, १७४० ह्या दिवशीं पोर्तुगीजांकडे दिले.

वेंकटरावानें केलेला उपरोक्त तह पाळण्यास भोसले मात्र राजी होईना! त्यामुळें सांवताच्या ताब्यांत बार्देज होता तो सोडवण्यासाठीं फिरंगी सरकारास त्याजकडे निराळा तह करावा लागला. हा तह ता. २८ फेब्रुवारी, १७४० ह्या रोजीं डिचोली येथें विठोजी शेणवी धुमे व बहुगुण कामत वाघ ह्यांच्या द्वारें गोवेंकरानें केला आणि त्या तहान्वयें बार्देज महाल फिरंग्यांच्या हवालीं करण्यांत आला.

सांवतांनीं प्रस्तुत तह थोड्याच दिवसांनीं मोडला व ता. २१ फेब्रुवारी १७४१ रोजीं बार्देजवर हल्ला करून तो पुनः काबीज केला. पण पोर्तुगीजांनीं त्याजकडून एकच दिवसाच्या अवधींत तो परत मिळविला. ही गोष्ट ता. १३ जून १७४१ रोजीं घडली. सांवताशीं झालेल्या ह्या लढाईच्या प्रसंगी मिनिटास ३२० बार काढणाऱ्या नवीन तऱ्हेच्या सोळा तोफा फिरंग्यांनीं प्रथमतः वापरल्या. त्यांच्या आवाजाने भोसल्याच्या पोटांत धडकी भरली, असें समकालीन पोर्तुगीज लेखांत वर्णन आहे.¶

पेशवा पुनः गोव्याच्या वाटेस गेला नाहीं. फिरंग्यानींहि प्रसंग पाहून त्याच्याकडे अदबीनें वागण्याचें धोरण ठेविलें.

गोवेंकराकडे व्यंकटरावानें केलेल्या तहामध्यें अशी एक अट होती कीं साष्ट व बारदेश या मुलखांत गांवगन्ना दिवाणाचा जो वसूल होईल त्यांपैकीं शेंकडा चाळीस टक्के वसूल बाजीरावास मिळावा.$ पण ही अट फिरंग्यांनीं पाळली नाहीं. हें निमित्त धरून पेशव्यांचा सरदार गोविंदपंत ठाकूर—जो कांहीं दिवसापूर्वीं कोल्हापूरकराच्या चाकरीस राहिला होता–यानें ता. १२ मे १७४२ रोजीं सुमारे तीन हजार घोडेस्वार व तितकेंच पायदळ घेऊन साष्टींत शिरला आणि तेथें सक्तीनें खंडणी वसूल करू लागला.§ ह्या सरदारानें साष्टींत

¶ लेखकाचें *Restauracão de Bardez e Salcete*. पृ. ६६–८२. लिस्बन येथें स. १७४२ मध्यें प्रसिद्ध झालेल्या पुढील दोन पुस्तकांत यद्विषयीं उपयुक्त माहिती दिली आहे. (१) *Relacão veridica dos Successos da India* व (२) *Notcia da Viagem que fez...Marquer do Louri,cal.*

$ ता. २ जुलै १७४२ रोजीं पोर्तुगीज जनरलनें लिहिलेलें पत्र (लिस्बन येथील पुस्तकालयांत असलेलें हस्तलिखित) व J. F.

§ लेखकाचें *Como Se Perdue Ba,caim* हें पुस्तक, पृ. १२४; पुरंदरे दप्तर, भा. १ ला पृ. ९२. पृ. ९१ मध्यें "गोवें घेण्याबद्दल इंग्रजांशीं वाटाघाट" अशा सदराखालीं जो कै. पुरंदरे यांनीं लेख दिलेला आहे तो "गोवें पोर्तुगीजास सोडण्याबद्दल इंग्रजांशीं वाटाघाट" असा पाहिजे आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक पंधरवडा लुटालूट केली व पुढें सांगें येथें जाऊन तेथील किल्यास वेढा दिला. ह्या किल्यांत अणाजी प्रभू नामक संवदेकराचा प्रधान होता. गोविंदपंतानें हा किल्ला काबीज करून अणाजी प्रभूस कैद केलें. सांगेंप्रमाणें फोंडेचा किल्लाहि गोविंदपंतानें आपल्या ताब्यांत घेतला. गोव्यांतील फिरंगी अधिकाऱ्यांस सांगें व फोंडें येथील किल्ले मराठ्यांकडे गेले हें हितावह न वाटून, ता. ८ जून रोजीं त्यांनीं सांगेच्या किल्ल्यावर हल्ला केला व तो जिंकल्यावर दुसऱ्या दिवशीं जमिनदोस्त केला. पोर्तुगीज सैन्यामध्यें सहाशें युरोपियन, दीड हजार एतद्देशीय शिपाई, नवीन तऱ्हेच्या दोन तोफा होत्या. ह्या सर्व सैन्याचें आधिपत्य जनरल मानुयल सुवारीस वेल्यु ह्याकडे होतें. पण सांगेची कामगिरी ह्या जनरलच्या हाताखालील एका सरदारावर सोंपविली होती. गोविंदपंताची ह्या वेळीं धुळधाण उडून त्यास घाटावर पळून जावें लागलें. उपरिनिर्दिष्ट जनरलनें ह्या लढाईचें विस्तृत वर्णन करून म्हटलें आहे कीं, सांगें येथील मराठ्यांच्या कैद्यांपैकीं कित्येकाचीं आपण डोकीं उडविलीं व कित्येकांचे उजवे हात कापून ते त्यांच्या गळ्यांत बांधून त्यांस सोडून दिलें!

सोमवार ता. ११ रोजीं पोर्तुगीजांचें सैन्य फोंडेस जाऊन त्याच दिवशीं तेथील किल्यास वेढा दिला. कोल्हापूरकर संभाजी छत्रपतीच्या एका सरदारानें हा किल्ला बळकाविला होता. त्यानें तो लगेच पोर्तुगीज जनरलच्या स्वाधीन केला. सांगेच्या किल्ल्याप्रमाणें हाहि किल्ला जमिनदोस्त करण्याचें पोर्तुगीजांच्या मनांत होतें पण संवदेकराच्या आग्रहामुळें त्यांनीं तो किल्ला त्याच्या स्वाधीन केला.

फोंड्याच्या किल्ल्याचें महत्त्व पोर्तुगीजांस फार होतें. तो किल्ला मराठ्यांच्या हातीं न जातां संवदेकराकडे असणें फिरंग्यांस अगत्याचें वाटत असे, कारण त्यामुळें गोव्यालगतचा प्रांत आपल्या कब्यांत राहील, अशी फिरंग्यांची समजूत होती.

इ. स. १७४४ मध्यें दों मिगेल दालमैद पोर्तुगाल याची गोव्याच्या विजरईच्या जागेवर नेमणूक झाली. हा फार शूर होता. इकडे आल्यावर थोड्याच महिन्यांनीं ह्या विजरईनें भोसल्याशीं लढाई सुरू केली. त्यानें हलोर्ण (५ मे १७४६), व डिचोली (१८ मे १७४६) येथील किल्ले घेतले. ता. १६ नोव्हेंबर १७४६ रोजीं विजरई आपल्या आरमारानिशीं कायसुवाच्या उपसागरांत प्रकट झाला. तेथून ता. २३ नोव्हेंबरास त्यानें तिराकोलच्या कोटावर हल्ला चढवून तो काबीज केला. ह्या प्रसंगीं फिरंग्यांनीं भोसल्याचें बहुतेक सर्व आरमार पकडलें किंवा नष्ट केलें. ह्या आरमारांत १५ ते २० तोफा असलेलीं दहा पाल, सतरा गलबतें, तीन बतेले, एक मचवा, चार पारंग इतके नग होते. शिवाय पुष्कळ होड्याहि होत्या.§

ता. ३ डिसेंबर १७४६ ह्या दिवशीं रेडीचा किल्ला फिरंग्यांनीं हस्तगत केला. भोसल्याविरुद्ध चाललेल्या प्रस्तुत लढ्यांत संवदेकरानें ससैन्य फिरंग्यास साह्य केलें.

§ M. M. कृत *Epanaphora Indica*, Lisboa, 1746, pag. 9.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोर्तुगीज लोकांनीं सांवतावर मिळविलेल्या ह्या विजयामुळें पेशव्यांस सांवताच्या बाजूनें फिरंग्यांकडे मध्यस्थी करणें आवश्यक झालें. पेशव्यानें ह्या कामीं महिपतराव चंदा नामक वकिलाची गोवेंकराकडे नेमणूक केली. चंदा गोव्यास येऊन पुष्कळ दिवस होत आले तरी पण पोर्तुगीजांकडून तहाची कांहीं आशा त्यास दिसेना त्यामुळें पेशव्यानें सदाशिवराव भाऊ यावर ही कामगिरी सोपविली व त्याकडे मोठी सेना देऊन त्यास कर्नाटकांत पाठविला.§

ता. १२ डिसेंबर १७४६ रोजीं पेशव्यानें पिलाजी जाधवराव यास एक पत्र लिहिलें होतें. त्यांत सदाशिवराव भाऊच्या पहिल्या स्वारीचा उल्लेख स्पष्ट लिहिला आहे. तें पत्र येणें-प्रमाणें. "सांवतांशी फिरंग्यांनीं कलह मांडला आहे. सांवतांचीं दोन तीन ठाणीं फिरंग्यानें घेतलीं. सांवत पहिल्यापासून पदरचे, त्यांणीं चाकरी केली. त्यांचें साहित्य करावें जरूर आहे. यास्तव फौज रवाना करावयाची तजवीज केली आहे. चिरंजीव राजश्री सदोबा यास निरोप देऊन त्या प्रांतें रवाना करावें ऐसा विचार केला...तिकडे सांवतांवर फिरंगियानें हाट केली तरी तिकडे दोन हजार फौज पाठविणें तिकडें पाठवून, त्याचेंहि साहित्य करावें..."†

सदाशिवराव भाऊच्या प्रस्तुत स्वारीचें वर्णन गोवेंदप्तरांत जें मिळालें आहे त्यावरून फिरंगी लोकांमध्यें तिजबद्दल किती भीति वाटत होती हें दिसून येतें. गोव्याचा विजरई मार्केज द आलोर्न यानें ३० डिसेंबर, १७४७ रोजीं पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या एका पत्रांत यद्विषयीं म्हटलें आहे.

"ज्यांत तीस हजार घोडेस्वार व अगणित पायदळ होतें असें नानाचें सैन्य गोव्यावर येत असल्याचें वृत्त जाहीर झालें. ह्या सैन्याचें आधिपत्य सदोबाकडे होतें....

हें सैन्य साष्टीपासून जवळ येत आहे असें वर्तमान कळल्यावर घाटांतील सर्व खिंडी मी व्यापून टाकल्या आणि झाडें पाडून वाटेंत टाकलीं. हेतू हा कीं, त्यामुळें शत्रूस घाटाखालीं येतांना अडचण व्हावी. मराठ्यांचें नांव घेतल्यावर आशियामध्यें लोकांच्या पोटांत धडकी भरते त्यामुळें सुपें येथें सदोबाचें सैन्य पोंहोचतांच साष्टींतील लोक घरेंदारें सोडून पळाले. संवदेकर व राणे यांचे शिपाई, ज्यांनीं घाटांतील वाटा रोखून धरल्या होत्या, तेहि फरारी झाले. आमचे शिपाई देखील असेंच करणार होते. पण मी सर्व सरदारांस ताकीद केली कीं, हे शिपाई जर पळून जाण्याचा प्रयत्न करितील तर त्यांची डोकीं उडविण्यास त्यांनीं मागें पुढें पाहूं नये...

कांहीं महिन्यापूर्वीं नानानें महिपतराव चंदा यास आपला वकील म्हणून माझ्याकडे पाठविलें होतें, आणि त्याकडून मला कळविलें होतें कीं, सांवताशीं आम्ही तह करावा. ह्या वकीलास मी उत्तर दिलें नाहीं. त्यामुळें तो इकडेच माझ्या उत्तराची प्रतीक्षा करीत राहिला...

---

§ सदाशिवराव भाऊनें ता. ६ फेब्रुवारी १७४७ रोजी गोव्यांतील विठोजी शेणवी धुमे यास लिहिलेलें पत्र (गोवें दप्तर)

† गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुळकर्णी व या. मा. काळे यांनीं संपादलेला 'ऐतिहासिक पत्रव्यवहार,' पृ. ४१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें कांहीं काळानें महिपतरावास परत पाठविण्यास सदोबानें मला लिहिलें. त्यानें असेंहि मला सुचविलें कीं, मराठे ससैन्य इकडे येण्याचें कारण गोवेंकरांना भोसल्याशीं तह करण्यास भाग पाडणें हें होय. शिवाय उत्तर कोंकणावर स्वारी करण्याचा आमचा उद्देश आहे कीं काय, हेंहि समजून घेणें सदोबास पाहिजे होतें.

सदोबानें मला पुनः लिहिलें कीं, भोसले हे पेशव्यांचे अंकित असल्यामुळें त्यांचे किल्ले व प्रदेश आम्ही काबीज केले आहेत ते त्यांचे त्यांस परत करणें इष्ट आहे व ह्याकरितां सदोबाकडे मी एक मातबर वकील पाठवून सांवताशीं योग्य असा तह करावा....

सदोबाच्या पत्रास उत्तर न करितां मीं दिवस घालविले.

मराठे जाणून होते कीं, मी लढाईच्या तयारीनें आहें. त्यांना असेंहि समजून आलें होतें कीं, साष्टींतील लोक पूर्वींच पळून गेले असल्यामुळें तिकडे मराठ्यांस लूट मिळणार नाहीं....

सदोबानें पुष्कळ दिवसपर्यंत वाट पाहून आपला तळ हलविला आणि तो कन्नडदेशाच्या सीमेपर्यंत निघाला......"

विजरईनें असेंहि लिहिलें आहे कीं, मराठ्यांच्या दराऱ्यामुळें अनेक राजे व नबाब त्यांस खंडणी देण्यास तयार झाले; पण प्रत्यक्ष सदोबाचें अगणित सैन्य गोव्याच्या सीमेवर येऊन भिडलें असतां देखील आपण त्याच्याकडे वकील पाठविला नाहीं अगर त्यांच्या पत्रास उत्तरहि केलें नाहीं. §

वस्तुस्थिति अशी होती कीं, पेशव्यांस ह्या वेळीं गोवेंकराशीं लढाई करण्यास सवड नव्हती. शिवाय ते जाणून होते कीं, अशी एकदां लढाई सुरू झाली म्हणजे ती लवकर न आटपतां वसईच्या मोहिमेप्रमाणें बराच काळ चालू राहील. $

पण फारशी लढाई न करतां गोवें मिळाल्यास पेशव्यांस पाहिजेच होतें आणि ह्यासाठीं त्यांनीं राणे, देसाई वगैरे फिरंग्यांच्या हस्तकांशीं अंतस्थ सूत्र ठेविलें होतें. ह्याविषयीं सरदार दादाजीराव भावे नरगुंदकर याच्या भास्करराव नामक चिरंजिवानें ता. ११ मे, १७४८ च्या पूर्वीं थोडे दिवस गोवेंकरास लिहिलेलें एक पत्र उपलब्ध झालें आहे. तें फार महत्त्वाचें वाटल्यामुळें खालीं उद्धृत करतों.

" अजम लुईस आफोस दात सकडतार दे इस्ताद दाम शफखतहू

६९ सलाम बाहदज सलाम महवल मकसुद आकी दिगर कुली हकीकत मुख्य पत्रावरून मालूम होईल परी अयाम इस्तादास तिकडील नवे काबेजात जाहाले. मुलकांचे जमियेतदार

§ गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध माहिती (Livro das mon,coes, No- 120, fl. 43)

$ बाळाजी बाजीराव प्रधान यानें रामचंद्रबावास लिहिलेल्या ता. ५-३-१७४७ च्या पत्रांत म्हटलें आहे, " फिरंगी बेइमान, त्याचें पारपत्य करावें तरि ये समयीं बनत नाहीं. " (काव्येतिहाससंग्रह, १९३०, पृ. ७४) ता. १४-२-१७४७ रोजीं सांखळींतील सत्रोजी राणे यानें विठोजी शेणवी धुमे यास कळविलें होतें कीं, मराठ्यांचें सैन्य असुर्व्यास पोंचलें असून घाटाखालीं उतरण्याचा त्याचा बेत नक्की झाला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामील जाहाले आहेत. त्यास इस्तादाने आपले पदरी घेतले आहेत. परंतु त्यांचे राजकारणांचे दोरे चहूकडे खेलतात. गत वर्षी अजम सदासीवपंत यांची मोहीम दक्षण प्रांते जाहाली त्या त्यागायेत जमेदारांचे राजकारणाचा दोरा आहे. त्यास सामत आहा तों राजकारण दाटसे जबरसे पडले. सत्रोजी राणेकडील व झालवा राणे याकडे राजकारण खेतले राणे मजकुराचे कारकून रुद्राजी सेणवी व दत सेणवी उभयेतां दोघा राणेपासी आहेत. त्याची पत्रें घेऊन त्याकडील कारकुणास पाठविल्हे होते आणि मजकूर लिहिला की आपले निसबतीचे गोवेत हजार माणूस आहे. बारदेसच्या मूर§ व तरीच्या पाईवाट आहेत त्या आपणासाधीन आहेत. आपले बंधु पाचसे लेकांनिसी बारदेसी आहेत. कुली मूर व तारीचे पांस$ आपणांस्वाधीन आहेत. येसे कितेक अजम पंतप्रधान यांकडे राजकारण चालते. पंतप्रधान याकडून पैका कापड आणितात. हे वर्तमान इजानेबांस सांप्रत दखल जाहाले. हे कसे आहे कळत नाही. इस्तादांची तव बंदोबस्ती राजकारणांत व सेणवी मजकूर यां प्रकारची करितात. तर मोहिबी सांवतांचे निसबतीचे लेक व जमीदार व कारकून घरेदारे जंजिरेआत असतील त्यास येकांदर बाहीर घालवे व मुरास व जंजिरेचे चौकीस लेक असतील त्यास जंजिरेबाहेर ठेवावे. त्याकडील लेक जंजिरेत येता जातां बाजपुसीने कार्याकारण घेत जावे. पंतप्रधान यांस गोमांतक घेऊन देऊ म्हणोन कबलात केली आहे असे राजकारण घोलते. इजानेबास दाखल जाहाले ते येकबालपन्हास व मोहिबांस दखल व्हावे म्हणोन लिहिलें आहे. इस्तादाचे पुण्य समर्थ असतां कोणती गोष्ट घडणार नाही परंतु इजानेबास दखल जाहालेलें इस्तादास कलवे म्हणोन लि।। आहे. पेसजी याच प्रकारें वसेस व साष्टी कलवेस राजकारण दोन च्यार वर्षे करून मोहीम केली. त्याचप्रकारें तिकडेही राजकारण चालते. मागें अंताजीपंत पलशा म्हणोन साष्टीमध्यें देसक होता त्याणे वाट दाखऊन कलवेचे वाटेने नेले हें मोहिबास दखल आहे. तर वाडी प्रांतांतील कारकून मोहिबानजीक असतील तर कोणाचा इतबार न धरावा व राणेकडील दोघे कारकून आहेत त्यास कैदीत ठेवावे हे कुली हकीकत पंत मा। निल्हेस जबानी सांगितले आहे. हें सागितील ती वचने इजानेबाची समजणे. इजानेबाने लिहिले हे न दर्शवावे. मोहिबास व येकबालपन्हास व कोणी जिवाळेचा नकल लिहिणार असेल त्यास दखल करावे. सोधेवाले यांणी पंतप्रधान यासी राजकारण लाविले आहे. मर्दनगड पंतप्रधानासी द्यावा असा मजकूर होत आहे तर बेगीकरून मर्दनगडास इस्तादांचे ठाणे पडेसे करावे. हे कुली विस्तार पेग मा। निल्हेस सांगितलें आहे जे इस्तादांच्या प्रयोजनाचे असेल ते घ्यावे. प्रयोजनाचे नसेल तें सोडावे जमेदारांस नजरते राखावे. कारकून असतील त्यास जबरदस्तीने कैदीत ठेवावे. इजानेबाचा लेकीक न होये ते करावे. इजानेबाने लिहावेस न सरे परंतु इस्तादाहून थोर दुसरे नव्हे याकरितां कलमी केले हे किताबत."

सरदार भास्करराव नरगुंदकर यास पेशव्याच्या सैन्यांत चांगली नोकरी होती. तीमुळें त्यास मराठ्यांच्या बातम्या सहज कळत आणि तो त्या गोवेंकरास गुप्तपणें लिहून पाठवीत असे.

§ पोर्तुगीज शब्द muros चा अपभ्रंश; मूर म्हणजे किल्ल्याची भिंत.
$ पोर्तुगीज शब्द passos म्हणजे पायवाट.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' ऐतिहासिक पत्रव्यवहार ' पृ. ७७ मध्यें भास्करराव दादाजी हा कोण याचा उलगडा होत नाहीं, असें रियासतकार लिहितात तो हाच ! असो.

फोंड्यांचा मर्दनगड आपल्या हातीं असावा अशी पेशव्यांस इच्छा होती. कारण तो किल्ला ताब्यांत असल्यावर पुढें मागें फिरंग्यांवर शह देण्यास त्यांस सुलभ होणार होतें. हेंच मत पे. दप्तर, भा. २४, पृ. १५४, मधील एका लेखांत वाचावयास मिळतें.

सन १७५६ त संवदेकरानें मर्दनगड किल्ला पेशव्यांकडे गहाण ठेवला. हें वृत्त फिरंग्यांस कळतांच मराठ्यांच्या कबजांत हा किल्ला पूर्णपणें जाण्यापूर्वीं आपणच तो काबीज करावा एतदर्थ खासा पोर्तुगीज विजरई कोंदि द आल्व्ह तिकडे ससैन्य गेला व त्यानें त्या किल्ल्यास वेढा घातला. पण किल्ल्यांतील लोकांस ऐन वेळीं कुमक झाल्यामुळें$ फिरंग्यांचा उद्देश शेवटास गेला नाहीं. फिरंगी सैन्याचा पराजय झाला व त्यास गोवेंस परतावें लागलें. खासा विजरई तेथें मारला गेला. तसेंच फिरंग्यांचे चौदा सरदार व ८७ शिपाई ह्या लढाईत मेले. ही गोष्ट ता. २८ जून, १७५६ रोजीं घडली.§ लक्ष्यांत ठेवण्याची गोष्ट ही कीं, फोंड्यांच्या किल्लेदारानें फिरंगी विजरईचें शव आदरपूर्वक गोव्यांस पाठवून दिलें !

फोंड्यांचा किल्ला मराठ्यांकडे आल्यावर त्याची काळजीपूर्वक डागडुजी करण्यांत आली. खुद्द त्र्यंबकराव विश्वनाथ (ह्या किल्ल्यांत स. १७५७ च्या सुरवातीस येऊन दोन महिने) ह्या कामासाठीं इकडे येऊन राहिला होता.

स. १७५६ मध्यें फोंड्यांचा किल्ला घेण्याचा गोवेंकराचा प्रयत्न फसला खरा; पण १ जून, १७६३ रोजीं पोर्तुगीज विजरई कोंदि द येग यानें तो काबीज केला. ह्या प्रसंगीं फिरंग्यांस फोंडें महालांतील सरदेसाई नरबा नाईक प्रभृति कित्येक हिंदुलोक व खुद्द त्या किल्ल्यांतील बापुजीपंत मुजुमदार व शूर सरदार रघू सांवत फितूर होते.¶ पोर्तुगीज विजरईनें हा किल्ला लवकरच पाडून टाकिला.

पेशव्यांकडून फिरंग्यांविरुद्ध फारशी हालचाल झाली नाहीं. फिरंग्यांकडून हा किल्ला परत मिळविण्याचा श्रीमंत माधवराव पेशव्याचा विचार होता. सन १७७१ सालांतील जानुआरीमध्यें पेशव्यांचें सैन्य हैदरअल्लीवर कर्नाटकांत जात असतां ह्या सैन्यास फोंडें महालांतून फिरंग्यांनीं वाट द्यावी, अशी पेशव्यानें खटपट चालविली होती. हेतु हा कीं, अशा निमित्तानें फोंडा महाल आपल्या कबजांत घ्यावा. मराठ्यांच्या सैन्यांत सुमारें दहा हजार लोक असून त्याचें नेतृत्व विसाजीपंत केशव लेले ह्या सरदाराकडे होतें. ह्या सैन्याखेरीज मराठ्यांचें एक आरमार

$ गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध माहिती व पारसनीसकृत ' पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती ', पृ. १९६.

§ Balsemâo कृत Portugueses no Oriente, III, p. 213–240

¶ गोवें दप्तरांतील Livro das mon,coes No. 136, fl. 339 व Balsemâo, III, 218,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मसुरेंजवळ येऊन राहिलें होतें व त्यांत १७ पाल व ८५ गलबतें होतीं. मराठ्यांच्या सैन्यास सांवतांचें सैन्य मिळालें असून सर्व सैन्याचा तळ डिचोली येथें पडला होता.

विसाजीपंताच्या मनांत आपल्या सैन्यास फिरंग्यानीं फोंडें महालांतून जाण्यास खुषीनें वाट न दिली तर बळजबरीनें तिकडून जावें, असें होतें. त्यानें गोवेंकरास लिहिलेल्या एका पत्रांत असा त्यास स्पष्ट इषारा देऊन ठेविला होता कीं, "हैदरआलीची मसलत राहून गोवेचे रयेतीवर पडेल. पडल्यानंतर दुतर्फा नाश होईल. इकडून कबूल असे..." $

फिरंगी मुत्सद्द्यांस मराठ्यांचा स्वभाव माहीत होता. गोवेंकरानें मोठ्या धीरानें लढाईची तयारी चालविली आणि शत्रूच्या सर्व वाटा रोखून धरल्या. वास्तविक पाहतां विसाजीपंताच्या सैन्यापुढें पोर्तुगीज लोकांचा निभाव लागणें कठीण होतें. ही गोष्ट फिरंगी अधिकाऱ्यांसहि ठाऊक होती. म्हणून गोवेंकरानें विठ्ठलराव वालावलीकर व श्रोत्री यांस पेशव्यांकडे वकिलीस पाठवून फोंडें महालांतून जर पेशव्याच्या सैन्यास आपण वाट दिली तर हैदरअलीशीं लढण्याचा आपल्यावर प्रसंग उद्भवणार ह्याची जाणीव पेशव्यास करून दिली.

श्रीमंत माधवराव पेशव्यास ह्या वेळीं फ्रेइ लियांद्र द माद्रि द देऊस नामक पाद्री डॉक्टराचें औषध चालू होतें व त्यामुळें पेशव्यांची त्याच्यावर फार मर्जी होती. गोवेंकरानें ह्या पाद्र्यामार्फत पेशव्यांकडे संधान बांधून विसाजीपंतानें फिरंग्यांच्या वाटेस जाऊं नये, असें आज्ञापत्र मिळविलें ! विसाजीपंताचा हिरमोड झाला. त्यास वाटलें होतें कीं, व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकराप्रमाणें आपणांस गोवेंकरास नामोहरम करण्याचें श्रेय लाभेल. पण त्याच्या आकांक्षा एका फिरंगी डॉक्टराच्या प्रयत्नामुळें निष्फळ ठरल्या !§

शिवाजीच्या उदयापासून पेशव्यांच्या अस्तापर्यंत गोवेंकर फिरंगी सरकार व मराठे यामध्यें लढाईचे अनेक प्रसंग आले. पण संभाजीच्या स्वारीखेरीज मराठ्यांकडून कॅथॉलिक धर्माच्या दडपणाखालीं असलेला गोवाप्रांत घेण्याचा दृढ प्रयत्न झालेला दिसत नाहीं. ह्यास कारण कोणतेंहि जरी असलें तरी एक गोष्ट सिद्ध आहे कीं, फिरंग्याच्या ह्या लहानशा टापूकडे मराठ्यांनीं फारसें लक्ष्य दिलें नाहीं आणि ज्या मराठ्यांच्या स्वाऱ्या गोव्याकडे झाल्या त्यांचें उद्दिष्ट तात्पुरतेंच म्हणजे केवळ लूट मिळवावी ह्या पलीकडे दुसरें एखादें असल्याचें आढळून येत नाहीं, असें कष्टानें म्हणावें लागतें.

उपरोक्त पोर्तुगीज विजरई मार्केज द आलार्न ह्यानें स. १७५१ सालांत आपण पोर्तुगालास निघण्याच्या वेळीं लिहून ठेविलेल्या लेखांत यद्विषयीं जे पुढील उद्गार काढिले आहेत ते लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत.

$ गोवें दप्तरांतील अप्रसिद्ध कागदपत्र.

§ लेखकाचा Contribuition à l'Etude de l'Histoire de la Médecine Portugaise dans l'Inde हा फ्रेंच निबंध (पृ. ६५–६६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"[O Marata] Como nâo faz a guerra nem por gloria, nem por defenc,a de cansa justa, mas pela mera ambic,âo, e interesse de riquezas, nâo se inclina facilmente, sem ter algum fim particular, a descer os Gates no districto chamado Concâo, em que se comprehende o de Goa, por ser pobre, e de que nâo pode tirar effeitos que satisfac,am a sua cubic,a, nem tâo pouco gosta que se lhe disputem os passos com ferro e fogo de que nâo resulte utilidade, e só perda di vidas ; por esta, razâo se alguma vez-entrou na Provincia de salcete, foi huma correria transitoria ; e a unica em que se demorou no anno de 1739, foi por diversâo, e por se ter empenhado na conquista da Provincia do Norte."§

भावार्थ—

" मराठे हे कीर्ति मिळविण्यासाठीं किंवा आपल्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठीं लढाई करीत नाहींत. तर ते केवळ संपत्तीच्या अभिलाषेनें लढतात. ते कांहीं तरी विशिष्ट फायद्याच्या हेतूशिवाय घाटावरून खालीं कोंकणांत—ज्यांत गोव्याचा समावेश होतो—उतरण्यास प्रवृत्त होत नाहींत. कारण कीं, हा प्रदेश गरीब आहे आणि त्यांच्या लोभीपणाची तृप्ति होण्यासारखा फायदा त्यापासून त्यांना मिळविण्याची आशा नसते. त्याचप्रमाणें त्यांना घाटांतून खालीं उतरतांना ज्या पायवाटा लागतात तेथें शत्रूकडून सशस्त्र प्रतिकार होऊन आपल्या सैन्याचा जीव बिनफायदा धोक्यांत घालण्याची आवड नसते. मराठ्यांनीं साष्टमध्यें ज्या ज्या स्वाऱ्या केल्या त्या त्या स्वाऱ्या म्हणजे केवळ तत्कालीन हुल्लडीच होत्या. स. १७३९ मध्यें मराठ्यांची जी एक मोठी स्वारी [ह्या प्रदेशांत] झाली तिचें कारण ते ह्यावेळीं उत्तर कोंकणच्या मोहिमेंत गुंतले होते, हें होय. "

[या लेखांतील सर्व तारखा न्यू स्टाइलच्या आहेत.]

---

§ Instrucç,âo do Vice-rei Marquez de Alorna, 3a ed. 1903, p. 52–53.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी राज्यांतील न्यायपद्धति

[लेखक—नारायण गोविंद चापेकर, B. A., LL. B., बदलापूर]

राजाचीं जीं कांहीं आवश्यक अशीं थोडी बहुत कर्तव्यें मानलीं जातात त्यांपैकीं आपल्या प्रजेला न्याय देणें हें एक कर्तव्य होय. मनुष्य हा स्वार्थपरायण आहे, त्यामुळें त्याच्या हातून अन्याय घडल्याशिवाय राहाणार नाहीं, या अनुभवसिद्ध गोष्टीवर हें राजाचें कर्तव्य ठरलें गेलें. राज्यें जेव्हां लहान असत तेव्हां हें कर्तव्य स्वतः राजाकडूनच बजावलें जाई. परंतु वाढत्या राष्ट्रांत राजाला आपल्या वतीनें हें कार्य करण्यास अधिकारी नेमणें भाग पडतें. या अधिकाऱ्यांना न्यायाधीश म्हणतात. न्यायाधीश हा शब्द अत्यंत अप्रयोजक दिसतो. न्याय काय आहे हें सांगणारा न्यायाचा अधिकारी अगर **स्वामी** नसून **दास** असतो. न्यायशास्त्री हें नांव कदाचित् समर्पक होईल. असो. न्यायाधीश हा शब्द मराठीशाहींतच रूढ झालेला होता यांत मात्र संशय नाहीं. व्यवहार हा प्राचीनतर शब्द मागें पडला आणि न्याय शब्द पुढें सरसावला.

न्यायपद्धतीचे मुख्य तीन घटक असतात. प्रथम न्याय अगर कायदा; नंतर न्याय करणारा इसम आणि तिसरा न्यायदान करण्याची तऱ्हा. आतां या प्रत्येकाचा विचार केला म्हणजे मराठेशाहींत न्याय पद्धतीचें स्वरूप कशा प्रकारचें होतें. याची आपणांस थोडी बहुत कल्पना करतां येईल.

प्रथमतः न्याय म्हणजे काय याचा आपण विचार करूं. योग्य, उचित, अनुरूप, बरोबर तें न्याय्य असें आपण साधारणपणें समजतों. तथापि अमुक गोष्ट योग्य, उचित अथवा अनुरूप आहे हें तरी कोणी व कसें ठरवावयाचें ? एकाद्या माणसास जें योग्य वाटतें तें दुसऱ्यास अयोग्य दिसतें. तेव्हां योग्यायोग्य निश्चित करण्याचें प्रमाण कोणतें हा प्रश्न उद्भवतो. न्याय करणाऱ्या इसमास जें योग्य वाटेल तें योग्य अगर न्याय्य असेंच अखेरीस म्हणावें लागतें. परंतु अशा स्थितींत न्यायदानाची अत्यंत अनिश्चितता लोकांना जाचक झाल्याशिवाय राहाणार नाहीं. प्रजेनें अन्यायानें वागतां कामा नये असें म्हटलें म्हणजे तिनें न्यायानें वागलें पाहिजे असें ओघानेंच प्राप्त होतें. तथापि प्रत्येक माणसाची विवेकशक्ति सारखी नसल्यामुळें न्यायानें वागण्याची प्रत्येकाची कल्पनाहि निराळीच असणार हें उघड आहे. आपल्या बुद्धीप्रमाणें एखादा मनुष्य एकादी गोष्ट न्याय्य आहे असें समजून वागला आणि दुसऱ्यास ती अन्यायाची वाटत असली तर पहिल्याचा हा दोष किंवा गुन्हा मानतां येईल काय ? ही आपत्ती टाळण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साठीं अर्वाचीन कालीं सर्व राष्ट्रांत अयोग्य वर्तन कोणतें तें स्पष्ट शब्दांत नमूद केलेलें असतें, यासच आपण कायदा म्हणतों. असे कायदे मराठी राज्यांत नव्हते व कायदे करण्याची जरुरीहि त्या वेळीं कोणास भासली नाहीं. लोकांनीं काय करावें व काय करूं नये अशाबद्दल मराठी राज्यकर्त्यांनीं वेळोवेळीं हुकूम काढलेले होते असें अद्यापि संशोधनकर्त्यांस आढळून आलें नाहीं. प्राचीन हिंदु राज्यांत अशा प्रकारचे कायदे होते हें कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून स्पष्ट दिसतें. त्याचप्रमाणें स्मृतिग्रंथांतहि व्यवहाराचें म्हणजे कायद्याचें एक प्रकरण असतेंच. स्मृतिग्रंथांहून कौटिलीय अर्थशास्त्र अधिक व्यापक आहे. निरनिराळ्या अपकृत्यांबद्दल या दोन्ही प्रकारच्या ग्रंथांत दंड अथवा शिक्षा सांगितलेली आहे. परंतु आधुनिक दृष्टीनें पाहिलें असतां गुन्ह्यांच्या व्याख्या अपुऱ्या दिसतात असें कबूल करणें भाग आहे. त्यांतहि कौटिल्यापेक्षां स्मृतींत हा दोष अधिक प्रमाणांत आढळतो. तें कसेंहि असलें तरी त्या कोणत्याहि ग्रंथांचा उपयोग मराठी राज्यांत करीत होते असें मानण्यास पुरेसा आधार नाहीं. मनुष्याच्या मिळकतीचा वारसा ठरविणें हें कायद्याच्या कक्षेंत पडतें, तेवढ्यापुरताच स्मृतींचा उपयोग करण्यांत येई अशाबद्दल प्रमाणें मिळतात. कारण अशा कामीं स्मृति पाहिल्याशिवाय गत्यंतरच नसतें. परंतु या व्यतिरिक्त इतर बाबतींत स्मृतींचा अंमल असल्याचें आढळत नाहीं. कौटिलीय अर्थशास्त्र तर ऐकूनहि कोणाला त्या वेळीं माहीत नसावें. अशा परिस्थितींत दहा माणसें ठरवितील तो न्याय असें होणें क्रमप्राप्त होतें.

कायद्याच्या अभावीं न्यायाधिशाचें अथवा न्यायासनाचें अस्तित्व असणें संभवत नाहीं. कायदा काय आहे हें जाणून प्रजेला कायद्याप्रमाणें वागावयाला लावणें हें वस्तुतः न्यायाधिशाचें काम. नुसता राजाचा शब्द म्हणजे कायदा नव्हे. कायदा हा निश्चित असावा लागतो. आणि कायदा काय आहे हें लोकांस आधीं समजलें असावें लागतें. राजा तोंडी हुकूम काय करणार याची आगाऊ कल्पना प्रजेला असणें शक्य नाहीं, म्हणूनच राजाचा हुकूम म्हणजे कायदा असें कोणी समजत नाहीं. कायदे कोणीहि केलेले असोत,—ते राजानें केले काय अथवा प्रजेनें केले काय एकच. म्हणजे ते एकाकडून झाले असोत अगर अनेकांकडून झालेले असोत, त्यांच्या कायदेशीरपणाला त्यामुळें बाधा येत नाहीं. सारांश, मराठी राज्यांत कायदे नव्हते ही गोष्ट निश्चित असतांहि न्यायाधीश नेमण्यांत येत असत हें जरा चमत्कारिक दिसतें. आमच्या मतें हे अधिकारी, ज्यांना न्यायाधीश ही संज्ञा शिवाजीच्या वेळींच देण्यांत आली होती, ते खरेखुरे न्यायाधीश नसून न्यायाधिशीकडील काम करणारे कारकून असावेत. याच्या पलीकडे या अधिकाऱ्यांचें महत्त्व नव्हतें. विशेषतः पेशवाईत तरी हा प्रकार निरपवाद असावा असें मानण्याची प्रवृत्ति होते. याचें एक लक्षण असें सांगतां येईल कीं, न्यायाधिशाच्या ठिकाणीं अमुक एक गुण असले पाहिजेत असा कांहीं निर्बंध असल्याचें दिसून येत नाहीं. वेदविद्या, तर्कशास्त्र, षड्दर्शनें, वेदान्त या विषयांत ज्याप्रमाणें परीक्षा घेण्यांत येत असे त्याप्रमाणें न्यायाधिशाची परीक्षा पेशवाईत घेतली जात असे असें ऐकिवांत अगर वाचण्यांत नाहीं. कोणीहि इसम न्यायाधीश होण्यास पात्र मानला जाई. पेशवाईत अत्यंत प्रसिद्धीस आलेले रामशास्त्री यांचा गुरु कोण होता, त्यांचें अध्ययन कोणत्या विषयांत व किती वर्षें झालें, याची आपणांस फारशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

माहिती नाहीं. तथापि ते वेदशास्त्रसंपन्न होते असें धरून चालण्यास प्रत्यवाय नाहीं. रामशास्त्र्यांची ख्याति त्यांच्या विद्वत्तेपेक्षां त्यांच्या निःस्पृहपणाबद्दलच अधिक झालेली दिसते. आतां रामशास्त्री विद्वान् होते असें मानलें तरी न्यायाधीश म्हणून त्यांचा उपयोग शास्त्राच्याच कामीं केला जात असे असें नाहीं. वतनाचे दावेहि त्यांच्याकडे निकालाकरितां जात. वारसाचा प्रश्न उद्भवल्यास कदाचित् त्यांच्या शास्त्राध्ययनाचा उपयोग व्हावयाचा. असो. कायदे नाहींत तेथें वादविषयासंबंधानें निकाल पूर्वापार वहिवाटीच्या आधारावरच झाला पाहिजे हें उघड आहे. तेथें रामशास्त्र्यांच्या विद्वत्तेचा काय उपयोग ? वहिवाट काय आहे ती लोक सांगणार. म्हणूनच मराठी राज्यांत प्रत्येक दिवाणी स्वरूपाचें काम पंचांकडे सोंपविण्यांत येई. मारामाऱ्या, शिवीगाळ वगैरेसारख्या गुन्ह्यांची चौकशी पाटील, मामलेदार, कोतवाल इत्यादि अधिकाऱ्यांकडून केली जाई. त्यांना शास्त्राचा गंधहि नसे; व त्यांस त्याची उणीवहि कधीं भासली नाहीं. लोक समजुतीनें जें बरोबर तें न्याय्य, लोकदृष्ट्या जें गर्हणीय तें अन्याय्य हीच न्यायान्याय ठरविण्याची कसोटी.

मराठी राज्यांत वतनाचे दावेच फार असत. न्यायान्यायामधील सूक्ष्म भेद त्या वेळीं लोकांच्या लक्षांत आला होता असें दिसत नाहीं. कांहीं अन्याय्य वर्तन वैयक्तिक स्वरूपाचें असतें तर दुसरें सामाजिक स्वरूपाचें असतें. ऋणकोनें सावकाराचें कर्ज न देणें हें पहिल्या प्रकारचें उदाहरण आहे; आणि चोर दुसऱ्याच्या घरांत शिरून चोरी करतो हें दुसऱ्या प्रकारचें उदाहरण होय. चोर एकाच माणसाकडे चोरी करतो; तो सर्व समाजाला एकाच वेळीं लुबाडतो असें नाहीं. परंतु तो ज्या माणसाकडे चोरी करतो त्या विशिष्ट व्यक्तीवर त्याचा डोळा नसतो. चोरी करण्यास जें घर त्याला सोईचें आढळतें तेथें शिरून तो आपला कार्यभाग करून घेतो. या दृष्टीनें चोरी करणारा इसम हा समाजकंटक समजला जातो. याच्या उलट देवघेवीच्या व्यवहारांची व्याप्ति फक्त विशिष्ट व्यक्तींपुरतीच असते. हा भेद लक्षांत न आल्यामुळें, चोरी, खून यासारखे गुन्हे हे वैयक्तिक स्वरूपाचेच आहेत, असें समजून त्यास शिक्षाहि तशाच स्वरूपाची देण्यांत येई.

शेवटचा प्रकार म्हणजे इंग्रजी भाषेंत ज्याला "प्रोसीजर" म्हणतात तो होय. त्याबद्दल मराठी राज्यांत कांहीं नियम असल्याचें दिसत नाहीं. कामाच्या पद्धतीचें शास्त्र बनलें नव्हतें. मुख्य दोष म्हणजे वकिलांचा वर्ग निर्माण झाला नव्हता. याचें कारण उघडच आहे. कायद्याचा अर्थ करण्याच्या कामीं न्यायाधिशाला साह्य करणें हें या वर्गाचें मुख्य काम. पण जेथें कायदाच अस्तित्वांत नाहीं तेथें वकील जन्मास कसा यावा ? धर्मशास्त्र अगर अर्थशास्त्र जारी असतें तर वकीलवर्ग अस्तित्वांत आला असता व एकंदर न्यायपद्धतीचें शास्त्र बनलें असतें. न्यायशास्त्र बनण्यास न्यायाधिशापेक्षांहि वकिलाचा उपयोग अधिक होतो. मराठी राज्यांत वकीलवर्ग निर्माण झाला असता तर सर्व राज्यकारभाराचें स्वरूप पालटलें असतें. राज्यकारभाराला वळण लावण्यास वकीलच मुख्यत्वेंकरून कारणीभूत होतात. शास्त्री-वकिलांकडून धर्मशास्त्रविषयक तक्रारी न्यायाधिशांच्या समोर मांडल्या गेल्या असत्या तर हिंदुधर्माला आजची अवनत स्थिति प्राप्त झाली नसती. समाजाचा अथवा राष्ट्राचा सर्वांगीण उत्कर्ष निष्णात वकीलवर्गावर अवलंबून असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणतेच नियम नसल्यामुळें फिर्याद प्रथम कोणाकडे द्यावयाची हेंहि ठरलेलें नव्हतें. पाटील कुळकर्ण्यापासून तों पंतप्रधानापर्यंत कोणाकडेहि फिर्याद घेऊन जावें; आणि यांत कांहीं वावगें होतें असें नाहीं. कारण ज्याच्याकडे फिर्याद घेऊन जावयाचें त्यानें त्या फिर्यादीचा निकाल करावा अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. फिर्याद घेतल्यावर वादीप्रतिवादींना त्यांच्याच सल्ल्यानें पंचायत नेमून दिली म्हणजे त्या अधिकाऱ्याचें काम संपलें. पंचांना मान्यता, तसेंच त्यांच्या निर्णयाप्रमाणें वागण्याविषयीं वचन या संबंधानें पक्षकारांकडून लेख लिहून घेण्यांत येत असे. याचा अर्थ, वादाच्या निर्णयाची जबाबदारी पक्षकारांवर पडे, सरकारवर पडत नसे. सरकार व पक्षकार यांच्या दरम्यान या व्यवहाराला करारांचें स्वरूप दिलें जाई. सरकारांतून कोणाहि एकाला मुन्सफी सांगण्यांत आली तरी तो मुन्सफ गांवांतील अनेक जातींच्या लोकांना, विशेषतः बलुतेदारांना व वतनदारांना बोलावून त्यांच्या सल्ल्यानें निर्णय देई. कधीं कधीं तर न्याय देण्याचा राजाचा सर्वमान्य हक्क नाकारून जातींच्या भांडणाचा निकाल जातीनेंच केला पाहिजे असा हक्क पुढें करण्यांत येई आणि सरकार तो मान्यहि करी.§

कोणत्याहि हक्कासंबंधानें फिर्याद चालत असे. ज्यांत पैशाचा संबंध नाहीं अशा मानपानांच्या फिर्यादींचीसुद्धां चौकशी करण्यांत येई. खोटीं भुतें घातलीं, या तक्रारी विचारांत घेतल्या जात. सारांश अमुक गोष्ट फिर्यादीचा विषय होत नसे असें नाहीं. मानपान ही एक महत्त्वाची सामाजिक बाब असल्यामुळें स्वराज्यांत तिच्याकडे दुर्लक्ष करून चालत नसे. यांत कांहीं वाईट आहे असें नाहीं.

एकदां निर्णय झालेली गोष्ट कोणत्या ना कोणत्या सबबीवर पुन्हा उकरून काढतां येई. याला अगदींच अपवाद नाहीं असें नाहीं. खुनाच्या खटल्याचा एकदां निकाल लागल्यावर पुन्हा चौकशी कां केली असा एक प्रश्न थोरल्या माधवरावसाहेबांनीं आपल्या अधिकाऱ्यास विचारल्याचें इतिहासांत नमूद आहे. कांहींच सबब नसली तर मात्र पुनः चौकशी होत नसे.‡

निर्णित विषयाची बाधा ज्याप्रमाणें कोणत्याहि दाव्यास होत नसे त्याप्रमाणें अमुक दावा अमुक मुदतींत आणला पाहिजे असा निर्बंध नव्हता. स्मृतिकारांनींसुद्धां वीस वर्षांच्या स्वतंत्र उपभोगानें आणि विरुद्ध कबजानें मालकी हक्क निर्माण होतो असा सिद्धांत प्रस्थापित केला असूनहि† मराठी राज्यांत कितीहि वर्षांनंतर फिर्याद केली तरी तिला मुदतीची हरकत नसे. उपरिनिर्दिष्ट स्मृतिकारांचें तत्त्व एखाद्या दाव्यास लावल्याचें अद्यापि आढळण्यांत आलेलें नाहीं. या एकाच गोष्टीवरून दाव्याचा निकाल करण्याच्या कामीं स्मृतींचें अध्ययन अथवा उपयोग न्यायाधिशांकडून केला जात असे असें वाटत नाहीं.

सामान्यतः एकतर्फी निकाल न करण्याकडेच प्रवृत्ति असे. न्यायाला करारांचें स्वरूप आल्यानें एकतर्फी निकालाचा संभवच नव्हता. वादीनें फिर्याद केली आहे, ही गोष्ट प्रति-

---

§ वाड २-३७.

‡ भट– भा. इ. सं. मंडळ द्वितीय संमेलन वृत्त, पृ. १५९.

† पश्यतोऽब्रुवतो भूमेर्हानिर्विंशतिवार्षिकी–याज्ञवल्क्य, असाधारणमातृका प्रकरण, श्लोक २४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वादीला कळविण्याची जबाबदारी सरकारावर; मसालाचिठीप्रमाणें हजर होण्याची अगर न होण्याची जबाबदारी प्रतिवादीवर अशी समजूत नव्हती. सरकारी न्यायपीठें नसलीं म्हणजे असें होणें अगदीं स्वाभाविक आहे. गांवांतील सामान्य लोकांकडून पंच म्हणून तंट्यांचा निकाल केला जाई. अशा लोकांना एकतर्फी निकाल करण्याचें धैर्य क्वचित्च असतें. त्याचप्रमाणें सरकारी बोलावणें आल्यावर हजर न होण्याचें धाडसहि लोकांमध्यें असेल असें वाटत नाहीं.

एकंदरींत न्याय करण्याच्या पद्धतीला शास्त्रीयता प्राप्त झाली नसली तरी मराठी राज्यांत लोकांवर अन्याय होत असे असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं. उभय पक्षकारांच्या संमतीनें पंचायती करणारे इसम नेमण्यांत येत असत. आपल्या गांवच्या लोकांकडून पक्षपात होण्याचा संभव आहे असा संशय आल्यास पक्षकार आपला दावा चालण्यास अन्य ठिकाण मागून घेई. यालाच "स्थल नेमून देणें" म्हणत. आपणच सुचविलेल्या लोकांनीं निर्णय दिला, म्हणजे तो मुकाट्यानें मान्य करणें भाग पडे. एकाद्या दाव्यांत चालीरीतीचा प्रश्न उद्भवत असला तर पक्षकारांच्या जातींतील लोकांच्या साह्यानें तंट्याचा निकाल करण्यांत येई§. वतनाचा प्रश्न असल्यास गांवांतील सर्व वतनदार, बलुतेदार यांच्या सल्ल्यानें किंवा मदतीनें त्या प्रश्नाचा निकाल लागत असे. नुसत्या शेतीवर निर्वाह करणाऱ्या लोकांत किंवा समाजांत भानगडीचे प्रश्न फारसे उद्भवत नाहींत. सामान्य माणसाच्या बुद्धीला पेलतील असेच साधे प्रश्न कोणत्याहि दाव्यांत उत्पन्न होणार हें उघड आहे. ज्या राष्ट्रांत उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर चालतात तेथें उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल करण्यास सूक्ष्म बुद्धीची आवश्यकता भासते. त्यामुळें सामान्य माणसांच्या पंचायतीकडून जरी तंटे तोडले जात असत तरी त्यामुळें अन्याय होण्याचा संभव नव्हता. शिवाय गांवांतील सर्व प्रमुख लोकांसमक्ष पक्षकारांचें म्हणणें व साक्षीपुरावा ऐकिला जाई त्यामुळेंहि अन्याय होण्याची भीति राहात नसे व हरलेल्या माणसाला तक्रार करण्यास जागा उरत नसे.

सरकारी दप्तरांत निकालपत्रें जतन करून ठेवण्याची वहिवाट होती. तसेंच या निकालांची नोंद बारनिशींतहि केली जाई. त्यामुळें त्याच विषयासंबंधानें पुन्हा तंटा झाल्यास पाठीमागील दाखला पाहाण्याची सोय झाली होती. न्यायाधिशानें पूर्वीच्या निकालाचे कागद मागून घेतल्याची उदाहरणें सांपडतात†. एका शिवेच्या कज्ज्यांत ७५ वर्षांपूर्वीचे कागदपत्र मागितले होते. † पक्षकार पुरावा हजर करतील तेवढाच घ्यावयाचा असा निर्बंध नव्हता. न्यायाधिकारी आपण होऊन अधिक पुरावा घेत असत. पुष्कळ दाव्यांचा निकाल क्रिया घालून म्हणजे शपथेवर होत असे. असल्या गोष्टींवर लोकांचा विश्वास असल्यानें झालेला निकाल खुषीनें मान्य केला जाई.

सर्वांत मोठी सोय म्हणजे हल्लींप्रमाणें न्याय मागण्यास पैशाची अडचण आड येत नसे. ब्रिटिश अमदानींत न्याय मागणाऱ्या माणसाला पैशाची तजवीज प्रथम करावी लागते आणि त्याकरितां त्याच्यावर कित्येक प्रसंगीं घरदार विकण्याची पाळी येते. गरीब, दरिद्री

§ पेशवाईच्या सावलींत, पृ. १०३.

† वतन पत्रें, निवाडा पत्रें, पृ. ५८, ६१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांना तर त्यांच्यावर कोणीहि जुलूम केला तरी त्याची दाद लावून घेणें हल्लींच्या न्यायपद्धतींत अशक्य झालें आहे. मराठी राज्यांत फिर्याद घेऊन जातांना पैसे खर्च करावे लागत नसत. जिंकलेल्या माणसाकडून नजर व हरलेल्या माणसाकडून हरकी अगर दंड सरकारांत भरावा लागे ही गोष्ट खरी. परंतु हा कर दाव्याचा निकाल झाल्यावर द्यावा लागे, अगोदर नाहीं; ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. आणि शिवाय ही शेरणी जीवन माफक असावी असा कटाक्ष असल्यामुळें लोकांना हा कर जाचक होत नसावा. कांहीं थोड्या ठिकाणीं निवाडा करून घेण्यासाठीं पेशव्यांस आधीं नजर दिल्याचीं उदाहरणें नमूद आहेत. त्याचप्रमाणें एका खुनाच्या खटल्यांत सरकारची गुन्हेगारीची रक्कम आधीं ठरली असल्याचें दिसतें. परंतु हा सर्वसाधारण नियम नव्हता हें खास.

प्रचलित न्यायपद्धति निर्जीव यंत्राप्रमाणें भासते हा एक तिच्यांत मोठा दोष आहे. परंतु पूर्वीं सहृदयता, सहानुभूति, माणुसकी इत्यादि गुण, संशोधकांनीं आजपर्यंत जीं निवाडपत्रें संग्रहित केलीं आहेत त्यांवरून प्रतीत होतात. उदाहरणार्थ—तुरुंगांतील कैदी आजारी पडल्यास त्यास जामीन घेऊन मुक्त करण्यांत येत असे. तसेंच त्याचा जवळचा नातेवाईक मृत झाल्यास त्यास क्रियाकर्मांतर करण्यासाठीं कांहीं काल मोकळें केलें जाई. कैद्याच्या समाजांतील दर्जाप्रमाणें त्यास आहार मिळण्याची व्यवस्था करीत असत. तुरुंगांत कैद्याच्या औषधोपचाराची तरतूद होई यांत आश्चर्य नाहीं. कारण दावा चालू असतांना साक्षीदार आजारी पडला तर त्यालाहि औषध देण्याकरितां सरकारांतून पैसे खर्च पडत †. साक्षीदारांवर रखवाली ठेवण्यासाठीं सरकारांतून शिपाई ठेवण्यांत येई. अशा रीतीनें पंचांना सरकारकडून मदत मिळे. पण ह्या व्यतिरिक्त पंचांचें काम सर्व प्रकारें निरपेक्ष असे यांत संशय नाहीं. आपल्या नजरेपैकीं अथवा हरकींतून सरकारनें कांहीं भाग पंचांना दिला असें उदाहरण अद्यापि बाहेर आलें नाहीं.

हल्लीं फिर्यादीला स्टॅंप लावून ती दाखल करावी लागते. तसा प्रकार पूर्वीं नव्हता हें पूर्वीं सांगितलेंच आहे. मात्र समन्सांची प्रोसेस फी हल्लीं पक्षकारांना कोर्टांत भरावी लागते त्याप्रमाणें पूर्वीं पक्षकारांकडून पैसे घेऊन जासुदांबरोबर मसाल्याच्या चिठ्या (समन्सें) पाठविण्यांत येत. परंतु पक्षकारानें पैसे न भरल्यास दाव्याचें काम अडून राहात नसे. सरकारांतून पैसा आदा करून जासूद पाठविला जाई. †

या सर्व गोष्टींवरून न्याय मागण्याच्या मार्गांत अवास्तव अडथळे ठेवलेले नव्हते हें दिसून येईल.

सारांश, शास्त्राध्ययनाकडे दुर्लक्ष केलें तर सद्यःकालीन समाजापेक्षांहि स्वराज्यांतील समाज अधिक सुखी होता असें आम्हांस वाटतें. ह्याचें कारण असें कीं तत्कालीन न्यायपद्धति तत्कालीन समाजाला अनुरूप होती. अर्थशास्त्र व स्मृतिग्रंथ ह्यांत पारंगत असलेल्या न्यायाधिशांकडून त्या शास्त्रांचा उपयोगच नव्हे तर विकास व्हावयास पाहिजे होता, तो तसा झाला नाहीं ही तक्रार करण्यास जागा राहिली ह्यात मात्र संशय नाहीं.

---

† वतनपत्रें, निवाडापत्रें, पृ. ५८, ६१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

मराठे, रजपूत व शीख

[लेखक—नारायण केशव बेहेरे, M. A., B. Sc., L. T., नागपूर]

हिंदुस्थानचा इतिहास लिहितांना मराठ्यांच्या पराक्रमाकडे व त्यांच्या स्वराज्याकडे दुर्लक्ष्य करण्याचा आंग्ल व हिंदी इतिहासकारांचा पूर्वी प्रघात होता. मराठ्यांनीं मोगलांना 'खो' देऊन स्वतंत्र मराठी राज्य स्थापन केलें, एवढेंच नव्हे तर मोगल साम्राज्याशीं निकराचा लढा लढून तें साम्राज्य खिळखिळें केलें आणि त्या मोडकळीस आलेल्या मोगल साम्राज्यांतून मराठी साम्राज्याची इमारत उभारली, ही गोष्ट इतिहासकार मुद्दामच दृष्टिआड करीत असत. इंग्रजांना मनांतून मराठ्यांचा द्वेष वाटत असे. कारण हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता स्थापतांना त्यांच्या आड मराठेच आले. मराठ्यांशीं अनेक लहानमोठ्या लढाया मारूनच इंग्रजांना या देशांत आपलें आसन स्थिर करतां आलें. हिंदुस्थान मराठ्यांपासून इंग्रजांनीं जिंकून घेतला. मनुष्यस्वभाव असा आहे कीं, पूर्वीच्या मालकाची खरीखोटी निंदा केल्यावांचून नव्या मालकाला आपली प्रतिष्ठा स्थापन झाली असा विश्वास वाटत नाहीं. कोणताहि अधिकारी एखाद्या ठिकाणीं बदलून गेला, म्हणजे पूर्वीच्या अधिकाऱ्याची थोडीबहुत निंदा करतोच करतो. तो इतरांना वाखाणेल, परंतु ज्याच्या जागीं तो येतो त्याचीं कुसळें शोधून त्यांना मुसळाचें स्वरूप दिल्याशिवाय तो राहात नाहीं. हा व्यक्तीचा नियम जमातींनाहि लागू पडतो. तेव्हां इंग्रजांनीं मराठ्यांपासून हिंदुस्थानचें राज्य जिंकून घेतल्यामुळें मराठ्यांना तुच्छ लेखण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति बनली. मराठे म्हणजे चोर, भुरटे, लुटारू! इतिहासांत त्यांना मग कसें स्थान मिळणार ? निःपक्षपाती म्हणविणाऱ्या इंग्रज इतिहासकारांनाहि ही धुंदी चढली. टॉडनें रजपुतांच्या वीर्यकथा गौरवानें रंगवून सांगितल्या. सेवेलनें विजयनगरच्या वैभवशाली हिंदु राज्याचा इतिहास भडक कुंचलीनें उघड उघड अतिशयोक्तिपूर्ण वाटण्याइतका रेखाटण केला. मोगलांच्या स्तुतिपर तर अनेक इंग्रजी ग्रंथ निर्माण झाले. रणजितसिंहावर सुमनांजली वाहण्यांत आली. फार काय, पण हैदरअली व त्याचा क्रूर पुत्र टिपू यांनाहि इंग्रजांकडून प्रसंगोपात्त प्रशंसापत्रें मिळालीं. परंतु मराठ्यांच्या शिवाजीच्या कपाळीं लागलेला लुटारूपणाचा टिळा मात्र वज्रलेप झाल्यासारखा दिसूं लागला. मग ब्राह्मण पेशव्यांची, त्यांनीं आपल्या त्यागी पराक्रमाच्या जोरावर मराठी स्वराज्याचें साम्राज्यांत रूपांतर केलें असलें तरी, पर्वा कोणता इंग्रज इतिहासकार करील ? आणि आज शिवाजीविषयीं इंग्रजांना प्रेमाचा पान्हा फुटलेला दिसत असला, तरी पेशव्यांच्या कपाळींची निंदा व विपर्यस्त हेटाळणी अजूनहि टळली नाहीं. कारण इंग्रजांना हिंदुस्थानचें राज्य बळकावतांना शिवाजीशीं थोडेंच लढावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागलें ? चित्पावन ब्राह्मण पेशवे व त्यांचा तसलाच ब्राह्मण मुत्सद्दी नाना फडणवीस यांनीं इंग्रजांची बरेच दिवस डाळ शिजूं दिली नाहीं. तेव्हां ब्राह्मणांचा इंग्रजांना राग कां न यावा ? आणि हिंदी इतिहासकार तर इंग्रज इतिहासकारांच्या बोंडल्यांतूनच दूध पीत असत. महमद घोरीनें इ. स. ११९३ सालीं पृथ्वीराजाचा पराभव केला, तेव्हांपासून जी पठाणी रियासत सुरू होई, ती इब्राहिमखान लोदीचा इ. स. १५२६ मध्यें बाबरानें पानपत येथें पराभव करीपर्यंत चालू राही. आणि १५२६ सालीं पानपतास चालू झालेल्या मोगल रियासतीचा शेवट १८५७ सालच्या युद्धानंतर शेवटच्या बहादुरशहाची दिल्लीहून ब्रह्मदेशांत उचलबांगडी झाल्यानंतरच होई. १८५८ नंतर तर इंग्रजांची उघडी नागडी रियासत चालू झाली व आजच्या घडीलाहि ती तशीच चालू आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या गेल्या सहाशें सातशें वर्षांच्या इतिहासांत मराठ्यांना स्थान देण्यासारखा कालखंडच इंग्रज व हिंदी इतिहासकारांच्या दृष्टीनें उपलब्ध नव्हता. मोगल रियासतीचा सविस्तर इतिहास लिहितांना केवळ नाइलाज म्हणून, चोर व लुटारू ठरलेल्या मराठ्यांचा प्रसंगोपात्त आनुषंगिक उल्लेख अधूनमधून इतिहासकार करीत असत.

परंतु मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून महाराष्ट्रांत नव्या युगाचा प्रारंभ झाला. काव्येतिहाससंग्रह हें मासिक चिपळूणकरांनींच सुरू केलें. आपल्या प्राचीन तेजस्वी इतिहासाची व ओजस्वी वाङ्मयाची लोकांना ओळख पटावी व तेणेंकरून त्यांचा स्वाभिमान वाढावा आणि स्वत्वाची सर्वस्वी होळी करणाऱ्या परसत्तेची आमक झापड त्यांच्या डोळ्यांवरून नाहीशी व्हावी, स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणें शक्य नाहीं असें त्यांना वाटूं लागावें आणि परकीय सत्तेचें उच्चाटण करण्याच्या प्रयत्नास त्यांनीं लागावें, असाच थोर व पवित्र हेतु शास्त्रीबुवांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनांत होता. शास्त्रीबुवांनीं जी जी देशहिताचीं कामें आरंभिलीं त्यांची त्यांची एकसारखी गौरवास्पद वाढच होत गेली व त्यांनीं रुजूं घातलेल्या बियांचे प्रचंड वृक्ष होऊन त्यांना फळें फुलें लागलीं. चिपळूणकरांनीं आरंभलेलें ऐतिहासिक संशोधनाचें कार्य साने, राजवाडे, पारसनीस, खरे व सरदेसाई यांनीं नेटानें पुढें चालविलें. या पांच महर्षींच्या कार्यानें अनेकांना इतिहाससंशोधनाची, अभ्यासाची व लेखनाची स्फूर्ति झाली आणि मराठ्यांच्या पराक्रमाचा व कर्तबगारीचा सांगोपांग व साधार इतिहास निर्माण झाला. या कार्याला अनेक लहानमोठ्यांचे हातभार लागले आहेत, परंतु हिंदुस्थानच्या इतिहासांत मराठी रियासतीचें स्वतंत्र दालन खोलण्याची आणि इतर इंग्रज व हिंदी इतिहासकारांकडून त्या दालनाला मान्यता मिळविण्याची अमोलिक कामगिरी या पांच महर्षींनींच मुख्यत्वेंकरून पार पाडली. त्यांतल्या त्यांत श्री. गो. स. सरदेसाई यांची कामगिरी महाराष्ट्राच्या इतिहासमंदिरावरील सुवर्णकळसाप्रमाणें भरीव व शोभिवंत झाली आहे. त्यांच्या इतिहाससंशोधनामुळें, त्यांच्या दीर्घ व्यासंगामुळें, त्यांच्या महासागराप्रमाणें विस्तीर्ण पसरलेल्या लेखनामुळें, त्यांच्या चिकाटीमुळें व त्यांच्या गोडव्या स्वभावामुळें हिंदुस्थानच्या इतिहासांत मराठी रियासतीचा स्वतंत्र व नामवंत सुभा स्थापन झाला व सर्वांनीं त्याला सिंहाचा छावा म्हणून मान्यता दिली. ब्राह्मण पेशव्यांचे व त्यांचे पराक्रमी ब्राह्मण सेनापति पटवर्धन, फडके, खरे, गोखले यांचें आक्रमक व धडाडीचें राजकारण सर्वांना विदित झालें व ब्राह्मण पेशव्यांचें ग्रहण तात्पुरतें सुटलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

मराठी राज्याच्या स्थापनेचा इतिहास अद्भुत आहे. एखाद्या मृत राष्ट्राच्या रक्षेंतून पुराणप्रसिद्ध फिनीक्स पक्ष्याप्रमाणें दुसऱ्या नव्या राष्ट्राचा जन्म झाल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांतून अनेक काढून दाखवितां येतील. परंतु एका अत्यंत बलिष्ठ साम्राज्याच्या छातीवर पाय देऊन नव्या चिमुकल्या राष्ट्रानें जन्मास येऊन दंड थोपटून युद्धास तयार व्हावें आणि एका म्यानांत दोन तलवारी नांदत असल्याचा आश्चर्यकारक देखावा जगास दाखवावा आणि पितामह भीष्म आपल्या तारुण्यरूपी शक्तीच्या घमेंडींत गर्क असतांना एखाद्या शिखंडीनें त्याचा सहजगत्या गर्व हरण करावा व त्याला अश्रु ढाळावयास लावून मग अर्जुनानें तोऱ्यानें भिरवावें, असली रोमांचकारी अद्भुत कथानकें जगाच्या इतिहासांत फारच थोडीं सापडतील. मोगल साम्राज्याची सत्ता औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ढासळूं लागली. परंतु शहाजहान व औरंगजेब या दोन सम्राटांच्या कारकीर्दींत मोगल साम्राज्याचें वैभव कळसास पोंहोचलें होतें. जगप्रसिद्ध कोहिनूर हिरा मस्तकीं धारण करून व मयूर सिंहासनावर आरोहण करून ताजमहालाची भव्य व दिव्य शोभा अवलोकन करत करत समाधानानें स्वतःच स्वतःला धन्यवाद देणाऱ्या शहाजहान बादशहाशीं लढण्यास दक्षिणेंतील चिमुकल्या अहमदनगरच्या निजामशाहीचा तुटपुंजा मराठा पाटील–सरदार शहाजी–दंड थोपटून तयार झाला. त्यामुळेंच शिवभारत रचणाऱ्या परमानंद कवीला दक्षिणेंतील शहाजी व उत्तरेकडील शहाजहान यांची तुलना करण्याचा मोह आवरला नाहीं. हा चुरशीचा सामना पुढच्या पिढ्यांनीं अधिक नेटानें व निकरानें चालविला. कडव्या इस्लामधर्मी औरंगजेबाचा नक्षा शिवाजी राजांनीं उतरवला व स्वतःस 'गोब्राह्मणप्रतिपालक आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक' असें हिंदुमात्राकडून म्हणवून घेतलें. भूषणासारख्या उत्तर हिंदुस्थानांतील हिंदी कवीला देखील त्यामुळें शिवाजी राजे जन्माला आले नसते तर हिंदूंची शेंडी गमावली असती व सर्वांची सुंता झाली असती, असें अभिमानपूर्वक लिहावें लागलें. शिवाजी महाराजांनीं स्वतःस वैदिक धर्मानुसार राज्याभिषेक करवून घेतला व औरंगजेब बादशहास मनगटें चावावयास लावलें. पुढें तर मराठ्यांचीं पाळेंमुळें खणण्याचा निश्चय करून औरंगजेबानें दिल्ली सोडून दक्षिणेंत औरंगाबादेस पंचवीस वर्षें तळ दिला व मोगलशाहीचा सर्व पराक्रम, इभ्रत व वैभव इरेस घातलें, तरी मराठे नामशेष झाले नाहींत. माणुसकीला निरंतरचा काळाकुट्ट कलंक लागेल अशा रीतीनें राजे संभाजीचा औरंगजेबानें वध केला. तप्त सांडसानें कैदेंत असहाय्य सापडलेल्या त्या महाराष्ट्राच्या नरसिंहाचे डोळे तर फोडले, त्याची जीभ बाहेर ओढून खाटकाप्रमाणें सुरीनें तर कापली आणि वांग्याचें भरीत करतांना तें भाजून त्याची साल सोलतात त्याप्रमाणें संभाजी राजांच्या अंगाचें कातडें सोलून काढलें. एवढ्या भयंकर हालअपेष्टा झाल्या व सार्वजनिक विडंबन झालें, तरी त्या धर्मवीरानें हिंदुधर्माचा त्याग करून इस्लामी धर्माचा स्वीकार केला नाहीं. संभाजी राजाच्या मृत्यूनंतर त्यांची साध्वी राणी येसूबाई व युवराज बालशिवाजी मोगलांच्या बंदींत पडले तरी मराठे नामोहरम झाले नाहींत. त्यांनीं तसाच नेटानें तो स्वातंत्र्यसंग्राम चालू ठेवला. अखेर बादशहा औरंगजेब मोडला व मेला, पण मराठे मोडले नाहींत. बादशहाला मरतांना देखील पुनः दिल्ली दिसली नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी त्यानें उत्तर हिंदुस्थानांतून मराठ्यांना ठेचून मारण्याकरिता दक्षिणेकडे प्रयाण केलें, तें शेवटचेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरलें व दक्षिणेंतच त्याची अखेरीस कबर बांधावी लागली. आणि औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बारा वर्षांच्या आंतच मराठी राज्याचे पंतप्रधान पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांनीं दिल्लीवर सय्यदांच्या साह्यासाठीं चढाई करून स्वराज्याच्या व चौथाई-सरदेशमुखी करवसुलीच्या सनदा साताऱ्यास आणल्या. त्यानंतर बाजीराव पेशव्यानें मराठ्यांचा दरारा मोगल बादशाहीस पटण्यासारखे अनेक युद्धप्रसंग निर्माण केले, मोहिमा केल्या, निजाम व अहमदशहा बंगश अशा पराक्रमी मोगल सुभेदारांचा धुव्वा उडविला व नर्मदेच्या उत्तरेकडील प्रांत जिंकून मराठी राजकारण उत्तराभिमुख केलें. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस पानपतचा जबरदस्त धक्का बसला तरी देखील मराठी स्वराज्याचें साम्राज्यांत रूपांतर झालें आणि पेशव्यांचे उत्तरेकडील वकील अटक ओलांडून रूमशामवर स्वारी करण्याच्या गोष्टी बोलूं व पत्रांतून लिहूं लागले. पानपतच्या पराजयाचा पुरा मोबदला माधवराव पेशव्यानें घेतला व आडदांड रोहिल्यांना 'दे माय धरणी ठाय' करून भरडून काढलें. पानपतच्या युद्धानंतर बरोबर दहा वर्षांनीं दिल्लीवर मराठी अंमल जमला व मोगल बादशहा शिंद्यांच्या हातांतील नामधारी बाहुलें बनला. पानपतच्या युद्धानंतर दोनच वर्षांनीं निजामाची राक्षसभुवनच्या लढाईंत पेशव्यांनीं दाणादाण उडविली, हैदर व टिपू यांच्यावर स्वाऱ्या करून त्यांना पराभूत केलें आणि मराठेशाहीचें वैभव अधिकच वाढवून पानपतच्या अपयशाचा डाग धुवून काढला. परंतु मराठेशाहीचा हा वीररसात्मक इतिहास अवघा दीडशें वर्षांचा आहे. शहाजी व शिवाजी या पिता-पुत्रांची जरी सारखी पंचवीस वर्षे धडपड चालू होती तरी इ. स. १६४४ सालीं शिवाजी महाराजांनीं कोंडाणा उर्फ सिंहगड किल्ला मुसलमानांकडून जिंकून घेतला, तेव्हांपासूनच मराठी राज्याची घटस्थापना झाली असें मानतां येईल. १६५५ सालीं प्रतापगडच्या युद्धांत विजापूरचा प्रसिद्ध सरदार अफजलखान पराभूत होऊन मारला गेला. तेव्हांपासून या नव्या सत्तेचा दरारा मुसलमानांना जाणवूं लागला. १६७४ सालीं शिवाजी महाराजांनीं विधिपूर्वक राज्यारोहण केलें. १७१९ सालीं दिल्लीवर बाळाजी विश्वनाथानें केलेल्या स्वारीमुळें मराठी स्वराज्याचे मराठी पादशाहींत रूपांतर झालें व पेशव्यांची सत्ता त्यानंतर एकसारखी वाढीस लागली. मराठ्यांनीं मारलेली अखेरची मोठी लढाई १७९५ सालीं खर्डा येथें झाली. महादजी शिंदे, अहिल्याबाई होळकर, हरिपंत तात्या फडके, नाना फडणवीस, तुकोजी होळकर, परशुरामपंत पटवर्धन वगैरे मराठी राज्यांतील कर्ते पुरुष एकामागून एक मृत्युमुखीं पडले, आपापसांत कलह सुरू झाले, मत्सर भडकला व स्वार्थ नागडा झाला आणि कुलकलंक कलिपुरुष राघोबा दादा याचा पुत्र बाजीराव बुडवा, याच्या हातीं पंतप्रधानकीचीं वस्त्रें पडलीं आणि मराठी सत्ता तत्वतः वसईच्या तहानें १८०२ सालच्या अखेरीस आणि वस्तुतः १८१८ सालीं धुळीस मिळाली. त्यानंतर मराठ्यांनीं थोडीबहुत टुरटुर करून पाहिली परंतु संघटणेच्या अभावीं ती फोल ठरली व इंग्रज या देशाचे स्वामी बनले. १८५७ सालीं नानासाहेब पेशवे यांनीं तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांच्या साह्यानें स्वराज्य-प्राप्तीसाठीं अखेरचा झगडा करून पाहिला व मृत्यु आणि पराभव समोर आ वासून उभा असतां पिंजऱ्याच्या लोखंडी गजांशीं त्या सिंहानें डोक्यानें टक्कर देऊन अखेरची धडपड करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिली. ती फसली असली तरी त्या नरशार्दूलानें पित्याच्या नादानपणाबद्दल प्रायश्चित्त घेऊन भट कुलावर आलेला कलंक पुसून काढला हें खास !

मराठेशाहीचा हा स्फूर्तिदायक इतिहासखंड कालमानाच्या दृष्टीनें लहान असला तरी पराक्रमाच्या दृष्टीनें अतिशय मोठा आहे. श्रीरंगपट्टणपासून तों लाहोर–अटकेपर्यंत आणि द्वारकेपासून तों कटकेपर्यंत मराठी भाले या अल्पशा कालखंडांत तळपत होते. मराठेशाहीचें वैभवपूर्ण पराक्रमी नाटक हिंदुस्थानच्या विस्तीर्ण रंगभूमीवर विलसत होतें. दोन कोटीपेक्षां कमी वसती असलेल्या महाराष्ट्रांतील मराठ्यांना हा पराक्रम कसा करतां आला ? मराठे काळेसावळे, बुटके, हाडकुळे; त्यांचा देश दगडी व रूक्ष; त्यांची भूमि निर्जल व अल्पप्रसू ; त्यांचे भीमथडी घोडे देखील इतके ठेंगणे कीं त्यांना घोडे न म्हणतां बटें म्हणत असत ! उलट उत्तरेकडील मुसलमान उंचेपुरे, थेडे गौरवर्णी व भरभक्कम बांध्याचे; त्यांचा देश सपाट मैदानी, दाट वस्तीचा व त्यांची भूमि जलपूर्ण व सुपीक; त्यांचे घोडेहि डौलदार ! दक्षिणेंतील दारिद्र्याला उत्तरेकडील वैभव सतत नाक मुरडून हंसत होतें. मग मराठ्यांनीं मुसलमानांना पाणी कसें पाजलें व मोगल बादशाहीचीं हाडें कशीं खिळखिळीं केलीं ?

प्राचीन काळीं राष्ट्राराष्ट्रांतील संबंध आजच्यासारखे घनिष्ठ नसले तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष्य करण्यासारखे सूक्ष्म खास नव्हते. हिंदुस्थानच्या मोगल राजवटीचा इतिहास लिहितांना युरोपांतील राजकारणाचे धागेदोरे हातीं ठेवणें भाग पडतें. स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड, फ्रान्स व जर्मनी यांच्या आपापसांत राज्यविस्तारासाठीं व व्यापारी चढाओढीपाठीं ज्या झटापटी त्या काळीं सारख्या चालू होत्या, त्यांचे परिणाम हिंदुस्थानच्या इतिहासावर घडल्याशिवाय कसे राहातील ? कर्नाटकच्या नबाबांतील यादवी व म्हैसुराकडील राजकारण म्हणजे युरोपांतील इंग्लंड व फ्रान्स यांच्या शतसांवत्सरिक युद्धाचे तत्कालीन पडसादच होत. क्लाईव्ह व डुप्ले ही इंग्लंड–फ्रान्सचीं युरोपियन प्यादीं हिंदुस्थानच्या पटावर वागडत होतीं, इतकेंच काय तें. परंतु इंग्रज व हिंदी इतिहासकारांनीं मोगल रियासतींतून ब्रिटिश रियासतींत प्रवेश करतांना मधल्या मराठी रियासतीच्या महत्त्वाच्या कालखंडाकडे दुर्लक्ष्य करण्याचा जो पायंडा पाडला, त्याचा प्रतिध्वनि म्हणून कीं काय, मराठेशाहीचा इतिहास लिहिणारांचें व संशोधकांचें युरोपांतील तत्कालीन राजकीय घडामोडींकडे दुर्लक्ष्य तर झालेंच, परंतु हिंदुस्थानच्या भिन्न भिन्न प्रांतांत नांदणाऱ्या तत्कालीन चिमुकल्या राष्ट्रांच्या इतिहासाकडेहि त्यांनीं फारशी नजर टाकली नाहीं. आज हिंदुस्थान गुलामगिरीच्या समान भूमिकेमुळें एक राष्ट्र बनलें असेल. प्राचीन काळीं तें निश्चित एक राष्ट्रच होतें. कारण हिंदुधर्म व संस्कृत भाषा यांच्या बंधनांनीं समान भूमिका प्राचीनकाळीं या भरतखंडांत निर्माण झाली होती. परंतु मधल्या एक हजार वर्षांच्या कालखंडांत या विस्तीर्ण देशांत निरनिराळ्या जमाती निरनिराळ्या प्रांतांत संघटित व प्रबल होऊन त्यांचे हितसंबंध एक बनल्यामुळें चिमुकलीं राष्ट्रें त्यांच्यांतून निर्माण झालीं. महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें मराठे नांदत होते, त्याप्रमाणें राजस्थानांत रजपूत नांदत असत. ह्या दोन्ही हिंदुधर्मी जमाती असल्या, तरी त्यांना भिन्न भिन्न राष्ट्रांचें स्वरूप प्राप्त झालें होतें. महाराष्ट्र व राजस्थान हीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन स्वतंत्र राष्ट्रें निर्माण झालीं. बेल्जियम, हॉलंड, डेन्मार्क, इटली वगैरे युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रांच्या दृष्टीनें राजस्थान, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, बंग हीं हिंदुस्थानांतर्गत राष्ट्रें विस्तारानें किंवा लोकसंख्येच्या दृष्टीनें कमी दर्जाचीं ठरणार नाहींत. आज इंग्रजांच्या सासुरवासामुळें एकराष्ट्रीयत्वाची भावना हिंदुस्थानांतील सर्व विभागांत प्रज्वलित झाली असली, तरी भाषावार प्रांतरचनेचें अंतिम तत्त्व कॉंग्रेसला देखील मान्य झालें आहे. याचा अर्थ असा कीं, हे केवळ प्रांत नसून समान भूमिकेमुळें संघटित झालेलीं हीं स्वतंत्र राष्ट्रें आहेत, ही गोष्ट सर्वांना पटली आहे. हिंदुस्थानची भावी राज्यघटना देखील राष्ट्र-संघटनेच्या स्वरूपाचीच राहील. हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील प्रत्येक प्रांतिक राष्ट्राला अंतर्गत कारभारापुरतें स्वातंत्र्य राहील व मध्यवर्ति सरकार संघटित स्वरूपाचें राहील. धर्म हें राष्ट्रीयत्वाचें गमक नसून भाषा हें प्रमुख बंधन आहे. युरोपांतील सर्वच राष्ट्रें भिन्न पंथी परंतु ख्रिस्ती धर्मानुयायी आहेत, परंतु भाषाभेदानुसारच राष्ट्रभेद तेथें निर्माण झाले आहेत. इंग्रजी राजवटींत प्रांताप्रांतांतील भेद बरेचसे वितळले असले तरी समूळ नष्ट झाले नाहींत. परन्तु तीनशें चारशें वर्षांपूर्वी हे भेदाचे डोंगर फारच प्रचंड होते. त्यामुळें महाराष्ट्रांतील स्वराज्य स्थापनेचा इतिहास लिहितांना मराठे व मुसलमान यांच्यातील लढ्याचें केवळ तपशीलवार वर्णन करून सत्यबोध होणार नाहीं. केवळ मराठ्यांच्या पराक्रमाच्या जोरावर महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापना झाली नाहीं व मुसलमानी सत्तेला खो बसला नाहीं. मोगल सत्तेविरुद्ध राजस्थानांतील रजपुतांनीं अनेक शतकें जी झुंज घेतली तिचें अप्रत्यक्ष साह्य मराठ्यांना मिळालें. मेवाडचा सिंह राणा प्रताप व त्याचे पराक्रमी पूर्वज आणि पुत्रपौत्र यांनीं मोगल बादशाहीच्या पायांत सुरुंग भरण्याचे अनेक प्रयत्न केले. बुंदेलखंडचा राजा छत्रसाल हा बुंदेल्यांना एकत्र करून त्यांचें स्वतंत्र राष्ट्र करूं पाहात होता. हिंदुस्थानच्या उत्तरेस मुसलमानी धर्माच्या चढाईनें गांजलेल्या लोकांत शिख धर्माचा प्रसार होऊन त्यांचें धार्मिक एकीकरण झालें व मोगल साम्राज्याच्या उत्तर सरहद्दीवर स्वतंत्र शीख राष्ट्राचा जन्म कालांतरानें झाला असला, तरी त्या जन्माचीं पूर्व चिन्हें शिवाजी महाराजांच्या जन्माच्या अगोदर दृग्गोचर होऊं लागली होती.

हे सर्व भिन्न भिन्न राष्ट्रांतील राजकारणांचे प्रवाह एकत्र जुळविल्याशिवाय महाराष्ट्रांतील स्वराज्य गंगेचें यथातथ्य स्वरूप कळणारच नाहीं. शास्त्रीय संशोधनाला सूक्ष्मदर्शी यंत्रांतून केलेलें निरीक्षण अत्यंत उपयोगी पडत असलें तरी ऐतिहासिक संशोधनाला असलें एकांगी व सूक्ष्मदर्शी निरीक्षण मुळींच चालणार नाहीं. दूरदर्शी दुर्बिणींतूनच इतिहाससंशोधनाचे वेध घेतले पाहिजेत. जेवढी दूरदृष्टि असेल व भूमिका व्यापक असेल, तेवढें इतिहाससंशोधन अचूक व मार्गदर्शी ठरेल. मराठे काटक असले तरी बलवान खास नव्हते. रजपूत व शीख मराठ्यांच्यापेक्षां खात्रीनें अधिक सशक्त होते. मराठ्यांचें शौर्य तर बहुतांशीं त्यांच्या पायांत साठवलेलें असे. त्यांचे हात दुबळे व छाती निकस असे. टोळधाड यावी त्याप्रमाणें मराठे दिवसा लपूनछपून राहात, संधि सापडतांच शत्रूवर अचानक हल्ला करीत व तेथून थोडी कापाकापी व अधिकांश लूटमार करून पुनः जसे आले तसे आकस्मिक पळून जात व लुप्त होत असत. रजपुतांप्रमाणें त्यांनीं कधींच जोहार केला नाहीं व केशरी पोषाख करून 'मरूं किंवा मारूं' अशा दृढनिश्चयानें ते कधींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रणभूमीवर उभे टाकले नाहींत. पण रजपूत खरे शूरवीर होते. भीति हा शब्द त्यांच्या कोषांत सापडत नव्हता. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' ही गीतेची सर्वश्रेष्ठ शिकवण रजपूत क्षत्रियांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबांत बाणली होती. रजपुतांना भांग–गांजा–चरस–अफूच्या व्यसनानें पछाडलें होतें. त्यांच्या राजस्थानांत त्या वस्तू मुबलक होत असत. त्यामुळें कुसुंब्याचा घोट घेतल्यावाचून रजपुतांचें पाऊल पुढें पडतच नसे. उलट मराठे फार साधेसुधे असत. त्यांना सुपारीचें खांड व तमाखू याशिवाय दुसरें कोणतेंच व्यसन नसे. त्यामुळें रजपूत नशेंत चूर असत व बेडर वृत्तीनें युद्ध करीत. प्राणांची पर्वा त्यांना वाटत नसे. मराठे मात्र व्यवहारी, धूर्त व थोडे भित्रे होते. जरासें संकट दिसलें कीं त्यांनीं आपल्या पायांना गति देऊन रणांगणांतून पळ काढलाच म्हणून समजावें. आज जीव वाचविला तर उद्या पराक्रम करतां येईल, असें त्यांचें व्यवहारी तत्त्वज्ञान असे. रजपुतांना व्यवहारी यशापेक्षा कीर्तीची अधिक चाड असे. त्यामुळें रणांगणाला पाठ दाखवून राज्य करण्यापेक्षां युद्धांत मरणें त्यांना अधिक रुचत असे. दोघांचीहि आपापल्या वतनावर विलक्षण आसक्ति असे. त्यामुळें रजपुतांनीं आपलीं राज्यें शेवटपर्यंत राखलीं, मात्र परक्यांच्या मुलखाचें अपहरण मात्र त्यांनीं कधीं केलें नाहीं. ते शंकराचे पूजक होते व सांबाप्रमाणेंच त्यांचा स्वभाव भोळा परंतु प्रामाणिक असे. असत्याची त्यांना पराकाष्ठेची चीड असे. रामचंद्राप्रमाणें ते एकवचनी असत. त्यांची प्रतिज्ञा ते मेले तरी मोडत नसत. शरणागताचें रक्षण प्राण देऊनहि ते करीत असत. मराठ्यांना हें धार्मिक तत्त्वज्ञान मानवत नव्हतें. ध्येयसाधनेसाठीं फसवणूक करण्यांत त्यांना पाप वाटत नसे. परदारा व परद्रव्य यांचा रजपुतांना मुळींच लोभ नसे. त्यामुळें त्यांनीं लूटमार कधीं केली नाहीं. त्यांच्या स्वराज्याचें साम्राज्यांतहि त्यामुळें कधीं रूपांतर झालें नाहीं. त्यांचीं राज्यें तेवढीं शतकानुशतकें टिकलीं! अनेक राजकीय वावटळी आल्या व गेल्या. अनेक राजकीय क्रांत्या झाल्या तरी रजपुतांचें आसन ढळलें नाहीं. त्यांनीं आपलें ब्रीद मात्र सोडलें नाहीं. त्यामुळें त्यांच्या शत्रूंच्या मनांत त्यांच्याविषयीं आदरबुद्धि कायम राहिली. मुसलमान व रजपूत यांच्यांत सातआठशें वर्षें कलहाग्नि धुमसत होता. परंतु दोघांत कायमचा वैरभाव उत्पन्न झाला नाहीं. राजकीय क्षेत्रांत व धार्मिक दृष्टीनें रजपूत मुसलमानांचे शत्रू असले, तरी एकमेकांच्या गुणांबद्दल एरवीं दोघेहि आदरभाव बाळगून असत.

उलटपक्षीं, मराठ्यांची हाव विलक्षण. परस्वापहरणाचें त्यांना पाप वाटत नसे. त्यामुळें लूटमार ही त्यांच्या अंगवळणी पडलेली बाब होती. मराठी स्वराज्याचें यामुळें साम्राज्यांत सहज रूपांतर होऊं शकलें. त्यांचें राज्य वाढलें व नष्टहि झालें. त्यांची सत्ता वृद्धिंगत झाली व लय पावली. मराठ्यांचा मात्र ज्यांच्या ज्यांच्याशीं संबंध येई त्यांच्या त्यांच्याशीं कट्टें हाडवैर उत्पन्न होई. पुढें पुढें मराठ्यांच्या हावरेपणानें रजपुतांना परधर्मी मुसलमानापेक्षां हिंदुधर्मी मराठ्यांचीच अधिक चीड येऊं लागली. मुसलमानच काय, परंतु परकी व अनोळखी खिस्ती इंग्रजांवर देखील विश्वास टाकण्यास रजपूत तयार झाले, इतका त्यांना मराठ्यांचा संताप आला होता व अविश्वास वाटत होता. प्रेताच्या टाळूवरील लोणीदेखील मराठे चाटून खातलि, इतका त्यांच्या हावरेपणाचा डांगोरा उत्तरेंत पिटला गेला. भोसल्यांनीं बंगाल्यांत विजय मिळविला खरा, परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीच हावरेपणाची अपकीर्ति पदरीं पाडून घेतली. परदारापहरणाच्या बाबतींत मात्र मराठे रजपुतांइतकेच नेकीचे ठरले. दोघांनाहि आपापल्या कुलांचा अभिमान व वंशशुद्धि कायम ठेवण्याची तळमळ लागलेली असे. त्यामुळें इतरांच्या स्त्रीवर्गाविषयीं दोघांच्या मनांत पूज्यबुद्धि असे. रजपूत काय किंवा मराठे काय, मुसलमान किंवा ख्रिस्ती सुंदरी युद्धांत हातीं लागली तरी कोणीच तिचा अभिलाष धरला नाहीं. शिवाजी महाराजांनीं कल्याणच्या मुसलमान सुभेदाराच्या सुनेची आदरपूर्वक केलेली बोळवण व चिमाजी अप्पांनीं वसईच्या वेढ्यांत सापडलेल्या फिरंगी सुंदरीची साडीचोळी देऊन केलेली सन्मानपूर्वक पाठवणी, हीं दोन सुप्रसिद्ध ऐतिहासिक उदाहरणें मराठ्यांच्या नीतीवर उत्तम प्रकाश पाडतात.

शक्ति व पराक्रम या दोन्ही बाबतींत रजपूत व शीख समसमान ठरतील. रजपूतांप्रमाणेंच किंबहुना थोडे अधिकच शीख धिप्पाड आहेत. शीख व रजपूत दोघेहि खरे शूर, मर्द, वीर आहेत. मराठ्यांचा पळपुटेपणा दोघांनाहि तिरस्करणीय वाटतो. शीख लोकांचा धर्म मराठे व रजपूत यांच्या प्राचीन हिंदु धर्मापेक्षां नवीन व तारुण्यानें मुसमुसलेला आहे. त्यामुळें शिखांचा धर्माभिमान मराठे व रजपूत या दोघांपेक्षांहि अधिक कडवा व तीव्र आहे. कोणत्याहि नव्या धर्मपंथाचे अनुयायी असेच कडवे असतात. कारण अनुयायांचा धर्माभिमान तीव्र नसला, तर जुन्या व रूढधर्माच्या प्रचलित राजवटींत नव्या पंथाचें आसन स्थिर होणें अशक्यप्राय असतें. शीख लोकांना हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांचें वावडें असलें, तरी मुसलमानांइतकें कट्टें शत्रुत्व त्यांना हिंदु लोकांविषयीं वाटत नाहीं. कारण बहुसंख्यांक मुसलमानी वस्ती असलेल्या प्रांतांत मुसलमानी सत्तेखालीं शीख धर्मानुयायांना वावरावें व जिवंत जगावें लागत असल्यामुळें, मुसलमानांच्या कडव्या इस्लामी चढाईला जशास तसें या न्यायानें ठोशास ठोसा देऊनच त्यांना पायबंद घालावा लागे. शीख धर्माचे आद्य संस्थापक गुरु नानक यांचा नामदेवादि हिंदु संतांशीं निकटचा स्नेहसंबंध जडला असल्यामुळें व हिंदुधर्मी संतांचीं अनेक पदें शिखांच्या परमपूज्य ग्रंथसाहेबांत समाविष्ट झालीं असल्यामुळें, हिंदु व शीख यांच्यांत सहानुभूति वसत असे. कारण दोघांनाहि मुसलमानांच्या चढाऊ व घातकी आक्रमणाला तोंड द्यावें लागे. आणि आजमितीला त्या दोघांतील ही सहानुभूति इतकी वाढली आहे कीं, शीख धर्म हा स्वतंत्र धर्म नसून केवळ हिंदुधर्मांतर्गत एक पंथ आहे असें मानण्यापर्यंत अनेकांच्या सहानुभूतीची मजल पोंहोचली आहे. परंतु शिखांना विलक्षण धर्मप्रेम असलें तरी मराठे किंवा रजपूत यांच्यासारखी स्वातंत्र्याची आवड मात्र त्यांना नाहीं. त्यामुळें केवळ धर्मरक्षणाकरितां त्यांनीं स्वराज्य स्थापन केलें. स्वतंत्र शीख राज्याची स्थापना रणजितसिंहानें १८०७ सालीं केली व त्याच्या मृत्यूनंतर केवळ दहा वर्षांनीं शीख राज्याचा अस्तहि झाला. कारण मुसलमानी सत्तेखालीं शीख धर्माला वाटत असलेलें भय इंग्रजी सत्तेखालीं नष्ट झालें. धर्मप्रेमाच्या कडवेपणांत ते कट्टर मुसलमानांनाहि लाजवितील. परंतु स्वातंत्र्याची तेवढी तीव्र लालसा नसल्यामुळें त्यांचें स्वराज्यच फार दिवस टिकलें नाहीं; मग त्याचें साम्राज्यांत रूपांतर होण्याची गोष्ट दूरच राहिली. १८५७ सालीं मराठे व मुसलमान यांनीं इंग्रजांपासून आपलीं राज्यें परत जिंकून घेण्याचा शेवटचा प्रयत्न करून पाहिला. दुर्दैवानें तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अयशस्वी ठरला. परंतु १८१८ सालीं भट घराण्यानें पेशवाई गमावली, त्या गोष्टीची आंच १८५७ सालीं नानासाहेब पेशव्यांना लागून त्यांनीं इंग्रजांविरुद्ध त्या उठावणींत पुढाकार घेतला. परंतु १८४९ सालीं आपलें स्वातंत्र्य गमावून बसलेले शूर मर्द शीख १८५७ सालीं बर्फाप्रमाणें थंड राहिले. केवळ आठच वर्षांत त्यांना आपल्या गमावलेल्या स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा विसर पडला आणि कंपनी सरकारचे राजनिष्ठ बहाद्दर शीख शिपाई म्हणवून घेण्यांत त्यांना धन्यता वाटूं लागली. शिखांचें स्वातंत्र्यप्रेम इतकें तकलुपी निघालें ! युद्धाच्या भट्टींत टाकतांच त्यावरील मुलामा उडून गेला व आंतलें पितळ उघडें पडलें.

साधेपणाच्या बाबतींत मात्र मराठ्यांची बरोबरी कोणीच करूं शकत नाहीं. मराठ्यांपेक्षां रजपूत अक्कडबाज आणि रजपूतांपेक्षांहि शीख अधिक मिजासखोर ठरतील. मुसलमानी सहवासानें नबाबी राहाणीची सवय त्यांना लागली. मुसलमानांच्या साहचर्यानें त्यांच्या नीति-मत्तेलाहि ग्रहण लागलें. परद्रव्य त्यांना लोष्ठवत वाटणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर परदारा त्यांना मातेप्रमाणेंहि पूज्य भासणार नाहीं. दुसऱ्याच्या बायका आपल्या घरांत घालणें व त्यांना बाटविणें, या मुसलमानी रिवाजाचें शिखांनींहि अंशतः अनुकरण केलें. त्यामुळें आपल्या गोषांतील स्त्रियांना हिंदु शेजाऱ्यांची भीति नाहीं, अशी ज्याप्रमाणें मुसलमानांना निर्धास्तपणें ग्वाही देतां येते, तशी शीख शेजाऱ्याबद्दल देतां येत नाहीं. कारण उत्तरेस त्या दोघांनाहि जशास तसें हें धोरण नाइलाजानें पतकरावें लागलें. शीख–मुसलमान दोघांचेंहि या बाबतींत सारखे डावपेंच चालू असतात. या धोरणामुळेंच शीख समाज पंजाबांत इतका लहान असतांहि आपला वचक राखून आहे. पंजाबांतील लोकसंख्येच्या मानानें मुसलमानांचा पहिला, हिंदूंचा दुसरा व शिखांचा तिसरा नंबर लागतो. याशिवाय पंजाबांतील हिंदु-मुसल-मानांना परप्रांतीय हिंदु-मुसलमानांचें प्रसंगीं साह्य, निदान त्यांचा नैतिक पाठिंबा तरी मिळवितां येतो. परन्तु शिखांना तोहि आधार नाहीं. त्यांची सारी वस्ती पंजाबांतच आहे. अशा परिस्थितींत देखील त्यांनीं आपलें राजकीय महत्त्व कायम ठेवलें, एवढेंच नव्हे तर तें अनेक पटीनें वाढविलें. होमरूल लीगची चळवळ करण्यापेक्षां शीख गुरुद्वारांची सुधारणा करणें त्यांना अधिक पसंत पडलें व त्यांनीं या अधार्मिक युगांत व कायदेबाज इंग्रजी राजवटींत कायदे व हायकोर्टाचे निवाडे धाब्यावर बसवून आपली धार्मिक बंधनें अधिक दृढ व पवित्र करून घेतलीं व आपलें संघटण यशस्वी केलें. गुरुद्वारांतून व्यसनी, सत्ताधिकारी व पिढ्यान् पिढ्या अधिकारसूत्रें हातीं धारण करणाऱ्या महंतांना गचांडी मारून त्यांनीं गुरुद्वारें हीं धर्माचीं पवित्र मंदिरें बनविलीं व शीख धर्मांत नवचैतन्य आणलें. धर्मादायाचा ओघ योग्य मार्गानें वळवून शिक्षणाचा आपल्या जमातींत प्रसार केला व अनाथालयें स्थापन केलीं. परंतु रजपुतांपेक्षां मराठे अधिक लोभी व स्वार्थी असले तरी शीख या बाबतींत मराठ्यांनाहि लाजवितील. मराठ्यांचा देश दरिद्री. त्यामुळें त्यांचें सर्व आयुष्य पोटासाठीं खर्ची पडतें. कलाविलास ही रिकामपणाची कामगिरी करावयास त्यांना अर्थात फुरसतच सापडत नाहीं. कारण प्रत्येक गोष्टींची रुपये आणे पैंत किंमत करण्याची सवय त्यांना लागलेली असते आणि कलाविलास व सौंदर्य यांचा तर बाजारभाव ठरविणें अशक्यच ! मराठ्यांपेक्षां रजपूत अधिक कलावंत आणि शीख तर

पुस्तकालय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुसलमानासारखे या बाबतींत दर्दी! परंतु शीख धर्माच्या शिकवणीमुळें त्यांच्या मूळच्या विलासी वृत्तीला पायबंद बसला आहे. कारण शीख धर्माची परंपरा लढाऊ व चढाऊ असली तरी साध्या फकिरी बाण्याची आहे.

राष्ट्रराष्ट्रांतील गुणावगुणधर्म बरेचसे भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात. महाराष्ट्राच्या डोंगराळ भागांत राहाणारा इसम अंगानें काटक व स्वभावानें तेढा असतो. परंतु वऱ्हाडच्या सुपीक मैदानांत राहाणारा इसम विलासी व नबाबी वृत्तीचा बनूं लागतो. पहिला कष्टाळू तर दुसरा आळशी होतो. कारण कष्ट केल्याशिवाय पहिल्याचें पोटच भरूं शकत नाहीं आणि दुसऱ्याला खाटल्यावर पडल्या पडल्या पंक्ती उठवितां व बायका मिळवितां येतात. एकाच राष्ट्रांतील निरनिराळ्या भागांत राहाणाऱ्या लोकांच्या स्वभावधर्मांत इतके ठळक फरक पडतात, तर भिन्न भिन्न राष्ट्रांतील लोकांच्या स्वभावधर्मांत किती मोठे भेदाभेद पडत असतील? कारण भिन्न राष्ट्रांत भौगोलिक परिस्थितीबरोबरच परंपरा व संस्कृति यांचाहि लोकांच्या राहाणीवर व दृष्टीवर भिन्न भिन्न परिणाम घडून येतो. त्यामुळें प्रत्येक राष्ट्राचें ध्येय भिन्न राहातें व आचारमार्गहि निराळा पडतो. प्रत्येकाचें तत्त्वज्ञानहि निराळें असतें. अशा भिन्न प्रकृतीच्या राष्ट्रांचा एकमेकांशीं संबंध आला, म्हणजे खटका उडालाच म्हणून समजावें. त्या खटक्याचा शेवट कोणाच्याहि जयापजयांत झाला, तरी दोन्ही राष्ट्रांची विचार व आचार परंपरा त्या झगड्यानंतर पार बदलून जाते. कारण, भिन्न भिन्न संस्कृतींचा व तत्त्वज्ञानांचा मिलाफ होतो व जीवनाचें ध्येय बदलतें. रोमनें ग्रीस देश जिंकला खरा, परंतु ग्रीक संस्कृति रोमच्या छातीवर नांदूं लागली. गॉल लोकांनीं रोमन साम्राज्य बुडविलें परंतु रोमच्या ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला. त्यामुळें राष्ट्रराष्ट्रांच्या स्वभावविशेषाची तर्कशुद्ध चर्चा केल्याशिवाय इतिहासाचे सम्यक् ज्ञान होणें शक्य नाहीं.

मराठेशाहीचा इतिहास लिहितांना रजपूत व शीख लोकांनीं मोगल साम्राज्याविरुद्ध केलेले उठाव विसरून चालणार नाहीं. मराठ्यांना महाराष्ट्रांत मोगलांविरुद्ध लढून स्वराज्य स्थापन करतां आले, परंतु या बनावाला केवळ मराठ्यांचा पराक्रम कारणीभूत झाला नाहीं. कारण, मराठ्यांपेक्षां रजपूत खात्रीनें अधिक शूर वीर पुरुष आहेत. शीख लोकांनीं उत्तरेकडे धामधूम करून मोगल साम्राज्याला तणावा दिला, म्हणून मराठ्यांना स्वराज्यस्थापनेला अनुकूल संधि मिळाली. उलट पक्षी मराठ्यांनीं दक्षिणेंत जोर केला म्हणून औरंगजेबाला दिल्ली सोडून औरंगाबादेस कायमचा तळ देऊन बसावें लागलें. त्यामुळें शीख लोकांचा सासुरवास व छळणूक कमी झाली व त्यांच्या संघटनेला संधि सापडली. शीख धर्मावरील इस्लामी आक्रमणाचें संकट टळलें व तो धर्म अधिक तेजस्वी झाला. मराठी उठावणी यशस्वी झाली नसती तर शिखांचें स्वतंत्र राष्ट्र निर्माणच झालें नसतें. उलट पक्षी, शीख व रजपूत यांचें भय मोगल साम्राज्याला नसतें, तर मराठ्यांना चिरडून टाकणें औरंगजेबाला सोपें गेलें असतें. मराठ्यांच्या पराक्रमाची सदान्कदा अवास्तव स्तुतिस्तोत्रें गाणारांनीं हे पूर्वापार संबंध व हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न राष्ट्रांतील तत्कालीन ऐतिहासिक घटना विचारांत घेतल्या पाहिजेत. त्या शिवाय यशाचा कितवा हिस्सा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांच्या पराक्रमाच्या पदरांत पडेल हें ठरवितां येणें दुरापास्त आहे. मराठ्यांच्या राष्ट्रीय गुणावगुणांची चर्चा तर्कनिष्ठुर पद्धतीनें इतिहासकाराला केली पाहिजे. सत्य कटु असलें तरी तें कबूल केलेंच पाहिजे. दुर्गुणांचें कथन हें स्वाभाविक अप्रिय असतें. परंतु इतिहासकाराला लोकरंजनाचा 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम्' हा दंडक पाळतां येत नाहीं. 'अप्रियमपि सत्यं सदैव ब्रूयात्' हेंच सूत्र त्याला आपल्या डोळ्यांसमोर धरणें भाग आहे. अशा निष्पक्षपाती दृष्टीनें त्यानें आपल्या राष्ट्राची इतरांशी तुलना केली पाहिजे व कोणाच्याहि रागलोभाची पर्वा न करतां जें सत्य आढळून येईल त्याचा निर्भय चित्तानें आविष्कार केला पाहिजे. इतिहासकार हा भूतकाळांत रममाण होत असला तरी गतकाळांत आढळलेल्या त्या सत्याच्या बळावर वर्तमानकाळींहि लोकांना मार्गदर्शक होऊं शकतो. कारण भूतकाळच्या अचूक ज्ञानामुळें मार्गांतील खांचखळग्यांची त्याला माहिती झालेली असते. भूतकाळच्या अनुभवाचा फायदा घेऊन राष्ट्राला वर्तमान काळीं भविष्यकाळचा ध्येयसिद्धीचा बिनचूक मार्ग दाखविणें, हीच खऱ्या इतिहासकाराची भूमिका होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महत्पूर लढाईच्या वेळचा पत्रव्यवहार

[लेखक—सरदार माधव विनायक किबे, M. A., इंदूर]

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत **विठ्ठल महादेव किबे** उर्फ तात्या जोग यांचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. यांची मुख्य कारकीर्द होळकर राज्याचे मुख्य कारभारी या नात्यानें इ. स. १८१८ ते १८२६ पर्यंत झाली. श्रीमंत महाराज यशवंतराव होळकर यांच्या सैन्यांत, प्रथम खजिनदार म्हणून व पुढें लढवय्येहि म्हणून यांनीं महत्त्वाचें काम केलें; पण श्रीमंत महाराज यशवंतराव वारल्यावर त्यांच्यावरील जबाबदारी वाढली व महत्पूरच्या लढाईंत होळकर सरकारच्या फौजेचा नायनाट झाल्यावर त्या राज्यांत स्थिरस्थावरता करणें सर्वस्वी यांच्यावर पडलें. शिवाय मध्यहिंदुस्थानांतील इतर संस्थानिक, विशेषतः महाराष्ट्रीय, व जहागीरदार वगैरे यांचें इंग्रजाशीं व आपसांतील संबंध व्यवस्थित करून देशांत शांतता नांदविण्याच्या कामांत यांचा फार मोठा भाग होता. होळकरांच्या अभिवृद्धीसाठीं यांनीं जें केलें त्याची इंग्रज व होळकर राजपुरुष यांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. इतकेंच नव्हे, तर तत्कालीन कागदपत्रावरून तें स्पष्ट होत आहे.

महत्पुरांत इंग्रज व होळकर सरकारची फौज यांतील झालेलें युद्ध उत्तर मराठेशाहीच्या इतिहासांत दीर्घ परिणामी ठरलें. त्या लढाईंत झालेल्या होळकर फौजेच्या विध्वंसामुळें उत्तर हिंदुस्थानांत पेशव्यास पाय ठेवण्यास जागा राहिली नाहीं. बाजीराव अशिरगड पावेतों आला होता. त्यांस तेथेंच राज्यत्याग करावा लागला.

या पराभवाचें वैशिष्ट्य हें आहे कीं तो होण्यास जीं कारणें झालीं तीं सर्वच मराठेशाहींत दृष्टीस पडत होतीं. फौजेचा वरचढपणा, पैशाची अव्यवस्थेमुळें तूट, परकीयांचें फौजेंत वर्चस्व, यादवी, हींच तीं होत. हीं सर्व, सोबत बारा पत्रें जोडलीं आहेत त्यांत इतिहासज्ञास, वर्णित झालेलीं आढळतील. त्यांतील सहा पत्रें खुद्द विठ्ठल महादेव यांनीं आपल्या वडील कन्येस लिहिलीं आहेत. यांतहि एक रहस्य आहे. बाकीचीं पत्रें, एक पत्र सोडून, विठ्ठल महादेव यांच्या पत्नी **रखमाबाई** यांस इतरांनीं लिहिलीं आहेत. त्या वेळचा जो अन्य पत्रव्यवहार उपलब्ध आहे त्यावरून त्या गृहकृत्यांत व राजकारणांत आपल्या पतीच्या हयातींतहि फार मोठा भाग घेत होत्या असें समजतें. पण विठ्ठलपंतानें त्यांच्या नांवानें पत्रें न लिहितां, आपल्या लहान वयाच्या कन्येचें नांव पुढें करून हीं लिहिलीं आहेत. यांत त्या काळची मर्यादा विशद होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विठ्ठल महादेव ता. ९ मार्च १७७९ रोजीं जन्मास आले व ता. ४ एप्रिल १८२६ रोजीं अल्पवयींच वारले, या थोड्या अवकाशांत त्यांनीं मिळविलेला नांवलौकिक व केलेली कामें पहातां आश्चर्य वाटतें. त्यांची जन्मकुंडली खाली दिल्याप्रमाणें आहे.

चैत्रमासे कृष्णपक्षे तिथौ ८ सौम्यवासरे घटी ४४।१८ जेष्ठी नक्षत्रे घ. २५–२७ सह मूळ व्यतिपात योगे घ. २५–४० इष्ट घटी ४३–४४



—१—

पो छ २० मोहरम **श्री**

चिरंजिव सौभाग्यवती गंगाबाई यासी,

विठ्ठल महादेव अनेक आशिर्वाद उपरी येथील क्षेम ताा कार्तिक वाा शुक्रवार प्रातःकाल मुाा श्रीकायावर्णेश्वर नजीक डग दोन कोस येथे सैन्यासह असो. विशेष. तुम्हांकडून दोन पत्र एक वाा १ व द्वितीयचे ऐसी पाठविली ती पाहून संतोष जाला. येथील धरणे याचा बैदा ऐकून तुम्हीं उदास जाला म्हणून पत्रीं विस्तारे पूर्वक लिहिले आहे. त्यांस येविसीचें पत्र काल डाकेत दिल्ही ती पावलीच असतील. तीन दिवस धरणे निकडीचे जाले. आम्ही जाऊन देवढीवर बेचो देऊन राहिल्यानंतर चौथे रोजी दोन प्रहरी खाडात जाऊन नबाब वगैरे मंडळहि होते तेथे जाब होऊन सरकारासी बोलणी जाली. कितेक मनात संशय होते ते दूर होऊन सफाई जाली. सिलेदार यासी छावणीचे मुळे देणे केले हे द्यावे त्यास त्याचाहि आज उद्या एखादा तह ठरेल. चिता नाही. आपल्यासी नबाबाचे वचन पके आहे. तेथे दुसरी कोणी यक व्हावयाची नाहीं. तुम्हीं काही चिता न करावी. कालचे मुाा रेजिमेंट पलटण वगैरे रोशनबेग व रोशनखा वगैरे यांसी सरकारचे बोलावणी गेली. त्याजवरून पलटण आले. येऊन भेटी जाल्या. आम्हीं त्याचे भेटीसमई तेथे नहुतो. पुढे निघोन आलो. पलटनवाल्याच्या भेटी जाल्या तेंव्हा त्याचे म्हणणे, की आपण बोलाविल म्हणून आलो आणि आपण कूच केला. तेव्हा प्रशस्थ नाही. त्याजवरून सरकार स्वारी तयार जाली. ते तेथेच मुाा राहिली. नबाब व शेडगे बरोबर राहिले. वरकड झाडून येथे आला. आज स्वारीही येईल. नंतर जाब होऊन डेऱ्यास येऊ ऐसे आहे. होईल ते मागाहून लिहू. सांडस्वार इसम मुदाम पाठविणार त्यास तूर्त प्रयोजन नाही. पेशजीरा गोविंद दादा हुजरे पाा ति. रा. चिंतोपंत भाऊ आले. त्याणी पावती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. सौ. सगाबाईस शाल देणे ती कोणती द्यावी म्हणून लिहिले, त्यास तुमचे विचारे येईल ती द्यावी. कर्डकर हवेलीकडे जिनस येतो त्यास हसिलाविसी दिकत करितात. म्हणून सिंदे साहेबाकडून ताकीदपत्रे आणवनु ती पाठविली आहेत. द्यावी म्हणजे आडथळा होणार नाहीं. सरकार स्वारी ही मदतपुराकडे लौकरच येईल. जागोतीदासाने नि मा कापड आणिले त्याचा महसूल जोरावदादाचे§ विद्यमाने घेतील. त्याजकरिता पत्र पाठविले आहे. तेथें कुल महसूल माघारी घेणे. आवूहून कापड आले ते शेटजीचे विद्यमाने येईल. ते आपले वरी आणोन ठेवावे; सावरीस ठेवावे म्हणोन लिहिले होते, त्यास तेथे, ठेऊ नये, हा आशीर्वाद. ”

—२—

श्री

चिरंजीव सौभाग्यवती गंगुबाई यांसी,

प्रति विठल महादेव आसीर्वाद उपरी येथील कुशल ताा कार्तिक वाा २ भोमवासर परियेत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे. विशेष इकडील माार रोज गुाा पत्र पाठविले ते पाऊन वृत कललेच असेल. रवीवारी पठाण व सेडगे धर्णे आपले डेऱ्या सांईकाल परियेंत बसले. नंतर राजश्री नबाब आम्हाकडे आले. घटका रात्रीस देव्हडीवर गेलो. तो तेथेंच राहिलो. संध्याकाल परियत स्नान जाले नाही. नंतर स्नान भोजन जाले. नबाब आम्हाजवळच आहेत. सिलेदाराचे रु. देणे, त्याची तोड जोड आज उद्या पडेल. तुम्ही बाजार आवईवर घाबरू नये. स्वस्त असावे. तोडीचे बोलणेही लागले आहे. आम्हां विषयी काळजी न करावी. तुम्हीं सावध आपले ठिकाणी असावे. रोज गुाा पत्र पाठविले त्या प्रो महीदपूर सावेर व खासगी गोविंदराव विठल यास ताकीद निक्षून करून ऐवज सावकाराकडे नगदी भरणा करवावा. येथे आज उद्या बोलण्या येईल. तेव्हां ऐवजाचे काम पडेल. याजकरितां ऐवज भरण्याची ताकीद करावी. उज्जनच्या आवयावर न जावे. येथे तोडीचे बोलणे लागले. आम्हां विसी कालजी किमपी न करावी. नबाब व सरकार याचेच तोड जोडीत आणि पठाण सिलेदाराचाही जाब बोलण्यांत आले, त्या शिवाये नाही. कळावे. बहुत काय लिो हे आसीर्वाद.

—३—

पाो छ १६ मोहरम श्री

चिरंजीव सौवती **गंगाबाई,**

प्रति विठल महादेव आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा कातिक वाा १ यथास्थित असे. विशेष इकडील माार. दोन चार पत्रीं लिहिला आहे त्यावरून सर्व समजलेच असेल. हाली छावणीतून पलटण सेद वगैरे बरोबर आणिले त्याचा करार स्वारीत गेल्यावर तुमचा तनखा देऊ. येथे आल्यावर पचवीस दिवस जाले, त्याची काहीच तोड न लागे. तेव्हा त्याणी रोज गुाा सर्व

§ झोरावर पंत उदयपूरचा—सर सिरेमत बापनीचा पूर्वज.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मडळी जमा होऊन आपले डेऱ्यास धरणे दिल्हे. अस्तमानी नबाब$ याणी बोलून चालून मंडळीसह आम्ही देवडीवर गेलो. दोन प्रहर रात्र परियत सेदास व रामजी यास समजावणे तितके समजाविले. परंतु त्याचा एकच जाब की रू. या वेऊ. हीच आडी घालून समजाविणे न ऐकतां रात्रौ देवडीवरच बसविले. आम्हाजवळ जबाबही आहेत. तुम्ही कोणे विसी काळजी न करितां स्वस्थ असावे. ईश्वर हेही संकष्ट पार पाडील. धरणेवाले यास ऐवज दिल्हा पाहिजे, सा तुम्ही खासगी सावेर महतपूर येथे ताकीद निक्षुण लिहून पाठवून ऐवज दुकानी भरणा करवावा. सावरवाल्यास व खासगीवाल्यास समक्ष बोलाऊन ताकीद निकडीची करावी. खासगीवाल्यांनीं तर यंदा शपत वाहिली आहे की तोजीचा ऐवज दुकानी भरण्या विसी त्यास त्याजला चांगले फजीत करून प्रसग हाच आहे असे समजाऊन ऐवज दुकानी सत्वर भरणा करावा. तुम्ही आम्हा विसी एकरूप काळजी न करावी. आज बोलणे चालणे होऊन जाव जिकडील तिकडे उरकोन धरणे उठऊ. काळजी करू नये. तुम्हाकडील वर्तमान वरचेवर लिहून डाकेत देत जावे, बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद.

—४—

पा। छ १९ मोहरम. **श्री**

चिरंजीव सौभाग्यवती **गंगाबाई** या प्रति,

विठल महादेव आसीर्वाद उपरी येथील कुशल ता। कातिक वा। ४ गुरुवार यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे. विशेष. येथील मारांची पत्रे तुम्हाकडे पाठविली आहेत ती पावलीच असतील. त्यावर परस्पर वर्तमान तुमचे ऐकण्यात आल्यावर तुमचे मनांत इकडील बहुत काळजी लागली असेल. त्यास येथे विशेष बाहीदा कांही नाही. सिलेदार यांस खर्चाचे द्यावयाचा जाब उगण्याची तोड व्हावी त्यांस आवकाश लागली. यामुळे त्यांत येथील कोणी व रामदीन सीरून त्याणी बहीदा करविला. दोन दिवस सिलेदार यांचे धरणे निकड राहिले. का समक्ष सरकारची गाठ पडोन बोलणी जाली. त्यात सरकारानी निखालस आगत्यवाद प्रमाणे कमती ठेविली नाही व या काळी नबाब कपूरखा याणी सरकारासी आपले तरफेचे बोलणे प्रांजळ करण्यांत कमती न केली. तेव्हा सरकारचे प्रमाण जाली. यावर जे मधे लबाड्या करीत होते त्यास सिक्षा व रामदीन याजवर रागे भरले. या योगे करून यावर कोणी लबाडी करू नये असे जाले. सिलेदार यांचेही समजाविषयीचा तोडजोड लागला आहे. सत्वरच सारे गुंते उरकण्यांत येतील. तुम्हीं कोणे विषयी एकरूप चिंता न करावी. तिकडील महालच्या तोजी बाधोन सत्वर ऐवज वसूल होऊन दुकानी भरणा करवावा या कामास ताकीद सिस्त करावी. येथे सिलेदार यांस द्यावयास ऐवज पाहिजे. त्या करिता महाला निहायेच्या ऐवजास विलंब लागू नये. हे सत्वर करावे. तुम्ही बहुत सावध राहून वरचेवर तुमचे कुशळ वृत्त लिहीत जावे. आम्हा कडील चिंता एकरूप न करावी. " येथीले येथे आवाया मनस्वी दीन मजकूर याणी उठविला

$ हा टोकच्या अमीरखानाचा जांवई गफूरखान व पुढें तहान्वयें जावऱ्याचा नबाब.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हा तेथेही उठवील याजकरितां लिो आहे ह्या दोघाना धरण्याची तोड पडून उठले. बहुत काय लिो हे आशीर्वाद. " ¶

—५—

रवाना मि॥ मार्गशीर्ष शु॥ १३ श्री
छ ११ सफर रवीवार

चिरंजीव सौवती गंगाबाई यासी,

प्रति विठल महादेव आसीर्वाद उपरी येथील कुशल तोा मार्गशीर्ष शु॥ १२ यथास्थित असो. विशेष, इकडील गलबलीचे वर्तमान तुम्ही तेथें ऐकोन बहुत चिंताक्रा हावालदील होऊन सुक्यास पाठविले, तो येथे मागील चार पाच घटका दिवस चढता पावला. वर्तमान सांगीतलें कलले: तुम्ही स्वस्थ राहावे. राजकारण आहे, तेव्हां धरणे बखेडे लागलेच आहे. त्याचा काही विधीनिषेध नाही. देवडीवरून कंपूवाल्यानी कंपूत आणिले. चिता नाहीं. कपूत आपले सिवाय कोणी नाही. सारे आपले ममतेतील; दुसरी गोष्ट नाही. आपण सरचाकरी एकनिष्ठपणें केली आहे. तरी श्री हरी सर्व संकटे दूर करून आनद करील. तुम्ही बाजार आवयावर न जाता येथील लेख पाहून स्वस्थ चिते असावे. धरण्यातून मोकळे जाल्याचे वर्तमानही एक दो रोजात लवकरच पाठवितो. बहुत काय लिो हे आसीर्वाद.

—६—

पाो छ २७ सफर श्री

राजश्री **बाबुरावजी गोसावी** यांसी,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नोा नबाब केसरअली§ सलाम विनंती उपर येथील कुशल ताा छ २६ सफर मुाा तराणे जाणोन वर्तमान यथास्थित असे विशेष. आलीकडे राजश्री तात्यासाहेबाचे व लस्करचे वर्तमान काही समजले नाही. तुम्ही बातनी ठेविलीच असलेल्यास साकल्प लिहून कळवावे आणि आम्हास जशी सला देऊन त्याहाल त्या अन्वये करण्यांत येईल. इकडून ही हलकारे लस्करात जातात. परंतु खचीत वर्तमान थेटचे येत नाही. यास्तव आपण सविस्तर लिहून कळवावे. दुसरे खासगी गाव पो मार चे आहेत त्याजवर जप्ती राजेश्री रामदीन याणी केली आहे. शाळीचा तो वसूल घेतलाच आहे त्याणे. परंतु आपण तात्यासाहेबास लिहून पाठवावे आणि गाव खासगीचे आहेत, त्याचा बदोबस्त करण्याचे आम्हांस लिहिणे यावे. म्हणजे गावचा बंदोबस्त करू. आपले भरवशावर आम्ही आहो. त्यास बातमी व गावचा बदोबस्त करण्या विसीचे पत्र यावे वरकड लिहून कळवावे असे नाही. हमेशा पत्री संतोषवीत असावे. कळावे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶ अवतरण चिन्हांत घातलेलीं अक्षरें घाईत लिहिलेलीं दिसतात.

§ हा जावन्याच्या नवाबाचा नातेवाईक दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—७—

रवाना छ १९ मोहरम श्री

वडिलांचे शेवसी आपत्य गणोबाने दोनी कर जोडून सिर सां नमस्कार. विनंती विज्ञापना येथील क्षेम ताा कार्तीक वाा ४ गुरुवार प्रातःकाल पावेतो वडिलाचे अशीर्वाद करून वर्तमान यथोस्थित असे. विशेष. पेशजी येथील धरण्याचे पत्र लिहिले होते ते पावलेच असेल त्यास आपण धरणे जाहले म्हणून चिताग्रस्त असाल, त्यास कोणे विशी एकरूप काळजी न करावी. काल दो प्रहरा पासून बडांत जाऊन सरकारासी समक्ष बोलणी होऊन सफाई जाली. एक आपण सी नबाबाचे वच...पक्के आहे. तर कांही भय नाही. येथील वर्तमान तिकडे राव साहेबाकडे गेले त्याणीही मुतद पत्रे लिाा आणि समक्ष जाब साल होऊन सफाई होऊन सिलेदार यासी चार रुाा देणे याची तोड काढावी. याची ती आज निघेल आपण कोणे गोष्टी विशी चिंता न करिता स्वस्थ असावे. लश्करचा कुच होऊन दोन चार रोजात महतपुरानजी येणार आहे. परवा मगळवारी आहुरा नजीक मुाा होता. तेथून कुच जाले आजही मुाा डगे नजीक होणार. पुढे महतपुरात पुरावर मुाा जाल्यावर तेथून नजीक पडेल. वडीली तिकडील खासगी वगैरे माहाली ताकीद करून ऐवज वसूल घ्यावा, ये विसी राा भेगातीदास याजलाही आलादा पत्र लिाे आहे. त्यास निक्षून ताकीद असावी. आपली निष्ठा एक सरकार लक्षात तेव्हा कोन्हाच्याने काही घडत नाही हे " खचीत ईश्वर सर्व नीटच करील कालजी तिलःप्राय करू नये तांब्राचा प्रकार बहुत लयही बहुत होत...लका घडल ते खरे स्वारी दक्षणेस जाण्याचे विचारात आहे. तेव्हा तिकडे येईलच भेटही होईल बहुत काय लिाे लेभकीजे हे विज्ञापना. "¶

हेच पत्री चितो नारायण याचे आसीर्वाद. सदरी लिहिले आहे त्याजवरून कलेल. इश्वर सर्त कडून जिकडील तिकडे निराकर्ण होईल. आपण कोणे गोष्टी विसी कालजी न करावी. दोचार रोजात लष्करे महतपुराकडे येणार आहेत. कळावे लेभ असावा हे विनंती.

—८—

श्री

वज्रचूडे मंडित सौ **रखमाबाई** यांस,

प्रति लक्ष्मण सदाशिव नमस्कार. विनंती येथील कुशल ताा मार्गशीर्ष श्रुाा १५ यथास्थित असे. विशेष. आलीकडे आपल्याकडील वर्तमान लागत नाहीं. त्यांस सविस्तर कळवावे. लस्करची बातमी परस्परे ऐकिलीच आसेल. हली तांब्रचा मुकाम महतपुरावर आहे. आपली फौजेचा मुकाम कोठे आहे हे आद्याप पकी बातमी नाही. माणसे बातमीस पां आहेत पकी बातमी आल्यानंतर कलऊ. राजश्री तात्यासाहेब खुशाल आहेत म्हणोन कलले. ईश्वरकृपेने जे उत्तम

¶ अवतरणांतील अक्षरांवर शिरोरेखा नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेच घडेल. इतःपर शत्रूचे शस्त्र काही चालणार नाही. आपल्या कडील ही माणसे बातमीस गेलीच असतील. पक्की बातमी आली म्हणजे इकडे सत्वर कलवावी. आपण कोणे गोष्टी विसी काळजी करू नये. श्रीजी सर्व विघ्ने दूर करील. इकडे वर्तमान आल्यावर लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

—९—

रवाना छ ४ जमादिलावल श्री

सौवती वज्रचूडे मंडित रखमाबाई यांसी,

लक्ष्मण सदासीव नमस्कार विनंती येथील कुशल ताा फाल्गुण श्रुाा ५ गुरुवार मुाा महतपूर यथोस्थित आसे विशेष राजश्री तात्यासाहेब काल बुधवारी गंगराडेस आले. आज येथे मुकाम येणार. रात्रै डाखेत वर्तमान आले. आपल्यास कलावे एक दोन रोजात क्षेत्री येतील बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

—१०—

श्री

वडिलांचे शेवेसी आपल्याचा कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना ताा कार्तिक वाा १० यथास्थित आसे, विशेष पत्र पाठविले ते पावले मजकूर समजला, इकडील कालजी तिलमात्र न करावी. धरसेदाचे व सेडगे मंडळ याचे आहे त्यास स्वारीचा कूच होऊन आज मुकाम महतपूर नजीक आला आहे. येथे दोन चार मुकाम होऊन धरण्याचा तोडजोड निघोन किसाजी– कडील तिकडे रफे दफे होईल. काळजी न करावी. पत्र वरचेवर पाठवीत जावे. ताम्रा कडे दाट निकडीस आहे § ते घेऊन पुण्याकडील वर्तमान श्रीपत संस्थानीहून निघोन पुंरदऱ्याहून सिंहगडास गुजराथचे लत्यास गेले. मागे शत्रूची लगत आहे. घडल ते वर "चेवर पत्र पाठवून वर्तमान कळवीत आहे. शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना."‡

राजश्री बाबूरावजी साहेब नमस्कार विनंती "लिाा परिसोन लोभ कीजे ही विनंती."‡

—११—

पो छ ४ जमादिवल श्री

साहबचे सेवेसी सा. नमस्कार विनंती. येथील कुशल ताा फाल्गुन श्रुाा ५ गुरुवार पावेतो साहबाचे कृपेकरून यथास्थित आसे. विशेष येजमान साहब गंगराडेस आले. आताच बातंमी इग्रजाचे डाकेत आली, आज सायंकाल परियेंत महत्पुरास येतील. त्याची येण्याची बातंमी म्हणोन दोन तीन मुकाम येथें करून राहिलो. भेट जाल्यावर जसी आज्ञा करितील त्या आन्वये करू. राजश्री बापाजी पागा घेऊन पुढे सामोर आणावयास एक दो घटकेंत जातील. शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

§ हा भाग फाटला आहे.

‡ अवतरण चिन्हांतील लिखाणावर शिरोरेखा नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजश्री बाबूरावजी व माधवरावजी व गणोबा स्वामीस सा. नमस्कार लिा परिसोन लोभ करावा ही विनंती.

-१२-

मि॥ व॥ ७ बुधवार श्री

चिरंजीव सौवती **गंगाबाई** यांसी

प्रति विठल महादेव आशीर्वाद उपरी येथील कुशल मार्गसीर्ष वाा १३ शुक्रवार परियेंत. मुाा नजीक सीतामहू येथें यथास्थित जाणोन स्वकीये लिहिणे. विशेष इकडील लढाईचे वर्तमान तुम्हास कळलेच असेल. नंतर पौर्णिमेस महाराजानी वस्त्रे उभयतास दिली. इकडील काळजी एकरूप न करावी. सर्व आरिष्टे श्री गज्याननाचे कृपेनें निवारण जाली. सर्व वर्तमान येथून राजश्री बापाजी वैद्य रोज गुाा रवाना केले ते साकल्य सांगतील. कळावे बहुत काय लिहिणे हे आसिर्वाद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' राजनीति ' अमात्यांची कशी ?

(लेखक—वि. भि. कोलते, M. A., LL. B , अमरावती)

शिवकालीन महाराष्ट्रात, आपल्या अंगच्या कर्तबगारीने व बुद्धिकौशल्याने जी अनेक घराणी उदयास आली त्यापैकीच पंत अमात्याचे घराणे हे एक होय. या घराण्याचा मूळ पुरुष निलो सोनदेव हा असला तरी त्याचा पुत्र रामचंद्र नीळकंठ यानेच आपल्या कुलाची प्रतिष्ठा महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रतिष्ठित केली.

उभयता पितापुत्रानी आपापल्या काळी अपूर्व शौर्य व मुत्सद्देगिरी गाजवून आपल्या स्वामीची, अर्थात् छत्रपतीची मर्जी सुप्रसन्न करून घेतली होती. पण त्यात रामचंद्रपंताचेच यश अधिक उज्ज्वल आहे. संभाजीच्या वधानंतर म्लेंच्छाधिपतीच्या मर्मप्रहारांनी विकलांग व छिन्न-विछिन्न झालेल्या मराठेशाहीच्या मंदिराला आपल्या मुत्सद्देगिरीने कुणी सावरून धरले असेल तर ते रामचन्द्रपन्त अमात्यानेच; त्या विपन्न परिस्थितीत मराठे सरदारात जूट त्यानेच घडवून आणली, महाराष्ट्रात चैतन्य त्यानेच ओतले, यवनांनी पादाक्रांत केलेले स्वराज्य परत मिळवून मराठ्यांची कीर्ति व छत्रपतीचे तख्त त्यानेच कायम राखले. यामुळेच रामचंद्रपंत अमात्याचे नाव मराठ्यांच्या इतिहासात अजरामर झाले आहे यात शंका नाही. या थोर पुरुषाच्या कामगिरीचे समालोचन दुसऱ्या शिवछत्रपतीने एका सनदेत पुढीलप्रमाणे केले आहे.

"त्यानंतर त्यामागे थोरले कैलासवासी स्वामीने तुमचे बहुता प्रकारे चालविले. थोरले कैलासवासी स्वामीस कैलास जाहलिया उपरी राजश्री संभाजीराज काका यानी तुम्हास सुरनिसीचा हुदा सांगोन कुडालापासोन नरगुंद तुंगभद्रापर्यंत देश तुमचे स्वाधीन करून रवाना केले. ते समई तुम्ही स्रमसाहास करून कितेक देशदुर्गादी संपादन केले. तदनंतर अवरंगजेब दक्षिणेवरी चालोन आला विजापूर भागानगर या पादशाही हस्तगत करून राजश्री संभाजीराजे काका यावरी सेना पाठविली ते समई ताम्रास हस्तगत जाले त्याउपरी तीर्थस्वरूप राजश्री कैलास-वासी स्वामी सिंहासनारूढ जाले असता अवरंगजेब पादशहा याणे सवारी करून संपूर्ण राज्य आक्रमायाचा उद्योग केला आणि आक्रमीत चालिला ते समई राज्यभार तुम्हावरी टाकून कैलासवासी स्वामी स्वार होऊन कर्नाटकप्रांते चंजीस गेले मागे तुम्ही सेनासंभार मेलऊन ताम्राच्या फौजा मारून चालविल्या कितेक देशदुर्गे ताम्राक्रांत झाली होती ती पुन्हा हस्तगत

लेखकाच्या इच्छेनुसार ही शुद्धलेखन पद्धति मुद्दाम उपयोजिली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून गेले राज्य संपादून वरचेवरी संतोषवार्ता चंजीस पाठवीत गेलेस त्यावरून कैलासवासी राजश्री स्वामी तुम्हावरी संतोषी होऊन मजमूचा हुदा पहिले तुमचे बाप निलो सोनदेउ यास होता तो तुम्हास सांगोन तुम्हावरी कृपा दिवसे दिवस विशेष केली तुम्हीही निस्टापूर्वक वर्तोन स्वामीचे राज्य ताम्राकांत होते ते संपूर्ण यथापूर्व हस्तगत केले चंजीस कैलासवासी स्वामी असता तिकडे ताम्राची रज होऊन चंजीस परिघ पडिला ते समई तुम्ही या प्रांतीहून कर्नाटकांत सेनासंभार पाववून कैलासवासी स्वामीचे संकट निरशन केले त्याउपरी..." या उताऱ्यावरून खुद्द दुसऱ्या शिवछत्रपतीला रामचंद्रपंताची कामगिरी किती बहुमोलाची वाटत होती याची स्पष्ट कल्पना येईल.

प्रस्तुत रामचंद्रपंत अमात्याच्या नावावर ' मराठेशाहीतील राजनीति ' अथवा ' आज्ञापत्र ' या नावाचा एक राज्यशास्त्रावरील प्रबंध मोडतो. हा प्रबंध आकाराने अगदी लहान असला तरी गुणांनी तो फार मोठा आहे. मराठी भाषेतील प्राचीन ऐतिहासिक वाङ्मयात असा दुसरा सर्वांगसुंदर ग्रंथ क्वचितच आढळेल. प्रतिपाद्य विषयाचे सूक्ष्म व मार्मिक विवेचन आणि त्या विवेचनाला वाङ्मयाचा शृंगारसाज चढविणारी अभिजात व डौलदार अशी प्रौढ भाषापद्धति याचे मोठे मनोहर मिश्रण या प्रबंधात पहावयास सापडते. आणि म्हणूनच प्रस्तुत प्रबंध हा इतिहासज्ञ व वाङ्मयाभ्यासक या दोघांच्याही कौतुकाचा व आदराचा विषय झालेला आहे. राजकारणाच्या क्षेत्रात नामवन्त झालेल्या रामचंद्रपंताच्या नावावर तो मोडत असल्यामुळे तर कित्येकांना हा ग्रंथ म्हणजे अमात्याच्या यशोमंदिरावरील वाङ्मयरूप कळस असल्यासारखाच वाटतो. पण...हा प्रबंध खरोखरच रामचंद्रपंताने लिहिलेला आहे काय ?

अशी शंका त्याच्या सूक्ष्म वाचनानंतर मनात डोकावल्याखेरीज राहत नाही. आणि ही शंका आज मलाच प्रथम येत आहे असे नाही. प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. का. ना. साने यांनी या आज्ञापत्राच्या ' कर्त्याविषयी शंका प्रदर्शित केली होती ' असे श्रीयुत शंकरराव देव (धुळे) हे आपल्या खाजगी पत्रात लिहितात. ' विविधज्ञानविस्तार पुस्तकमालेतून ' हा प्रबंध प्रसिद्ध करण्यात आला (सप्टेंबर १९२६) तेव्हा मात्र त्यांना अशी शंका नव्हती असे दिसते. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत कै. साने यांनी हा प्रबंध रामचंद्रपंताचाच असल्याचे गृहीत धरलेले आहे, (प्रस्ता. पृ. १०) हे स्पष्ट दिसते. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रसिद्धीपूर्वी किंवा नंतर त्यांना वरील शंका आली असल्यास आपल्या कारणासहित त्यांनी तिचे कुठे विवेचन केलेले मला आढळले नाही.

प्रो. श्री. ना. बनहट्टी यांनी पाच सहा महिन्यापूर्वी नागपूर येथील ' मध्यप्रांत संशोधन मंडळात ' याच विषयावर एक निबंध वाचला. त्यांचा तो निबंध अजून प्रसिद्ध झालेला नाही. तथापि ' माझ्या लेखातील सिद्धांत आज्ञापत्रातील पहिली दोन प्रकरणेच केवळ नव्हेत तर सर्वच आज्ञापत्र रामचंद्रपंत अमात्य यानी लिहिले असणे शक्य नाही, अशा स्वरूपाचा आहे' असे त्यानी मला लिहिले आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रि. मि. कोलते

राजनीतीचे हस्तलिखित

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ' पंत अमात्य बावडा दप्तर - भाग १ ला ' या ग्रंथामुळे माझ्या शंकेवर बराच प्रकाश पडेल असे मला वाटले होते. तथापि त्याचा विशेष फायदा झाला नाही. त्यात रामचंद्रपंत अमात्याच्या नावावर मोडणारी ' राजनीति ' अथवा ' आज्ञापत्र ' छापलेले आहे. " यापैकी सन १६६० ते १७१५ इसवी या काळातील–रामचंद्रपंत अमात्यांनी शिवशाहीतील राजनीतिसंबंधी लिहिलेला व ' आज्ञापत्र ' म्हणून प्रख्यात असलेला कागद धरून सत्याणव कागद या पहिल्या भागात समाविष्ट केलेले आहेत " असा खुलासा संपादक श्री० सबनीसांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत केलेला आढळतो. बावडा जहागिरीच्या दप्तरी दाखल असलेल्या कागदपत्रात ' आज्ञापत्राचा ' कागद मुळीच नाही. बावडा दप्तरात छापल्याप्रमाणे खरोखरच आज्ञापत्राचे हस्तलिखित मूळ दप्तरात आहे किंवा नाही याची खात्री करून घेण्यासाठी ' बावडा दप्तराची पहाणी व निवड करून कालानुक्रम लावण्याचे काम ' ज्यांनी अत्यंत ' श्रमाने व मुद्दाम गगनबावड्यास ' जाऊन केले त्या रा. ब. रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्याकडे मुद्दाम चौकशी केली.

'बावडे दप्तरात राजनीतीचे हस्तलिखित नाही. विविधज्ञानविस्तारात हे प्रकरण पूर्वी छापले, त्यावरूनच पंत अमात्यांना त्याची माहिती. तो ग्रंथ रामचंद्रपंतांनी लिहिला असा यत्किंचित् पुरावा दप्तरात आढळत नाही. याच हेतूने दप्तराच्या संरक्षकानी व आम्ही त्रिखंड शोधले. रामचंद्रपंत ज्या पोथ्या वगैरे नेमाने वाचीत त्याही सर्व शोधल्या, पण बिलकूल पत्ता लागला नाही. सबनीसांनी देखील वि. ज्ञा. वि. च्या लेखावरूनच तो लेख आपल्या ग्रंथात छापला...' असे ते लिहितात.

विविधज्ञानविस्तारात ज्या हस्तलिखितावरून प्रस्तुत प्रकरण छापले होते ते हस्तलिखित सुद्धा सापडत नाही असे कळते. त्याची ' एकमेवाद्वितीयम् ' अशी प्रत धुळे येथील श्रीसमर्थवाग्देवता–मंदीरात आहे असे समजते. तथापि, त्यांच्या संग्रही असलेले हस्तलिखितसुद्धा ' अस्सल ' नाही, तर ' नकललेले ' आहे. त्याच्या शेवटी ' शालिवान शके १७६५ शोभकृन्नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध १५ इंदुवासरे संपूर्णम् ही नीति हुजूर लिहविली असे ' असा समाप्ति–लेख आहे. त्यावरून ही नकल शके १७६५ तील म्हणजे इ. स. १८४३ तील आहे. कोणत्या लेखकाने ती नकलली याचा उल्लेख तीत नाही. श्री. शंकरराव देव याच्या अंदाजाप्रमाणे ' ती बडोद्याची असावी व हुजुर म्हणजे बहुधा गायकवाड ' असावे असे वाटते. या हस्तलिखिताचा आरंभ व शेवट विविध ज्ञान-विस्तार-मालेतून प्रसिद्ध झालेल्या ' राजनीती'तील मजकुराशी बरोबर जुळतो. क्वचित् अक्षर लेखनात फरक आहे; पण मजकुरात नाही. त्यामुळे या हस्तलिखिताचा नवीन माहिती मिळविण्याच्या बाबतीत काही उपयोग होत नाही. राजनीतीच्या ' लेखका'च्या प्रश्नावरही त्यामुळे नवीन प्रकाश मुळीच पडत नाही. असो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तुत 'राजनीति' ही रामचंद्रपंत अमात्याची आहे असे समजले जाते; पण तसे का समजावे हेच कळत नाही. रामचंद्रपंताने ती स्वतः लिहिली असावी, असे दाखविणारे एकही वाक्य या राजनीतीत नाही. उलट तिचा आरंभ व शेवट जर नीट रीतीने लक्षात घेतला तर ती रामचंद्रपंताने लिहिली नसून दुसऱ्याच कुणी तरी लिहिली असावी हे स्पष्ट दिसते. राजनीतीचा आरंभ आणि शेवट असा.

आरंभ—"स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४२ मन्मथनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी गुरुवासेर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपती स्वामी यांणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमत पन्हा यासी आज्ञा केली ऐसीजे:- स्वामी राज्यासनारूढ जाहले असता" वगैरे.

शेवट—"याप्रमाणे हुजुरात, गड, किल्ले आदिकरून परम सावधतेने वर्तत मातुश्री साहेबाचे सेवेशी कोणेही अर्थे अंतर न पडे, तुम्ही केले सेवेचा मुजरा होय आणि या दिग्भित यज्ञास तुम्ही पात्र होऊन स्वामींनी जो तुम्हावर संपूर्ण अखत्यार दिला आहे आणि स्वामींची अनुपम्य दया तुम्हावरी आहे, ती दिनप्रतिदिनी अभिवृद्धीस पावे ती गोष्ट करणे. तो योजिला संपूर्ण उद्योग सिद्धीस पावून सत्वरच स्वामींचे आगमन त्या प्रांती होत आहे. तदोत्तरी तुमच्या विचारे आणखीही किती एक नाजूक धंद्याचे नियम, जे परंपरेने राज्याभिवृद्धीस उपयुक्त आणि इहलोक परलोक साधन, ज्यास संपूर्ण कीर्ति, ते सर्वही यथान्याये करून दिले जातील."

आत्मस्तुतिपर उल्लेख

या आरंभावरून व शेवटावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते, की शंभुछत्रपतीने रामचंद्र अमात्य यास उद्देशून हे आज्ञापत्र लिहिलेले आहे. आरंभी तर रामचंद्रपंतास उद्देशून मजकू लिहिलेला असल्याचे अगदी स्पष्टच दिसते; पण शेवटीही त्यासच 'तुम्ही' असे वारंवा संबोधल्याचेही दिसून येईल. यावरून, हा आरंभीचा भाग व शेवटचा भाग, हे दोन्ही भा एकाच लेखकाने लिहिले असावे. असे मानण्यासही हरकत दिसत नाही. आता मौजेची गो अशी, की या दोन्ही भागात रामचंद्रपंत अमात्याची भरपूर स्तुति केलेली आढळते. अगदी पहिल्याच वाक्यात 'समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि' अशी विशेषणे त्यास लावली आहे. ती रामचंद्रपंताने स्वतःची स्वतःस लावली असे म्हणणे केव्हाही योग्य होणार नाही. रामचंद्रपंताने हा भाग लिहिला असता तर त्याने आत्मस्तुतिपर अशा या शब्दांचा आपल्यासाठी उपयोग केला नसता. बरे, एवढी ही विशेषणेच रामचंद्रपंताच्या स्तुतिपर आहेत असे नाही तर, दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटी 'तुम्ही कृतकर्मे सेवक, तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामी कर्नाटकप्रांती गेले तेव्हा हा राज्यभार दिधला असता तुम्ही यथोचित राज्याभिवृद्धि केली. तुम्हास राजकार्य, नीति, मर्यादा अवगतच आहेत.'

हे रामचंद्रपंताच्या कर्तबगारीचे भरपूर वर्णन आले आहे. हे वर्णनसुद्धा अर्थातच, रामचंद्रपंतानेच लिहिले असणे संभवनीय वाटत नाही. दुसरे असे की रामचंद्रपंताच्या कार्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गिरीची ही स्तुति उघड उघड दुसऱ्या कुणी तरी, म्हणजे स्वामी शंभु छत्रपतींनी केलेली असल्याचे स्वच्छ दिसते. तेव्हा हा भाग रामचंद्रपंताचा स्वतःचा असणे शक्य वाटत नाही. त्याचप्रमाणे शेवटचा भाग देखील रामचंद्रपंताला उद्देशूनच असल्यामुळे तोही त्याने लिहिला असणे शक्य दिसत नाही. सारांश या कारणामुळे 'राजनीती'चा लेखक रामचंद्रपंत अमात्य नसून दुसराच कोणी तरी असावा असे म्हणण्यास हरकत नाही.

यावर पुढील युक्तिवाद करता येणे शक्य आहे. तो असा, की 'हा आरंभीचा मजकूर रामचंद्रपंताला उद्देशून असला व त्यात त्याच्या स्तुतिपर अशी विशेषणे वापरून त्याच्या कर्तबगारीचे वर्णन केलेले असले तरीसुद्धा तेवढ्यावरून ही राजनीति अमात्याची नसावी असे म्हणता येणार नाही. स्वामीच्या आज्ञेनुसार ग्रंथलेखन करीत असताना पूर्वीचे लेखक आपल्या स्वामीची ती आज्ञाच ग्रंथारंभी उद्धृत करीत असतात व मग 'ऐशियास'—असे म्हणून ग्रंथ-लेखनाला आरंभ करतात. या पद्धतीप्रमाणे, राजनीतीच्या आरंभी असलेला मजकूर हा पंताने स्वामीच्या 'आज्ञापत्रा'वरून जसाचा तसा उद्धृत केला असेल. त्यावरून फार झाले तर असे म्हणता येईल की राजनीतिची पहिली दोन प्रकरणे तेवढी रामचंद्रपंताची नसावी.' पण हा युक्तिवाद फारसा टिकू शकत नाही. कारण असे, की केवळ आरंभीचाच नव्हे तर शेवटचाही भाग रामचंद्रपंतास उद्देशून लिहिलेला असल्याचे जर स्वच्छ दिसत आहे तर तो त्याने स्वतःच लिहिला असावा असे मानणे कसे शक्य आहे ? आता आरंभीचा भाग म्हणजे शंभुछत्रपतींने रामचंद्रपंतास प्रस्तुत राजनीति लिहिण्यास केलेली आज्ञा असावी.' या म्हणण्याचा विचार थोडा बारकाईने करणे अवश्य आहे. त्यावरून काय निष्पन्न होते ते पाहू या.

'आज्ञापत्र' कशासाठीं ?

श्री शंभुछत्रपतीने रामचंद्रपंताला 'आज्ञा' केली आहे यांत शंका नाही. पण, ही आज्ञा कोणती ? कशाबद्दल ? रामचंद्रपंताला छत्रपतीने काय करावयाला सांगितले ? या प्रश्नांच्या उत्तराचा शोध केल्यास बऱ्याच गोष्टीवर चांगलाच प्रकाश पडू शकेल असे वाटते. विविधज्ञान विस्तार—मालेतून छापलेल्या आज्ञापत्राच्या दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटी असलेल्या मजकुरात शंभुछत्रपतीच्या आज्ञेचे स्वरूप नीट पहावयास सापडते. तो सर्व मजकूर वाचका-समोर अक्षरशः मांडतो. मग त्यावरून आपणास काय अनुमाने काढता येतात ते नंतर पाहू ! तो मजकूर असा—

'स्वामी सुमुहूर्तें नर्मदापार जहाले. श्रीकृपे अल्पकाळेच मुख्य शत्रूचा पराभव करून दिल्ली, आग्रा, लाहोर, डाका, बंगाल, ठठ्ठा, जलकरादि करून संपूर्ण तत्संबंध देशदुर्ग हस्त-वश्य करून वाराणशीस जाऊन स्वामी श्रीविश्वेश्वर स्थापना करितात, तावत्कालपर्यंत दक्षिणप्रांत संरक्षणार्थ श्रीमत्सकलतीर्थैकतीर्थ श्रीमन्मातोश्रीसाहेब दक्षिणप्रांतास राहिली आहेत. त्या सन्निध श्रियासह चिरंजीव जीविताधिक प्रियतम राजश्री राजकुमार यास ठेवले आहेत. उभयतांचे सेवेशी तुम्हास ठेविले आहेत. ऐसीयासी स्वामी कायावाचामनसा मातोश्रीसाहेबांचे चरणाविरहित अन्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दैवत जाणत नाहीत. हे राज्य व हा कीर्तिलाभ व पुढे जे होणे यशप्राप्ति हा सकलही त्यां चरणाचा प्रसाद. त्यांची आज्ञा परिपाळण करून त्यांचे चित्त प्रसन्न करून घ्यावे यापरते स्वामी इतर इष्ट साधन नाही. ही स्वामीची अनुपम निष्ठा तुम्हास कळलीच असली पाहिजे. तदनुरू तुम्ही हा संपूर्ण अर्थ बरा चित्तात आणून त्यांचे आज्ञेप्रमाणे वर्तोन श्री मातोश्रीसाहेब स्वामी दिन प्रतिदिनी संतोष पावत ते करावे. तुम्ही कृतकर्मे सेवक. तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वा कर्नाटक प्रांती गेले तेव्हा हा राज्यभार दिधला असता तुम्ही यथोचित राज्याभिवृद्धि केलं तुम्हास राजकार्य, नीति, मर्यादा अवगतच आहेत. तथापि चिरंजीव राजश्री राजकुमार राजका सुशिक्षित व्हावे व वरकड देशोदेशी देशाधिकारी व पारपत्यगार यांनी नीतीने राज्यसंरक्ष करावे यास्तव स्वामींनी यथाशास्त्र 'राजनीति' या आज्ञापत्रावरून केली आहे ती सकल चित्तात आणून चिरंजीव राजकुमार तदनुसार अधीत होत असे करावे. तसेच सकल लोक त्याप्रमाणे यथाधिकार वर्तोन राज्य संरक्षण करावे."

हा उतारा थोडा लांब झाला खरा, पण विवेचन सुलभ व्हावे म्हणून तो येथे उद्धृत करणे आवश्यक होते. छत्रपतींने रामचंद्रपंताला सांगितलेल्या कामगिरीचे स्पष्ट स्वरूप दिसून येते. या उताऱ्याचे पृथक्करण करून पाहिले असता रामचंद्रपंताकडे पुढील कामे छत्रपतींने दिल्याचे आढळते—

१. स्वामीच्या अनुपस्थितीत दक्षिणप्रांताच्या संरक्षणासाठी राहिलेल्या श्रीमातोश्रीसाहेबांची व राजकुमाराची सेवा करणे.

२. मातोश्रीसाहेब स्वामीवर दिनप्रतिदिनी संतोष पावत ते करणे.

३. स्वामींनी यथाशास्त्र राजनीति या आज्ञापत्रावरून केली आहे. ती सकल चित्तात आणून तदनुसार चिरंजीव राजकुमार अधीत होत असे करणे. आणि

४. राज्यसंरक्षण करणे.

यापैकी तिसरा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यात स्पष्ट सांगितले आहे की स्वामींनी यथाशास्त्र राजनीति तयार केली आहे. त्याप्रमाणे राजकुमारास शिक्षण द्यावे.

अर्थात् स्वामीने (किंवा त्याच्यासाठी दुसऱ्या कुणी तरी) लिहिलेल्या राजनीतीप्रमाणे राजकुमाराला शिक्षण देण्याचीच महत्त्वाची कामगिरी रामचंद्रपंताना या आज्ञापत्राच्या द्वारे सांगितलेली आहे. 'राजनीति' तयार करण्याबद्दल किंवा लिहिण्याबद्दल त्याला हुकूम केलेला नाही. तेव्हा रामचंद्रपंताने 'राजनीति' लिहिण्यापूर्वी आपल्याला तसे करण्याबद्दल मिळालेल्या आज्ञापत्रातील मजकूर आरंभी घेतला आहे, असे म्हणण्यास जागाच शिल्लक राहत नाही. यावरून मला असे वाटते की, 'राजनीती'चा लेखक रामचंद्रपंत असणे शक्य दिसत नाही. राजनीतीच्या खऱ्या विवेचनाला आरंभ तिसऱ्या प्रकरणापासून होतो. तेव्हा आरंभीची दोन प्रकरणे रामचंद्रपंताची नसतील; पण पुढील प्रकरणे तरी त्याची असावित असे म्हणण्याला वरील विवेचनावरून जागा राहत नाही. कारण त्यात सरळ स्पष्ट शब्दात रामचंद्रपंताला सांगितले आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

की, ' तुम्ही स्वतः राजनीति जाणणारे आहात तरी देखील राजकुमाराच्या शिक्षणासाठी म्हणून व राज्यसंरक्षणासाठी स्वामी तुम्हाला ही ' राजनीति ' तयार करून देत आहेत. त्याप्रमाणें तुम्ही त्याला (राजकुमारास) शिक्षण द्या ' यावरून दिसूनच येते की राजनीतीचा मूळ भाग देखील इतर कुणी तरी लिहिलेला असावा, रामचंद्रपंताने नव्हे.

याला उपलब्ध असे दोनतीन पुरावे आणखी देता येतील. मागे उद्धृत केलेला राजनीतीचा शेवटचा भाग जर लक्षात घेतला तर असे दिसून येते की तेथे सुद्धा—म्हणजे मूळ ग्रंथाच्या शेवटात सुद्धा ही हुकुमाची भाषा वापरलेली आहे. आणि तो हुकूम आरंभीप्रमाणेच आहे. म्हणजे मातोश्रीसाहेबांची सेवा, राज्यसंरक्षण वगैरे. हा भाग रामचंद्रपंतालाच उद्देशून लिहिलेला आहे, हे ' तुम्ही केले सेवेचा मुजरा होय...आणि स्वामींनी तुम्हावर जो संपूर्ण अखत्यार दिला आहे...' या वाक्यावरून स्पष्ट दिसून येते. अर्थात हा भाग रामचंद्रपंताने स्वतःच लिहिला असणे शक्य नाही. म्हणजे पहिल्या दोन प्रकरणाचेच नाही तर मूळ राजनीतीचेही कर्तृत्व पंताचे असणे शक्य दिसत नाही.

दुसरे असे की, या शेवटच्याच भागातील ' **या प्रमाणे** हुजुरात गडकिल्ले आदिकरून परम सावधतेने वर्तत...ती गोष्ट करणे ' या वाक्यातील ' **या प्रमाणे** ' हा शब्द असे सुचवितो की या लिहून दिलेल्या ' राजनीती'प्रमाणे हुजुरात, गड इत्यादिकाचे संरक्षण करण्याची आज्ञा रामचंद्रपंताला सांगितली आहे. तेव्हा ही राजनीति रामचंद्रपंताने काही लिहिली नाही; ती दुसऱ्याच कोणी तरी लिहिलेली असावी, हे उघड उघड दिसून येते.

वतनासंबंधी उल्लेख

राजनीतीचे हे प्रकरण रामचंद्रपंताचे नसावे असे दाखविणारा अंतर्गत पुरावाही पुढे मांडता येणे शक्य आहे. राजनीतीच्या सातव्या प्रकरणात वतनाविषयी लेखकाने बराच विचार केलेला आहे. त्यात तो स्पष्ट लिहितो की काहीही झाले तरी राजाने ' इत्यादि दोष बरे चित्तात आणून नूतन वृत्ति कोणास करून न द्यावी.' यासाठी त्याने युक्तिवादही मोठा सुंदर केलेला आहे. तो म्हणतो ' जो राजा होत्साता तो राजाचा शत्रु असेल त्याने भूमीवर उदार व्हावे. राजास भूपति असे भूमीकरिता म्हणावे, ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचे करणार ? पति कोणाचा होणार ? ' म्हणून ' जो राजा राज्य करणार, राज्य वाढविणार, नीतिवंत म्हणोन कीर्ति संपादणार त्याणे सर्वार्थी मोह न पावता यवोदरप्रमाण भूमि तीही इनाम देऊ नये ' (पृ. २४-२५). इतके निक्षून लिहिणारा हा लेखक रामचंद्रपंत असेल असे वाटत नाही. बावडे दप्तरात (भाग १ ला) प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार पाहिला म्हणजे रामचंद्रपंत अमात्य हा वतनाचा फार लोभी होता असे म्हणावे लागते. छत्रपतीजवळ तो नेहमी आपल्यासाठी व आपल्या वंशजासाठी नवीन नवीन वतने मागत असे असे दिसून येते. राजारामाच्या कारकीर्दीत पंताने उत्कृष्ट कामगिरी बजाविली यात संशय नाही. पण त्याबद्दल त्याने छत्रपतीकडून किती तरी इनामवतने मिळविलेली होती ! बावडे दप्तरातील अनुक्रमांक ५२ वा लेख याचा

Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगला निदर्शक आहे. बरे, ही वतने राजारामाने आपणहून दिली होती असेही नाही. रामचंद्र पंताने ती मागून घेतली. 'आपण स्वामीच्या राज्यानिमित्य स्त्रमसाहस करून राज्याभिवृधी केली याकरितां स्वामीने आपला मजमूचा हुदा जीर्णोद्धार करून आपणास सांगितला. परंतू हुदा म्हणजे बारगीर वस्तू आहे. याकरिता स्वामीनी आपली पहिली वतने व इनामती आहेत त्याचा भोगवटा बहुत दिवस तुटला आहे ती वतने व इनामती आपणास वंषपरंपरेने दिले असे करावे व **नूतनही इनामती वतने अजरामऱ्हामत करून वंषपरंपरेस चालेत ऐसि आज्ञा केली पाहिजे'** अशी दुसऱ्या शिवछत्रपतीजवळ पंताने याचना केली होती. त्याप्रमाणे त्याच्या नूतन इनामांचा जीर्णोद्धार करून ती व नवीन काही वतने त्यास वंशपरंपरेने दिली गेली. (बावडा दप्तर पा. १०,३२;१०४;१०५) नवीन वतने आणि तीही वंशपरंपरेने मुळीच करून देऊ नयेत (आज्ञा. पा. २४); 'यवोदरप्रमाण भूमि तीही इनाम देऊ नये' असे कळकळीने सांगणारा राजनीतीचा लेखक व आपल्यासाठीं वंशपरंपरेने नवीन वतने मागणारा रामचंद्रपंत हे दोन्ही एकच असणे शक्य आहे काय? मला तरी तसे वाटत नाही. नवीन वतने मिळविण्याच्या बाबतीत रामचंद्रपंत फार आधाशी होता असे दिसून येते. स्वतःच्याच नव्हे तर इतरांच्याही वतनावर याचा नेहमी डोळा असे. रियासतकार सरदेसाई यासंबंधी म्हणतात की "शंकराजी नारायण सचिव, सुंदर तुकदेव, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, प्रत्यक्ष रामचंद्रपंत अमात्य ही मंडळीसुद्धा दुसऱ्याची वतने हिरावून स्वार्थ साधण्यात काही कमी नव्हती." (स्थिरबुद्धि राजाराम, पा० ९६) यावरून रामचंद्रपंताच्या लोभाविष्टपणाचे स्वरूप कळून येईल. अशा या गृहस्थाने वर उल्लेखिलेला राजनीतीतील वतनाविषयीचा मजकूर लिहिला असणे शक्य मानणे अत्यंत हास्यास्पद होईल. या अंतर्गत पुराव्यावरूनसुद्धा राजनीतीचे प्रकरण रामचंद्रपंत अमात्याने लिहिले असावे असे मानता येणे शक्य दिसत नाही.

दुसरे असे की राजनीतीच्या पहिल्या दोन प्रकरणात लेखकाने आपल्या 'स्वामी'च्या कर्तबगारीची फार फार स्तुति केलेली आढळते. ती रामचंद्रपंताची नसावी असे म्हणता येते. कारण हा स्वामी म्हणजे शंभु छत्रपति (म्हणजे, माझ्या मते, शिवाजी दुसरा) नावाचा छत्रपति होता. राज्यकारभार ताराबाईच पहात असे. इच्या (म्हणजे स्वामीच्या) कार्यांचे वर्णन राजनीति पान १, २, ३ व ५ ते ८ इतक्या पानात आलेले आहे. आता रामचंद्रपंताने हे वर्णन केलेले नसावे असे वाटण्याचे कारण हे की त्याचे व ताराबाईचे तितकेसे सूत जमत नव्हते. रा. ब. सरदेसायांनी तर स्पष्टच म्हटले आहे की दुसऱ्या शिवाजीच्या राज्यारोहणाला पंताची मान्यता नव्हती. परंतु परशुराम त्रिंबक व शंकराजी नारायण यांच्या आग्रहावरून 'स्वतःचे मन सांगत नसता केवळ दुही दिसू नये म्हणून, पंताने माघार घेऊन ताराबाईस विरोध केला नाही. तथापि या वेळेपासून पंताचे मन इतके विटले की राज्याचा गाडा हाकण्याचा त्याचा पूर्वीचा आवेश पार मावळला. अगदी जरूर पडेल तेवढ्यापुरती सल्ला देऊन इतर बाबतीत त्याने निवृत्तीच धारण केली.' (स्थिरबुद्धि राजाराम, पा. १००) अशा वृत्तीचा रामचंद्रपंत ताराबाईची इतकी स्तुतिस्तोत्रे गात राहील असे वाटत नाही. तेव्हा अर्थातच रामचंद्रपंताला याचा लेखक मानणे योग्य होणार नाही असे वाटते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारांश—

१. प्रस्तुत राजनीति रामचंद्रपंताने लिहिली असे दाखविणारा एकही पुरावा मूळ ग्रंथात नसल्यामुळे

२. तसेच बावडा दप्तरात देखील असा कोणताच पुरावा उपलब्ध होत नसल्यामुळे

३. इतकेच नव्हे तर या प्रबंधाच्या आरंभी व शेवटी असलेला मजकूर रामचंद्रपंतास उद्देशून लिहिलेला असल्याचे स्वच्छ व स्पष्ट दिसत असल्यामुळे

४. कोणीही आपणा स्वतःविषयी लिहिणार नाही असा मजकूर रामचंद्रपंताविषयी त्यात असल्यामुळे

५. वतनाविषयीचा रामचंद्रपंताचा लोभाविष्टपणा व राजनीतिकाराचे धोरण ही अगदी परस्परविरुद्ध असल्यामुळे आणि

६. ताराबाईची मुक्तकंठाने स्तुति करणारा लेखक रामचंद्रपंत नसावा यामुळे,

'मराठेशाहीतील राजनीति' अथवा आज्ञापत्र हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्याचा नसावा असे मानणे भाग पडते.

ग्रंथकर्तृत्व कोणाचे ?

तर मग ही राजनीति लिहिली कुणी ? या प्रश्नाचे मात्र नक्की उत्तर देता येणे कठीण आहे. शंभुछत्रपतीच्या नावाने 'राजनीति' लिहिली गेली असली तरी तिचा लेखक मात्र तो असणे शक्य नाही. शंभुछत्रपतींने किंवा त्याच्या मातुःश्रींनी कोणाकडून तरी ती लिहवून घेऊन मग रामचंद्रपंताकडे पाठविली व तदनुसार राजकुमारास शिक्षण देण्यास आज्ञा केली हे उघड दिसते. हा मूळ लेखक कोण असावा हे ठरविण्यास निश्चित असा पुरावा काहीच सापडत नाही. तो रामचंद्रपंत नसावा असे जसे पुराव्यानिशी म्हणता येते, तसे तो अमुकच असावा असे म्हणता येत नाही. निदान आज तरी ते शक्य नाही. तथापि या बाबतीत एक तर्क सुचतो. छत्रपतीची आज्ञापत्रे ही नेहमी पंतप्रधान व पंतप्रतिनिधि यांच्या शिक्क्यानिशी दिली जात असत. सर्वसाधारण प्रतीची वतनपत्रे किंवा सनदा यांचा मजकूर जवळजवळ ठराविकच असल्यामुळे तो सबनीस वगैरे कारकुनाकडून लिहिला जात असावा. तथापि त्यांचा मायना व प्रसंगी ज्यास आज्ञापत्र, सनद किंवा वतनपत्र द्यावयाचे असेल त्या गृहस्थाचे वर्णन इत्यादि मजकूर प्रंतप्रधान किंवा पंतप्रतिनिधीकडूनच सांगितला जात असावा. त्यातही प्रतिनिधीचे पद हे सर्वात महत्त्वाचे, तो दुसरा राजाच असल्यामुळे लिहिण्यासवरण्याचे काम तो करीत असेल असे मानता येत नाही. पण त्याच्या हुकुमानुसार पंतप्रधान अशी कामे उरकीत असावा, असा तर्क करणे चुकीचे होणार नाही. आणि म्हणूनच कागदपत्रावर मुख्यप्रधानाचा शिक्का आढळतो. शिवाय आपणास हे लक्षात ठेवले पाहिजे, की राजारामाने 'प्रतिनिधि'पद नवीनच निर्माण केले होते. त्यापूर्वी असली कामे मुख्य प्रधानाकडून होत. 'प्रतिनिधिपद निर्माण केल्यानंतर कागदपत्रावर त्याचाही शिक्का असावा असे ठरले'. (स्थिरबुद्धि राजाराम,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पा. ४१-४२) अर्थात पूर्वीप्रमाणेच ही कामे मुख्य प्रधानाकडून होत असावी, असे मानणे योग्य होईल. तेव्हा शंभुछत्रपतीच्या वेळी असलेल्या मुख्य प्रधानाने 'राजनीति'चे हे संपूर्ण प्रकरण लिहिले असावे असा तर्क करावयास काय हरकत आहे ?

आता असा तर्क केल्यास तो इतर पुराव्यांनी सबळ होऊ शकतो किंवा नाही हे पाहू या. शंभू छत्रपतीच्या वेळी व तत्पूर्वीही मुख्य प्रधानाची कामगिरी नीळकंठ मोरेश्वर पिंगळे बजावीत होता, हे बावडा दप्तरात प्रसिद्ध झालेल्या अनेक पत्रावरील शिक्क्यावरून सहज दिसून येते. संभाजीच्या वेळचे एकही पत्र या दप्तराच्या पहिल्या भागात आलेले नाही. तथापि त्याच्या कारकीर्दीत मुख्य प्रधानाचे पद नीळकंठ मोरेश्वराकडेच होते. (उग्रप्रकृति संभाजी, पा. ३२) तेव्हापासून ते त्याच्याकडे होते. शंभू छत्रपतीच्या नावे दिलेल्या इ. स. १७१४ मधील दोन आज्ञापत्रावर (बावडा दप्तर, क्रमांक ९२–९३) मुख्य प्रधान म्हणून या नीळकंठ मोरेश्वराचेच शिक्के आहेत. सारांश, शंभू छत्रपतीच्या वेळी मुख्य प्रधानाची कामगिरी करीत असलेल्या नीळकंठ मोरेश्वरानेच ही राजनीति–वर दाखविल्याप्रमाणे लिहिली असावी, असे मानण्यास हरकत नाही. या राजनीतीच्या पहिल्या दोन प्रकरणात श्री शिवाजी महाराजापासून तो शंभु छत्रपतीपर्यंतच्या छत्रपतीची कामगिरी वर्णन केली आहे. या सर्व कारकीर्दी नीळकंठ मोरेश्वराने पाहिल्या होत्या. शिवाजीच्या वेळी त्याचे वडीलच मुख्य प्रधान होते. वडिलांच्या शिस्तीत तयार झालेल्या नीळकंठ मोरेश्वराचे नाव शिवाजीच्या वेळच्या मुत्सद्द्यात आढळते आणि संभाजीने तर त्यालाच प्रधान नेमले होते. तेव्हा या सर्व कारकीर्दी ज्याने पाहिलेल्या होत्या अशा गृहस्थानेच वर उल्लेखिलेले वर्णन केले असणे अधिक शक्य आहे.

शिवाय दुसरा असाही युक्तिवाद करतां येईल की 'राजनीति' या ग्रंथामध्ये अनुभवाचे व आत्मप्रत्ययाचे जे तेज आढळते ते राजकारणात मुरलेल्या मुत्सद्द्याच्या लेखणीतून उतरले असले पाहिजे. शंभू छत्रपतीच्या वेळी इ. स. १७१५ च्या सुमारास असे पुरातन मुत्सद्दी प्रामुख्याने दोनच होते. एक रामचंद्रपंत व दुसरा नीळकंठ मोरेश्वर. या दोघांनीही शिव-छत्रपतीपासूनच सर्व कारकीर्दी पाहिलेल्या होत्या व आपापल्या शक्तीप्रमाणे राज्यकारभाराचा गाडा हाकण्यास मदत केली होती. पण यापैकी रामचंद्रपंत अमात्याची ही 'राजनीति' नाही हें मी वर दाखविलेच आहे. तेव्हा राहता राहिलेला जो नीळकंठ मोरेश्वर त्याच्याचकडे या ग्रंथाचे कर्तृत्व देणे योग्य वाटते, नव्हे, तो त्यानेच लिहिला असावा असे मानण्यास हरकत नाही.

याला उपोद्बलक असे आणखी एकदोन मुद्दे पुढे मांडता येणे शक्य आहे. नीळकंठ मोरेश्वर हा बऱ्याच दिवसापासून मुख्य प्रधान होता हे आपण पाहिलेच आहे. 'प्रतिनिधि'-पद निर्माण होण्यापूर्वी राज्याचा खरा चालक मुख्य प्रधानच असावयाचा. या प्रधानपदाचेच अत्यंत सुरस व मनोरम वर्णन 'राजनीती'त आपणास पहावयास सापडते.

याच वर्णनाच्या वेळी राजनीतीच्या लेखकाची लेखणी जणु काय प्रतिभेने स्फुरण पावू लागली; आणि त्या भरात तिने प्रधानाचे पुढील सुंदर शब्दात वर्णन केले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'प्रधान म्हणजे राज्यलक्षणगृहाचे स्तंभ आहेत. राज्य ते यथोचित संरक्षून नूतन निर्माण करणे याचे मुख्य कारण; प्रधान म्हणजे नृपसत्ताप्रसारक; प्रधान म्हणजे प्रजापालनधर्म संरक्षणाचे अध्यक्ष; प्रधान म्हणजे राजमदजनित अन्याय सागराची मर्यादा; प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश; किंबहुना प्रधान म्हणजे इहलोकी राज्यकृत्यसंपादनामुळे नृपाची विश्रांत, धर्म प्रतिपालनामुळे परलोकपंथीची दीपिका' (राजनीति १७-१८). हे वर्णन कसे बहारीचे उतरले आहे हे निराळे सांगावयास पाहिजे काय ? या वर्णनाचा लेखक, प्रधानपदाचा ज्याने बहुत काळ उपभोग घेतला तो नीळकंठ मोरेश्वरच असावा असे मानणे केव्हाही विसंगत होणार नाही.

सुभाषिते देण्याची पद्धति

लेखनपद्धतीच्या दृष्टीनेही 'राजनीती'चे कर्तृत्व नीलकंठ मोरेश्वराकडेच जाते असे साधार वाटते. छत्रपतीच्या आज्ञा बहुतेक मुख्यप्रधानाकडून लिहिल्या जात असत हे आपण मागेच पाहिले. या दृष्टीने बावडा दप्तरातील २४ व्या अनुक्रमांकाचे वृत्तिपत्र नीट लक्षात घेतले, तर त्याच्या व राजनीतीच्या लेखन पद्धतीत एक मोठेच साम्य आढळते. राजारामाने रामचंद्रपंतास दिलेले हे एक वृत्तिपत्र आहे. त्याचा शेवटचा भाग असा

'या वतनाचा हक, लवाजिमा व इनाम पूर्वापार चालत असल तो तुम्ही अनुभऊन देशकुलकर्णपणाची कमावीस करून सुखरूप असणे या वृत्तीस कोण्ही अन्यथा करील त्यास धर्मशास्त्राचे श्लोक.

स्वदत्ता द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनं ॥
परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् ॥
एकैव भगिनी लोके सर्वेषामपि भूभुजां ॥
न भोग्या न करग्राह्या विप्रदत्ता वसुंधरा ॥

हे स्मरोन चालवितील तुम्ही अनुभऊन सुखी असणे जाणिजे निदेश समक्ष."

यात संस्कृत श्लोक देण्याची जी पद्धति आहे तीच 'राजनीती'तही आपणास आढळते. उदाहरणार्थः—

(१) कित्येक देशद्वीपांतरातून वस्तुजातीचे येणे राहिले. तसेच सैनिक कित्येक—

(श्लोक)

मुनयोपि न गच्छन्ति यां गतिं योगिनोपि च ॥
स्वामिकार्यगतप्राणास्तां गतिं यान्ति सेवकाः ॥

या दृढबुद्धीने स्वामिकार्यावर क्षत्रधर्मे शाश्वत लोकाश्रयित जाहले (आज्ञापत्र २).

(२) 'त्यापासून पुणे आदि करून' स्वल्प स्वस्ता स्वतंत्र मागून घेऊन पंधरा वर्षांचे वय असता त्या दिवसापासून तितकेच स्वल्पमात्र स्वास्तेवर उद्योग केला.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(श्लोक)

आयुर्मर्माणि रक्षन्ति । आयुरन्नं प्रयच्छति ॥
गांडीविनो मतमिदं । कुतो दैन्यं कुतो भयं ॥

तसेच 'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः' या दृढबुद्धीने शरीरास्थान पाहता'.... वगैरे (आज्ञा ३).

(३) '.....असे जाणून हुजरातीत शिलेदार एकंदर न ठेविता लिहिलेप्रमाणे हुजुरात सजवावी.

(श्लोक)

त्यजेत्स्वामिनमत्युग्रमत्युग्रात्कृपणं त्यजेत् ॥
कृपणादविशेषज्ञंऽततोपि कृतनाशनं ॥ १ ॥

हे गुण, मनुष्याचे दाटीचा कंटाळा व मनुष्यास बोलण्याचा अभाव हे गुण सर्वथा अस् नयेत.' (आज्ञा. १५)

या उदाहरणावरून राजनीतीच्या लेखकाला मधून मधून संस्कृत सुभाषिते उद्धृत करण्याची आवड होती असे दिसते. आरंभी उल्लेखिलेल्या बावडा दप्तरातील २४ व्या क्रमांकाच्या वृत्तिपत्राच्या लेखकास सुद्धा अशीच आवड असल्याचे दाखविले आहे. या वृत्तिपत्राचा लेखक नीळकंठ मोरेश्वरच असावा हेही वाचकांच्या लक्षात आणून दिलेले आहे. या साम्या वरून हा नीळकंठ मोरेश्वरच राजनीतीचा लेखक असावा, असे वाटते. बावडा दप्तरातील वरील वृत्तिपत्रावर मुख्यप्रधान म्हणून नीळकंठ मोरेश्वराचा व प्रतिनिधि प्रल्हाद नीराजीचा शिक्का आहे. यावरून कदाचित कोणी असे म्हणतील की ते वृत्तिपत्र नीळकंठ मोरेश्वराने लिहिले आहे असे न मानता, प्रल्हाद नीराजी प्रतिनिधीने लिहिले असे मानले तर मग राजनीतीचाही कर्ता तोच अर्थात प्रल्हाद नीराजीच असावा असे मानता येणार नाही काय ? या आक्षेपाला उत्तर असे, की अशी वृत्तिपत्रे प्रतिनिधीपेक्षा प्रधानाकडूनच लिहिली जाणे अधिक संभवनीय आहे. असे का, याची कारणे मी वर एका ठिकाणी दिली आहेत. दुसरे असे की प्रल्हाद नीराजी हा इ. स. १६९४ मधेच वारला. (स्थिरबुद्धि राजाराम, पाने ४२ व ७२) तेव्हा इ. स. १७१५मधे लिहिलेल्या राजनीतीचा तो लेखक असूच शकत नाही. उलट यावरून असे मात्र निश्चित म्हणता येईल, की आज्ञापत्रातील संस्कृत सुभाषिते उद्धृत करण्याची लेखकाची सवय व बावडा दप्तरातील २४ व्या वृत्तिपत्राच्या लेखकाची तीच पद्धत लक्षात घेतली असता व १७१५च्या पूर्वीच प्रल्हाद निराजी मृत्युवश झाला होता हेही लक्षात ठेवले असता, या वृत्तिपत्राचा व राजनीतीचा लेखक नीळकंठ मोरेश्वरच असणे अधिक शक्य वाटते.

प्रमेय, सिद्धांत नव्हे !

सारांश, मराठेशाहीतील 'राजनीति' अथवा 'आज्ञापत्र' या ग्रंथाचे कर्तृत्व रामचंद्र पंत अमात्य बावडेकर याच्याकडे देण्यात येते, ते चुकीचे असून, नीळकंठ मोरेश्वर पिंगळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंतप्रधान हा त्याचा लेखक असावा असे माझे मत झाले आहे. ते अभ्यासू वाचकासमोर मांडत आहे. इतिहासज्ञ या मताचा योग्य तो विचार करून त्याच्या सत्यासत्यतेविषयी साधार निर्णय देतील अशी अपेक्षा करावयास काही हरकत नाही. या बाबतीत आणखी एका गोष्टीचा खुलासा येथेच करणे अवश्य आहे. तो असा की मी मांडलेले हे माझे मत प्रमेय स्वरूपाचेच आहे. विवेचनाअंती त्याला सिद्धांताचे स्वरूप येईल किंवा कदाचित् ते सोडूनही द्यावे लागेल, त्याविषयी आग्रह किंवा अभिनिवेश कोणत्याच प्रकारचा नाही. हे लिहिण्याचे कारण एवढेच की आपणाला न रुचणारी मते प्रगट करणारावर वैयक्तिक व गर्ह्य हेतूचा आरोप करण्याची दुष्ट सवय आमच्या काही प्रकाण्डपंडितांनाही लागलेली आढळते. तेव्हा या विवेचनाच्या बाबतीत तसे होऊ नये हीच इच्छा आहे.

वरील प्रश्नाच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या आणखी एक दोन प्रश्नांचा विचार करून हा लेख संपवितो. रामचंद्रपंत अमात्याला उद्देशून प्रस्तुत आज्ञापत्र देणारा ‘ श्री राजा शंभुछत्रपति ’ म्हणजे कोण ? राजारामाला ताराबाईपासून झालेला शिवाजी दुसरा की राजसबाईपासून झालेला संभाजी दुसरा ? शंभुछत्रपति म्हणजे राजसबाईचा मुलगा संभाजी हाच होय असे रा. ब. सरदेसाई मानतात, हे ‘ आज्ञापत्रा’ला असलेल्या त्यांच्या प्रस्तावनेवरून व ‘ स्थिरबुद्धि राजारामां’तील उल्लेखावरून दिसतेच आहे. ‘ संभू ’ (=संभाजी) याचे संस्कृत रूप ‘ शंभू ’ धरून चालल्यास हे ठीक जुळते यात शंका नाही. पण मला वाटते की राजनीतीच्या आरंभी उल्लेखिलेला ‘ शंभू ’ म्हणजे बहुतेक ‘ शिव ’ छत्रपति असावा. याचे एक कारण असे, की बावडा दप्तरातील क्रमांक ९२ व ९३ ची पत्रे (ता. १४–१०–१७१४) शंभू छत्रपतीच्या नावाची असली, तरी त्यावर प्रधान व प्रतिनिधींचे शिक्के मात्र

‘ श्री **शिवनरपति** हर्षनिदान । मोरेश्वरसुत नीलकंठ प्रधान ॥ ’ व

‘ श्री आई आदि पुरुष श्रीराजा **शिवछत्रपति** स्वामी कृपानिधि ’

तस्य परशराम त्र्यंबक प्रतिनिधि ’॥ असे आहेत. यावरून, यात ‘ **शिव** ’छत्रपतीलाच ‘**शंभू**’ म्हणून संबोधिले असावे असे वाटते. यावर रियासतकार सरदेसाई यांचे म्हणणे असे आहे की—

‘ बावडा दप्तर नं. ९२–९३ ची पत्रे राजारामपुत्र संभाजी कोल्हापूरकर छत्रपतीची आहेत. शिवाजी पदच्युत होऊन संभाजी गादीवर आला त्याच संधीची ही पत्रे असावी. नवीन शिक्के करण्यास अवधि लागतो आणि वतने घेणारांना प्रथम लेख पक्का करून घ्यावयाचा असतो. कदाचित् राजा मागाहून वचन मोडील अशी भीति असते. यावरून मला तरी वाटते की याच एक दोन दिवसात शिवाजी कैदेंत पडून संभाजी छत्रपति बनला. त्या कामी रामचंद्रपंतानें साह्य केलें त्याचा हा मोबदला असावा. प्रसंगोपात संभाजीचा डाव उलटून शिवाजी पुनः राज्यावर आला तरी रामचंद्रपंताचे उत्पन्न कायम राहावे असे हे दुहेरी बंधन आहे. परशुरामपंत प्रतिनिधि मेल्यावर त्याच्या नावाचा शिक्का पुष्कळ दिवस त्याच्या मुलाने वापरला, अशी उदाहरणे पुष्कळ आहेत. ’

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण श्री. सरदेसाई यांचे हे म्हणणे पूर्णपणे मान्य करता येईल असे वाटत नाही. नवीन शिक्के करण्यास वेळ लागतो व म्हणून अनेकदा जुन्याच शिक्क्याचा उपयोग करणे भाग पडते, हे कबूल आहे. पण हे केव्हा? एक राजा जाऊन–मृत्यु पावून–त्याच्या जागीं त्याचाच न्याय्य उत्तराधिकारी अधिकारारूढ होत असतो तेव्हा! पण जेथे एकाला कैदेत घालून त्याचे राज्य बळजबरीने दुसऱ्याने बळकाविले आहे तेथे या दुसऱ्या बलात्कारी राजाने पहिल्याच्या नावाचा शिक्का वापरणे योग्य होईल काय? त्याला स्वतःला तरी ते पसंत पडेल काय? राजारामपुत्र दुसऱ्या शिवाजीनंतर छत्रपतिपद (कोल्हापूर गादी) संभाजीकडे गेले हे स्थित्यंतर नैसर्गिकरीत्या झालेले नव्हते. ती एक प्रकारची राज्यक्रांतिच होती. अशा स्थितीत क्रांतिकारक अशा या दुसऱ्या छत्रपतीने आपल्याच कैदेत असलेल्या पहिल्या छत्रपतीचे किंवा त्याच्या अधिकाऱ्याचे शिक्के वापरले असतील असे म्हणणे तितकेसे सयुक्तिक वाटत नाही; व ते पटतहि नाही. यावरून असे वाटते की बावडा दप्तरातील क्रमांक ९२–९३ पत्रातील शंभु छत्रपति म्हणजे शिवछत्रपतिच असावा. राजनीतीच्या आरंभी ज्या शंभु छत्रपतीचा उल्लेख आहे तोही राजारामपुत्र शिवाजी दुसरा हाच असावा.

दुसरे असे की राजनीतीच्या लेखकाने आपल्या या 'शंभू छत्रपति स्वामीने' केलेल्या कार्याची जी जंत्री दिलेली आहे ती दुसऱ्या संभाजीस लागू न होता दुसऱ्या शिवाजीसच लागू होते. 'स्वामी राज्यसनारूढ जाहले' नंतर त्याने जो उद्योग केला त्याचे वर्णन १, २, ३ व ५ ते ८ या पानात आलेले आहे. त्यातील एक महत्वाची गोष्ट अशी की हा स्वामी राज्यारूढ झाल्यानंतरच 'राज्यावर औरंगझेबासारिखा सबल शत्रु चालोन आला, या राज्यानिमित्त आपला संपूर्ण पराक्रम व अर्थवैभवादि सर्व शक्ति वेचली. तथापि श्रीकृपाकटाक्षाने सकळही निर्फळ जाहले. परिणामी हतोद्यम होत्साता पराङ्मुख होऊन यमालयास गेला.' स्वामीच्या कारकीर्दीतील औरंगजेबाच्या मृत्यूचा हा उल्लेख हेच सुचवितो की हा स्वामी म्हणजे औरंगजेबाच्या मृत्यूपूर्वी (इ. १७०७) राज्यासनारूढ झालेला दुसरा शिवछत्रपतीच असावा. पान ५ वर औरंगजेबाच्या मृत्यूचा उल्लेख पुनः आलेला आहे. या म्लेंछ राजाने केलेल्या आघातामुळे विस्खलित झालेली मराठी राज्याची घडीही या स्वामीनेच सावरली असे राजनीतीचा लेखक सांगतो. तेव्हा त्याचेही कर्तृत्व दुसऱ्या छत्रपतीकडेच जाते, हे स्पष्ट दिसते. या शिवाय या स्वामीने शामलाचा, सावंतादिकाचा व म्हैसुरकरादि पाळेगारांचा निःपात केल्याचे वर्णन पान ६ वर आहे. त्यावरून या स्वामीने प्रथम 'प्राचीन वस्तीस्थाने निग्रहाने आक्रमून शामलाचे निर्नाम केले.' नंतर 'अनुपदे सावंतादि जे राज्यास संकटभूत जाहले, होते त्यांचा निःपात केला' मग 'म्हैसुरकरादि पाळेगारास यथोचित शिक्षा करून 'राज्य निष्कंटक' केले. यात उल्लेखिलेली शामलाची स्वारी कोणती, हे उपलब्ध इतिहासावरून नीट कळत नाही. पण सावंताच्या निःपाताचा उल्लेख मात्र बावडा दप्तरातील एका पत्रात आढळतो. कुडाळकर सावंतावरील यशस्वी स्वारीचा मुहूर्त पाहून दिल्याबद्दल रा. बाळंभट विश्वनाथभट वडणगेकर यास छत्रपतीने जमीन इनाम दिली, त्यासंबंधी रामचंद्र नीळकंठ अमात्याने पन्हाळा येथील देशमुख देश कुळकर्णी यास लिहिलेले हे पत्र आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(बावडा दप्तर अनु. ७८) ' कुडाळकर सावंत याणे राजश्री छेत्रपती स्वामीच्या पासी दुर्बुद्धि धरून दुष्टाचरण आरंभिले होते त्यास नतीजा पावावया निमित्ये आगेजे केला ' असा उल्लेख त्या पत्रात आढळतो. पत्र ता. १४–१०–१७१० चे आहे. तेव्हा राजनीतीत उल्लेखिलेला सावंताचा निःपात इ. स. १७१० मधील, म्हणजे, अर्थात् दुसऱ्या शिवाजीच्या कारकीर्दीतील होय. यावरूनही शंभु छत्रपतिस्वामी म्हणजे दुसरा शिवछत्रपति हाच असावा असे वाटते. याशिवाय या स्वामीने ' विजापूर भागानगरादि प्राचीन महास्थळे यावर खासा चालोन जाऊन–' ते ' स्वशासनवश केले.' ' अनुपदे औरंगाबाद बऱ्हाणपुर ' ही स्थळेही घेतली. या सर्व उल्लेखांना कागदोपत्रीचा प्रत्यंतर पुरावा अजून मिळावयाचा आहे ही गोष्ट खरी. तथापि ज्या स्वामीच्या कारकीर्दीत ही इतकी प्रचंड कामगिरी झाली तो स्वामी इ. स. १७१४ मधे (स्थिरबुद्धि राजाराम, पा. १५४) म्हणजे राजनीतीच्या लेखनापूर्वी एकच वर्ष आधी राज्यासनारूढ झालेला दुसरा संभाजी असावा असे मानणे योग्य होणार नाही. यापेक्षा हा स्वामी ' शंभु छत्रपति ' म्हणजे ' शिवछत्रपति ' अर्थात ताराबाईचा मुलगा दुसरा ' शिवाजी 'च असावा असे मानणे योग्य होईल. वरील कामगिऱ्यांचे उल्लेख कोणाचे असावे याविषयी केलेल्या पृच्छेला ' मला वरील उल्लेख ताराबाईचे वाटतात. राजसबाईचेही असू शकतील ' असे उत्तर श्री. सरदेसाई देतात. त्यावरून त्याच्याही मते वरील कामे जीत झाली ती कारकीर्द ताराबाईची–म्हणजे दुसऱ्या शिवछत्रपतीची असावी असे उघड उघड दिसते.

' शत्रूचा पराभव करावा हाच स्वामींनी दृढ विचार करून तमाम प्रांतांचे रजपूत एकत्र करविले. **स्वामी** सुमुहूर्ते नर्मदापार जाहले. श्रीकृपे अल्पकालेच मुख्य शत्रूचा पराभव करून दिल्ली, आग्रा, लाहोर, डाका, बंगाल, ठठ्ठा, जलकरादि करून संपूर्ण तत्संबंध देशदुर्ग हस्तवश्य करून वाराणशीस जाऊन स्वामी श्रीविश्वेश्वर स्थापना करितात, तावत्कालपर्यंत दक्षिणप्रांत संरक्षणार्थ श्रीमत्सकलतीर्थैकतीर्थ श्रीमन्मातोश्रीसाहेब दक्षिण प्रांतांस राहिली आहेत. ' असाही उल्लेख या स्वामीविषयी आढळतो. त्यावरून दक्षिणप्रांत सोडून नर्मदेच्या पलीकडे स्वामी गेले होते असे दिसते. उपलब्ध इतिहासावरून, दुसरा शिवछत्रपति किंवा दुसरा संभाजी यापैकी कोणीच नर्मदेपलीकडे गेले होते असे आढळत नाही. यावरून हा भाग अनैतिहासिक आहे की काय अशी शंका येते. पण यापेक्षा या ' राजनीतीचा ' किंवा ' आज्ञापत्रा 'चा हा पुरावा ग्राह्य मानून दुसरा शिवाजी आपल्या सरदारासह तिकडे गेला असावा असे मानावयास हरकत नाही.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिंबकजी डेंगळे

[लेखक—वि. स. वाकसकर, बडोदें]

[१ मूळ पत्रांतील सारांश. २ त्रिंबकजीचे भाऊ वगैरे आप्त. ३ कुटुंबाचा वृत्तांत. ४ जन्म सन. ५ त्रिंबकजीच्या काल्पनिक पत्नीचें शौर्य. ६ पूर्व वृत्तांत. ७ त्रिंबकजींचें वर्तन. ८ त्रिंबकजीच्या सुटकेसंबंधींचें पत्र. ९ पत्रांतील सारांशावर विचार. १० गंगाधरशास्त्री यांची जन्म तारीख व कौटुंबिक माहिती. ११ शाहीर प्रभाकर याचा वृत्तांत. १२ रियासतकारांच्या भगीरथ प्रयत्नामुळें इतिहासाचा लाभ.]

गंगाधरशास्त्री यांचा खून आणि ठाण्याच्या किल्ल्यांतून पलायन या दोन मुख्य कर्तृत्वामुळें त्रिंबकजी डेंगळा हें नांव फार प्रसिद्ध आहे. त्याचें विश्वसनीय चरित्र आज सांगण्याचा विचार आहे. मराठी रियासत, उत्तरविभाग ३, पृष्ठ ४५० वर त्रिंबकजीचा परिचय पुढीलप्रमाणें करून दिला आहे.

१ मूळ पत्रांतील सारांश

"......हा निंबगांव–जाळी या गांवचा पाटील; बाजीरावाजवळ हुजऱ्याचें काम करीत होता. पुढें याची नेमणूक जासुदांत करून ठिकठिकाणची माहिती आणण्याच्या कामावर बाजीरावानें यास नेमिलें. यशवंतराव होळकरापासून पराभव पावून बाजीराव महाडास गेला, तेव्हां त्याजबरोबर त्रिंबकजी होता. महाडहून एक जरूरीचें पत्र बाजीरावास पुण्यास पाठवावयाचें होतें. तें पत्र पोंचवून त्याचा जबाब तावडतोब त्रिंबकजीनें बाजीरावास आणून दिला. तेव्हांपासून......त्याजवर त्याची मर्जी विशेष बसली ......विद्येचा किंवा राजकारणाचा उच्च संस्कार त्याला नव्हता, तरी खटपटी व तरतरी या वृत्तीमुळें बाजीरावाचे बरेवाईट हुकूम न्यायान्याय न पाहतां अंमलांत आणण्यास तो कचरणारा नव्हता."

रियासतकारांनीं त्रिंबकजीच्या चरित्राचें हें सार फार मार्मिक असें दिलें आहे. त्यानंतर पेशवे दप्तराचे ४५ भाग त्यांनींच प्रकाशांत आणिल्यामुळें पुष्कळ नवीन वृत्तांत प्रगट झाला आहे. तो लक्षांत घेऊन हें चरित्र लिहिण्याचें ठरविलें आहे.

२ त्रिंबकजीचे भाऊ वगैरे आप्त

यशवंतराव होळकरानें दौलतराव शिंद्याचा पराभव सन १८०२ मध्यें केला, तेव्हां बाजीराव महाडास पळून गेला. त्या वेळीं त्याबरोबर त्रिंबकजी हा हुजऱ्या या नात्यानें नोकर होता. पेशवे दप्तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ४१ लेखांक २६५ यांत त्रिंबकजीचा भाऊ कुसाजी यानें या डेंगळे कुटुंबाचें वृत्त लिहिलेलें प्रसिद्ध झालें आहे. त्या पत्राच्या आधारें पुढील वृत्तांत सांगतां येतो. ' त्रिंबकजीच्या बापाचें नांव मल्हारजी. या मल्हारजीला पहिल्या पत्नीपासून झालेलीं मुलें मरण पावलीं, त्यास मल्हारजीनें दुसरें लग्न केलें. त्या दुसऱ्या बायकोचा मुलगा त्रिंबकजी. हा झाल्यानंतर पहिलीस एक मुलगा झाला तो कुसाजी. म्हणजे कुसाजी हा त्रिंबकजीपेक्षां वयानें लहान पण मानानें मो होता. कारण तो मल्हारजीच्या पहिल्या म्हणजे वडील पत्नीचा मुलगा होता. '

वर उल्लेखिलेलें पेशवे दप्तर भाग ४१ लेखांक २६५ चें पत्र त्रिंबकजीचा भाऊ कुसा डेंगळे यानें तारीख २२-३-१८२३ रोजीं लिहिलेलें आहे. स

३ कुटुंबाचा वृत्तांत १८०२ मध्यें त्रिंबकजी हा पेशव्यांच्या पदरीं हुजऱ्या या नात्यां नोकर होता हें वर सांगितलेंच आहे. त्रिंबकजी हा बाजीरावाच्या पदरीं हुजऱ्याची नोकरी धरीपर्यंतचा डेंगळे घराण्याचा वृत्तांत त्या पत्रांत पुढीप्रमाणें सांगितल आहे. ' त्रिंबकजी व कुसाजी हे दोघे बंधु मोठे झाल्यावर त्यांचे विवाह झाले. पुढें या दोघां वडील मल्हारजी हे निवर्तले, त्या वेळीं कांहीं कर्ज देणें होतें. त्याचा तगादा लागला ते त्रिंबकजी रोजगारासाठीं नागपुरास गेला. कुसाजी मात्र घरीं निंबगांवजाली परगणे संगमने येथेंच राहून कर्जाची फेड करण्याच्या व्यवस्थेस लागला. त्रिंबकजी हा दोन वर्षे नागपुरा राहून परत घरीं निंबगांवजालीस आले. पण त्यानें पैसा असा कांहींच आणिला नाहीं. त्यामु हे दोघेहि बंधु आपल्या मुलांमाणसांसह निंबगांवजालीहून परागंदा होऊन पाडेसर येथें गेले तेथें राहिले. त्या वेळीं कुसाजीचें कुटुंब गरोदर असल्यानें बाळंतपणासाठीं माहेरीं वडसरी ये पोंचविलें, व बाकीची सर्व मंडळी पाडेसर येथेंच राहिली. दोनचार महिन्यांनीं त्या कुटुंबा घ्यावयास कुसाजी वडसरीस गेला, तेव्हां त्याच्या मेहुण्यानें त्याला तेथेंच शेतकी कर राहण्याचा उपदेश केला. त्यावरून कुसाजीनें आपला भाऊ त्रिंबकजी याचा मनोदय काय अ त्रिंबकजीस विचारिलें. त्रिंबकजीनें त्यास संमति दिली. त्यावरून कुसाजी हा वडसरीस येऊ राहिला. व स्वतः त्रिंबकजी हा पाडेसर येथें राहिला. पुढें कांहीं दिवसांनीं त्रिंबकजी आपल मुलांमाणसांसह निंबगांवजालीस गेला व त्यानें आपला भाऊ कुसाजी यांसहि त्याच्य मुलांमाणसांसह निंबगांवजालीस नेलें, " असें कुसाजी आपल्या या पत्रांत म्हणतो. यानंतर त असें म्हणतो कीं, ' नंतर त्रिंबकजीची पत्नी मरण पावली. हल्ली त्रिंबकजीची जी पत्नी बा या नांवाची आहे, ती त्रिंबकजी श्रीमंत झाल्यावर त्यानें केलेल्या लग्नाची आहे. आणि म्हणून तिला पूर्वीची माहिती नाहीं. '

वर सांगितलेला इतिहास कुसाजीस लिहिण्याचें कारण पुढें विस्तारानें सांगण्यांत येईलच.

४ जन्म सन तूर्त एवढें निश्चित दिसतें कीं, सन १८०२ मध्यें अथवा त्या सुमारास त्रिंबकजीची पहिली बायको निवर्तली व तो पुण्यास बाजीराव पेशव्याच्या पदरीं हुजऱ्या म्हणून नोकरीस राहिला. पुढें त्यानें हुशारी दाखविल्यावर त्यास बाजीरावानें सरदारी देऊन सातारकर छत्रपतीवर देखरेख ठेविण्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १८०४ मध्यें नेमलें. या वेळीं म्हणजे सन १८०२ अथवा सन १८०३ सालीं त्रिंबकजीनें पुन लग्न केलें असावें. सन १८०२ पर्यंतचा त्याचा आयुःक्रम पाहिला म्हणजे त्यावेळीं तो चांगला पंचवीस तीस वर्षांचा असावा असें गृहीत धरिलें, तर त्याचा जन्म साधारणतः सन १७७५ च्या सुमारास झाला असावा असें वाटतें. पुढील विवेचनास प्रारंभ करण्यापूर्वी कुसाजीनें आपल्या घराण्याची कुळकथा कां लिहिली हें निवेदन करितों.

५ त्रिंबकजीच्या काल्पनिक पत्नीचें शौर्य

सन १८०४ पासून सन १८१४ पर्यंत त्रिंबकजीचा उत्कर्ष सारखा होत गेला. पेशवे व गायकवाड यांच्यामधील आपापसांतील देण्याघेण्याचा निवाडा करण्यासाठीं गायकवाडांच्या बाजूनें गंगाधरशास्त्री पटवर्धन या गृहस्थास गायकवाडांच्या छत्राखालीं व इंग्रजांच्या कवचाच्या आश्रयानें पुण्यास पाठविण्यांत आलें. सन १८१५ मध्यें गंगाधरशास्त्र्याचा पंढरपुरांत खून झाला, व पुढें एक दोन महिन्यांनींच त्रिंबकजीला अटक करून ठाण्याच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. तेथून एक वर्षानें सन १८१६ मध्यें त्रिंबकजी पळाला. त्यानें कांहीं लोक जमवून सुमारें दोन वर्षे दंगा केला. सन १८१८ मध्यें त्याला ‘ अहिरगांवीं ’ पकडण्यांत आलें. त्या वेळीं घडलेला एक रोमांचकारी वृत्तांत ‘ दुर्दैवी मोहरे ’ या पुस्तकांत पृष्ठ १३२ वर दिला आहे तो मनोरम असल्यानें पुढें देतों.

“ .... एक स्त्री व त्रिंबकजीचा नोकर इंग्रजास फितूर झाले. त्यांनीं ब्रिग्जला त्रिंबकजीच्या ठिकाणाची माहिती दिली. त्याबरोबर कॅ. स्वान्टन हा एक हजार स्वार बरोबर घेऊन अहिरगांवीं आला. त्या वेळीं बिचारा त्रिंबकजी सडा होता व आपले अज्ञातवासाचे दिवस कसे तरी ढकलीत होता. तेव्हां इंग्रजांस त्रिंबकजीला पकडण्याचें शूर कृत्य करण्यास चेव चढला. त्यांनीं लगेच गांवाची नाकेबंदी केली आणि पहांटे त्रिंबकजी गाढ झोंपीं गेला असतांना त्याच्या गळ्याभोंवतीं गळफांस टाकला. त्रिंबकजीच्या वाडयास गराडा घातला. वाडा दोनदां तळघरें–बळदांसुद्धां शोधला; पण त्रिंबकजीचा पत्ता लागेना. शेवटीं तिसऱ्यांदा मात्र त्रिंबकजीचें दुर्दैव ओढवलें. तो एका बळदांत लोखंडी चोरदाराच्या पलीकडे एक जिना होता त्या ठिकाणीं फरारी होण्यासाठीं म्हणून भिंत फोडीत होता. त्यास धरण्यासाठीं म्हणून इंग्रजांचे लोक जाऊं लागले, तो त्यांस एका वीर भालाइतानें अडथळा केला व येणाऱ्या इसमास भाल्यानें ठार करण्याचा त्यानें सपाटा चालविला. एकटया माणसानें तीस आसामी ठार केले. हें पाहून स्वान्टन घाबरला व या बेहोष माणसास कसें कह्यांत आणावें हेंच त्यास सुचेना. तेव्हां कंटाळून त्यानें त्या पराक्रमी भालाइतावर गोळ्या झाडण्यास हुकूम दिला. आपला प्राण घेण्याकरितां आतां बंदुकींतून गोळ्या सूं सूं करत येणार हें त्यानें पाहिलें; पण त्याची स्वामिनिष्ठा इतकी जाज्वल्य, कीं त्याचें त्यास कांहींहि वाटलें नाहीं. आपल्यावर सूं सूं करीत येणाऱ्या गोळ्या ह्या प्राणघातक नसून त्यांच्यांत अमृततुल्य संजीवन सांठविलेलें आहे असें त्यांस वाटत असल्यामुळें त्याचें आसन थोडेंसुद्धां ढळलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. तो भिंताडासारखा ताठ होता. त्याला कशाचीहि कदर नव्हती. यजमानाचें रक्षण हेंच आपलें दिव्यनिधान वैकुंठ अशी त्याची भावना होती. टोपीकर इंग्रजांच्या लोकांनीं सोडलेल्या गोळ्या त्याच्या अंतःकरणाचा भेद करून जातांच त्याचा वीर देह खालीं पडला. तो मराठा शूराच्या मरणानें मेला, त्याचें सोनें झालें ! त्या पुरुषाला जवळ जाऊन पाहतात तों खरोखरीच आश्चर्य ! तो पुरुष नसून पुरुषवेष धारण करणारी स्त्री होती. ती त्या वीर त्रिंबकजीची वीरपत्नी होती !........आपण पुरुष म्हणून मारलेला मराठा हा बाप्या नसून बाप्यास लाजविणारी स्त्री आहे आणि तीसुद्धां त्रिंबकजीची बायको आहे हें जेव्हां स्वान्टन यांस कळलें त्या वेळेस त्यास मोठा अचंबा वाटला.........."

या मजकुरामध्यें त्रिंबकजीच्या पत्नीच्या शौर्याचें वर्णन मोठें चित्तवर्धक व रोमांचका[री] केलेलें आहे. किंबहुना झांशीची महाराणी लक्ष्मीबाईसुद्धां या वर्णनांतील स्त्रीपुढें फिकी पड[े]. झांशीची महाराणी ब्राह्मण असल्यानें ब्राह्मण लेखकांनीं तिची उगीचच अतिशयोक्तिपर स्तु[ति] केली असेल असें कोणी म्हणेल; पण त्रिंबकजी हा मराठा असून त्याच्या पत्नीच्या शौर्या[]वर दिलेलें वर्णन श्री. लेले या गृहस्थांनीं केलें असून या पुस्तकाला पुण्याचे प्रसिद्ध इतिहास-संशोधक, व छत्रपति शिवाजीमहाराज व त्यांचा धाकटा बंधु व्यंकोजी असे दोघेहि जण स[न] १६३० मध्येंच एकाच पंधरवड्यांत जन्मले असें अट्टाहासानें सांगणारे श्री. दत्तोपंत आ[पटे] यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. असा प्रकार असल्यानें वर उतरून घेतलेल्या वर्णनांत काना-मात्रेची सुद्धां अतिशयोक्ति असणें संभवनीय नाहीं. म्हणून यासंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं प्रस्तुत वृत्तांत प्रसिद्ध होत आहे तोंपर्यंत उपर्युक्त इतिहासाला एकहि आधार प्रसिद्ध झाले[ला] नाहीं. या उभयतांच्या कृपेनें यापुढें तो प्रसिद्ध होणार असल्यास तोंपर्यंत वाट पाहणें भाग आहे!!

६ पूर्व वृत्तांत

त्रिंबकजीचा वृत्तांत मराठी रियासत उत्तर विभाग ३ पृष्ठ ५०८ वर श्रीयुत सरदे[साई] यांनीं संक्षिप्त पण ऐतिहासिक असा दिला आहे. त्यांतील महत्त्वा[चा] भाग पुढें देतों. "(बाजीरावाचा) दुसरा साथीदार त्रिंबकजी डेंग[ळे] यानेंही पुढें (सन १८१८ मध्यें) स्वाधीन होण्याचें बोलणें जनर[ल] डोव्हटनकडे सुरू केलें.........डोव्हटननें त्याजवर हल्ला केला तेव्हां तो पळून गेला.. ......वणीदिंडोरीजवळ अहिरगांव येथें सन १८१८ च्या जुलै महिन्यांत एल्फिन्स्टननें त्या[स] पकडून बेड्या घालून कबिल्यासुद्धां चांदवडचे ठाण्यांत आणून ठेविलें......(पुढें) त्या[स] चुनारगडचे किल्ल्यांत ठेविलें. तेथें तो तारीख १६-१०-१८२९ रोजीं मरण पावला. रियासतकारांनीं आपलें हें उत्तरविभाग ३ चें पुस्तक सन १९३२ सालीं प्रसिद्ध केलें. त्यानं[तर] सन १९३४ सालीं मागें सांगितलेला पेशवे दप्तर भाग ४१ हा प्रसिद्ध केला. त्यांतील महत्त्वा[चा] वृत्तांत आतां सांगतों.

१ ले. २३७—११-७-१८१८ त्रिंबकजी पुण्याहून पळाला. साताऱ्याहून प्रसिद्धी पत्रक निघालें कीं त्रिंबकजीस पकडून हाजर करावें. वगैरे वर्तमान एकानें कळविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ ले. २३८—१७-७-१८१८ त्रिंबकजी डेंगळा यास किल्ले आमदानगर येथें गेले बुधवारीं (तारीख १०-७-१८१८) धरून आणून किल्ल्यास दाखल केला.

३ ले. २५१—१८१८ दाजीबा डफळा यानें गंगाधरशास्त्री यांचा खून केला.

४ ले. २६२—४-११-१८२२ त्रिंबकजीच्या कुटुंबांतील मंडळींची यादी. १ मुलगा. ८ बायका. ३ मुली. १ लहान भाऊ. २ भावजया. १ पुतण्या (भावाचा मुलगा) १ पुतण्याची बायको. २ पुतण्या (भावाच्या मुली). एकंदर १९ मंडळी त्रिंबकजीच्या कुटुंबांत होती. या शिवाय संपत्तीचा तपशील व ३० कुणबिणी व वीस लेकवळे असे पन्नास नोकर असल्याचा उल्लेख याच पत्रांत आहे.

५ ले. २६५—२२-३-१८२३ त्रिंबकजीचा भाऊ कुसाजी यानें कुटुंबाची हकीकत लिहिली तो कागद. यांत त्रिंबकजीच्या एकच पत्नीचा उल्लेख आहे. कुसाजीनें हें पत्र लिहिण्याचें कारण असें आहे कीं, त्रिंबकजीच्या एका पत्नीनें (बाया हिनें) कुसाजी व त्रिंबकजी हे विभक्त असल्यानें त्रिंबकजीच्या संपत्तींत कुसाजीचा कांहींहि भाग नाहीं असें सरकारांत कळविल्यानें कुसाजीनें पूर्ववृत्तांत त्या पत्रांत लिहिलेला आहे. त्यामुळें त्या पूर्ववृत्तांताशिवाय इतर कांहीं माहिती त्यांत नाहीं हें रीतीचेंच आहे.

६ ले. २७७—१२-११-१८११ त्रिंबकजीनें पेंढाऱ्यांवर केलेल्या स्वारीचें वर्णन.

७ ले. २७४—२४-१२-१८३१ सोंडूरचे दौलतराव घोरपडे यांनीं त्रिंबकजीशीं पूर्वीं केलेल्या लढाईचें वर्णन. ही लढाई गोताल्याचे घाटाखालीं गणेशपूर येथें झाली. ही लढाई सन १८१६ ते १८१८ या कालांतील होय. कारण सन १८१६ मध्यें तो तुरुंगांतून पळाला व बंड करीत फिरत होता. सन १८१८ मध्यें त्यास पकडलें, तें पुढें सांगूं.

८ ले. २३६—४-७-१८१८ त्रिंबकजी यास वण पोटचे गांवीं धरून चांदवडांत आणून बेड्या घातल्या व कैदेंत ठेविलें. वर क्रमांक २ पहा.

वर मुद्दाम आठ पत्रांतील सारांश सांगितला आहे. आतां यापुढें त्रिंबकजीचा वृत्तांत कथन करावयाचा आहे.

७ त्रिंबकजीचें वर्तन

त्रिंबकजी हा बाजीरावाच्या जवळ राहिल्यावर मोठ्या झपाट्यानें ऊर्जितावस्थेस आला, हें पाहिलें म्हणजे त्याच्याबद्दल फारसा आदर वाटत नाहीं. देवदेवतार्चनांत बाजीरावाचा बराच काळ जात असे व बाकीचा वेळ स्त्रियांच्या संगतींत तो घालवीत असे. त्या समाजांत वाटेल तो बीभत्स प्रकार होत असे असें एल्फिन्स्टन म्हणतो. जो सरदार अथवा नोकर आपली बायको त्या मजलसींत पाठवीत नसे, त्यावर बाजीरावाची इतराजी होऊन त्याचें उत्पन्न बंद करण्यांत येत असे. बाजीरावाचा सेनापति बापू गोखले यावरसुद्धां हा प्रयोग झाला व त्यानें बाजीरावाचें म्हणणें मान्य करतांच त्यास त्याचें उत्पन्न मिळूं लागलें. हा एकंदर इतिहास पाहिला म्हणजे त्रिंबकजीबद्दल मुळींच आदर वाटत नाहीं. त्रिंबकजीच्याच सल्ल्यानें बाजीरावानें लोकाचीं उत्पन्नें धडाधड बंद केलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्वी महाल इजाऱ्यानें देत असत. अधिक रक्कम देण्याचें वचन देईल त्यास तो महाल सोंपण्या येत असे. पण यामुळें प्रजेचे हाल मनस्वी होत असत. पण त्रिंबकजी पैशाशिवाय इतर कोणत्या मुद्द्याकडे लक्ष देत नसे. एका इजारदारास समक्ष बोलावून वसुलाच्या बाबतींत चर्चा चा असतां त्रिंबकजीनें, त्याच्या तोंडांत इतक्या जोरानें मारली कीं, तत्काळ तो गतप्राण झाल असल्या राक्षसाबद्दल काय म्हणावें हें वाचकांनींच ठरवावें. साताऱ्च्या चतुरसिंगास त विश्वासघातानेंच सन १८११ मध्यें त्रिंबकजीनें पकडून कैद केलें व शेवटीं तो त्यांत रायगड किल्ल्यावर सन १८१८ मध्यें मरण पावला. साताऱ्च्या छत्रपतीवर सख्त देखरे करण्याचें काम त्रिंबकजीनें सन १८०४ मध्यें पतकरिलें व नंतरच त्याचा भराभ उदय झाला; यावरून त्याच्या उदयाचें कारण सहज लक्षांत येतें. त्रिंबकजीच्या सल्ल्यां बाजीरावानें सर्व जहागिरदारांस भिकेस लाविलें, पण एल्फिन्स्टन यानें सन १८१२ मध्यें ए व्यवस्था ठरवून बाजीरावास तीच मान्य करण्यास लाविल्यानें जहागिरदार वांचले. त्रिंबकजीच्या सल्ल्यानें सन १८१५ मध्यें बाजीरावाजवळ पांच कोट रुपये खजीना जमला होता. या खजिन्याच्या जोरावर त्रिंबकजी स्वराज्य वाढविणार होता. त्रिंबकजी, बाजीराव, सर्जेराव घाटगे दौलतराव शिंदे, ही मराठशाहींतील प्रमुख मंडळी व वेल्स्ली, एल्फिन्स्टन, कॉर्नवालिस, ही इंग्रजांकडील प्रमुख मंडळी, अशा उभयतांचा सामना पाहिला म्हणजे त्याचा घडलेला शेव योग्यच होय असें निश्चितपणें वाटतें. शेवटीं त्रिंबकजी हा ठाण्याच्या किल्ल्यांतून पळाला. यां त्याचें चातुर्य दिसतें यांत शंका नाहीं. या मुद्द्याची चर्चा करून हें प्रकरण संपवूं.

त्रिंबकजी हा ठाण्याच्या किल्ल्यांतून पळाल्याचा इतिहास प्रसिद्ध आहे. तो असा कीं त्याच्यावर ठेविलेले पाहेरकरी इंग्रज लोकच होते. त्यामुळें त्रिंबकजीनें एका घोडेवाल्याशीं संधान बांधिलें. इंग्रज पाहेरेकऱ्यांस मराठी ये नसल्यानें त्रिंबकजी हा आपलें मनोगत त्या घोडेवाल्यास समजावें या उद्देशानें पोवाड्यांत गाऊन ऐकवीत असे. पुढें तो घोडेवाला त्याच रीतीनें त्रिंबकजीशीं भाषण करीत असे. याप्रमाणें संकेत ठरू

८ त्रिंबकजीच्या सुटकेसंबंधींचें पत्र

त्रिंबकजी पळून गेला. हा प्रकार तारीख १२ सप्टेंबर सन १८१६ रोजीं सायंकाळ सात आठ वाजतां घडला. परंतु पेशवे दप्तर भाग ४१ पत्रांक ९१ मध्यें पुढील अर्थाच मजकूर आहे. "त्रिंबकजीस फांशीं देण्यासाठीं म्हणून पंचवीस गारदी बरोबर देऊन मेण्यांत घालून खाडीकाठीं आणिला व आतां त्याचा शिरःच्छेद होणार तों त्यानें मोरकऱ्यांस विनंति केली कीं, 'आम्हांस मारूं नये, पुण्यास जिवंत घेऊन चलावें. मी तुमचे उपकार फेडीन.' हें त्रिंबकजीचें बोलणें ऐकून मोरकरी म्हणाले कीं, 'आम्हांस सोळा हजारांचा ऐवज, रोख मोहरा पंधरा हजार आणि रोख रुपये एक हजार इतके पैसे देण्याचा हमीदार द्या, म्हणजे पुण्यास नेतों.' खाडीच्या कांठीं प्रत्यक्ष हमी घेण्यासाठीं ऐपतदार मनुष्य कोठून आणावा अशी पंचाइत त्रिंबकजीला पडली. पण इतक्यांत आबा जोशी नांवाचे गृहस्थ तेथें आले. त्यास त्रिंबकजीनें आपली वस्तुस्थिति नीट समजावून सांगितली कीं, 'त्रिंबकजीला जिवंत घेऊन तुम्ही पुण्यास चला. तेथें जातांच तुमची ठरलेली रक्कम मी स्वतः तुमच्या पदरांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाकीन. ' असें सांगून आबा जोश्यांनीं मोरकऱ्यांची खात्री पटविल्यावर रात्रीचा दिवस करून मजला मारीत ही सर्व मंडळी सहावे दिवशीं पुण्यास आली. पुण्यास येतांच आपण गुप्त राहून डेंगळ्यानें स्वहस्तानें एक पत्र आपले स्नेही हरबा आबा यांस लिहिलें व त्यांस पंधरा हजार होन व एक हजार रोख अशा ऐवजाची तरतूद तावडतोब करून आबा जोश्यांच्या स्वाधीन करण्यास सांगितलें. ' ऐवज आजच्या आज हातीं न येईल तर मोरकरी आमची गर्दन मारितील म्हणून ऐवजाची व्यवस्था करावी. तसेंच आबा जोशी सांगतील त्याप्रमाणें वागावें. गोष्ट षट्कर्णी करूं नये. येथून सुटलों म्हणजे बापू गोखल्याच्या लष्करांत जाईन, ' असें सर्व खुलासेवार लिहिलें होतें. त्याप्रमाणें ऐवजाची व्यवस्था होऊन त्रिंबकजी सुटला. " (हा सर्व वृत्तांत ' दुर्दैवी मोहरे ' पृष्ठ १२२–१२३ वरून घेतला आहे. वरील अर्थाच्या पत्राखालीं रियासतकारांनीं आपलें मत पुढीलप्रमाणें प्रदर्शित केलें आहे. ' This solves the mystery of Trimbakji's escape on 12 September, 1816 from the prison of Thana. ' आतां यासंबंधीं विचार करूं.

९ पत्रांतील सारांशा-वर विचार

हें पत्र पुण्याहून तारीख १२-९-१८१६ रोजीं सायंकाळीं लिहिलें असून त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, ' हमीदार देतांच रात्रीचा दिवस करून ठाण्याहून आज सहावे दिवशीं दिवस मावळतां पुण्यास दाखल झालों. ' यावरून त्रिंबकजी हा ठाण्याच्या किल्ल्यावरून तारीख ७-९-१८१६ रोजीं सकाळींच गुप्त झाला. त्यावरील पाहरेकरीसुद्धां त्याची मराठी भाषा न समजणारे व इंग्रज शिपाई ठेविले होते. पण त्याला ठार मारण्यास मात्र मराठी भाषा समजणारे मांग रामोशी यांसच पाठविलें व त्यांच्याबरोबर भरंवसेदार अधिकारी कोणीच पाठविला नव्हता. म्हणजे गंगाधरशास्त्री यांच्या खुनासंबंधानें जेवढें दुर्लक्ष झालें तेवढेंच दुर्लक्ष त्रिंबकजीच्या पलायनासंबंधानें विशेषतः इंग्रजांचें झालें व तें कोणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून त्यांनीं सहा दिवस गुप्त ठेविलें असा एकंदर तर्क करावा लागतो. असला वेडगळ तर्क करण्यास कारण काय, तर वर दर्शविलेलें एक पत्र. तें पत्रच बनावट आहे असें म्हटलें, तर सगळी संगति सरळ लागते, पण पत्राचें महत्त्व कमी होतें, अशी भलतीच भीति इतिहाससंशोधकास वाटते. कांहींहि असो, तें पत्रच बनावट आहे असें मला निश्चितपणें वाटतें. इतर महत्त्वाचा मजकूर असत्य मानून या पत्रास भलतेंच महत्त्व देणें म्हणजे भलत्याच प्राण्याच्या पाठीवर अंबारी ठेविण्या-सारखें आहे.

१० गंगाधरशास्त्री यांची जन्म तारीख व कौटुंबिक माहिती

' दुर्दैवी मोहरे ' या पुस्तकाच्या पृष्ठ ११८ व पृष्ठ ११९ वर गंगाधरशास्त्री यांच्या आबासाहेब नांवाच्या मुलास प्रभाकर कवीची मुलगी दिली होती, असा त्यांचा निकटसंबंध असून त्यानें, त्रिंबकजीनें खून केला असें कवनांत म्हटलें नाहीं; यावरून शास्त्री यांचा खून त्रिंबकजीनें केला नव्हता असें अनुमान काढलें आहे. पुढें पृष्ठ ११९ वर गंगाधरशास्त्री यांची मुलगी यमुनाबाई ही आपल्या बापाच्या खुनाचा आरोप त्रिंबकजीवर करीत नाहीं असें लिहिलें आहे. हीं सर्व अनुमानेंच असल्यानें यासंबंधीं विशेष चर्चा करण्याचें कारण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. परंतु या निमित्तानें अवश्य ती विशेष माहिती प्रसिद्ध करावीशी वाटते, म्हणून ती तेव लिहितों. गंगाधरशास्त्री यांचा जन्म तारीख २-१-१७६९ रोजीं झाला होता असें त्यांच पत्रिकेवरून दिसतें. त्यांचे वडील चिरंजीव भिमाशंकर ऊर्फ रायसाहेब यांचा जन्म तारी २२-६-१८०४ रोजीं झाला. दुसरे चिरंजीव विनायकराव ऊर्फ आबासाहेब. यांची पत्रि मला मिळाली नाहीं. हे विनायकराव साधारणतः सन १८०६ मध्यें जन्मले असावेत. जर खरें असेल तर गंगाधरशास्त्री यांच्या खुनाच्या वेळीं म्हणजे सन १८१५ मध्यें विनायकराव, आबासाहेब नऊ किंवा दहा वर्षांचे असावेत. आतां प्रभाकराच्या मुलीशीं यांचा विव केव्हां झाला असावा हें सांगतों. प्रभाकराची मुलगी ही या विनायकरावांची दुसरी पत्नी होय यांच्या पहिल्या पत्नीस मुलगा झाल्यावर ती निवर्तली. त्या मुलाचे चिरंजीव श्री. दाजीसाहे शास्त्री हे होत. हे आज बडोदें राज्यांत नायबसुभे आहेत. सारांश हे दाजीसाहेब वर सांगितलेल्य विनायकरावांचे नातु व गंगाधरशास्त्री यांचे पणतु होत. प्रभाकराची मुलगी ही विनायकरावांच दुसरी पत्नी असल्यानें ती या दाजीसाहेबाची सावत्र आजी होय. या बाईचें नांव यमुनाबाई ही बाई सन १९२५ च्या सुमारास निवर्तली, त्या वेळीं तिचें वय शंभर वर्षांचें असेल अ मानिलें तरी बाईचा जन्म सन १८२५ सालीं म्हणजे गंगाधरशास्त्री यांचा खून झाल्याव दहा वर्षांनीं झाला असें म्हणावें लागतें. असा एकंदर प्रकार असल्यानें प्रभाकर हा गंगाध शास्त्री यांचा व्याही होता व त्यानें आपल्या कवनांत खुनाचा आरोप केला अगर न केला य म्हणण्यांत कांहीं स्वारस्य नाहीं. गंगाधरशास्त्री यांच्या मुलीचें नांव यमुनाबाई नव्हतें. श्री. ले यांनीं हें नांव गंगाधरशास्त्री यांच्या मुलीचें असल्याचें लिहिलें आहे पण ती त्यांची नजरचू आहे. प्रभाकराच्या काव्यावर रा. लेले एवढा विश्वास कां ठेवितात हें कळत नाहीं. कारण तो एवढा विश्वासपात्र नव्हता.

'दुर्दैवी मोहरे' या पुस्तकांत 'प्रभाकर'चा उल्लेख केला आहे त्यामुळें त्याची विशेष

११ शाहीर प्रभाकर याचा वृत्तांत

माहिती सांगणें अवश्य वाटतें. प्रभाकर हा डफावर म्हणण्यासारखी सुंदर कवनें करीत असल्यानें तो शाहीर या अभिधानानें प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रसाहित्य पृष्ठ ४७३ वर या प्रभाकराचा इतिहास पुढीलप्रमाणें दिला आहे. "......प्रभाकर, दादा वीर, बचु फंदी, महादु सुतार हे......सर्व...आपआपले डफ घेऊन पडद्याआड होतात. त्यांचे डफ डोळ्यापुढें असतात आणि त्यांच्या कवनांकडे कान लागलेले असतात तोंपर्यंत हे कोण व कुठले यांची चौकशी करण्याचें मनांतहि येत नाहीं. पण ते जरा दूर झाल्यावर या असल्या चौकशा आपल्या मनाला सुचूं लागतात. हे सर्वजण समकालीन असून एकाच बैठकींत...असत. बचु फंदी हा अनंत फंदीचा कोणीहि आप्त नव्हता. याचें उपनांव दिवटे. हा मोठा विचित्र पुरुष होता.........सारा वेळ तमाशे करावे, पोरे नाचवावे आणि मिळेल तें सुख साधून समाधानानें खुशालींत काळ घालवावा असा याचा क्रम होता. या सर्व मंडळींत प्रभाकर दाता हा जरा प्रतिष्ठित दिसतो......हा मूळ हरणई-मुरूडचा राहणारा. याच्या कवनांत आलेल्या उल्लेखावरून याची घरची...स्थिति फार गरीबीची असावी असें दिसतें. किंबहुना उत्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वयांत मुंबई, ठाणें यांसारख्या शहरांतहि सटरफटर माणसांवर कवनें करून हा द्रव्याची याचना करी. यावरून याची स्थिति केव्हांहि फारशी सुधारली असेल असें वाटत नाहीं. सवाई माधवरावांचा भरलेला ऐश्वर्यसंपन्न दरबार पाहून ज्यानें त्यावर कवन करून म्हटलें, त्याला उत्तरवयांत ठाण्याच्या कचेरीचें वर्णन करणें भाग पडावें; ज्यानें पेशव्यांचीं आणि त्यांच्या शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन इत्यादि सरदारांचीं वर्णनें आपल्या रसवंतीनें गाइलीं त्याला मुंबईकडल्या पारशांचीं, सोनारांचीं आणि इतर अनेक लुंग्यासुंग्यांचीं वर्णनें करीत सुटण्याची पाळी यावी आणि वाग्देवीच्या गळ्याला दोरी बांधून दरवेशाच्या अस्वलीप्रमाणें तिला दारोदार नाचविण्याची पाळी यावी, हें पाहून खेद वाटतो............कोंकणांतून घाटावर आल्यावर प्रभाकर हा प्रथम नाशकाजवळ गंगापुरास राहत असे. पुढें हा तेथून निघून प्रत्यक्ष पुण्यास येऊन राहिला होता. पुण्यांत खंडेराव रास्ते या उदार सरदाराच्या घरीं हा कारकुनीवर असे.......नोकरी सोडून हा कवनें करूं लागला.........सरदार पटवर्धन-गंगाधर शास्त्री– यांच्या घराण्याशीं याचा शरीरसंबंधहि जडला......हा शके १७६५ (सन १८४३) मध्यें आपल्या वयाच्या ७४ व्या वर्षी मृत्यु पावला." याचा मृत्यु सन १८४३ आहे यावरून याचा जन्म सन १७६९ हा असावा असें दिसतें.

रियासतकारांनीं रियासतीमध्यें या कवीचा आधार घेतलेला नाहीं हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. आणि म्हणूनच व्याकरणावर जशी अष्टाध्यायी, तशीच मराठ्यांच्या इतिहासावर 'मराठी रियासत' प्रमाण होय. रियासतींची योग्यता व प्रभाकराच्या शाहिरी वर्णनाचें मूल्य भिन्न प्रांतांतील असल्यामुळें एकाच मुद्यावर दोघांचीं मतें अजमावून त्यांची श्रेष्ठ कनिष्ठता ठरविणें अगदीं ग्राह्य नाहीं. इतिहास म्हणजे पोवाडा नव्हे व पोवाडा हा निश्चयानें इतिहास नव्हे हें सूत्र विसरतां कामा नये.

१२ रियासतकारांच्या भगीरथ प्रयत्नामुळें इतिहासाचा लाभ

त्रिंबकजीचें चरित्र सांगण्याचें काम संपलें. हें चरित्र आतां इतकें सविस्तर लिहिण्यास पेशवे दप्तर प्रकाशन हें मुख्य साधन प्राप्त झालें हा फार मोठा लाभ होय. बाजीरावाच्या आज्ञेवरून त्रिंबकजी डेंगळ्यानें गंगाधरशास्त्री यांचा खून करविला यांत काडीमात्र संशय नाहीं. पेशवे दप्तर प्रकाशनानें असे किती तरी मुद्दे स्पष्ट झाले आहेत. हें दप्तर प्रकाशनाचें कार्य मुंबई सरकारनेंच निश्चित केलें व रियासतकार गोविंदराव सरदेसाईसारखे भगीरथ या कार्यास मिळाल्यानें समाजावर फार मोठे उपकार झाले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परकीयांचें व धर्मभ्रष्टांचें हिंदुकरण

[लेखक—डॉ. **अनन्त सदाशिव अळतेकर**, एम्. ए., एल्एल्. बी., डी. लिट्., बनारस]

हल्लींची सामान्य समजूत अशी आहे कीं, हिंदुधर्म हा जे जन्मतः हिंदु आहेत त्यांच्या करितांच आहे. जे परधर्मांत अगर संस्कृतींत जन्माला आले असतील, किंवा जे जन्मानें हिंदु असून पुढें धर्मभ्रष्ट झाले असतील, त्यांना हिंदुधर्मांत प्रवेश मिळणें शक्य नाहीं, असा हल्लीं पुराणमताभिमानी लोकांचा समज आहे. आर्यसमाज व प्रगतिप्रिय हिंदु संस्था यांनीं शुद्धिकरणास सुरुवात केली आहे, पण त्यांचें हें कार्य प्राचीन रूढीच्या व धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे असें सनातन्यांचें प्रामाणिक मत आहे. आजच्याप्रमाणेंच १७ व्या शतकांतील काशींतील पंडितांचेंहि मत होतें. बर्नियर नांवाच्या एका विदेशी प्रवाशानें इ. स. १६६० च्या सुमारास काशींतील विद्वानांशीं या बाबतींत चर्चा केली होती. त्यास त्यांनीं प्रांजळपणें सांगितलें,— "आमचा हिंदुधर्म हा सर्व देशांतील लोकांकरितां आहे असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. परमेश्वरानें तो फक्त आमच्याकरितांच केला आहे; म्हणून आम्ही परधर्मीयांना हिंदु करून घेत नाहीं." ही विचारसरणी आपल्या संस्कृतीस कितपत धरून आहे याचें थोडेसें विवरण करण्याचें या लेखांत योजिलें आहे.

वैदिक आर्य हे राजकीय दृष्ट्याच नव्हे तर धर्मदृष्ट्याहि विजिगीषु वृत्तीचे होते. '**कृण्वन्तो विश्वमार्यम्**' या मंत्रावरून सर्व विश्वास आर्यमय करणें हें आपलें कर्तव्य होय असें त्यांचें मत होतें असें स्पष्टपणें दिसून येईल. ते त्याप्रमाणें चालतहि होते. प्रथम प्रथम वैदिक आर्यांनीं अनार्यांचा निःपात करण्याचाच उपक्रम सुरू केला होता; पण पुढें त्यांनीं त्यांना आपल्या धर्माची दीक्षा देण्यासहि सुरुवात केली. पूर्व पंजाब, दिल्ली व उत्तर संयुक्तप्रान्त या मुलुखांत अनार्य लोक बहुसंख्य होते; त्यांच्या कांहीं देवता व धार्मिक आचार यांना आपल्या धर्मांत स्थान देऊन आर्यांनीं त्यांना आपल्या वैदिक धर्माची पुरी दीक्षा दिली. आर्य व अनार्य यांच्यामध्यें बेटीव्यवहारहि रूढ झाले, हें हिडिंबा, उडुपी वगैरे स्त्रियांशीं भीम, अर्जुन इत्यादिकांनीं जीं लग्नें केलीं त्यावरून दिसून येईल.

'**कृण्वन्तो विश्वमार्यम्**' ही प्रवृत्ति अनेक शतकें अव्याहत रीतीनें आर्यसमाजांत रूढ राहिली. हळू हळू सबंध हिंदुस्थान हिंदुमय बनविण्यांत आलें. पुढें इ. स. पूर्व चौथ्या शतकामध्यें अलेग्झँडरनें हिंदुस्थानावर स्वारी केली, व पुढें कांहीं दशकांनीं पंजाबमध्यें अनेक ग्रीक राज्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापन झालीं व अनेक ग्रीक लोक वसाहत करून राहिले. प्रथम प्रथम हे ग्रीक लोक आपला धर्मच पाळीत होते, पण पुढें लवकरच 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' या तत्त्वाचा प्रयोग त्यांच्यावर करण्यांत येऊं लागला. त्यांच्यापैकीं मिनॅंडर, हर्मियस्सारखे कांहीं राजे बौद्ध बनले. बौद्ध धर्मानुयायी ग्रीक लोकांपैकीं कांहींनीं कार्ले वगैरे ठिकाणीं बौद्ध भिक्षूंना राहण्याकरितां गुहा बांधल्या. बौद्धधर्मीयांप्रमाणें हिंदुहि ग्रीक लोकांना आपल्या धर्मांत घेण्याची खटपट करीत होते, व त्यांच्या खटपटीस यशहि येत होतें. विशेषतः भागवत धर्माचीं तत्त्वें ग्रीक लोकांना फार आवडलीं, व त्यांपैकीं अनेकांनीं त्या मार्गाचा स्वीकारहि केला. इ. स. पू. १५० च्या सुमारास तक्षशिलेस अँटिअलकाइडस् नांवाचा एक ग्रीक राजा राज्य करीत होता. त्याचा एक हेलिओडोरस् नांवाचा वकील माळव्यामध्यें विदिशा नगरांत शुंगराज दरबारांत होता. त्यानें वैष्णव धर्म स्वीकारून एक विष्णूचें देवालय विदिशेला बांधलें होतें. त्या देवालयाच्या समोरील गरुडध्वज सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी उपलब्ध झाला आहे. त्यावरील लेखामध्यें हेलिओडोरसनें आपणास 'परमभागवत' हें विशेषण लावून घेतलेलें दिसून येतें. हिंदुस्थानांत ग्रीक अंमलाच्या वेळेस सुमारें ५०,००० तरी ग्रीक येथें वसती करून राहिले होते. ते सर्व थोडयाच दशकांत पूर्ण हिंदु बनून हिंदुसमाजांत एकरूप होऊन गेले असें इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें.

इ. स. पू. ५० ते इ. स. ३५० पर्यंत उत्तर हिंदुस्थानांत, शक, कुशाण वगैरे परधर्मीयांच्या स्वाऱ्या होऊन त्यांचा अंमल सुरू झाला होता. हे परधर्मीय राज्यकर्तेहि थोडयाच अवधींत हिंदु बनून गेले. इ. स. च्या प्रारंभीं मथुरेस षोडास नांवाचा शकराजा होता, त्याचा उपाध्याय एक ब्राह्मण होता. विमकडफायसेस नांवाचा कुशाण बादशाह सुमारें इ. स. ५०-७५ पर्यंत उत्तर हिंदुस्थानांत राज्य करीत होता. त्याच्या नाण्यावर त्यास परममाहेश्वर असें विशेषण दिलेलें असून शिवमूर्तिहि कोरलेली आढळते. प्रख्यात कनिष्क बादशाह बौद्धधर्मी होता. गुजरात–काठेवाडमध्यें जें शक घराणें ३०० वर्षें राज्य करीत होतें, तें तिसऱ्या पिढीपासून हिंदु बनलें व संस्कृतविद्येस मनापासून उत्तेजन देऊं लागलें. या सुमारास हिंदु व बौद्ध लोकांनीं जावा, सुमात्रा, बोर्निओ या ठिकाणीं धर्मोपदेशक पाठवून आपल्या धर्माचा प्रसार केला. बोर्निओ बेटांतील हिंदु राजांनीं केलेल्या यज्ञांतील शिलालेखयुक्त स्तूप सांपडले आहेत. फाहिएन हा इ. स. ४१५ चे सुमारास जेव्हां जावा बेटांत थांबला होता, तेव्हां तेथें त्यास हिंदुधर्म रूढ असलेला आढळला. या प्रदेशांत इ. स. १३०० पर्यंत हिंदु व बौद्ध धर्मच प्रचारांत होते. पांचव्या सहाव्या शतकांत हिंदुस्थानांत हूणांच्या स्वाऱ्या झाल्या, व बरेच हूण लोक येथें येऊन राहिले. एक मत असें आहे कीं, हल्लींचे राजपूत हे या हूणांचेच वंशज आहेत. तें जरी खरें नसलें तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, हे सर्व हूण लवकरच हिंदु बनवण्यांत आले. चेदि, चंदेल वगैरे प्रख्यात राजपूत राजघराणीं हूण कन्यांशीं लग्न करीत, असें शिलालेखांवरून दिसून येतें. प्रख्यात हूण राजा मिहिरकुल हा कट्टा शैव होता, व त्याच्या नाण्यावर त्रिशूल व नंदी हे आढळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परकीयांना हिंदु बनविण्याची ही प्रथा मुसलमानांच्या स्वाऱ्या आठव्या शतकांत सुरू झाल्या त्या वेळींहि सुरू होती, पण मुसलमानी समाजास हिंदुसमाज आत्मसात् करूं शकला नाहीं. शक, कुशाण, हूण वगैरे लोकांचा स्वतःचा असा विशिष्ट धर्म नव्हता. पण मुसलमानी लोकांची गोष्ट निराळी होती. अल्ला, महमद व कुराण यांवर त्यांची अढळ निष्ठा होती, व महमदाशिवाय इतर कोणासहि ते धर्मोपदेशक किंवा प्रेषित मानण्यास तयार नव्हते. मूर्तिपूजेचा त्यांना अत्यंत तिटकारा होता व मांसभक्षणामध्यें त्यांना कांहींच दोष दिसत नव्हता. उलटपक्षीं हिंदु हे या वेळीं शाकाहारी बनले होते व गोभक्षक लोकांची एक नवी हिंदु जात मानणें त्यांना शक्य नव्हतें. मूर्तिभंजक व मूर्तिपूजक यांचा समेट होणें शक्य होईना. वरील कारणामुळें हिंदु समाजास मुसलमानी समाजास शक, यवन, हूण इत्यादि समाजाप्रमाणें आत्मसात् करता आलें नाहीं.

मुसलमानी समाजास आत्मसात् करून स्वतःचें बळ वाढवणें जरी हिंदुसमाजास शक्य झालें नाहीं, तरी मुसलमानांच्या भ्रष्टीकरणाच्या चळवळीनें आपलें बल कमी न होऊं देण्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे असें विचारवंत हिंदुसमाजधुरीणांचें मत आठव्या शतकांत होतें. सिंधमध्यें आठव्या शतकांत स्वाऱ्या होऊन जेव्हां अनेक लोक लांचलुचपतीनें अगर बळजबरीनें बाटवण्यांत येऊं लागले, तेव्हां त्यांना शुद्ध करून घेण्याची स्वाभाविक चळवळहि त्या प्रांतांत सुरू झाली. गोमांतकांतील शुद्धीकरणाच्या चळवळीचें नेतृत्व जसें एका तपस्व्याकडे होतें, तसें या चळवळीचा पुढाकारहि एका ऋषीकडे होता. त्यांचें नांव देवल ऋषि. समाजास आपली चळवळ चांगली कळावी म्हणून त्यांनीं आपलीं तत्त्वें एका स्मृतींत ग्रथित केलीं. ती स्मृति अद्याप ‘ देवल स्मृति ’ या नांवानें उपलब्ध आहे. सदरहु स्मृतीमध्यें म्लेच्छांपासून गर्भ राहिलेल्या स्त्रियांना देखील शुद्ध करून घेतां येतें असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे.

योषा गर्भं विधत्ते या म्लेच्छात्कामादकामतः।
ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रावर्णेतराच या ॥ ४८ ॥
अभक्ष्यभक्षणं कुर्यात्तस्याः शुद्धिः कथं भवेत्।
कृच्छ्रंसांतपनं शुद्धिः घृतैर्योनेश्च पाचनम् ॥ ४९ ॥

देवलस्मृत्तींत वीस वर्षांपेक्षां जास्त काल यवन बनलेल्यास शुद्ध करून घेतां येत नाहीं, असें विधान आहे. पण त्यास कारण म्हणजे त्या स्मृतीचा काल असावा. ती स्मृति आठव्या शतकाच्या प्रारंभीं लिहिली गेली होती, व त्या वेळीं भ्रष्टीकरणाची चळवळ फार वेळ चालेल असें लोकांना वाटलें नसावें. अग्निपुराणामध्येंहि बाटवलेल्या लोकांना शुद्ध करून घेण्याची मोकळीक दिलेली आहे. तेथें कालमर्यादा घातलेली नाहीं हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

म्लेच्छैर्गतानां चोरैर्वा कान्तारे वा प्रवासिनाम्।
भक्ष्याभक्ष्यविशुद्ध्यर्थं तेषां वक्ष्यामि निष्कृतिम् ॥
पुनः प्राप्यस्वदेशं च वर्णानामनुपूर्वशः।
कृच्छ्रस्यान्ते ब्राह्मणस्तु पुनः संस्कारमर्हति ॥ अध्याय १७०, ३०–३१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवलादि समाजधुरीणांचीं मतें समाजास मान्य होतीं, व त्याप्रमाणें लोक वागत, मुसलमानी इतिहासकारांच्या विधानांवरून दिसून येतें. आठव्या शतकाच्या अखेरीस मधील एकंदर स्थितीचें वर्णन करितांना अल् बिलादुरी म्हणतो कीं, त्या वेळीं मुसल सत्तेस उतरती कळा लागली होती, व बहुतेक सर्व बाटलेले लोक परत मूर्तिपूजक बन होते. (ईलियट व डौसन, भाग १, पृ. १२६) या विधानावरून देवलस्मृतींतील समाज आचरणांत आणीत होता असें दिसून येईल. अल् उत्बीनें ११ व्या शतकांतील शुद्धिकरणाचें उदाहरण दिलें आहे. गझनीच्या महमदानें जयपालाच्या एका नातवास बा त्यास एका शहराचें गव्हर्नर नेमलें होतें. पुढें त्यास पश्चात्ताप झाला व त्यानें पुन्हा हिंदु बन करितां खटपट सुरू केली. हें जेव्हां महमुदास समजलें तेव्हां त्यानें त्याजवर झंजावाताप्र हल्ला केला, व त्यास त्याच्या जागेवरून हाकलून लावलें (ईलियट् व डौसन, भाग पृ. ३२–३).

पण या वेळीं ब्राह्मणसमाजांत कूपमंडूकवृत्ति वाढत चालली होती, व बाटलेल्या लोक परत हिंदु करूं नये असें मत प्रभावी ठरूं लागलें होतें. अल्बेरुनीनें या बाबतींत बरीच चौक केली होती. कांहीं हिंदु लोकांनीं त्यास सांगितलें कीं, थोडें प्रायश्चित्त देऊन अशा लोकांना स्वधर्मांत घेण्यांत येतें. पण ब्राह्मण लोकांनीं असें करण्यांत येत नाहीं असें त्यास सांगित **अल्बेरुनीस** ब्राह्मण लोकांचें म्हणणें खरें वाटलें. ' जर शूद्राचें घरीं थोडे दिवस जेवलें ब्राह्मणाचें ब्राह्मण्य कायमचें नष्ट होतें; तर मग म्लेच्छान्न भक्षण केल्यावर तें कसें शिल्लक राही असें तो विचारतो.

वरील वृत्तांतावरून असें दिसून येईल कीं, ११ व्या शतकांत ब्राह्मण हे हळू शुद्धीकरणाच्या विरुद्ध होत चालले होते, पण बहुजनसमाजास ती चळवळ अद्याप सामान्य संमत होती. पण जातिभेदाचीं बंधनें हळू हळू जास्त दृढ होत चाललीं होतीं व त्या शुद्धीकृतांच्या जातीचा प्रश्न बिकट होत चालला होता. त्यामुळें इ. स. ११०० ते १८ पर्यंतच्या काळांत कांहीं प्रांतांत शुद्धिकरण होत असे व कांहीं प्रांतांत होत नसे. राजपुतान्या जेरिया राजपुत मुसलमान झाले होते, व पुढें त्यांना परत हिंदु बनण्याची तीव्र इच्छा झा पण त्यांना इतर राजपुतांनीं शुद्ध करून घेण्याचें नाकारलें असें टॉडच्या ग्रंथावरून दिसून (भाग १, पृ. ५०७) टिपूनें अनेक हिंदु लोकांना गोमांस बळजबरीनें खावयास ल बाटविलें होतें. त्यांच्या मनांत परत हिंदु बनावें असें फार होतें, पण समाजानें त्यांचें ऐ नाहीं. अखेर त्यांनीं आपली स्वतःची एक नवी जात बनवून पृथक राहण्याचें ठरविलें (इंपीरि गॅझेटियर, भाग ९, पृ. २३).

पण शुद्धिकरणाचें तत्त्व या कालांत अंमलांत आणलेल्याचेंहि अनेक दाखले आढळता १७ व्या शतकांत बंगालमध्यें बाटलेल्या ब्राह्मणांनादेखील परत घेत असत; ' ब्राह्मण्या तेज कशानेंच लुप्त होऊं शकत नाहीं ' असें गौडीय ब्राह्मणांचें निश्चित मत होतें (J. S. B., १९३५, पृ. १९४). शिवाजीमहाराजांनीं निंबाळकर घराण्यांतील एक मुसल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बनलेल्या सरदारास शुद्ध करून त्यास आपली मुलगीहि देऊन टाकली होती हें सर्वश्रुतच आहे. गोव्याकडे पोर्तुगीझ अधिकाऱ्यांनीं जेव्हां न बाटणाऱ्या हिंदूंची कत्तल करण्यास सुरुवात केली, तेव्हां बदला घेण्याकरितां शिवाजीमहाराजांनीं चार पाद्री लोकांना पकडलें, व हिंदु बनण्याचें त्यांनीं नाकारल्यावर त्यांचा शिरच्छेद करविला (पत्रसारसंग्रह नं. ११८६) तेव्हां शिवाजीमहाराजांचें धर्मकारण हें त्यांच्या राजकारणाप्रमाणें चढाऊ वृत्तीचें होतें हें दिसून येईल. १२–१३ वर्षें मुसलमान बनलेल्या नेताजी पालकरासहि तो दक्षिणेंत परत आल्यावर त्यांनीं परत हिंदु करून घेतलें. शिवाजीमहाराजांचें अनुकरण तंजावर येथील त्यांचे वंशज १८ व्या शतकांत करीत असत असें मनुची वगैरे प्रवाशांच्या वृत्तांतावरून दिसतें. ज्या वेळीं जेसुट लोकांच्या कारस्थानांनीं शेकडो लोक तंजावरमध्यें बाटवण्यांत येऊं लागले त्या वेळीं अखेर तेथील मराठा राजांनीं शुद्धिकरणाच्या चळवळीस राजदंडाची मदत दिली. बाटलेले लोक जर परत हिंदु झाले नाहींत तर त्यांची मिळकत जप्त करून त्यांना वर निराळा दंड करण्याचा हुकूम तंजावरच्या राजांनीं काढला होता, व त्यामुळें बहुतेक सर्व जण परत हिंदु बनले (मनुची भाग ३, पृ. ३२८). अठराव्या शतकांत पैठण हें सनातन ब्राह्मणांचें आगर होतें, पण तेथील ब्राह्मणहि शुद्धिकरणाच्या उलट नव्हते. नरहर नराळेकर नांवाचा एक ब्राह्मण पानिपतच्या लढाईवर गेला होता. तेथें तो मुसलमानांच्या तावडींत सांपडून अखेर बाटविला गेला. पुढें तो ११ वर्षांनीं १७७२ सालीं कैदेंतून सुटून पैठणला परत आला. तेव्हां पैठणच्या ब्रह्मसभेनें त्यास प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतलें. पण नरहर नराळेकराचे कांहीं हितशत्रू होते, त्यांनीं या शुद्धिकरणाविरुद्ध पुण्याला पेशव्यांकडे तक्रार केली. पुण्याच्या पंडितांनीं पैठणच्या ब्रह्मसभेचा निकाल फिरविला. १०-१२ वर्षें यवनमय झालेल्यास शुद्ध करून घेतां येत नाहीं, तेव्हां नराळेकरास हिंदु करूं नये असा हुकूम पुण्याहून पैठणला गेला, व नरहर नराळेकर पुन्हा मुसलमान झाला ! (पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ३८९-९०) पुण्याच्या पंडितांचें मत २-४ वर्षांच्या आंत शुद्धि व्हावयास पाहिजे असें असावें असें दिसतें.

वरील उदाहरणावरून असें दिसून येईल कीं, १८ व्या शतकापर्यंत धर्मभ्रष्टांचें शुद्धिकरण मधून मधून होत असे, व त्या कृत्यास हिंदु राजसत्तेचाहि पाठिंबा मिळत असे. ब्राह्मणांपैकीं सुद्धां कांहीं लोक बारा वर्षें यवनमय झालेल्यास सुद्धां परत शुद्ध करून घ्यावें अशा मताचे होते. बंगाली ब्राह्मण तर ब्राह्मण्य हें कशानेंच नष्ट होत नाहीं असें प्रतिपादीत. पण एकंदरींत अग्निपुराण, देवलस्मृति इत्यादि ग्रंथांमध्यें प्रणीत केलेली शुद्धिकरणाची पद्धत मागें पडत चालली होती. राजसत्ता मुसलमानी असल्यामुळें स्वाभाविकच ती शुद्धिकरणास विरुद्ध होती. शिवाजीसारखे कांहीं दूरदर्शी हिंदु राजे शुद्धिकरणाचे पुरस्कर्ते होते, पण ते अल्पसंख्यच होते. दुसरी अडचण म्हणजे जातिभेदाची होती. या कालांत हिंदु समाज अनेक जमातींत विभागिला गेला होता, व प्रत्येक जमातीस असें वाटे कीं शिवाशिव, खाणेंपिणें, बेटीव्यवहार इत्यादि बाबतींत आपण जितका अधिक आकुंचितपणा दाखवूं, तितकें अधिक आपलें श्रेष्ठत्व मानलें जाईल. या वृत्तीमुळें स्वाभाविकच धर्मभ्रष्टांच्या शुद्धिकरणास बहुजनसमाज उलट होऊं लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याच वृत्तीमुळें राजपुतामधील जेरिया, मालकाना वगैरे जमातीस इच्छा असूनहि परत होतां आलें नाहीं. टिपूनें बाटवलेल्यांनाहि नवी जात करून राहावें लागलें.

हिंदु-करणाच्या व शुद्धिकरणाच्या वरील इतिहासावरून असें दिसून येईल कीं, शु करणाची हल्ली सुरू झालेली चळवळ आपल्या संस्कृतीस धरूनच आहे. त्यामध्यें शास्त्रवि कांहींच नाहीं. ती फक्त अशास्त्रप्रणीत, रूढिसिद्ध व कूपमंडूक वृत्तीच्या उलट आहे. 'कृण्व विश्वमार्यम्' हें आपल्या धर्माचें ब्रीद वैदिक कालापासून तें सुमारें इ. स. ८०० पर्यंत हे व शुद्धिकरणाची चळवळ ही त्यास अनुसरूनच आहे. अल्बेरुनीला जेव्हां काहीं ब्राह्मण शु करणाच्या उलट आहेत असें कळलें, तेव्हां त्यास अचंबा वाटला. तो म्हणतो, "भ्रष्ट झाले गोष्ट पवित्र करावी ही स्वाभाविक मानवी प्रवृत्ति आहे. आपल्या हातास अगर पायास घ लागली तर आपण ती लगेच धुऊन टाकीत नाहीं काय? पण हिंदु लोक हे फार विचि आहेत. परधर्मीयांस जरी मनापासून त्यांच्या धर्माचा स्वीकार करावासा वाटला तरी ते त्य आपल्या धर्मांत घेत नाहींत." तेव्हां बळजबरीनें अगर लांचलुचपतीनें जे लोक फसून परधर्मा गेले असतील, त्यास जर खरोखर पश्चात्ताप होत असेल, तर त्यांना परत आपल्या धर्मांत घे किंवा ज्या परधर्मीयांना आपला धर्म मनापासून आवडत असेल, त्यांना त्यांत प्रवेश करण्य परवानगी देणें हें आपल्या संस्कृतीस एकंदरींत अनुकूलच आहे असा निष्कर्ष वरील विवेचन वरून निघतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठेशाहींतील फौजा

[लेखक—जनरल नानासाहेब शिंदे, बडोदें]

" ज्या देशास संस्मरणीय भूतकाळ नाहीं, त्याला स्पृहणीय भविष्यकाळहि नाहीं. "

कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करतांना प्रथमतः त्या राष्ट्रांतील लष्करी सामर्थ्याकडे व लष्करी पराक्रमाकडे लक्ष जावें हें साहजिकच आहे. कारण राज्यें मिळविण्याच्या किंवा राखण्याच्या कामीं जीं साधनें उपयोगीं पडतात त्यांत लष्करी सामर्थ्याचा दर्जा निःसंशय पहिला असतो. **नाना फडणविसाची** तरवार केवळ मनसुब्याची होती हें खरें, तरी पण प्रत्यक्ष खऱ्याखुऱ्या तरवारीशीं तिची गांठ पडली, तेव्हां तिला नमावेंच लागलें. **श्रीशिवाजीमहाराज** हे मुत्सद्दी होते, पण ते तरवारबहाद्दर नसते तर स्वराज्यसंस्थापनेस त्यांची निव्वळ मुत्सद्देगिरी कितपत उपयोगी पडली असती हें सांगणें फार कठिण आहे.

या लेखांत फक्त मराठेशाहीमध्यें म्हणजे श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांपासून पेशवाई-अखेरपर्यंत फौजेची रचना, व्यवस्था, शिक्षण वगैरे कोणत्या प्रकारचें होतें याबद्दलची माहिती देण्याचा प्रयत्न मी करणार आहें. यासाठीं श्रीशिवाजीमहाराजांच्या वेळीं लष्कराची व्यवस्था कशी होती याजबद्दल आपण प्रथम विचार करूं. घोडदळांत **बारगीर व शिलेदार** असे दोन प्रकार होते. बारगिरांच्या घोडदळास पागा असें म्हणत. या पागेंतील सगळीं घोडीं सरकारचीं असून त्यांचा खर्चहि सरकारांतून केला जात असे. शिलेदारांच्या घोडदळांतील घोडीं प्रत्येक शिलेदारानें आपापलीं आणावीं व त्यांची जोपासना ज्याची त्यानें करावी असा निर्बंध असे. याबद्दल त्यांस घोड्याचा खर्च व शिवाय पगार सरकारांतून रोख मिळत असे. हें शिलेदारांचें घोडदळ ठेवण्याची पद्धत यवन पादशाहींतील होती. ती महाराजांस फारशी आवडत नसे. कारण अशीं घोडीं राहावींत तशीं हुशार राहात नसत, व कोणी शिलेदार चाकरीस कंटाळला असतां तो आपल्या घोड्यासह निघून जाण्याचा संभव असे. यासाठीं या शिलेदारांची संख्या कमी करण्याचें महाराजांचें धोरण नेहमीं असे. अशी शिलेदारी करून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या त्या काळीं पुष्कळ असल्याकारणानें, महाराजांस त्यांना नोकरीस ठेवणें प्राप्त असे. पावसाळ्यामध्यें घोड्यांस ठेवण्याकरितां पागा बांधलेल्या असत. त्या ठिकाणीं घोड्यांस ठेवून त्यांचा व स्वारांचा खर्च सरकारांतून होत असे. सुगीच्या दिवसांत घोडदळानें आपला खर्च दुष्मनाच्या मुलखांतून भागवावा असें असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायदळांत मुख्य दोन प्रकारचे लोक असत. एक घाटमाथ्यावरचे **मावळे** आणि दु घाटाखालील कोंकणांतील हेटकरी. मावळे तरवारबहाद्दर असत व हेटकरी अचूक मारण्यांत कुशल असत. हे मावळे व हेटकरी सर्वदा डोंगराळ प्रदेशांत राहणारे असल अवघड डोंगरावर व कड्यावर चढण्यांत अत्यंत तरबेज असत. असे चपळ लोक कोणत्याहि प्रांतांत त्या वेळीं नव्हते. पायदळांतील कांहीं शिपायांच्या हातीं तीरकमठे, पट्टे, बरच्या व साङ्ग असत, व कांहीं खास बारदार असत. पायदळास लागणाऱ्या बंदुका दारूगोळा श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांस पोर्तुगीज लोकांकडून घ्यावा लागत असे. याप्रम जो ज्या शस्त्राच्या कारवाईत कुशल असे त्यानें तें शस्त्र वापरावें असा नियम असे. पायदळास रोख पगार देण्यांत येत असे.

महाराजांच्या ताब्यांत २८० किल्ले होते. या किल्ल्यांचें महत्त्व महाराजांस फार वा कारण काबीज केलेल्या प्रांताचें रक्षण यथास्थित व्हावयास या किल्ल्यांची आवश्यक त्या धामधुमीच्या काळांत अतिशयच होती. हे किल्ले स्वराज्याचे केवळ जीवप्राण आहेत अ महाराजांस वाटत असे. म्हणून या किल्ल्यांची व्यवस्था त्यांनीं फार चौकसपणानें लावून दि होती. किल्ल्यावरील लोकांस अडीश्री, नगदी वगैरे वेतन वेळच्या वेळीं देण्यांत येत असे.

महाराजांच्या अंतसमयीं खास ८०,००० स्वार होते व शिलेदार पागेंत २५,०० होते. एकूण १,०५,००० घोडदळ होतें. याशिवाय मावळे व हेटकरी यांचें पायदळ सैन्य एकंदर सुमारें एक लक्ष होतें.

नेपोलियन बोनापार्टप्रमाणें शिवाजीमहाराजांवर त्यांच्या फौजेची मोठी भक्ति व प्रेम होतें. त्याच्यायोगें वाटेल त्या संकटांत उडी घालण्यास महाराजांची फौज नेहमीं तयार असे. बहादुरीबद्दल बक्षिसें देण्यांत महाराज जसे उदार होते, तसेच लष्करी कडक शिस्तीचेहि ते फार भोक्ते होते. स्वारीस जाणाऱ्या इसमांपैकीं कोणीहि आपली बायको, बटिक किंवा कलावंतीण बरोबर नेऊं नये, व त्याचप्रमाणें स्वारीबरोबर कलाल नसावेत, अशी सक्त ताकीद असे. हा नियम मोडणारास देहान्त शासन देण्यांत येत असे. सिंहगड काबीज केला तेव्हां प्रत्येक शिपायास त्यांनीं चांदीचें कडें बक्षीस दिलें होतें. कडक शिस्तीमुळें व त्यांच्यावरील भक्तीमुळेंच बाजी प्रभु यानें मरेपर्यंत रांगण्याची घोडखिंड अडवून धरली होती. अफझलखानाच्या कुटुंबास पळून जाण्यास खंडोजी काकडे यानें मदत केली, म्हणून महाराजांनीं त्यास फांशीं दिलें. जंजिऱ्याचा किल्ला घेतांना शामराज पंताचा पराभव झाला म्हणून महाराजांनीं त्याची पेशवाई काढून घेतली. हे सर्व नोकर पगारी होते, म्हणून महाराजांस अशी शिस्त ठेवतां येत होती.

भाला, बोथाटी, तरवार व बंदूक हीं चालविण्यास शिकविण्याच्या शाळा त्या वेळीं नव्हत्या. या सर्व गोष्टी संवयीनें करावयास येतात तशा त्या मराठी सैनिकांनाहि येत असत. तथापि शिक्षणाच्या लष्करी शाळा व शिस्तीची कवाइत नसल्यामुळें मराठ्यांच्या लष्करी गुणाच्या उपयुक्ततेंत उणेपणा होता तो त्यांना पुढें पुढें जाणवूं लागला. लष्करी भरतींत माणसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व घोडीं यांची वाण मात्र मराठ्यांस कधींच पडली नाहीं. सुगीच्या दिवसांत कुरणांत घोडीं सोडून द्यावयाचीं व जातिवंत मादवाना बाळगून घोड्यांच्या पागा तयार करावयाच्या हें शिलेदार लोकांचें काम असे. हा एक त्या काळचा प्रतिष्ठित धंदा असून वैभवास चढण्याचा मार्ग होता. सर्वत्र घोड्यांचा खेळ असल्यामुळें गरिबापासून श्रीमंतापर्यंत उमदीं घोडीं पदरीं बाळगण्याचा सर्वांनाच एक प्रकारचा षोक असे. दारांत घोडें नाहीं असें घर नाहीं, घोड्यावर बसतां येत नाहीं असा घरांत मनुष्य नाहीं, अशी महाराष्ट्राची स्थिति एक वेळ होती. कृष्णा, भीमा व गोदावरी या नद्यांच्या कांठचीं तट्टें खंबीर असून तीं भारी मजला मारीत. या भीमथडीच्या घोड्यांसच मराठ्यांनीं दिग्विजय करून सिंधूनदाचें पाणी पाजलें. गनिमी काव्याच्या लढाईंत या चपळ व भारी मजला मारणाऱ्या घोड्यांचा मराठ्यांस फार उपयोग होत असे हें सांगण्याची जरूर नाहीं.

सरंजामी पद्धत

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं फौजेस रोख पगार देण्याची जी पद्धत सुरू केली होती ती पुढें शाहूमहाराजांचे वेळीं पेशव्यानें बदलली. फौजेस रोख पगार देण्याचे ऐवजीं नवीन जिंकलेल्या मुलखामध्यें जहागिरी देण्याची पद्धत पेशव्यानें सुरू केली. या पद्धतीस सरंजामी पद्धत असें म्हणतात. मराठ्यांची आपल्या वतनावर म्हणजे जमिनीच्या तुकड्यावर अतोनात आसक्ति असते. या आसक्तीची परक्या लोकांस कल्पना होणें शक्य नाहीं. मराठे लोक दुसऱ्या वाटेल त्या गोष्टीचा त्याग करतील; परंतु वडिलोपार्जित मालकीच्या जमिनीचा त्याग ते प्राण गेला तरी करणार नाहींत. या स्वभावगुणाचा फायदा घेऊन औरंगजेब लोकांस भराभर नवीन वतनें देऊं लागला, तेव्हां राजाराममहाराजांस व त्यांच्या कारभाऱ्यांसहि तोच मार्ग स्वीकारावा लागला. नाहीं तर बादशहाशीं लढण्यास कोणीच पुढें आला नसता. मुख्य अडचण म्हणजे त्या वेळीं फौज पाहिजे होती. पुरेशी फौज कशी निर्माण करावी हा मोठा प्रश्न होता. औरंगजेबासारख्या बलाढ्य बादशहाशीं टक्कर देण्याचा तो वखत होता. श्रीछत्रपति संभाजीमहाराजांचा वध होऊन राजाराममहाराज जिंजीच्या किल्ल्यांत अडकून पडले होते. युरोपांत हल्लीं कायद्यानें व शिस्तीनें जशा फौजा निर्माण करतां येतात, तसा प्रकार त्या वेळीं नव्हता. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं रोख पगार देण्याची पद्धत घातली होती ती बंद पडली. कारण फौजेस पगार देण्यास पैसा नव्हता. म्हणून वतनाची लालूच दाखविल्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. हा जो प्रघात एकदा पडला तो पुढें नाहींसा करतां आला नाहीं. आपणांत कोणीहि राजा नसतां व जवळ तिजोरींत पैसा नसतां, औरंगजेब बादशहाबरोबर मराठ्यांनीं महाराष्ट्रांत जें हें २१ वर्षें स्वातंत्र्यप्रीत्यर्थ युद्ध चालू ठेविलें होतें, त्या कामीं त्यांस जहागिरीचा व वतनाचा अवलंब करणें भाग पडलें. पेशव्यांनासुद्धां वतनदारीची पद्धत चालवावी लागली. प्रत्येक वतनदारानें अमूक एक फौज घेऊन लढायला यावें असा करार असे. मात्र या व्यवस्थेंत एक मोठा दोष असा होता कीं, पावसाळ्यांत सर्व लोक आपली शेतीभाती पाहाण्यासाठीं घरीं जात आणि त्या वेळीं सरकारजवळ लढण्यास फौज राहात नसे. एखादी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोहीम चालू असतां पावसाळा सुरू झाल्याबरोबर ती मोहीम तशीच टाकून लोक घरोघर नि गेल्यानें राज्याचें कार्य बिघडलें, असे अनेक प्रसंग पुढें मराठेशाहींत आले. वतनाचं आसक्ति मराठे लोकांच्या मनांत किती होती हें यावरून दिसतें. महादजी शिंद्यास दिल्ली बादशहाचा वजीर अगर 'अलिजा बहादूर' म्हणवून घेण्यापेक्षां जांब गांवचे 'पाटी म्हणवून घेण्यांत प्रौढी वाटत असे.

बाळाजी विश्वनाथ पेशवा दिल्लीहून चौथाईच्या सनदा घेऊन आल्यावर वसुलाची लष्कराची पुढील तरतूद करण्यासाठीं त्यानें संरजामी पद्धत ठरवून दिली. निरनिराळ्या सरदार मुलुखगिरीसाठीं प्रदेश तोडून दिले. सरदारानें आपल्या मुलखांत वसूल गोळा कराव न्यायनिवाडा करावा व त्याचा बंदोबस्त ठेवावा. सरदारांना जहागिरी देतांना बाळाजी पुढीलप्रमाणें अटी घातल्या होत्या—

१ सरदारांनीं आपआपल्या मुलखांत मुलकी व लष्करी अंमल चालवावा.

२ छत्रपति व त्यांचे मुख्य प्रधान यांच्या हुकमाशिवाय कोणत्याहि सरदार परराष्ट्रांशीं लढाई किंवा तह करूं नये.

३ ठरविलेली खंडणी सरकारांत भरावी.

४ जहागिरीच्या उत्पन्नाचे हिशेब सरकारचे अंमलदार तपासतील, त्यांस तपासूं द्यावे

या अटी सरदारांनीं मोठ्या खुषीनें पतकरल्या. जहागिरी मिळाल्याबद्दल सर्वांस मोठ आनंद झाला व जवळच्या मोगलांचा प्रांत काबीज करून आपली जहागिर वाढविण्याचा जे तो सरदार प्रयत्न करूं लागला. यामुळें पुढें मराठ्यांचें राज्य झपाट्यानें वाढलें.

संरजामी पद्धतींतील वैगुण्य

या संरजामी कारभारामध्यें मुख्य वैगुण्य असें होतें कीं, उत्पन्नाचा पैसा प्रथम सरकारच्या मुख्य तिजोरींत येऊन पडला पाहिजे, तसें होत नसे. या पद्धतीनें मराठ्यांच्या ठिकठिकाणी जहागिरी उत्पन्न झाल्या. म्हणजे पर्यायानें त्यांचीं लहान लहान स्वतंत्र राज्यें बनलीं. जहागिरीच्या पद्धतींत दुसरें एक व्यंग नेहमींच कायम होतें. मोहिमा कोणीं व कोठें करावयाच्या याचा हुकूम शाहू सोडीत असे, तो हुकूम अंमलांत आणण्याचें काम पेशवे वगैरे सरदारांचें असे आणि प्रत्यक्ष फौजा लहानमोठ्या जहागिरदारांच्या हातांत असत. ही कामाची वाटणी गैरसोयीची असल्यामुळें कोणतीहि मोहीम सुरळीत तडीस जात नसे. मोहिमांवर गेलेले सरदार कंठशोष करून पैसा व फौजा मागत, त्या त्यांस वेळेवर मिळत नसत. खुद्द बाजीराव पेशवा सावकाराच्या कर्जानें नेहमीं त्रासलेला असे. शिंदे, होळकर हे त्याचे विश्वासू सरदार त्यास थोडीबहुत मदत करीत, म्हणून बाजीरावाचें कसें तरी चाले. "सावकारापुढें नाक घासतां घासतां कपाळास घट्टे पडले," "आम्हास कर्जानें बुडविलें, प्राण जाता तरी बरें होतें; विष खाऊन मरावें इतकेंच," "आज दाभाडे, गायकवाड, बांडे कोटि कोटि रुपये खजिने आणि मी तुझे पायाशीं व धन्याचे पायाशीं निष्ठेनें वर्ततों तो अन्नास महाग झालों. आम्ही जोड इतकीच केली कीं, वी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लाख रुपये कर्जदार," अशीं पत्रें बाजीरावानें ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेलीं त्या वेळच्या स्थितीचीं निदर्शक आहेत. रोकड तनखे देण्याऐवजीं जहागिरीची पद्धत ठरविल्यानें हे दोष उत्पन्न झाले. अव्यवस्थित लष्करी पद्धत हें नेहमींच मराठी राज्यांतलें मोठें व्यंग असून त्यामुळें राज्याचें फार मोठें नुकसान झालें. सर्व सरकारी नोकरांस रोख पगार देणें आणि त्यांच्या नोकऱ्या केव्हांहि पिढीजाद न चालविणें, हा श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचा मुख्य नियम होता; परंतु त्यांच्या पश्चात् तो पुढें पाळला गेला नाहीं.

पेशवाईंत फौजेचा पगार नेहमीं बाकी थकलेला असे. मागील देण्याचा निकाल लागल्याशिवाय एकहि स्वार पुन्हा दुसऱ्या मुलुखगिरीवर जाण्यास खुषी नसे. स्वारांनीं पागे व पथकें यांस पैशाकरितां तगादा लावावा, पाग्यांनीं व पथकांनीं मुख्य सरदारांच्या दारांत धरणें देऊन त्यांस उपाशी बसवावें, मुख्य सरदारांनीं कारभाऱ्यांच्या दारांत गयावया करीत जाऊन बसावें असा नित्यक्रम असे.

डेरे दाखल होणें (Mobilization)

मराठी फौजांची चाकरी नेहमीं आठमाही असे. शत्रूच्या मुलखांत छावणी झाल्यास क्वचित् बारमाही चाकरी पडे. उदाहरणार्थ समजूं कीं, कोणा शिलेदारास रु. ३०० तैनात ठरली आहे. बहुधा श्रावणाच्या महिन्यांत त्या शिलेदारास नालबंदी मिळे. ही नालबंदीची रक्कम रु. १२५ असे. भाद्रपद मासांत स्वारीस तयार होण्याविषयीं पत्र जात असे त्या वेळीं खानगी म्हणून आणखी रु. १० देत असत. पुन्हा आश्विनांत दसऱ्याचें कापड ५० आंख अथवा रोख रु. २५ मिळत. मिळून रु. १६० त्यास पोहोंचत असत व रु. १४० सरकारांतून देणें बाकी राहात असे. सरदार 'डेरे दाखल झाला' म्हणजे ती मोहीम सुरू झाल्याची व फौज जमा होण्याची खूण होती. त्या वेळचें हें Mobilization समजलें जात असे. लगेच सरदाराचें पत्र त्या शिलेदारास जात असे कीं, तुम्ही जलदीनें तयार होऊन अमूक मुक्कामीं लष्करांत दाखल व्हावें. याप्रमाणें तो कार्तिक शु॥ १ ला घराहून निघून त्याच दिवशीं लष्करांत हजर होई व त्या दिवसापासून त्याचा रोजमुरा सुरू होत असे. हा रोजमुरा आठवड्याचा रु. ४ असे व वैशाख अखेरपर्यंत तो कर्नाटकांत अगर हिंदुस्थानांत मोहिमेवर राहिला म्हणून त्यास सात महिन्यांत रोजमुरा रु. ११२ मिळत असे. नंतर मोहीम संपल्यावर बाकी रु. २८ पेहराव अगर रोख रुपये त्यास मिळत व रोजमुरा बंद होत असे. याप्रमाणें सरदाराशीं केलेला करार पुरा करून तो घरीं जात असे. पाऊस सुरू होण्यापूर्वीं आपल्या मुलांमाणसांत जाऊन राहावें, आपली शेतीभाती व संसाराचीं इतर कामें पहावीं, घोड्यांस विश्रांति देऊन ते ताजेतवाने करावेत, इकडे शिलेदारांचा फार ओढा असल्यानें छावणीस राहाण्याचें त्यांच्या फार जिवावर येई. त्यास राहावून घ्यावयाचें झाल्यास सरदारांनीं सक्ति करून कांहीं उपयोग होत नसे.

छावणींत फौज ठेवण्याची गोष्ट निघाली कीं, सरंजामी सरदारांच्या पोटांत धस्स होत असे. याचें कारण उघड आहे. समजा कीं, दर स्वारास रु. ३०० प्रमाणें हिशेबानें १००० स्वार बाळगण्याच्या शर्तीवर कोणास रुपये तीन लक्षांचा मुलूख जहागिर मिळाला होता. त्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या सरदारानें १००० स्वारांसह वैशाख अखेरपर्यंत स्वारी चाकरी केली. येथपर्यंत ठीक झाले. पण पुढें त्यास छावणींत राहाण्याचा हुकूम सरकारांतून झाल्यास त्यानें आपल्या फौजेचे रोजमुरे कोठून द्यावेत ? छावणीचा खर्च त्यानें सरंजामाच्या उत्पन्नामधूनच समजून घ्यावयाचा ठराव असल्यामुळें व वर सांगितल्याप्रमाणें वैशाख अखेरपर्यंतच प्रत्येक शिलेदार रु. ३०० खाऊन गेल्यामुळें पुढचे आश्विनपर्यंतचे रोजमुरे सरदारानें पदरचे दिले पाहिजेत. याशिवाय पावसाळ्यात कांहीं आसरा करून घेण्यासाठीं पालपडदा पाहिजे. त्यासाठीं, सणावाराकरितां व भाद्रपद मासीं पक्षाकरितां म्हणून शिलेदारास कांहीं निराळें द्यावेंच लागे. मिळून, दर स्वारास रु. ७५ धरले, तरी एक हजार स्वारांच्या सरदारास निदान पाऊण लाख रुपये छावणीनिमित्त खर्च नाहक पडला. अशा दोन किंवा तीन छावण्या पडल्या म्हणजे सरदारी लिलांवाला निघावयाची ! सरकारच्या सांगण्यावरून त्या सरदारानें ठरावापेक्षां अधिक फौज ठेवली असल्यास तर त्याच्या फजितीस पारावारच नाहीं ! राज्यांत चोहोंकडे शांतता असली तरी देखील फौज छावणीस ठेवणें फार कठिण. मग सर्वत्र बंडाळी सुरू असल्यामुळें, कोठूनच वसूल येईनासा झाल्यावर सरदारांची स्थिति काय होत असेल याची कल्पनाच करणें शक्य नाहीं. मराठे सरदार नेहमीं कर्जबाजारी व फौजेच्या थकलेल्या बाकीकरितां त्यांना तगादे व दारीं सदैव धरणीं चालू असत, त्यांतील खरें इंगीत वरील वाईट पद्धतींत होतें असें कोणीहि कबूल करील.

शिरस्त्याप्रमाणें सरंजामी सरदाराकडून जहागिरीचे, सरंजामाचे हिशेब घेण्याचा योग येई, त्या वेळीं नेहमीं तक्रारी चालत. कारण या सरदारांचें महत्त्वच इतकें वाढलें होतें कीं, त्यांच्या सरंजामाचे हिशेब पेशव्यांनीं आपणाजवळ मागणें हा एक प्रकारचा आपला अपमान किंवा कमीपणाहि वाटूं लागला होता. अर्थात् सरंजामी सरदारांचीं प्रस्थें अशीं माजल्यामुळें दौलतीचें व्यापक धोरण त्यांच्या अनुमतीशिवाय ठरविणें पेशव्यांस अशक्य झालें होतें. **मूळ राजसत्ता छत्रपतींची, सर्वाधिकार पेशव्यांचा, मनसबा फडणविसांचा** व **तरवार सरदारांची** अशी मराठे दौलतीच्या सत्त्वाची चार ठिकाणीं वाटणी झाल्यामुळें एकतंत्री कारभार चालणें अशक्यच झालें होतें. सरदारांनीं लढाई जिंकून शत्रूला तहाला आणावें, फडणविसांनीं मुलकी धोरण पाहून तहाच्या अटी बनवाव्यात, पेशव्यांनीं यावर मखलाशी करावी व साताऱ्याच्या छत्रपतींचें त्यावर शिक्कामोर्तब व्हावें. असा चौतंत्री कारभार चालत असून त्यापैकीं प्रत्येकाला इतर तीन तंत्रें सांभाळावीं लागत; व हीं जोंपर्यंत परस्पर आदरपूर्वक सांभाळलीं जात असत तोंपर्यंतच मराठेशाहींत अंतस्थ जोर जिवंत राहिला. इंग्रज इतिहासकार मराठेशाहीचें वर्णन करतांना 'मराठी राज्य' असें न म्हणतां 'मराठा संघ' असें म्हणत तें बरोबर आहे. हा संघ जोंपर्यंत टिकला, तोंपर्यंत मराठ्यांची सत्ता सर्व हिंदुस्थानभर होती. परंतु तो संघ मोडतांच ती सत्ता नष्ट झाली.

मराठ्यांचा गनिमी कावा

गनिमी काव्याची लढाई म्हणजे काय याबद्दल आपण प्रथम थोडा विचार करूं. गनिमी काव्याच्या लढाईसच "धावपळीची" लढाई असें कित्येक ठिकाणीं म्हटलें आहे. गनिमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काव्याची लढाई करण्यांत मराठ्यांइतके पटाईत लोक हिंदुस्थानांत कोणीहि नव्हते. शत्रूबरोबर तोफा, पायदळ व पुष्कळसे बाजारबुणगे असले म्हणजे त्यांची या गनिमी काव्यानें जी त्रेधा उडून जाई ती पुसूं नये! ते लूटालूट व जाळपोळ करीत शत्रूच्या मुलुखांतून हिंडत तेव्हां त्यांच्यानें त्यांचा पाठलागहि करवत नसे. कारण तो जर फक्त घोडेस्वारांची फौज घेऊन पाठीस लागला तर ते बेशक त्याजवर उलटून पडून त्याचा चुराडा करीत. पायदळ व तोफखान्याचें लटांबर घेऊन तो पाठीस लागेल तर हे तोंपर्यंत शेंपन्नास कोस दूर जात असत. हा गनिमी काव्याचा एक प्रकार झाला. मराठ्यांची फौज शत्रूपेक्षां कमी असली म्हणजे दुष्मनास हेलपाटे घालावयास लावून बेजार करून नंतर त्याच्याशीं गांठ घालावयाचा त्यांचा विचार असला तर ते याप्रमाणें करीत. जर शत्रूपेक्षां दीडपटीनें, दुपटीनें आपली फौज अधिक असली तर त्यांची गनिमी काव्याची निराळीच तऱ्हा होती. ते जेथें शत्रू असेल तेथें जाऊन त्यास घेरीत. त्याच्या लहानसहान टोळ्यांवर झडप घालून त्या मारून टाकीत. मोठीशी चांगली १०-१५ हजारांची टोळी आपली मुख्य फौज सोडून अंगावर चालून आली, म्हणजे आपण भ्यालेंसें दाखवून ते पळूं लागत. आपला जय झालासें समजून शत्रू झपाट्यानें पाठलाग करी. या प्रमाणें त्यास पाठीवर घेऊन बरेच अंतरावर गेल्यावर व त्याची लढाईची व्यवस्था अगदीं मोडली आहे व तो बेसावध झाला आहे असें पाहून एकादी अडचणीची जागा पाहून हे एकदम माघारी उलटून त्याजवर तुटून पडत व त्याचा संहार करीत. ते शत्रूच्या लष्करा-भोंवतीं रात्रंदिवस घिरट्या घालीत. त्याच्या चौक्या मारून तुडवून टाकीत. त्यास अन्नपाणी व वैरण अगदीं पोचूं नयेसा बंदोबस्त करीत. रात्रीं त्याच्या लष्करांत बाणांचा वर्षाव करीत व दिवसा जेजालांचा व बंदुकांचा मारा करीत. अशा स्थितींत तो हैराण होऊन तळ हालवून कूच करूं लागला, म्हणजे हे नेहमीं त्याच्या पिछाडीस बिलगत व त्यास "पायबंद" करीत. यामुळें त्यास मुक्कामच करणें भाग पडे. त्यानें मुक्काम केला म्हणजे अन्नपाणी बाहेरून पोंचण्याचें बंद केल्यामुळें त्यास उपाशी मरण्याची पाळी येऊन, शरण येऊन कशी तरी आपली सुटका करून घेणें त्यास भाग पडे.

मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचे श्रीछत्रपति शिवाजीमहाराज हे आद्य प्रवर्तक होते. सह्याद्रीसारख्या डोंगराळ प्रदेशांत डोंगरी किल्ल्यांच्या आश्रयानें मूठभर मावळे लोकांनिशी गनिमी काव्यानेंच मोगल बादशाहीशीं व विजापूरकराशीं टक्कर देऊन महाराजांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविली. अफझलखानाच्या वधानंतर त्याच्या लष्करांतील पकडलेल्या घोड्यांवर मात्र मावळ्यांस बसवून महाराजांनीं प्रथम आपलें घोडदळ तयार केलें. या घोडदळासहि गनिमी काव्याचें शिक्षण देऊन तयार केलें. या घोडदळाचा मुख्य सेनापति नेताजी पालकर हा होता. शिवाजीमहाराजांच्या धाडशी व बाणेदार सरदारांपैकीं हा एक होता. कोठेंहि संकटाची वेळ आली कीं, तेथें ही स्वारी दत्त असेच. प्रतापराव गुजर हाहि एक घोडेस्वारांचा सेनापति होता. **खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले, संताजी घोरपडे, धनाजी जाधव** वगैरे शूर पुरुष नुकतेच कोठें समरांगणांत येऊं लागले होते. शिवाजी-महाराजांच्या पश्चात् यांची खरी योग्यता दिसून आली. यांपैकीं पहिल्या जोडीनें गनिमी काव्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढून वऱ्हाडांत मराठ्यांची सत्ता कायमपणें स्थापिली. दुसऱ्या जोडीनें औरंगजेबास पादाक्रां करून महाराष्ट्रास स्वतंत्र करण्याकरितां चालविलेल्या युद्धाचा शेवट गोड केला. एक वर्षेपर्यंत मराठ्यांविरुद्ध युद्ध चालविलें ही आपण अनर्थकारक चूक केली अशी औरंग बादशहाची खात्री झाली. त्याचें तीन लाख प्रचंड सैन्य निरुपयोगी झालें. त्याच्या स्वतः तंबूचे सोन्याचे कळसहि मराठ्यांनीं लुटून नेले. खुद्द बादशहाहि पकडला जाण्याच्या अ बेतांत होता. तेव्हां अहमदनगर येथें मरते वेळीं "आपला जन्म फुकट गेला" असे बादशहानें उद्गार काढले, ते निष्कारण नव्हत. मूठभर मराठे लोकांनीं, धाडशी व सरदारांच्या नेतृत्वाखालीं गनिमी काव्यानें लढून मोगल बादशहास कसें हैराण केलें त्याचें उत्तम उदाहरण आहे.

मराठ्यांचा काटकपणा

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर व संभाजीमहाराजांच्या वधानंतर औरंगजेबाबरोबर मरा ठ्यांनीं जें युद्ध चालविलें होतें त्याचें वर्णन ग्रांट डफनें येणेंप्रमाणें केलें आहे–"मराठ्यांचें सामा म्हटलें म्हणजे थोडीशी कांदाभाकरी व एक घोंगडी एवढें काय तें असे. रात्रीं कोठें उतरले तर घोड्यांची लगाम हातांत धरूनच घोंगडी पसरून त्यावर कांहीं वेळ अंग टाकून राहात. त्याप्रमा दिवसा दोनप्रहरीं कांहीं खाण्याकरितां किंवा ऊन टाळण्याकरितां ते उतरले म्हणजे पांच पांच सहा सहा जण एखादें झाडझुड असलें, तर त्याचे छायेखालीं उतरत. परंतु उघडें मैदान असलें, तर ते जमिनींत भाले रोवून त्यांस आपले घोडे बांधून भाल्यांचे टोकावरून एखा घोंगडी आडवी पसरून देत व तिच्या लहानशा छायेंत फक्त डोकीं ठेवून, बाकी सर्व अंगा दुपारचें कडक ऊन लागत असतांहि जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तरवारी मात्र ते कधींहि विसंबत नसत. त्या ते कुशीशीं ठेवीत. त्यांजवळ उंट, बैल, वगैरे कांहीं नसत फक्त लहान, खुर्जी, चपळ, कंटक अशीं तट्टें असत. मिळालेली लूट त्यांवर लादून ती फार जलदीनें लांबवीत. येणेंप्रमाणें मराठ्यांची फौज अगदीं सुटसुटीत असल्यामुळें, मिजासी व कांहीं अंशीं बेकैद अशा बादशहाच्या फौजेस तिचा पाठलाग करणें कठिणच पडे. त्यांतूनहि ती कधीं गाठली जाऊन तिचा पराभव झालाच तर तिचें नुकसान तें काय होणार ? उलट मोगलांचेच हाल होत. बादशहा मारल्यापासून आपला फायदा नाहीं, तो जिवंत राहिल्यानें आमचा लुटीचा धंदा चांगला चालतो असें सर्व मराठे त्या वेळीं म्हणत असत."

शत्रूचे मुलखांत मोहीम करण्याची मराठ्यांची अशी तऱ्हा होती कीं, त्यांच्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या साऱ्या प्रांतभर पसरत आणि लुटालूट व जाळपोळ एकदांच चोहींकडे सुरु करून रहिवाशी लोकांस व शत्रूच्या फौजेस अगदीं भेदरून सोडीत. त्यांची लढण्याची शिस्त अशा तऱ्हेची होती कीं, तिच्या योगानें कसलेहि पराक्रमी व बलाढ्य शत्रू मैदानांत त्यांच्या तावडींत एकदां सापडले म्हणजे बहुधा सुरक्षितपणें सुटत नसत. त्यांच्या गनिमी काव्याच्या लढाईंत पायदळ व तोफखाना यांचा त्यांस कांहीं उपयोग होत नसे. म्हणून मराठे प्रत्येक स्वारींत तो बाळगीत नसत. मराठे टोळी टोळीनें शत्रूवर हल्ला करीत व या हल्ल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"हिरिरी" अशी संज्ञा होती. मराठ्यांची नेहमींची हल्ला करण्याची रीत बहुधा हिरिरीचीच असे. साऱ्या फौजेचा एकदम हल्ला फार क्वचित् होई. याचें कारण असें कीं, असा सर्व फौजेनें हल्ला केला आणि जर कां तो शत्रूनें माघारा फिरविला, तर साऱ्या फौजेचा धीर सुटून ती पळत सुटावयाची. यासाठीं शत्रूस जिंकूं अशी पक्की खात्री असल्याशिवाय सारी फौज शत्रूवर घालण्यास सरदार तयार नसत.

मराठ्यांची लढण्याची पद्धत

मराठा म्हटला म्हणजे त्याला बहुधा रणांगणाचें बाळकडूच पाजलेलें असावयाचें. पेशवाईच्या वेळीं मराठी फौजेमध्यें पायदळापेक्षां घोडदळाचा भरणा अधिक असे. पहिल्यापासून मराठ्यांची पद्धत अशी असे कीं, त्यांचा पायदळापेक्षां घोडेस्वारांतच अधिक उपयोग होई. तळ पाडून, खंदक खणून लढण्याची त्यांची रीत नव्हती. धिमेपणानें लढत बसणें हें त्यांच्या गुरूनें त्यांना कधीं शिकविलें नव्हतें. शत्रू आटोक्यांत आला कीं, त्याजवर दौड करून हल्ला चढवावा अगर घाला घालावा व एका हल्ल्याच्या घावांत जितके तुकडे पाडतां येतील तितके पाडावे. पण शत्रू आटोक्यांत येण्यासारखा नसेल किंवा आपणाहून अधिक प्रबळ असेल तर त्याजपासून फटकून दूर राहावें, त्याच्या आसपास घिरट्या घालून व त्याची रसद मारून त्याला जेरीस आणावें असा त्यांचा परिपाठ होता. जनरल लेकबरोबर यशवंतराव होळकराची लढाई चालू असतां भरतपूरच्या जाटांनीं त्यास किल्ल्यांत येण्यास सांगितलें होतें. त्या वेळीं यशवंतराव होळकरानें जाटांस असें बाणेदार उत्तर पाठविलें होतें कीं, "**किल्ल्याचा आश्रय घेऊन लढणें आमचें ब्रीद नव्हे. मराठ्यांची गादी घोड्याच्या पाठीवर. यासाठीं आम्ही किल्ल्याच्या बाहेर राहून शत्रूस हैराण करूं.**"

गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीवरून मराठ्यांस गनीम म्हणण्याची सर्व हिंदुस्थानांत चाल होती. "आम्ही गनीम, आम्ही दुसऱ्याची रसद बंद करावयाची ती उलट आमचीच रसद बंद होऊन आम्हांस उपासमार काढावी लागत आहे," असे पानपतच्या छावणीमध्यें भाऊसाहेब पेशव्यांनीं उद्गार काढले होते ते यावरूनच. गनिमी काव्याच्या लढाईंत बहुत वर्षांचा अनुभवी व वाकबगार सरदार **मल्हारराव होळकर** हा होता. याच्या तोडीचा त्या वेळीं मराठ्यांमध्यें कोणीहि दुसरा सरदार नव्हता. गनिमी काव्यानें अबदल्लीला हैराण करण्याची त्यांनीं दिलेली सल्ला भाऊसाहेबानें धुडकावून लाविली म्हणूनच पानपतमध्यें 'तीन लाख बांगडी फुटली.'

मराठ्यांचें आपल्या घोड्यांवरील प्रेम

मराठ्यांना आपल्या घोड्यांसंबंधीं वाटत असलेल्या विलक्षण प्रेमाबद्दल तत्कालीन इंग्रजांना आश्चर्य व कौतुक वाटे. घोडा दहा रुपयांचा असो किंवा हजार रुपयांचा असो, त्याचे चोज व शृंगार करण्यांत मराठा स्वार गढलेला असे. अनुकूलता असेल, तर तो घोड्याच्या गळ्यांत पुतळ्यांच्या माळा, पायांत वाळे व इतर शृंगार घाली. लगाम, अनिन, जीन, जेरबंद वगैरे थाटाचा करी. पण ज्याची ऐपत एवढी नसेल तो निदान आयाळाच्या केसांच्या वेण्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून कपाळावर रंगीबेरंगी बटीची गोंडवेणी लोंबत ठेवून बटीची शोभा वाढविण्या कमी करीत नसे. पण त्याच्या प्रेमाची मर्यादा या बाह्य थाटावरच संपत नसून, तिचा ठ घेण्यास आपणास या शिलेदाराच्या अंतःकरणांत शिरलें पाहिजे. त्याला आपला घो जीवापेक्षांहि प्यारा वाटे. त्याची शुश्रूषा करण्यासाठीं एक स्वतंत्र पोरगा स्वारींत प्रत्येक शिले घेत असे. तरी तो त्याच्यावर विसंबून न राहातां त्याला चंदी, वैरण, पाणी, खरारा वेळच्या वे मिळत आहे किंवा नाहीं हें पाहाण्याविषयीं फार दक्षता ठेवी. इतकेंहि करून घोड्यावरू खालीं उतरतांच, त्याच्या पुठ्यावर थाप मारून, त्यास गोंजारून, त्याचें सारें अंग मनगा पासून कोपरापर्यंत हातानें जोरजोरानें रगडल्यावांचून व त्याचे पाय मागें व पुढें ओढून स मोकळे केल्यावांचून मराठा शिलेदारास चैनच पडत नसे. सारांश, मराठा शिलेदारांचे घो तेजस्वी, तयार व चालाक असून धन्याच्या प्रेमळ वर्तनाचा त्यांच्यावर परिणाम झालेला दि तत्कालीन एक इंग्रज गृहस्थ लिहितो, " घोडा बाळगावा मराठ्यानेंच. त्याचें तो जें कौतु करतो, त्याचें वर्णन करतां पुरवत नाहीं. पण येवढें खरें कीं, इंग्रजी सैन्यांत घोड्यास रो चार शेर साडेचार शेर चंदी असून त्यापेक्षां शेर दीडशेर चंदीवर मराठ्यांचे घोडे जास्त तयार आहेत!"

कवायती कंपू

पोर्तुगीज लोकांशीं कोंकणांत लढत असतां कवायती गार्द्यांकडे प्रथम चिमाजी आप्पाचें लक्ष गेलें, व वडिलांचा हा गार्द्यांविषयीं अनुकूल ग्रह त्यांचे चिरंजीव सदाशिवराव भाऊ यांचे मनांत दृढ झाला. ते गार्द्यांचे विशेष चहाते होते, पण खुद्द त्यांच्याच जीवास मुजफरजंग गार्द्यांकडून अपाय होण्याचा एके वेळीं समय आला होता. पानिपतच्या लढाईंत मराठ्यांच्या सर्वस्वाचा जो नाश झाला त्याचें कारण सदाशिवराव भाऊंचे गार्दी व त्यांची कवायती पद्धति हेंच सर्वांत जास्त महत्त्वाचें होतें, असा त्या वेळच्या कांहीं मोठ्या लोकांचा ग्रह होता. नारायणराव पेशव्याचा खून गार्द्यांच्या हातूनच झाला. या गोष्टीमुळें व गार्द्यांच्या परकीपणामुळें बहुतेक मराठे मुत्सद्दी व सेनानायक कवायती पद्धतीच्या अगदीं मनापासून विरुद्ध होते.

मराठेशाहींत कवायती सैन्याचे पहिल्या प्रतीचे पुरस्कर्ते महादजी शिंदे हे होते. कवायती कंपू तयार करून त्यांच्या साह्यानें त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत आपला दरारा बसविला व पानिपतच्या पराभवानें मलिन झालेलें मराठ्यांच्या राजसत्तेचें तेज पुन्हा एकवार उज्ज्वल केलें. कवायती सैन्याची कल्पना पाटिलबोवांच्या मनांत केव्हां व कशी आली ही हकिकत फार मौजेची आहे. आनंदीबाईच्या यजमानांची आसुरी राज्यतृष्णा तृप्त करण्याकरितां इंग्रजांनीं मराठ्यांशीं जें युद्ध केलें त्यामध्यें त्यांनीं आपलें कांहीं सैन्य बोरघाटानें पुण्यास रवाना केलें. या सैन्यास मराठ्यांनीं वडगांवच्या खिंडींत हैराण करून आपल्या स्वाधीन होण्यास भाग पाडलें. महादजी शिंदे जरी या लढाईंत जेत्यांच्या बाजूस प्रमुख होते, तरी ते जयानें फुगून गेले नाहींत. शत्रूच्या बलाचें रहस्य त्यांनीं पूर्णपणें ओळखलें व लढाईनंतर इंग्रजांनीं तहाचें बोलणें लाविलें त्या वेळीं त्यांनीं एका ब्रिटिश कामगारापाशीं पुढील उद्गार काढले, " काय हो, तुमचें सैन्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवळ भिंतीप्रमाणें आहे. एक शिपाई पडला तर दुसरा त्याच्या जागीं उभा आहेच. मला जें सैन्य हवें तें असेंच पाहिजे. " आपले विचार कल्पनासृष्टींतच ठेवण्याची संवय पाटिलबुवांस नव्हती. व योग्य संधि मिळाल्याबरोबर त्यांनीं त्यांस मूर्तस्वरूप दिलें. सुदैवानें ज्या युरोपियनाची योजना या कामावर करण्यांत आली तोहि अगदीं सामान्य मनुष्य नव्हता. असा दुग्धशर्करेचा योग आल्यामुळें जनरल डिबॉइनची कीर्ति व शिंद्याची सत्ता थोडक्याच काळांत उत्तर हिंदुस्थानांत अतोनात वाढली.

डिबॉइन हा फ्रान्समधील राहाणारा असून त्यानें नेपोलियन बोनापार्टच्या हाताखालीं कांहीं दिवस काम केलें होतें. यानें शिंद्याकरितां पुष्कळ कवायती कंपू तयार केले. या फौजेमध्यें फ्रेंच, इटालियन, डच, जर्मन, इंग्लिश इत्यादि युरोपियन, अंमलदार म्हणून नेमले होते. प्रत्येक कंपूमध्यें दहा पायदळ पलटणी, पांचशें लोकांची शिबंदीची एक तुकडी, पांचशें तुर्क स्वार व साठ तोफा इतकी तयारी असे. या पलटणीपैकीं सात पलटणींस तेलंग असें म्हणत असत. त्यांचे पोषाख, हत्यारें वगैरे ईस्ट इंडिया कंपनीच्या शिपायांप्रमाणें असत. बाकीच्या तीन पलटणीस नजीम म्हणत. त्यांचे पोषाक पर्शियन तऱ्हेचे होते. सर्व पायदळ पलटणींस इंग्रजी तऱ्हेची कवाईत शिकविली जाई व हुकमाचे शब्दहि इंग्रजींतच असत. शिंद्यानें आग्रा किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तेथें सँक्स्टर या स्कॉच इसमाच्या मार्फत आपला हत्यारांचा व दारुगोळ्याचा कारखाना काढला होता.

रजपुतांबरोबर झालेल्या युद्धांत या कवायती सैन्याचा महादजी शिंद्यांस फार मोठा उपयोग झाला. या कवायती कंपूंतील फौजेस वेळचे वेळीं पगार मिळावा म्हणून दिल्ली व मथुरा यांच्या दरम्यानचा बावन्न परगण्यांचा मुलूख कवायती कंपूच्या खर्चाकरितां डिबॉइनला देण्यांत आला होता. या परगण्यांचा वसूल तीस लाख रुपये होता. वर दिलेली गार्द्यांची फौज व कवायती कंपू यांजमध्यें पुष्कळ फरक होता. कवायती कंपूला जें लढाईचें शिक्षण देत तें पाश्चात्य राष्ट्रांतील युद्धकलेप्रमाणें असे. जनरल डिबॉइनच्या नंतर जनरल पेरन हा या कंपूचा मुख्य अधिकारी झाला. परंतु तो नीच वृत्तीचा असल्यानें दौलतराव शिंद्याच्या व इंग्रजांच्या ज्या पुढें लढाया झाल्या त्या वेळीं तो इंग्रजांस फितूर झाला, व त्यामुळें कवायती कंपूचा नाश झाला.

महादजी शिंद्यांनीं कवायती कंपू तयार करण्यामध्यें एक मोठी घोडचूक केली ती ही कीं, या कवायती कंपूमध्यें एकहि मराठा शिपाई नव्हता किंवा एकहि मराठा सेनानायक नव्हता. या कंपूमध्यें उत्तर हिंदुस्थानांतील पुरभय्ये व मेवाती लोक यांचाच मुख्यतः भरणा होता व वरिष्ठ अंमलदार हे सुद्धां परकी असल्यामुळें व त्यांनीं ऐन वेळीं दगा दिल्यामुळें, कंपूंतील सर्व लोक शिंद्याची नोकरी सोडून इंग्रजांस जाऊन मिळाले.

शिंद्याप्रमाणें होळकरानेंहि शेव्हेलियर, डुड्रेन, प्लिंट व गार्डनर हे युरोपियन अधिकारी आपल्या नोकरीस ठेवून त्यांच्याकडून कवायती कंपू तयार करविले. शिंद्यांच्या उपसेनापतींनींहि आपल्या हाताखालीं गोरे अधिकारी ठेविले होते. कॅ. बटरफील्ड हा लखबादादाकडे राहिला;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेफर्ड व बेलासीस हे अंबाजी इंगळ्याकडे राहिले; आप्पा खंडेराव यानें जॉर्ज टॉमस या नोकरीस ठेविलें. बुंदेलखंडांत अलि बहाद्दरनें व वऱ्हाडांत रघुजी भोसल्यानें हाच क्र स्वीकारला. दुसऱ्या बाजीराव पेशव्यानें मेजर टोन व मेजर बॉइन यांस नोकरीस ठेवू आपल्याच पदरच्या सरदारांचें अनुकरण केलें होतें.

परकी लोकांचा तोफखाना, परकी लोकांचें पायदळ व बडेबडे परकी अंमलदार चाकरी ठेवून त्यांच्या भरावर राज्याचा बचाव करण्याची आशा मराठ्यांनीं धरली ही मोठी चूक झाली हाच पैका त्यांनीं देशी पायदळावर खर्च करून व त्यावर देशी अंमलदार नेमून तें पायदळ उजगारीला आणलें असतें तर त्याचा फारच उपयोग झाला असता.

आपली गनिमी काव्याची युद्धपद्धति टाकून देऊन मराठ्यांनीं कवायतीपद्धति स्वीकारलें ही गोष्ट त्यांच्या फायद्याची झाली नाहीं असें पुष्कळ लोकांचें म्हणणें आहे. "मराठ्यांच्या खालचा घोडा ज्या दिवशीं निघून गेला त्या दिवशीं त्यांचें राज्य गेलें," असें एकानें म्हटलें आहे. दौलतराव शिंदे व त्यांचा सरदार गोपाळराव यांच्या दरम्यान भर दरबारांत पुढीलप्रमाणें संवाद झाल्याचें सांगतात. गोपाळराव हा एक जुन्या पद्धतीचा सेनापति होता. तो म्हणाला, "तुमच्या वाडवडिलांनीं राज्य मिळविलें त्यांचें घर घोड्याच्या खोगिरावर होतें; तेथून उठून तें तंबूंत जाऊन बसलें! आतां तर तुम्ही शिपायांना मातीच्या बराकी बांधून देऊं लागलां. पण सांभाळा, पुढें सर्वांचीच माती होईल." दौलतराव म्हणाला, "माझीं पलटणें व तोफा आहेत तोंवर मी कोणासच भीत नाहीं." त्यावर गोपाळराव म्हणाला, "पण या तोफाच शेवटीं तुमचा घात करतील." पार्लमेंटमध्येंहि सर फिलिप फ्रॅन्सिस यानें एकदां असें उघड बोलून दाखविलें कीं, "मराठे कवायत शिकूं लागले व तोफा ओतूं लागले, पण त्यांतच त्यांचा नाश आहे. त्यांनीं आपली लढाईची स्वदेशी पद्धति सोडली व परदेशी पद्धति तर कोणासच मानवत नाहीं. आम्हांपुढें भिण्याचें त्यांना कांहींच कारण नाहीं." ड्यूक ऑफ वेलिंग्टनचेंहि मत असेंच होतें. एका दृष्टीनें हें म्हणणें खरेंहि दिसतें. इंग्रजांनीं दौलतराव शिंद्याच्या कवायती कंपूचा पुरा नाश अवघ्या एका वर्षांत केला; पण बेशिस्त भुरट्या पेंढाऱ्यांना वठणीला आणण्याला मात्र त्यांना सात आठ वर्षें लागलीं. मोगलांविरुद्ध मराठ्यांना गनिमी काव्यानें यश आलें, पण इंग्रजांविरुद्धहि तें साधन सदासर्वदा उपयोगी पडलेंच असतें असें म्हणवत नाहीं. छापे घालणें किंवा दौड करून जाणें हा युद्धकलेपैकीं एक भाग झाला; पण तेवढ्यानें कार्यभाग होऊं शकणार नाहीं. शिवाय गनिमी काव्याच्या लढाईत आश्रयस्थानें म्हणून किल्ल्यांचा जो उपयोग होत असे, तो होणें इंग्रजांच्या तोफांमुळें पुढें पुढें अशक्यच झालें होतें. अर्थात शत्रूचीं युद्धसाधनें आपलींशीं करून घेतल्याशिवाय मराठ्यांना यश मिळणें शक्य नव्हतें. महादजी शिंद्यांनीं कवायती पद्धतीचें सत्य ओळखिलें होतें; परंतु तें सत्य पूर्ण नव्हतें, अर्धें होतें; व त्यामुळेंच त्यांनीं उभारलेली इमारत ऐन वेळीं खचली. कांहीं दिवसांची फुरसत मिळती तर कदाचित् मराठ्यांनीं उत्तम कवायती राष्ट्रीय सैन्य तयार केलें असतें. परंतु दैवी इच्छा निराळी होती, आणि रणजितसिंगानें भविष्य केल्याप्रमाणें लवकरच "हें सर्व तांबडें" झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांचे माळव्यांतील दोन प्रबळ शत्रू

[लेखक—**चिंतामण बळवंत लेले**, बी. ए., धार]

१८ मे सन १७२४ त बाजीराव व निजाम यांची नालछे येथें भेट झाली. या वेळीं बाजीराव माळव्यांत मोहिमेकरितांच आले होते. याच वेळेस हैदराबादचा सुभेदार कंब्रीजखान (मुबारिझखान) यास निजामास दक्षिणेंत न येऊं देण्याची ताकीद बादशहाकडून दिली गेली होती. मोठ्या फौजेनिशीं तो निजामाशीं तोंड देण्यास तयार झाला. निजामाच्या छातींत धडकी भरली. त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यावर निजामानें पेशव्याची मदत घेऊन २ आक्टोबर, १७२४ रोजीं साखरखेडें येथें कंब्रीजखानाचा पूर्ण पराभव केला. निजामाचें वाढतें वर्चस्व पाहून बादशहानें अजिमुल्लाखांकडून माळव्याची सुभेदारी काढून घेऊन अलाहाबाद येथील गिरधर बहादर या नागर ब्राह्मणाकडे माळव्याची सुभेदारी दिली (२ जून, १७२५). यानंतर निजाम दक्षिणेंत उतरला व पुनः बाजीरावाविरुद्ध त्यानें आपलीं कारस्थानें पूर्ववत् चालू ठेविलीं. याच वेळीं देशस्थ–कोकणस्थ वाद दक्षिणेंत उद्भवला होता. ही वेळ साधून निजामानें श्रीपतराव प्रतिनिधिला बाजीरावाविरुद्ध प्रवृत्त केलें व कोल्हापूरच्या संभाजीला शाहूमहाराजाविरुद्ध फूस दिली. " दक्षिण सहा सुभ्याची चौथें व सरदेशमुखी वसुलीची रकम, शाहू व संभाजी यांच्या वाट्यांबद्दल निर्णय होईपावेतों अनामत ठेवण्यांत येईल–वारसाचा निकाल होण्यापूर्वीच शाहूमहाराजांना आम्ही कां रकम देऊं ?" असा साफ रोकडा जबाब त्यानें बाजीरावास दिला. त्यामुळें बाजीरावाला संताप येऊन त्यानें लढाई करण्याबद्दल शाहूमहाराजांची अनुमति मिळविली. ता. २७ ऑगस्ट, १७२७ रोजीं बाजीराव साताऱ्याहून स्वारीला निघाला. निजामाला रेटीत तो पुण्यास आला व तेथें दसरा करून मोठ्या फौजेसह त्यानें निजामावर चढाई आरंभिली. तत्पूर्वीच उदाजीराव पवारास ३ डिसेंबर, १७२२ त सनद देऊन बाजीरावानें माळवे व गुजराथ येथील निमे मोकासा त्यास सोंपवून दिला होता. त्यांत " आमची इमारत सर्व तुम्हांवरच आहे येविषयीं आपलें समाधान असो देणें " असा उल्लेख केला आहे. माळव्यांत मराठ्यांच्या आक्रमणांत उदाजीराव पवाराचें प्रमुख अंग होतें. बाजीरावाचा मुक्काम गुजराथेंत पाणोथा येथें असतांना त्यानें आनंदराव पवार यांस पत्र पाहतांच येण्यास सांगून उदाजीराव पवार न आल्याबद्दल विस्मय प्रदर्शित केला आहे. " अनमान कराल तर आमची आण असे " इतक्या कळकळीच्या उद्गारांत पवार बंधूंविषयीं बाजीरावाचे मनांत वसत असलेला आत्मविश्वास दृग्गोचर होतो. या वेळीं आनंदराव पवार व उदाजीराव गुजराथेंतच बाजीरावानें सोंपविलेल्या कामगिरीवर असावेत. पुष्कळ ठिकाणीं झुलवीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि चुकवीत बाजीरावानें निजामाची अगदीं दाणादाण केली. बऱ्हाणपूरला सैन्याची रवानगी करण्यांत निजामाची फटफजिती झाल्यामुळें त्यानें पुण्यावर चाल केली. परंतु बाजीरावानें गोदावरीच्या पूर्व तीरावरील निजामाचे वैजापूर व गांडापूर हे परगणे उध्वस्त केले. (म. रि. म. वि., भाग १, पृ. १९६) आणि ठिकठिकाणीं लहान लहान चकमकी करीत, दाणापाणी नाहीं अशा पालखेड नजीक घनदाट जंगलांत निजामास रेटलें. शेवटीं २५ फेब्रुवारी, १७२८ त गुढी पाडव्याचे दिवशीं निजाम-पेशवे यांचें युद्ध होऊन निजामाचा संपूर्ण पराभव झाला (पे. श. पृ. ५६). जेरीस येऊन निजामानें तहाचें बोलणें सुरू केलें. ६ मार्चला मुंगी शेवगांवचा तह ठरला. सहा सुभ्यांतील वसुली करण्यांकरितां बाजीरावाच्या कारकुनांना हरकत नसावी व त्या करितां कांहीं किल्लेहि निजामाकडून मिळावे अशा अटी होत्या. बाजीरावानें संभाजी (कोल्हापूरकर) यांस तावीन म्हणून मागितलें होतें. पण निजामास तें पटलें नाहीं. यापूर्वीच छत्रपति संभाजी पन्हाळगडावर गेला होता. हा तह झाल्यावर शाहूनें कित्येक वेळां निजामाच्या वाटेस न जाण्याकरितां आपल्या सरदारांना ताकीद दिली होती.

यानंतर बाजीराव दक्षिणेंत गेला. माळव्यांत मराठ्यांच्या वतीनें उदाजी पवार, अंबाजीपंत पुरंदरे हे खंडवसुली करीत होते. परंतु माळव्याचा बादशाही सुभेदार राजा गिरधर बहादर व त्याचा पुतण्या दया बहादर यांचा या कामांत नेहमीं अडथळा होत असे. अंबाजीपंतानें गुजराथेंतून खंडवसुली केली. गुजराथचा सुभेदार सरबुलंदखान याच्याशीं पेशव्यांचा तह झाल्यामुळें त्याचे कामांत कांहींच व्यत्यय आला नाहीं. केसो महादेवानें राजा गिरधर बहादर अडथळा करतो म्हणून कळविलें होतें. शाहूमहाराजांनींहि गिरधर बहादरला तसें न करण्याबद्दल ता. ४ मार्च, १७२६ ला पत्र लिहिलें होतें (पे. द., भाग १३, प. ५), परंतु त्यानें शाहूच्या पत्राकडे कानाडोळा करून दया बहादराच्या चढाईलाच प्रोत्साहन दिलें. पालखेडच्या लढाईनंतर मात्र मराठ्यांचें लक्ष माळव्याकडे वेधलें गेलें. मुंगी शेवगांवच्या तहानें पुष्कळशा गोष्टींचा निर्णय झाला. निजामाला वेसण घातली गेली. प्रतिनिधीला नमतें घ्यावें लागलें. चंद्रसेन जाधवाची निराशा झाली व संभाजी व शाहू यांत एकी झाली. पालखेडच्या लढाईत हताश झालेला निजाम दोन तीन वर्षें तरी डोकें वर करूं शकला नाहीं. तत्पूर्वीच इ. स. १७२६ त शाहूमहाराजांनीं उदाजीराव पवाराशीं माळवा गुजराथ येथील वसुलीसंबंधीं एक नवीन तह करून घेतला. त्याप्रमाणें माळवा व गुजराथ येथील अधिकाऱ्यांना ताकीद पत्रें पाठविलीं गेलीं. त्यापैकीं सरबुलंदखान, राजा गिरधर बहादर, उमरखान, महम्मदयारखां, तेगबेगखां यांना जीं गौरवयुक्त पत्रें पाठविण्यांत आलीं, (तीं धार दरबारचे दप्तरांत उपलब्ध आहेत) त्या योगानें उदाजीराव पवाराचा माळवा व गुजराथ येथील वसुलीचा मार्ग मोकळा करण्यांत आला. गुजराथेंत सरबुलंदखानाशीं मैत्रीचा तह झाल्यामुळें वसुलीला अडथळा झाला नाहीं. पण माळव्यांत मात्र पहिल्यापासून मुसलमान अधिकाऱ्यांचा विरोध होऊं लागला. बाकानेर आणि मांडव यांच्या कांहीं भागापर्यंत मराठ्यांचें आक्रमण झालें होतें. पण दया बहादरास संताजी भोसले मिळाल्यामुळें अधिक उत्तरेकडे जाणें मराठ्यांना धोक्याचें वाटलें. त्या वेळेस फक्त मांडव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथून चौथ वसूली झाली (*Malwa in Transition*, p. 161, पे. द., भाग १३, पृ. १३) सुरवातीला मराठी फौजेच्या तीन टोळ्या माळव्यांत आल्या. परंतु दया बहादरानें त्यांना सर्व बाजूंनीं घेरून वसुलीला अडथळा केला. इतकेंच नव्हे तर केसो महादेवाच्या आधिपत्याखालीं असणाऱ्या सैन्याला नजरकैदेंतच ठेवलें. मुसलमानी फौजांच्या कचाट्यांतून निसटणें मराठ्यांना अवघड जाई. दादो भीमदेवानें दिल्लीहून बाजीरावास व चिमाजी अप्पास जयसिंगाची हार्दिक इच्छा –" तुमची फौज मालवियांत जलदीनें येतें. तरी पादशा तुमचे जे मतालब आहेती तें सर्वहि करून देतों. फौज माळव्यांत येऊन धामधूम करी ते गोष्ट केली पाहिजे, फौज माळव्यांत येतें अगत्य केलें पाहिजे "– कळविली आहे (पे. द., भाग १३, पृ. १०). संताजी भोसले दया बहादराशीं मिळाला होता. त्याच्याशीं पेशव्यांनीं संगनमत करून चिमाजी अप्पाच्या मदतीनें स्वारीची तयारी केली व इ. स. १७२८ त फौजेचा गाहा करून मल्हारजी होळकर व उदाजी पवार यांच्यासह माळव्याच्या स्वारीस सुरवात केली.

ता. २४ नोव्हेंबर, १७२८ रोजीं मराठे नर्मदेच्या दक्षिण तीरावर राजापूर सोडून दुसरेच दिवशीं नर्मदोत्तर धरमपुरीजवळ आले. या वेळीं राजा गिरधर बहादर व दया बहादर यांचा तळ आमझेरें मुक्कामीं होता. गिरधर बहादरानें दयाबहादरास बाकानेरच्या तोंडाशींच तोफखाना सज्ज ठेवण्यास कळविलें होतें. कारण मराठ्यांची फौज बाकानेर-मनावर मार्गें येणार असा अगाऊच सुगावा त्याला लागला असावा. मुसलमानी फौजेची हालचाल सावध मराठ्यांना तावडतोब कळली आणि त्याप्रमाणें त्यांनीं मांडवच्या घाटाचा अवलंब केला. ता. २७–२८ या दोन दिवशीं चिमाजी अप्पानें नालछास जो मुक्काम केला तो कां केला हें कळत नाहीं. कदाचित् मुसलमानी सैन्याचा रोख अजमावण्यासाठीं पूर्व बातमी काढण्याकरितांच हा असेल. शेवटीं गिरधर बहादर व दया बहादर हे एका ठिकाणीं नाहींत अशी पक्की खात्री झाल्यावर मराठ्यांचें सैन्य नालछाहून आमझऱ्याच्या रोखानें पुढें सरसावलें. ता. २९ नोव्हेंबर रोजीं आमझऱ्याच्या जवळ येऊन थडकल्यावर चिमाजी अप्पानें गिरधर बहादरावर अचानक छापा घातला. ही लढाई किती तास चालली होती याबद्दल अजून सबळ पुरावा मिळाला नाहीं. जो आहे तो रावलजी सोमवंशीचें चिमाजी अप्पास पत्र. त्यांत दया बहादराशीं दोन प्रहर युद्ध झालें व त्यांत तो पडला असा निर्देश आहे (पे. द., भाग १३, पृ. २५).

आतां गिरधर बहादर व दया बहादर यांच्या मृत्युदिनाविषयीं इतिहाससंशोधकांत जो वाद आहे त्याची तोंडमिळवणी करण्याचा प्रयत्न सितामहूचे युवराज डॉ. रघुवीरसिंह यांनीं केला आहे. परंतु पेशवे दप्तरांतील उपलब्ध साधनांवरून जरी विधान करावयाचें म्हटलें तरी डॉक्टरांच्या प्रतिपादनाप्रमाणें गिरधर बहादर व दया बहादर हे एकाच दिवशीं एकाच लढाईत मारले गेले असें वाटत नाहीं. अधिकृत पुराव्याची मदत घेऊन मराठ्यांच्या या दोन प्रतिस्पर्ध्यांची मृत्यु-तारीख ठरविण्याचा प्रयत्न आम्ही यथामति पुढें करतों.

प्रथमतः हें सांगणें जरूर आहे कीं, श्री. सरदेसाई यांनीं आपल्या मराठी रियासतींत राजा गिरधर बहादर हा सारंगपूरच्या लढाईत इ. स. १७२६ त मारला गेला असें दाखविणारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीं सहा सात भालेरावी पत्रें (म. रि., मध्य वि. १, पृ. ३२४ ते ३२९) समाविष्ट के आहेत, तीं अस्सल नाहींत असें नंदलाल मंडलोई यांचे वंशज रावराजा छत्रकर्ण यांचेक ठाम समजलें आहे (भा. इ. सं. मं., त्रै., वर्ष १०, अंक २ रा, पृ. ४०). आतां ही गोष्ट आहे कीं, इ. स. १७२६ सालीं मराठ्यांनीं सारंगपूर परगण्यांतून १५००० रुपये केले (पेशव्यांची बखर पृ. ३७; Malcolm). तरी पण सारंगपूरच्या लढाईचा ऊहा निरर्थक आहे हें वरील पत्रांच्या असत्यतेवरून स्पष्टच होत आहे. किंबहुना २९ नोव्हें १७२८ पावेतों तो माळव्याच्या सुभेदारीवर होता हें सिद्ध झाल्यावर आतां अधिक पुराव्या अपेक्षाच उरत नाहीं. वस्तुतः हीं बनावटी पत्रें मागाहून तयार करण्याचें प्रयोजन का एतद्विषयीं कार्यकारणभाव समजत नाहीं.

यानंतर पेशवा दप्तराच्या १३ व्या भागांत जीं अस्सल पत्रें छापलीं आहेत, त्यांवरू एकंदर समरप्रसंगाविषयीं व तदनुषंगिक मराठ्यांच्या हालचालीसंबंधीं ठळक गोष्टी निश्चयात्म अनुमानितां येतात त्यांचा विचार करूं.

ता. २९ नोव्हेंबर, १७२८ रोजीं लढाई झाल्यावर सरासरी २ डिसेंबरपर्यंत चिमा अप्पाचा मुक्काम आमझेरें येथेंच होता (पे. द. २२, पृ. ५). लढाईचें इतिवृत्त त्यानें बा रावास दुसरेच दिवशीं लिहिलें. हें पत्र पोहचण्यापूर्वींच पेशव्यांकडून चिमाजी अप्पास ता. डिसेंबर, १७२८ रोजीं पत्र गेलें तें चिमाजी अप्पास उज्जैन जवळ त्याच महिन्याच्या बा तारखेस पोहचलें. बाजीरावांचें हेंच एक पत्र चिमाजीस लवकर मिळालेलें दिसतें. त्यां बाजीरावानें "सांप्रत आजीच वर्तमान आलें कीं, तुमचे व गिरधर बहादर याचें युद्ध जाहालें गिरधर बहादर याजकडील कितेक सरदार व लोक मारून गिरधर बहादर बुडविला...... यैसियासी ये गोष्टीचे तत्वता वर्तमान काय आहे ते सविस्तर लिहून पाठविणें" (पे. द., भाग १३, प. १५). यावरून बाजीराव यांस चिमाजीचें पत्र ता. ८ ते २७ डिसेंबरच्या संधि कालांत मिळालें असलें पाहिजे. कारण ता. २७-१२-१७२८ रोजीं पेशव्यानें मुक्काम वासिं येथून चिमाजीस जें पत्र लिहिलें, त्यांत आमझऱ्याच्या पत्रांची पोंहोंच दिली आहे. यां "गिरधर बहादर याचे युधी" हे शब्द पुढील विचारसरणीस पुष्टिकारक असल्यामुळें महत्वाचे आहेत. गिरधर बहादराशीं झालेल्या युद्धांत उदाजी पवारानें केलेला पराक्रम चिमाजीनें "राजश्री उदाजी पवार याणी व हुजूरच्या पथकांनी कस्त मेहनत बहुत केली" म्हणून स्प शब्दांत व्यक्त केला आहे. यानंतर बाजीरावानें चिमाजीस ता. ४-१-१७२९ रोजीं पत्र पाठविलें आहे (पे. द., भाग १३, प. २९). त्यांत चिमाजीनें पाठविलेल्या ३० नोंव्हेंबरच्या व २० डिसें बरच्या पत्रांची पोंच लिहिली आहे. मात्र या पत्रांत लिहिलेला गिरधर बहादराचा उल्लेख पेशव्यांचे हातून नजरचुकीनें केला गेला आहे असें वाटतें. कारण ता. २० डिसेंबर रोजीं उज्जैनहून पाठविलेल्या पत्रांतील टिपण "दया बहादर लुटिला. हे फत्तेची खबर घेऊन राजश्री आपा कडून जासूद आले. त्यास रुपये ४८" असें आहे (पे. द., भाग ३०, पृ. २८७). या नोंदीचा कार्यकारणभाव सिद्ध करावयास हवा. ही पैवस्तीची तारीख नसून मूळ चिमाजीनें प

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिहिलेल्या दिवसाची तारीख आहे असें पेशव्यांकडून आलेल्या ता. ४ व ९-१-१७२९ अशा दोन पत्रांवरून नक्की वाटतें. ही पोंहचण्याची तारीख म्हणावी तर ३० नोव्हेंबरचें आमझऱ्याचें चिमाजीचें पत्र बाजीरावास ९ ते २७ डिसेंबरच्या दरम्यान मिळाल्यावर हें पत्र केव्हां पाठविलें असावें, यावद्दल कोडेंच उत्पन्न होतें आणि तें सोडविणें साधन-ग्रंथावरून शक्य दिसत नाहीं. हें दुसरें पत्र पेशव्यानें चिमाजीस गिरमडगाऊ, प्रांत वऱ्हाडहून पाठविलें आहे. त्यांतहि २०-१२-१७२८ च्या पत्राची (२९ जमादिलावलची) नोंद आहे. पण चूक असलेल्या मजकुराची मात्र पुनरावृत्ति केलेली नाहीं (पे. द., भाग १३, प. ३३). तेव्हां ता. २९ नोव्हेंबर १७२८ रोजीं मराठ्यांच्या फौजेची गिरधर बहादराशीं लढाई होऊन त्यांत तो मारला गेला, हें उघड दिसत आहे. परंतु वरील २० डिसेंबर, १७२८ च्या चिमाजी अप्पाच्या पत्रावरून व १७२९ च्या जानेवारींतील मल्हार दादाजी, दावलजी सोमवंशी, पिलाजी जाधव, अंताजी गणेश, बापूजी श्रीपत, मंडोजी, धोंडाजी महादेव व [पुढें एप्रिल महिन्यांत] चिमणाजी दामोदर इत्यादिकांच्या पत्रांवरून राजा गिरधर बहादराच्या पाडावानंतर मराठ्यांना दया बहादराशीं पुनः लढावें लागलें असें अनुमान करावेंच लागतें (पे. द., भाग १३, प. २५-२६-२७-२८-३१-३२-३५-३७-३८-४६). कारण दया बहादराच्या मृत्यूबद्दल उज्जैनहून चिमाजीनें जसें पेशव्यांस कळविलें तद्वतच वरील लोकांस कळविलें असलेंच पाहिजे. यावरूनच वरील पत्रांद्वारें सर्वांनीं चिमाजी अप्पाचें अभिनंदन केलें आहे. मल्हार दादाजी लिहितो, "प्रथम स्वारीस स्वामी गेले. वडिलांचें आशिर्वादें व महाराज स्वामींचे प्रतापें थोर येश पदरीं पडलें. कीर्ति घोष दिगंती झाला." दावलजी सोमवंशी सर लष्कर यांस "संतोषाच्या कोटी" झाल्या. पिलाजी जाधवानें "श्रीनें थोर येश दिल्हें" म्हणून समाधान प्रगट केलें (दिघेकृत मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा, पृ. ११). इतकेंच नव्हे तर कृष्णराव महादेव चासकरानें सुद्धां दया बहादरासंबंधींच उल्लेख केला आहे (पे. द., भाग १३, प. १७). याशिवाय चिमाजी अप्पानें १७२८ च्या डिसेंबरांत साताऱ्यास दादोबास (मल्हार तुकदेव) दया बहादराचा पाडाव होऊन त्याजकडील १८ हत्ती हस्तगत झाले आहेत, असें शाहूमहाराजांस कळविण्यास लिहिलें आहे (पे. द., भाग ३०, पृ. ४१). स्वतः शाहूमहाराजांनीं गिरधर बहादर यांस पूर्वी वसुलीच्या कामांत अडथळा करूं नये म्हणून पत्र पाठविलें असतांना माळव्याच्या सुभेदाराच्या मृत्यूबद्दल शाहूमहाराजांना कांहींच गंधवार्ता मिळूं नये हें आश्चर्य नव्हे काय? उलट दया बहादरासंबंधीं मात्र शाहूकडे बातमी जावी याचा राजकारणाच्या दृष्टीनें कांहींच उलगडा होत नाहीं. शाहूच्या सरदारांना दया बहादराबद्दल महत्त्व वाटत असेल. पण महाराजांना गिरधर बहादराच्या पाडावाचें वृत्त कळविणें चिमाजीला व बाजीरावाला क्रमप्राप्त नव्हतें कां? यानंतर शाहूमहाराजांनीं पावसाळा जवळ आल्यामुळें पुढील कार्यासंबंधीं मनसुबा करण्याकरितां साताऱ्यास चिमाजी अप्पाला खानदेशांतून फौजेसह येण्यास कळविलें होतें. बरोबर उदाजी पवार यांसहि घेऊन येण्याकरितां त्यांत लिहिलें होतें (शा. म. रो., पृ. ४८, पे. द., भाग १३, पृ. १४ ता. १२-४-१७२९) यानंतर चिमाजी अप्पा मे महिन्यांत पुण्यास येऊन दाखल झाला (ब्र. स्वा. च. ले. ४३).

पुस्तकालय
[illegible] कांगडी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां एकंदर अस्सल पत्रव्यवहारांवरून असें अनुमानणें भाग पडतें कीं, मराठ्यांच्या फौजेनें मांडव घाटाचा अवलंब केल्यावर ती आमझऱ्याच्या नजीक पोंहचते न पोंहचते तें बाकानेर वा मनावराच्या आसपास सुसज्ज असणाऱ्या दया बहादराला मराठे आमझऱ्या पोंहचल्याचा सुगावा लागला असावा. ताबडतोब त्यानें सैन्यास आमझऱ्याकडे कूच करण्या हुकूम केला. उपलब्ध साधनावरून चिमाजी अप्पाची गिरधर बहादराशीं लढाई झाल्या दया बहादर फौजेसह येऊन ठेपला व त्यानें ताबडतोब "वहमियानें" मराठी सैन्यावर ह केला असला पाहिजे. मराठे कांहीं बेसावध नव्हतेच ! कारण दया बहादर आपल्या लौकरच चालून येणार याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आमझऱ्याला पोंहचतांच त्या गिरधर बहादराच्या मृत्यूचें कटु सत्य कळलें व वचपा काढण्याकरितां त्वेषानें नुकत्या निघालेल्या मराठी सैन्यावर त्यानें निकराचा हल्ला केला. आमझऱ्याच्या जवळ वा आहू आमझरें यांचें दरम्यान ता. २ वा ३ डिसेंबर, १७२८ रोजीं उभयतांचें घनघोर युद्ध जुंपलें दावलजी सोमवंशी सरलष्कर यानें आपल्या पत्रांत चिमाजी अप्पाच्या पत्रांतील "द बहादर फौजेनिशीं वहमियानें चालोन आले, त्याचे व आमचे फौजेचें दोन प्रहर युद्ध जाहलें दया बहादर ठार पडले," वगैरे जो मजकूर समाविष्ट केला आहे तो या दुसऱ्या लढाईच्या संभवतेला पुष्टिकारकच आहे. गिरधर बहादरानंतर लागोपाठ दया बहादराशीं झालेलें हें दुसरें युद्ध सहा तास झालेलें आहे, हें कोण नाकबूल करील ? तेव्हां अधिक सबळ पुराव्याचे अभावीं एकाच दिवशीं अर्थात २९-११-१७२८ रोजीं हे दोघेहि काका पुतणे पडले हें अनुमानणें किंवा ठाम विधान करणें धाष्टर्याचें आहे.

आतां शकावलींत गिरधर बहादर यास उदाजी पवार व चिमणाजी दामोदर यांनी युद्धांत मारला हें कोणच्या आधारांवर लिहिलें आहे समजत नाहीं (पे. श., पृ. ५६). ही लढाई १७२८ च्या सुरवातीला झाली असावी म्हणून श्री. वि. गो. दिघे यांनीं अनुमान केलें आहे तें सयुक्तिक दिसत नाहीं. कारण गिरधर बहादराशीं झालेल्या युद्धांत हजर असलेल्या चिमणाजी दामोदर दया बहादराच्या मृत्यूबद्दल चिमाजी अप्पास बहादुरपुऱ्याहून लिहितो कसा, हेंच समजत नाहीं. प्रचलित साधनांवरून चिमणाजी दामोदर हा या वेळीं माळव्याच्या स्वारींतच दिसत नाहीं. तेव्हां वरील लढाईच्या सत्यतेबद्दल साशंकच राहावें लागतें. याशिवाय चितेगांवकर पवार कैफियतींत व मावजीकृत कैफियतींत जगदेवराव पवारानें हत्तीवरून दया बहादराचें शिर उडविलें, असें म्हटलें आहे याबद्दल तर अजून विश्वसनीय पुरावा नाहीं.

तेव्हां अधिक ऐतिहासिक सबळ पुराव्याची वाट पाहून माळव्यांतील मराठ्यांच्या या दोन प्रबल शत्रूंचा अंतकाल वरील उपलब्ध साधनांवरून जो निदर्शनास येतो त्यावरच दृढ विसंबून राहावें लागतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामटेक येथील
रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख

[लेखक-**प्रो. वा. वि. मिराशी**, एम्. ए. व श्री. ल. रा. कुळकर्णी, एम्. ए.]

रामटेक हें नागपूर जिल्ह्यांतील रामटेक तहसिलीचें मुख्य गांव असून नागपूरच्या उत्तरेस २८ मैलांवर वसलें आहे. गांवाला लागूनच असलेल्या टेकडीवर श्रीरामचंद्राचें पुरातन देवालय असल्यानें या गांवाला रामटेक हें नांव पडलें आहे. गांवांत व टेकडीवर अनेक तीर्थें व देवालयें असल्यानें ह्याची क्षेत्रस्थान म्हणून फार प्रसिद्धी आहे. कार्तिक महिन्यांत येथें मोठी यात्रा भरते, त्या वेळीं आजूबाजूच्याच नव्हे तर दूरदूरच्या प्रदेशांतून हजारों लोक देवदर्शनास येतात.

तीर्थस्थान म्हणून रामटेकची ख्याति आज निदान दीड हजार वर्षांइतकी जुनी आहे. **गुप्त** वंशांतील प्रख्यात राजा द्वितीय **चंद्रगुप्त विक्रमादित्य** याची मुलगी **प्रभावती गुप्ता** ही विदर्भाच्या **वाकाटक** वंशांतील द्वितीय **रुद्रसेन** नामक राजास दिली होती. लग्नानंतर थोड्याच काळानें तिचा पति वारल्यामुळें ती आपल्या मुलाच्या नांवानें राज्यकारभार पाहूं लागली. वऱ्हाडांतील **ऋद्धपूर** येथें सांपडलेला तिचा ताम्रपट प्रसिद्ध आहे.§ हा ताम्रपट तिनें '**रामगिरिस्वामिनः पादमूलात्**' म्हणजे रामगिरीवरील श्रीरामचंद्राच्या पादुकांजवळून कार्तिक शुद्ध द्वादशीस दिला होता. प्राचीन कोरीव लेखांत पादमूल या शब्दाचा प्रयोग पादुका असा होतो. सध्यां सामान्यतः श्रीदत्तात्रयाचीच पादुकारूपानें पूजा होते. पण प्राचीन काळीं इतर हिंदु देवतांचीहि पादुकारूपानें पूजा होत असे. वर उल्लेखिलेल्या प्रभावती गुप्तेचा मुलगा द्वितीय **प्रवरसेन** याच्या वेळचा एक ताम्रपट मध्यप्रांतांतील बैतूल जिल्ह्यांतील **पट्टन** या गांवीं दोन वर्षांपूर्वीं सापडला होता,† त्यांतहि महापुरुषाच्या म्हणजे विष्णूच्या पादुकांच्या देवालयांतील अन्नछत्राकरितां कांहीं जमीन दान दिल्याचा निर्देश आहे. इतर ठिकाणींहि विष्णूच्या पादुकांचा उल्लेख आढळतो. कविकुलगुरु कालिदास याच्या मेघदूतांतील (श्लो. १२) यक्ष रामगिरीवरच कांही काळ राहात होता. त्यानें मेघाला अलकेचा मार्ग सांगण्यापूर्वी रामगिरीचा '**वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु**' (मनुष्यांना वंद्य अशीं श्रीरामचंद्राचीं पदें ज्यावर उमटलीं आहेत) असा निर्देश केला आहे. त्यावरूनहि कालिदासाच्या काळींहि रामगिरीवरील देवालयांत श्रीरामचंद्राची पादुकारूपानें पूजा होत असे

§ भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक पुस्तक २, पृ. ८९ पहा.

† या ताम्रपटावरील लेख लौकरच एपिग्राफिया इंडिकांत प्रसिद्ध होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें स्पष्ट दिसतें.§ यानंतर कांहीं काळानें तेथें राम व सीता यांच्या मूर्ती बसविण्यांत आल्या; लक्ष्मणाचेंहि देऊळ बांधण्यांत आलें असें दिसतें.$ म्हणून सध्यां रामटेकावर श्रीरामचंद्राचें देऊळ मागें व लक्ष्मणाचें पुढें असें दिसतें. सध्यांच्या मूर्ति रामटेकास दुधाळा नामक तळ्यांत सापडल्या व पूर्वीच्या मूर्ति भग्न झाल्यामुळें त्यांची त्यांच्या जागीं स्थापना करण्यांत आली असें समजतें.%

प्रभावती गुप्तेचा ताम्रपट कार्तिक शुद्ध द्वादशीस दिला होता. त्यावरून तिनें आदल्या दिवशीं प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून दुसऱ्या दिवशीं द्वादशीस पारणें सोडतांना या ताम्रपटांत उल्लेखिलेला गांव एका ब्राह्मणास दान दिला होता असें दिसतें. प्रभावती गुप्तेचा पुण्यास सापडलेला दुसरा ताम्रपट@ **नंदिवर्धन** गांवाहून दिला आहे. तें नंदिवर्धन रामटेक जवळ नंदर्धन किंवा नागर्धन या नांवानें प्रसिद्ध आहे व रामटेकमाहात्म्यांतहि नंदिवर्धन गांवांतील तीर्थांचा उल्लेख आढळतो.£ उपरिनिर्दिष्ट ताम्रपट हाच वाकाटकांचा सर्वांत प्राचीन ताम्रपट असल्यानें त्यांत निर्दिष्ट केलेलें नंदिवर्धन हें गांव त्या वेळीं वाकाटकांची राजधानी असावी असा कांहीं संशोधकांचा तर्क आहे. तसें असल्यास प्रभावती गुप्तेच्या काळीं म्हणजे इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस रामटेकला राजधानीच्या सान्निध्यामुळें फार महत्त्व आलें असावें. कालिदास विदर्भांत असतांना रामटेकास अनेकदां गेला असावा व टेकडीवरून आसपासचा देखावा पहात असतां मेघदूताचें कथानक त्यास सुचलें असावें असा तर्क करण्यास हरकत नाहीं.¶

यानंतरचा रामटेकचा उल्लेख महानुभावांच्या स्थानपोथींत महानुभाव पंथसंस्थापक **श्रीचक्रधर** हे रामटेकास गेले त्या वेळच्या वर्णनांत आढळतो. श्रीचक्रधर हे रामदेवराव यादवांच्या काळीं होऊन गेले व पुढें सिद्ध केल्याप्रमाणें प्रस्तुत शिलालेखहि यादवकालीन आहे. स्थानपोथी ही श्रीचक्रधरांच्या काळींच लिहिलेली नसली तरी तींत आलेलें स्थळवर्णन श्रीचक्रधरांच्या काळापासून आलेल्या परंपरागत माहितीवरून लिहिलें गेलें यांत संशय नाहीं. प्रस्तुत कोरीव लेखांत उल्लेखिलेलीं तीर्थें व देवालयें पुढें परिशिष्टांत दिलीं आहेत. त्यांतील कांहीं सध्यां दाखवितां येत नसलीं तरी त्यांचा उल्लेख महानुभावांच्या वरील स्थानपोथींत आढळतो. त्यावरून ती पोथी व प्रस्तुत शिलालेख परस्परोद्बलक आहेत हें दिसून येईल.* याशिवाय सिंदूरगिरिमाहात्म्य नांवाची पोथी कांहीं वर्षांपूर्वी नागपूर येथें श्री. जोशी

---

§ अद्यापि गयेला विष्णूच्या पादुकांचीच पूजा केली जाते.

$ लघु व व बृहत् सिंदूरगिरि माहात्म्यांत लक्ष्मणाच्या देवळाचा उल्लेख आहे, पण तीं माहात्म्यें फार प्राचीन दिसत नाहींत.

% रा. ब. हिरालाल यांचा रामटेकवरचा लेख इंडियन अँटिक्वरी पु. ३७

@ एपिग्राफिया इंडिका पु. १५, पृ. ३९ पहा.

£ अ. ६, श्लो. १-२, ८, ७; १३, ८ इत्यादि पहा.

¶ वा. वि. मिराशी-कालिदास (नवभारतग्रंथमाला) पृ. १२१ पहा.

* या पोथींतील उतारा आमचे मित्र श्रीयुत हरि नारायण नेने, एम्. ए., यांचे कृपेनें आम्हांस मिळाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांनीं छापून प्रसिद्ध केली, तींतहि रामटेकच्या व आजूबाजूच्या पंचक्रोशींतील तीर्थांचा उल्लेख व वर्णन आहे. हें माहात्म्य पद्मपुराणांतून घेतलें आहे असा शेवटीं उल्लेख आहे. तथापि सध्यां प्रसिद्ध असलेल्या आनंदाश्रमग्रंथावलींतील किंवा वेंकटेश्वर प्रेसच्या ग्रंथावलींतील पद्मपुराणांत तें आढळत नाहीं. [त्यांतील माहिती शेवटच्या परिशिष्टांत दिली आहे.]

वर उल्लेखिलेल्या राम व लक्ष्मण यांच्या देवळांखेरीज इतर अनेक देवालयें टेकडीवर आहेत. त्यांतील कांहीं फार प्राचीन असावीं. तेथें वामनावताराची एक मूर्ति भग्न स्थितींत आढळते. ती प्राचीन दिसते व म्हणून पुराणवस्तुसंशोधन खात्यानें ती व तिचें विशीर्ण देवालय आपल्या ताब्यांत घेतलें आहे. या मूर्तीचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखाच्या सध्यांच्या अवशिष्ट भागांत तसेंच रामटेकमाहात्म्यांतहि कोठें आढळत नाहीं. टेकडीवर एकांत एक असे तीन प्राकार असून शेवटचा प्राकार ओलांडून गेल्यावर राम व लक्ष्मण यांचीं देवालयें व त्यांच्या सभोंवार इतर लहान देवालयें दिसतात. हिंदूंशिवाय इतरांस या तिसऱ्या प्राकाराच्या आंत जातां येत नाहीं.

प्रस्तुत शिलालेख लक्ष्मणाच्या देवळाच्या सभामंडपांत गर्भगृहाच्या पुढील भिंतींत दरवाजाच्या उजव्या बाजूस बसविला आहे. या शिलालेखाचा उल्लेख जनरल **कनिंगहॅम**चा सहाय्यक **बेग्लर** यानें प्रथम केलेला आढळतो. हा सन १८७३–७४ सालीं रामटेकास गेला होता. त्याला शेवटच्या प्राकारांत जाऊं दिलें नव्हतें. तथापि आपल्या हिंदु नोकरांकडून त्यानें लेखाचा छाप काढविला. त्यांत रामदेव हें नांव त्यास आढळलें.§ तथापि हा लेख कोणी व कशा-करितां कोरविला याची कांहींच माहिती त्याला देतां आली नाहीं.$ यानंतर डॉ. **फ्लीट**मार्फत प्रस्तुत शिलालेखाचा एक अस्पष्ट छाप प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ प्रो. **कील्हॉर्न** यास मिळाला. तो छाप अस्पष्ट असल्यानें कील्हॉर्नला तो सबंध वाचतां आला नसावा. तथापि त्यांतील **सिंहण** व **रामचंद्र** हीं राजांचीं नांवें त्याला दिसलीं. हीं नांवें **हैहय** वंशाच्या रायपूर शाखेंतील राजांच्या नामावलींत दिसत असल्यानें त्यानें हे राजे **कलचुरि** किंवा हैहयवंशाचे असावे असें एपिग्राफिया इंडिकामधील हरिब्रह्मदेवाच्या खलारी या लेखाचें संपादन करतांना म्हटलें आहे.† त्यानंतर **कुझेन्स्** सन १९०३-४ मध्यें रामटेकास गेला होता, पण त्यासहि आंत जाऊं न दिल्यानें प्रस्तुत शिलालेखाविषयीं कांहीं माहिती देतां आली नाहीं. या लेखाचा शेवटचा उल्लेख मध्यप्रान्तांतील प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ कै. रायबहादूर डॉ. **हिरालाल** यांनीं आपल्या मध्यप्रांत वऱ्हाड यांतील कोरीव लेखांच्या सूचींत केला आहे.@ याप्रमाणें अनेकदां या शिलालेखाचा निर्देश केला असला तरी अद्यापि कोणी तो समग्र छापला नाहीं. त्यामुळें त्यांतील माहितीबद्दल अनेकांचा गैरसमज झाला आहे. या लेखाचें यादवकालीन इतिहासांत महत्त्व जाणून आम्हीं तो येथें संपादीत आहों.

§ हें नांव एकसष्ठाव्या ओळींतील असावें. पण तेथें तें श्रीरामचंद्राचें वाचक आहे.

$ कनिंगहॅम–आर्किआलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, व्हॉ. ७, पृ. ११२ पहा.

† ए. इं., व्हा. २, पृ. २३० पहा.

@ पहिली आवृत्ति (१९१६), पृ. ३–४; दुसरी आवृत्ति (१९३२), पृ. ३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर लिहिल्याप्रमाणें प्रस्तुत लेख लक्ष्मणाच्या देवळांत गर्भगृहाच्या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतींत बसविलेल्या दगडावर कोरलेला आहे. आरंभीं हा लेख फार मोठा असावा पण सध्या त्याच्या फक्त ७५ ओळी दिसतात. त्यांनीं २ फूट ६ इं. रुंद व ३ फूट १ इं. उंच इतकी जागा व्यापिली आहे. या लेखाचे दोन भाग पडतात. पहिल्यांत १ ते ३१ ओळी व दुसऱ्यांत ३२ ते ७५ ओळी येतात. हे दोन भाग ३१ व्या व ३२ व्या ओळींत 'ळ' काराकृति चिन्हें काढून निरनिराळे दाखविले आहेत. शिलेचा पृष्ठभाग अनेक ठिकाणीं–विशेषतः वर, खालीं व डाव्या बाजूस खराब झाल्यानें लेख त्रुटित झाला आहे. या लेखाच्या आरंभीं एका राजवंशाचें व त्यांतील पुरुषांनीं केलेल्या पराक्रमाचें वर्णन केलें होतें, पण हा भाग फारच खराब झाल्यानें त्यांतील बहुतेक ऐतिहासिक माहिती आतां नष्टप्राय झाली आहे. दुसऱ्या भागांत रामटेकच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन आलें आहे. यांतील आरंभींचा भाग बराचसा शाबूत आहे, पण खालचा भाग पुनः अतिशय खंडित झाला आहे.

या लेखाची लिपी इ. स. च्या बाराव्या तेराव्या शतकांतील नागरी आहे. पृष्ठमात्रांचा अनेक ठिकाणीं उपयोग केला आहे. 'रि' बद्दल ऋ, व च्या ठिकाणीं ब, ष बद्दल ख, आणि ख बद्दल ष लिहिलेले अनेक ठिकाणीं आढळतात. क व प यांच्या पूर्वी येणाऱ्या विसर्गाबद्दल ष् चा उपयोग केलेला आहे. कांहीं ठिकाणीं अवग्रहाचें चिन्ह कोरलें आहे.

या लेखाच्या पहिल्या चार ओळींतील बहुतेक सर्व शब्द नाहींसे झाल्यानें त्यांतील मजकुराचा पत्ता लागत नाहीं. पांचव्या ओळींत '**यादवो वंशः**' व '[य]**दुवंशजः**' हे शब्द येतात, त्यावरून ज्या राजाच्या कारकीर्दींत हा लेख कोरविला गेला तो स्वतःस यादव-वंशी म्हणवीत असे हें उघड आहे. या वंशांतील एका राजाच्या पराक्रमाचें वर्णन पुढील ओळींत आलें होतें. पण त्यापैकीं **रुद्र** (ओळ ७) **अंध्राधिप व चोल** (ओ. ८) व कदाचित् **गुर्जरेन्द्र** (ओ. ९) एवढींच त्याच्या शत्रूंचीं नांवें शिल्लक आहेत. नवव्या ओळीच्या शेवटीं '**जैत्र**' असा शब्द आला आहे तो **जैत्रपाल** या नांवाचा अवशेष असावा. पंधराव्या ओळींत सिंहणाचा उल्लेख त्याच्या नंतरच्या राजांच्या वर्णनांत ओघांत आला आहे. सिंहणाचें नांव १३ व्या ओळींतहि आलें असावें पण त्याचीं पहिलीं दोन अक्षरें फुटून गेलीं आहेत. सोळाव्या ओळींत **श्रीराघव** नामक अधिकाऱ्याची वंशावळ सुरू होते. तो **वायिनायक** नांवाच्या गृहस्थाचा नातू होता. सतराव्या ओळींत असें म्हटलें आहे कीं, श्रीरामचंद्रराजानें आपल्या साम्राज्यांतील समृद्धीमुळें सुंदर दिसणाऱ्या लक्ष्मीला या राघवाच्या स्वाधीन केलें व स्वतः क्रीडोद्यानांत अखिलकलानिपुण अशा स्त्रियांच्या सहवासांत रममाण झाला. अठराव्या व एकोणिसाव्या ओळींतहि याच राघवाचा शय्यापाल म्हणून उल्लेख आलेला दिसतो. त्याची पत्नी **राजायी** हिचें नांव १९ व्या ओळींत आलें आहे. एकदां या राघवानें आपल्या गुरूस प्रश्न केला कीं, "भगवन्, आपणांस सर्व माहीत आहे. तेव्हां हा अगाध संसारसागर तरून जाण्यास योग्य असा एखादा उपाय मला सांगावा." त्यावर, "विष्णूच्या भक्तीशिवाय दुसरा उपाय नाहीं" असें त्या गुरूनें उत्तर दिलें. व नंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या टेकडीवरील व आजूबाजूच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन केलें. लेखाच्या पहिल्या भागांत रामटेकच्या चारी बाजूच्या घंटेश्वर, सुधेश्वर, केदार व आंजनेय या चार देवळांचा उल्लेख आला आहे. दुसऱ्या भागांत सिंदूरगिरि माहात्म्यांतल्याप्रमाणें रामगिरीवरील व त्याच्या सभोंवतालच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन केलें आहे. यांतील बरींचशीं सिंदूरगिरिमाहात्म्यांत व कांहीं महानुभावांच्या स्थानपोथींतहि वर्णिलेलीं आढळतात. या सर्व उल्लेखांवरून व स्थानिक माहिती-वरून त्यांतील बहुतेकांचें स्थानहि निश्चितपणें ठरवितां येतें. तसा प्रयत्न या लेखाच्या शेवटीं परिशिष्टांत केला आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें खलारी येथील शिलालेखाचें संपादन करीत असतां कील्हॉर्ननें प्रस्तुत शिलालेखाचा उल्लेख केला आहे. त्यांतील सिंहण व रामचंद्र हे राजे, खलारी लेख ज्या हरिब्रह्मदेव नामक हैहयवंशी राजाच्या कारकीर्दींत कोरविला होता, त्याचे अनुक्रमें पितामह व पिता असावे असें त्याला वाटलें व त्यावरून कलचुरि किंवा हैहयवंशी राजांचें राज्य पश्चिमेस नागपूर प्रांतापर्यंत पसरलें होतें असा त्यानें निष्कर्ष काढला. कलचुरि राजांचे अनेक लेख आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील बहुतेकांत एका विशिष्ट शकाचा उपयोग केलेला आहे. ह्याला कलचुरिशक किंवा चेदिशक असें म्हणतात. या शकाच्या मितींचा विचार करून कील्हॉर्ननें असें अनुमान काढलें कीं, कलचुरि शकाचा आरंभ पूर्णिमान्त आश्विन महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेस होत असावा. पण हिंदुस्थानांत आश्विन शुक्ल प्रतिपदेस एकाद्या शकाचा आरंभ होत होता याविषयीं निश्चित पुरावा त्याला आढळेना. शेवटीं प्रसिद्ध संस्कृतज्ञ **हेन्री टॉमस् कोलब्रुक** यांचें एक पत्र त्यांच्या मुलानें लिहिलेल्या चरित्रांत§ कील्हॉर्नला सापडलें. त्यांत नागपूर प्रांतीं आश्विन शुक्ल प्रतिपदेस वर्षारंभ होतो असें म्हटलें होतें. रामटेकच्या लेखावरून कलचुरि किंवा हैहय वंशाचें राज्य नागपूरपर्यंत पसरलें होतें असें कील्हॉर्नला वाटलें व कोल-ब्रुकच्या पत्रावरून कोलब्रुकच्या कालापर्यंत नागपूर प्रांतीं आश्विन शुक्ल प्रतिपदेस वर्षारंभ होत होता असें दिसलें. तेव्हां नागपूर प्रांतांतील हा वर्षारंभ कलचुरि शक त्या प्रांतांत प्रचलित होता याचा त्यानें द्योतक मानला व त्यावरून त्या शकाचा वर्षारंभ पूर्णिमान्त आश्विन महि-न्याच्या शुक्ल प्रतिपदेस होत असे असा सिद्धान्त त्यानें प्रस्थापित केला.† तेव्हां प्रस्तुत शिलालेखांत कोणत्या राजवंशाचें वर्णन आहे याचा विचार केवळ या शिलालेखाच्या अर्था-करितांच नव्हे तर कलचुरि शकाचा आरंभ निश्चित करण्याकरितांहि महत्त्वाचा होणार आहे.

हा लेख समक्ष पाहण्याची संधि कील्हॉर्नला मिळाली नव्हती. या लेखाचा एक अस्पष्ट छापच त्याच्यापुढें होता. आज शेंकडों वर्षें या लेखाला तेलाचीं, काजळीचीं व चुन्याचीं पुटें बसलीं असल्यानें त्याचीं अवशिष्ट अक्षरेंहि बहुतेक बुजून गेलीं आहेत. त्यामुळें त्यांचा

§ पृ. १६३ पहा. कोलब्रुक हा नागपूरच्या भोसल्यांच्या दरबारीं इंग्रजांचा वकील म्हणून १८ मार्च, १७९९ ते १९ मे, १८०१ पर्यंत होता. सन १७९९ च्या नागपुरांतील दसऱ्याचें वर्णन कोलब्रुकनें केलें आहे. त्यांत त्यानें हें विधान केलें आहे.

† *Festgruss an Roth* या पुस्तकांतील त्याचा कलचुरिशकाचा वर्षारंभ हा लेख पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगला छाप घेतां येत नाहीं व घेतलेल्या छापावरून लेख वाचणें अत्यंत कठिण जातें. रायबहादुर हिरालालनीं हा लेख समक्ष पाहिला होता व त्यांत त्यांना **यादवो वंशः** हीं अक्षरें दिसलीं होतीं. पण यांत देवगिरीच्या यादवांचें वर्णन आलें असावें असें न मानतां किल्हॉर्नच्या मताचाच अनुवाद त्यांनीं केला आहे व हैहयवंशी राजे हे यदूच्या वंशांतील राजे असल्यानें त्यांस यादव मानण्यांत हरकत नाहीं असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. **यदु**, नंतर त्याचा मुलगा **सहस्रजित्** व त्यानंतर **हैहय** अशी वंशावळ पुराणांत आढळत असल्यानें हैहय हे यदुवंशज होते यांत संशय नाहीं. पण रूढीमुळें यादव हें नांव यदूचा दुसरा मुलगा **कोष्टु** ह्याच्या वंशजांनाच प्राचीन काळापासून लावण्यांत आलें आहे.§ कलचुरि राजांचें साम्राज्य उत्तर हिंदुस्थानांत दहाव्या व अकराव्या शतकांत दूरवर पसरलें होतें व त्या वंशाच्या दोन शाखा मध्यप्रांताच्या पूर्वेकडील छत्तीसगढ या भागांत रतनपुर व रायपूर येथें मराठ्यांची सत्ता स्थापित होईपर्यंत राज्य करीत होत्या. हे राजे आपणांस हैहयवंशी म्हणवत. त्यांचे अनेक लेख सापडले आहेत, पण त्यांतील एकांतहि त्यांनीं आपणास यादव म्हटलें नाहीं किंवा आपल्या पूर्वजांच्या यादींत यदूचा उल्लेख केला नाहीं. तेव्हां रामटेकच्या शिलालेखांतील राजे आपण यादव म्हणवीत असल्यानें ते हैहय असणें संभवनीय नाहीं. शिवाय हैहयवंशी राजांच्या नामावळींत जैत्रपाल ह्यासारखें नांव कोठेंहि आढळत नाहीं. हें नांव या लेखांत नवव्या ओळीच्या अखेरीस आलें असावें हें वर दाखविलें आहे. शिवाय प्रस्तुत लेखांत निर्दिष्ट केलेलें सिंहण व रामचंद्र हे राजे हैहयवंशी होते असें मानण्यांत सर्वांत मोठी अडचण येते ती ही कीं, छत्तीसगडांत चौदाव्या पंधराव्या शतकांत रायपूर येथें राज्य करणाऱ्या या राजांनीं किंवा त्यांच्या पूर्वजांनीं रुद्र, आंध्राधिप, चोल, गुर्जरेंद्र या राजांवर कधीं जय मिळविल्याचें त्यांच्या किंवा इतरांच्या लेखांतहि नमूद नाहीं. कारण हे राजे दुर्बल असून यांचें राज्य सामान्यतः रायपूर जिल्ह्याच्या पलीकडे चौदाव्या पंधराव्या शतकांत पसरलेलें दिसत नाहीं. शिवाय या शतकांत रुद्र नांवाचा कोणी राजा राज्य करीत होता असेंहि दिसत नाहीं त्यामुळें प्रस्तुत लेखांतले सिंहण व रामचंद्र हे राजे हैहयवंशी होत हें कील्हॉर्न व हिरालाल यांचें मत बरोबर दिसत नाहीं.

याच्या उलट सिंहण व रामचंद्र ही नांवें देवगिरीच्या यादव वंशांतील प्रतापी राजांची म्हणून प्रसिद्ध आहेत. हे राजे इ. स. च्या तेराव्या शतकांत राज्य करीत होते. नवव्या ओळीच्या शेवटीं आलेलें जैत्रपाल हें नांव सिंहणाच्या पित्याचें दिसतें. सातव्या आठव्या ओळींत रुद्र, आंध्राधिप, चोल वगैरे नांवें जैत्रपाल राजाच्या पराक्रमाच्या वर्णनांत आलेलीं दिसतात. कारण **हेमाद्रीचा** व्रतखंड$ रामदेवरावाचा पैठणचा ताम्रपट‡ इत्यादिकांवरून जैत्रपालानें काकतीयवंशी रुद्रदेवाचा पराभव करून त्याच्या पुतण्यास गादीवर बसविलें असें वर्णन आढळतें. रुद्र राजाचा कांहीं ठिकाणीं आंध्र म्हणूनहि उल्लेख आढळतो. त्यामुळें

---

§ पार्जिटर याचें *Ancient Indian Historical Traditions*, पृ. ८७ पहा.

$ तिलिंगाधिपतेः पशोर्विशसनं रौद्रस्य रौद्राकृतेः। कृत्वा पूरुषमेधयज्ञ विधिना लब्धस्त्रिलोकीजयः।

‡ इंडियन् अँटिकरी, व्हॉ. १४, पृ. ३१६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तुत लेखांतील जैत्रपाल, सिंहण व रामचंद्र हीं नांवें यादववंशी राजांचींच होत असें निर्विवादपणें म्हणतां येतें. यादवांचें राज्य मध्यप्रांतांत पूर्वेस बालाघाट जिल्ह्यांतील **लांजी** या गांवापर्यंत पसरलें होतें, हें लांजी येथील शिलालेखावरून स्पष्ट दिसतें. हा शिलालेख सध्यां नागपूरच्या संग्रहालयांत ठेवला असून त्यांत रामदेवरावाचा उल्लेख आहे.‡

यादवांच्या इतर लेखांवरून सिंहणाच्या नंतर त्याचा नातू **कृष्ण** हा गादीवर बसला असें दिसतें. पण त्याचें नांव या लेखाच्या अवशिष्ट भागांत आढळत नाहीं. तथापि तें पंधराव्या ओळींत आलें असावें असें अनुमान करतां येतें, कारण त्या ओळींत आपल्या सुराज्यानें त्यानें पृथ्वीला सिंहण राजाचा वियोग भासूं दिला नाहीं असें एका राजाविषयीं म्हटलें आहे, तें अर्थातच सिंहणाचा उत्तराधिकारी कृष्ण याबद्दलच असावें. कृष्णाचा बंधु **महादेव** व त्याचा मुलगा **आमण** यांचीं नांवें या लेखांत आलीं होतीं असें वाटत नाहीं. यानंतर मागें सांगितल्याप्रमाणें कृष्णाचा मुलगा **रामचंद्र** राजा याचें नांव १८ व १९ या ओळींत आलें आहे. हा रामचंद्र म्हणजे **श्रीज्ञानेश्वरांचा** समकालीन राजा **रामदेवराव** यादव होय.

प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेले राजे हे यादववंशी होते हें याप्रमाणें सिद्ध झालें आहे. शिवाय कलचुरि किंवा हैहय यांचा एकहि शिलालेख मध्यप्रांतांतील मराठी जिल्ह्यांत सांपडला नाहीं. म्हणून कलचुरि शकाचा वर्षारंभ आश्विन महिन्यांत होत असे हें कील्हॉर्नचें मत नागपूर प्रांताच्या वर्षारंभाच्या रूढीनें सिद्ध होणें शक्य नाहीं.§

प्रस्तुत शिलालेख अनेक ठिकाणीं खंडित झाल्यामुळें तो कोरविण्यांत काय उद्देश होता हें सांगणें कठिण आहे. तथापि १६ व १७ या ओळींत श्रीराघव नांवाच्या अधिकाऱ्याची वंशावळ दिली आहे. व त्यावर राज्याचा भार टाकून रामचंद्र राजा विलासमग्न झाला असें म्हटलें आहे. पुढें ६३ व्या ओळींत कांहीं विशिष्ट काम केल्यावर या राघवाला कृतकृत्य वाटलें असें वर्णन आलें आहे. त्यावरून या लेखाचा उद्देश राघवाची रामटेक येथील कामगिरी—कदाचित् लक्ष्मणाच्या देवळाचा जीर्णोद्धार—नमूद करण्याचा दिसतो. ७० व ७१ या ओळींत माइदेव नांवाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. तो उपरिनिर्दिष्ट राघवाचा रामटेकला नेमलेला अधिकारी असावा.

ज्या टेकडीवर श्रीरामचंद्र व लक्ष्मण यांचीं देवळें बांधलीं आहेत तिचीं सिंदूरगिरि व तपंगिरि अशीं नांवें प्रस्तुत लेखांत आलीं आहेत. यांपैकीं पहिल्या नांवाबद्दलची कथा या लेखाच्या २३ व्या ओळींत आली आहे. ही ओळ बरीच खंडित झाली आहे. तथापि अवशिष्ट

‡ हिरालाल यांची मध्यप्रांत, वऱ्हाड यांतील लेखांची सूचि (द्वितीयावृत्ति) पृष्ठ २० पहा. या सूचींत 'या लेखाचा कांही भाग रामटेक लेखाशीं तंतोतंत जुळतो' हें हिरालालांचें विधान मात्र चिंत्य आहे. कारण तसा भाग आम्हांस आढळला नाहीं.

§ ही रूढीहि कोलब्रुकच्या काळीं नागपूर प्रांतीं प्रचलित होती असें दिसत नाहीं. दसऱ्याचा मोठा समारंभ पाहून कोलब्रुकची तशी समजूत झाली. त्या वेळींहि नागपूर प्रांतीं चैत्रादि शालिवाहन शक प्रचलित होता हें तत्कालीन कागदपत्रांवरून दाखवितां येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भागावरून, 'येथें नरसिंहानें आपल्या तीक्ष्ण नखाग्रांनीं हिरण्यकशिपूचें वक्षःस्थळ फा[ड्]ले, त्यांतून वाहाणाऱ्या रक्तानें हा सर्व प्रदेश माखला गेला, तेव्हांपासून याला सिंदूरगिरि म्ह[णूं] लागले,' ही कथा त्या ओळींत वर्णिलेली दिसते. सध्यां या टेकडीवर नृसिंहाची भव्य [मूर्ति] असलेलीं दोन देवळें आहेत. रायबहादूर हिरालाल यांनीं अनुमान केल्याप्रमाणें सिंदू[रगिरि] हें नांव प्रारंभीं या टेकडीवरच्या तांबूस रंगाच्या दगडांवरून पडलें असावें. या टेक[डीला] तपंगिरि (किंवा तपोगिरि) म्हणण्याचें कारण सिंदूरमाहात्म्यांत असें दिलें आहे कीं, [ये]थें शूद्रमुनि शंबूक तपश्चर्या करीत होता. नंतर श्रीरामचंद्रांनीं मृत ब्राह्मणपुत्रास जिवंत कर[ण्या]करितां आपल्या चंद्रहास खड्गानें त्याचा शिरच्छेद केला. तेव्हां शंबूकानें तीन वर मागित[ले] ते हे कीं, माझ्या देहाचें या ठिकाणीं शिवलिंग व्हावें. श्रीरामचंद्रांनीं या गिरीवर सदो[दित] वास्तव्य करावें व यात्रेकरूंनीं श्रीरामचंद्राचें दर्शन करण्यापूर्वी माझें दर्शन करावें. त्याप्रमा[णें] सध्यां यात्रेकरू टेकडीच्या दक्षिणेच्या टोंकावर असलेल्या धूम्रेश्वराचें प्रथम दर्शन करून न[ंतर] श्रीरामाच्या दर्शनास जातात. शंबूकाची कथा प्रस्तुत लेखाच्या ४५ व्या ओळींत आली आ[हे]. [त्या]तींत धूम्राक्षनामक शिवलिंगाचा उल्लेख आहे.

वाल्मीकि रामायणाच्या उत्तरकांडांत शंबूकाची कथा आली आहे. तेव्हां तेथील व[र्णन] रामटेकास कितपत जुळतें तें पाहूं. उत्तरकांडांत शंबूक शैवल पर्वताच्या उत्तरेस एका विस्ती[र्ण] तलावाच्या कांठीं तपश्चर्या करीत होता असें वर्णन आलें आहे.§ या शैवल पर्वताचा इतर को[ठें] निर्देश सांपडत नाहीं. तथापि रामायणांतच विंध्य व शैवल या पर्वतांमधील देशांवर दण्ड [या] नांवाचा राजा राज्य करीत होता.$ त्यानें एका ब्राह्मण कन्येवर बलात्कार केल्यामु[ळें] शैवल पर्वताच्या आसपासचा शंभर योजनें प्रदेश उध्वस्त झाला व त्यालाच पुढें दंडकार[ण्य] म्हणूं लागले असें म्हटलें आहे.† या दण्ड किंवा दाण्डक्य राजाला इतर ठिकाणीं भो[ज] म्हटलें आहे.¶ भोज हे प्राचीन विदर्भावर राज्य करीत होते हें प्रसिद्ध आहे. तेव्[हां] शंबूक हा विंध्याच्या दक्षिणेस विदर्भांतच तपश्चर्या करीत होता हें उघड आहे. शंबूकाला [ठा]र मारल्यानंतर श्रीरामचंद्र विमानांत बसून देवांसह अगस्त्याश्रमीं गेले असें रामायणां[त] म्हटलें आहे.‡ पण शंबूकाच्या वधस्थानापासून अगस्त्याश्रम किती दूर होता याचा स्पष्ट निर्दे[श]

---

§ दक्षिणां दिशमाक्रामत्ततो राजर्षिनन्दनः । शैवलस्योत्तरे पार्श्वे ददर्श सुमहत्सरः। तस्मिन् सरसि तप्यन्तं तापसं सुमहत्तपः । ददर्श राघवः श्रीमाल्लम्बमानमधोमुखम्॥ अ० ७५, १३-१४. शैवलपर्वताविषयीं टीकाकार राम म्हणतो, शैवलस्य शैवलाख्यस्य विन्धसमीपदक्षिणभागवर्तिगिरेः ॥

$ उत्तरकाण्ड, अध्याय ७९, श्लोक १६

† उत्तरकाण्ड, अध्याय ८१, श्लोक ८

¶ दाण्डक्यो नाम भोजः कामात् ब्राह्मणकन्यामभिमन्यमानस्सबन्धुराष्ट्रो विननाश । अ. १, प्र. ३

‡ उत्तरकाण्ड, अध्याय ७६, श्लो. १६-२०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामायणांत आढळत नाहीं. एकंदरींत, रामायणांत उत्तरेंतल्या स्थळांच्या इतकें दक्षिणेंतील स्थळांचें वर्णन स्पष्ट व निःसंदिग्ध नाहीं. त्यामुळें लंका कोठें होती याबद्दल विद्वानांत वाद माजून राहिला आहे. तथापि उत्तरकांड लिहिलें गेलें त्या काळीं विंध्य पर्वताच्या दक्षिणेस व गोदावरीच्या उत्तरेस विदर्भांत कोठें तरी शंबूकाच्या तपश्चर्येचें स्थान होतें यांत संशय नाहीं. रामायणांतील या स्थानाचें वर्णन रामटेकास जुळेल असें आहे. कारण रामटेकास टेकडीच्या पायथ्याशीं **अंबाळें** नांवाचा तलाव अद्यापि विद्यमान आहे. [या भागांत रामटेकाइतकें शंबूककथेशीं संबद्ध असें प्राचीन स्थान दिसत नाहीं म्हणून उत्तरकांडाच्या कर्त्यासहि रामटेक हेंच शंबूकाच्या तपश्चर्येचें स्थान म्हणून विवक्षित होतें असें मानण्यास हरकत नाहीं.¶]

शिलालेख

ओळ

1 ....**णु**...................................

....**मवाङ्मु**...............................

2 ....**पूजित**......................................

....**स्तत्वे (त्त्वे) न$**.........

3 ....**देवासुरोर**...................................

....**त्रचरितो**.................................

4 ....**कः सुकविसार्थपथे प्रा**.............................

....**प्रोत्सूते** (?)..............................

5 ....**युग्मः ॥ ततोभूद्यादवो वंशः**............

....**किं वर्ण्यतेऽ [यं*]**............

[य] दुवंशजः...

¶ वर उल्लेखिलेल्या सोळा अध्यायांच्या सिंदूरगिरिमाहात्म्याशिवाय आणखी एक ४५ अध्यायांची प्रत नागपूर येथील सुप्रसिद्ध ॲडव्होकेट श्री. **दा. तु. मंगळमूर्ति** यांच्या वडिलांजवळ आम्हांस पहावयास मिळाली. तींत (अ. २, श्लो. २०-२२) तपोगिरि व सिंदूराद्रि या दोन नांवाशिवाय महाशैवल नांवाचाहि उल्लेख आहे. व या गिरीवर श्रीशंकर शैवास आणतात (**अस्मिन् गिरिवरे शम्भो शैवं लाति यतो भवान्**) म्हणून यास शैवल म्हणतात अशी व्युत्पत्ति दिली आहे. हें बृहत् सिंदूरमाहात्म्य पद्मपुराणाच्या कौमारखंडांतून घेऊन रामानंदानें लिहिलें असें त्यांत म्हटलें आहे. पण यांतील शंबूकवधाविषयींचा भाग वाल्मीकि रामायणांतून जशाचा तसा घेतलेला दिसतो. पद्मपुराणाच्या छापील प्रतींत कौमारखंड आढळत नाहीं. तथापि या माहात्म्यांतील वर्णनावरून रामटेकला शैवलगिरी म्हणत असावे या आमच्या अनुमानाला पुष्टि मिळते.

$ या लेखांतील दुरुस्त्या अर्धचंद्राकृति कंसांत व अस्पष्ट अक्षरें चतुष्कोणी कंसांत दाखविलीं आहेत. एखादें अक्षर लेखांत गळालें असल्यास तें चतुष्कोणी कंसांत देऊन त्याला तारकांकित केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

6 ....[क्षो]णिपालष्कालः$ प्रोद्यद्वैरिवीर.....
....जंभशत्रुः । भ्रश्यत्कलंक
विधुम..

7 ....यस्याति भीषणरणांगण.....
....मंडलमिदं स्मरति स
रुद्रको [ला ?]..

8 ....लीवनालीतलग (?
भुजगवा .... त्वमंध्राधिपत्वं
रे चोड विमुंच द [र्प]..............................धरानाथप्रबोध

9 ....षि (खि) लभूपतीनां
शिर [स्सु ?].........................[गुर्ज ?] रेन्द्रः पराङ्मुखो यस्य
पुरो रणेभूत्..................................हेषु महामहीन्द्रे जैत्र
....

10 ....दि [शि ?] प्रभिन्नप्रति
भटविक्र [म ?]..[मौक्तिक*] कौघै
र्गगनमिव सतारं संध्यया स..................[क] रोत्कराणां सौंदर्यस्य

11 ....[क्षो ?]णिपतेरस्य
भूमिपालो .... हासिनिहतप्रति
भटेभकुंभद्वयीपट्टद्य...............................कमुक्ताच्छलात् । अमुष्य

12 .... महीरुहस्य
यशसा चंद्र..वाचस्पतेः ।
तेजोभिर्दिनकृद्रुचामपि हठादा [धि] क्य..................द्रालयभोग-
भूमिरभवत्काल—

13 ....णः§
देवनामा गुणाभि...कृष्ट
चंडकोदंडमुक्तैः शितकांडदण्डैर्विष(ख)ण्डितारक्त.........देहषं (खं)
डैरमंडि क्षितिराहवस्य ।

14 ....
[मा] साद्य शान्ति परमामवाप............जगतीं क्षितिशः । शशाश (स)

$ क्षोणिपाल ॣ कालः असें वाचावें.

§ ' सिंघणदेवनामा ' असें वाचावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्रामतरुस्ततो यष्फलेग्रहि§र्याचकपत्रिपंक्तेः । धराचक्रं भ्रांत्वात् (त्रि) दश—

15 ....
धिष्ण्याय रच्वयत्यहो नृत्यत्क [बंध*]..............अपारसंसारसमुद्रसारै-र्यशः सुधौघैर्वसुधा यदीयैः । श्रीसिंहणक्षोणिपतेर्वियोगतापं जहौ ॥

16 ....
......[म*] हीतले । वायिनायक इति क्षमातले नि..........यशोभरैः । तत्सुतः सकललोकविश्रुतो न श्रुतः क्वचिदपीह यत्समः तस्याप्ययं राघवदेवनामा

17 ....
..................[गु] णगौरवप्रणयिनं श्रीरामचंद्रः प्रभुर्य साम्राज्य-समृद्धिसुंदररुचः पात्रं विधाय श्रियः । क्रीडोद्यानतलेऽषि (खि) लोज्ज्वल-कलालीलागृहस्त्रीजनालाप—

18 ....
.........श्रीरामभूपत्वधरस्य शय्यापालीकृतात्मानममानसत्वं (त्त्वं) ॥ श्रीवैद्यनाथशिवपादपयोजभक्तिसंपादिताषि(खि)लमहत्व (त्त्व) पदाय तस्मै । के के नृपा ज—

19 ....
..................द्वीरं क्षांतिरपि प्रधानकुलजं श्रद्धा यथा सात्वि (त्त्वि) कं । तद्वद्भूषयति स्म यं पृ (प्रि) यतमा सौभाग्यसौंदर्यभू राजायीति गुणाश्रया गुणगणाधारं धुरो—

20 ....
.................दिनकृद्दिनकृद्यु(द्द्यु) तिं । गुरुमात्मीयमित्येष प्रपच्छ तदनु द्विजम् । जानासि सर्व्वं भगवंस्ततस्त्वां पृच्छानि पर्युत्सुकतामुपेतः । अगाध संसारपयोधि—

21 ....
.........................षि (खि)लपारदृश्वा ॥ शय्यापालकुलाधीश निबोधेदं वचो मम । संसारसागरोत्तारकारणं न हरेः परं । अवतारा दशाप्यस्य रामस्ते [षां ?]

22 ....
..................................वायुपुत्रयुक्तो वसत्युत्तमयोगिचिन्त्यः । महीधरस्यास्य तपंगिरेस्तं प्रभावमग्र्यं किमुदाहरामि । विहाय मे.........

§ य ≍ फलेग्रहि असें वाचावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

23 ....

....साद्य रघूद्वहस्य। प्रागत्रदेवो नृहरिः सुरारेर्वि(र्बि)भेद वक्षः करजैः शितोग्रैः। तद्रक्तपूरा-रुणितस्ततो यं . ...

24 ....

....[गु] प-कथां सौंदर्यसारैः पुनस्तद्वद्वक्तुममुं बृ(बृ)हस्पतिसमोऽप्यन्यो हि जानाति कः। पपौ समुद्रं चुलुकेन यस्तं मुनी [श ?]

25 ....

....

मनो मृदु......[रा] मेश्वर इतीह कीर्त्यते । श्रीरामाय मुनीश्वरः कलशभूर्मध्येसभं ब्र (ब्र)ह्मणः। श्रुत्वैतस्य गिरः प्र [भाव-]

26 ....

............विलोक्य सादरं जन्तुर्मुच्यते ब्र (ब्र)ह्महत्यया। गोविप्रवा-(बा)लप्रमदावधादिपापौघपूर्णा अ.........

27 ....

..............लयपर्वतेंद्रे। कृतोपवासा हरिवासरे ये कुर्व्वन्ति रात्रौ रघु-नन्दनाग्रे तपंगिरौ§जागर [णं]......

28 ....

............मराधिकाभैः॥ घंटेश्वरं चैव सुधेश्वरंच केदारमीशं च तथां-जनेयं। द्वारेश्वर......

29 ....

............[म] ज्जनेन दुरितं निर्धूय वं (वं)धच्छिदा स्वाच्छंद्यं मनुजा भजंति भवने भर्गस्य यत्तत्पदं॥ म......

30 ....

..................प्रभावं। शक्नोति वक्तुं न गुरुः सुराणामन्यस्य तत्कस्य............

31 ....

....................श्रीशंष (ख) नाम्नि ᔕ ᔕ ᔕ तृ (त्रि) भुवन-जनतापूज्यपादारविंदं स्नात्वा श्री......

---

§ 'तपोगिरौ' असें वाचावें. सिं. मा. च्या छापील पोथींतहि तपंगिरि असेंच नांव दिसतें. पण दुसऱ्या हस्तलिखित बृहत्सिंदूरगिरिमाहात्म्यांत तपोगिरि असें शुद्ध नांव दिलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

32 ....
......ᔕ ᔕ ᔕ लत्य (?) नलां समयमक्षयः शंखपाण्यंतिकस्थः ॥
ताम्रक्षितीर्थप्रभवां विभूतिं

33 ....
..............................स्व (म्ब) तीर्थे नरः स्नात्वा पूजयित्वां-
वि(बि)कापतिं । अंवि(बि)कानाथसदने याति भोगैकभूमितां ॥
अधिगम्य वरुणतीर्थं

34 ....
ᔕ ᔕ वरुणादि लोकपालैर्व्वंदितचर[ण]...स्व (?) रिशरणं । यत्शु-
क्रतीर्थेऽप्यभिषेकभाजां जायेत पुन्यं (ण्यं) नरपुंगवानां । तदश्वमेधादिम
हामखा (खा) नामोघैर्न लभ्यं न तपोभि—

35 ᔕ रुग्रैः ॥ ती [र्थे] नृसिंहस्य कथं [चि*] दाद्यैः पु [ण्यैः*] समासाद्य
विशुद्धमूर्त्तेः । नरस्य लोकतृ (त्रि)तये करस्थं किमीप्सितं नास्ति
दुरापमन्यैः ॥ अष्टमे च कुरुक्षेत्रनाम्नि तीर्थवरे नरः । निमज्य त्र (ब्र)-
ह्महत्यादिभूजा शुद्धो दिवं व्र—

36 जेत् ॥ तीर्थपंचकमिहाचलराजेयत्रिलोकविदिते विदि [ता]ख्यं ।
तत्प्रभावकथने न समर्थो देवसार्थगुरुरस्ति न सोऽपि ॥ लक्ष्मीतीर्थं तेषु
मुख्यं दुरापा लक्ष्मीर्न स्यान्मज्जतां यत्र तूर्ण्णं । यावज्जीवं पातको-
द्भूतिहेतुप्रोद्य[द्दु]ष्षो (ःखो) द्रेकदारिद्रभाजां ॥

37 किं हंसतीर्थस्य तथा प्रभावः प्रभूतपुण्योजव(ज्ज्व)लकेतनस्य । ख्या
[ख्या] यते यज्जलपानतोऽपि हंसो हृदिस्थो विमलत्वमेति । श्रीचक्रतीर्थ-
महिमानममानमुर्व्यां गुर्व्वीं प्रवक्तुमपि कस्य नरस्य शक्तिः । यस्य स्वयं
भगवता हरिणा स्वचक्रं रक्षार्थमुद्यतमकल्पि

38 सुदर्शनाख्यं ॥ स्नात्वा धनुस्तीर्थजले धनुश्च प्रदाय हेमाद्रिकृतं
स्वशक्त्या । नरो विदूरीकृतपापराशिः श्रीशार्ङ्गपाणेः सदनं प्रयाति ॥ तीर्थे
पितृणां पितृतीर्थनाम्नि स्नात्वा च कृत्वा पितृतर्पणादि । कोटिं पितृणां
नियतः (तं) पवित्रीकृत्ये (त्यै) ति दिव्यं हि पदं पितृ—

39 णां ॥ गिरेरपाच्यां दिशि वाजिमेधतीर्थे समर्थेऽखिलतीर्थसार्थात् । नरो
निमज्ज्यांगनया समेतस्तनूभवानाशुलभेत धन्यान् । या ररक्ष कलिकालतो
वलाद्धर्ममूर्मिकरपंकजैर्नदी । सा तथास्य कलिपेति विश्रुता संनिधौ
कलिमलं हरत्यलं ॥ सुरनदी च सुरौघ—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

40 समाश्रिता निकटतोऽप्यवहत्यचलस्य सा । सुरनिकेतनभोगसमृद्धिदा
सकृदिवाचमनादिकृतां नृणां ॥ कलिपासुरनद्यंवु (बु)संगादंगाक्षं जांवु-
(बु)नोः । संगं न गणयंत्युच्चैर्मनुख्य (ष्य) मुनिदेवताः ॥ नाश्चर्यमस्मि-
न्मणिकालकुंडं तीर्थोत्तमं प्राप्य समस्तसिद्धीः ।
41 प्राप्नोतिमर्त्यःखलु मुक्तिरस्य प्रसादतः साऽपि न दूरसंस्था ॥ मोक्षकुंडं
समासाद्य दक्ष (क्षि) णस्यां महीभृतः । दुर्लभोऽपि भवेन्मोक्षः सुलभः
प्राणिनां क्षणात् ॥ श्रीरामतीर्थं यदिहास्ति तीर्थं साक्षात्सदर्थप्रथितप्रभावं
तस्याप्लुतिप्रोद्भवपुन्य (ण्य) राशे$ष्फलप्रदाता दशकंधरा—
42 रिः । एकादशीवासरवासभाजां तीर्थे शुभार्थे दशकंठशत्रोः । मुक्तिर्व-
राकी करपंजरस्था करोति सेवां गृहसारिकेव । यत्कार्तिके मासि नरो
निमज्य श्रीरामतीर्थे दशकंधरारिं । भक्त्या प्रपश्येन्न शरीरकोशे कीटत्व-
मायाति तदन्तरात्मा ॥ सकृन्नामगयाश्राद्धं गिराविह क—
43 रोति यः । लभन्ते पितरस्तस्य मुक्तिमत्यंतदुर्लभां ॥ श्रीरामचंद्रस्य
समीपतोऽहि सिंदूरवापी सुकृतप्रपा सा । यस्या विशुद्धेन विलोकनेन
विजित्यनाकं सुसुपैतिसुकिंत ॥ कर्पूरवापी सुकृतप्रवाहपूरेणपूर्णा किमु
वर्ण्णनीया । देवस्य सीतादयितस्य पार्श्वे दास्यं हि यस्याः कुरुतेऽपि
44 मुक्तिः ॥ काशी नोज्जयिनी न चापि मथुरा नो द्वारका नो पुरी तद्वत्पुण्य-
भरं प्रयच्छतिनृणां वासेन नित्यायुषा । यद्वद्वासरमेकम(?) ष्टितिकृतां
सिंदूरभूमीधरः श्रीरामस्य पदारविंदयुगलस्पर्शेन सर्व्वोत्तमः ॥ जगन्मंगल-
माधत्ते यस्य कुंभद्वयी स्मृता । गजेंद्रवदनः
45 साक्षादत्रास्ते रामकांक्षया ॥ [आस्ते ?] धर्म्मेश्वरो नित्यं स रामस्य
गिराविह । पीडितं कलिना धर्म्मं यः कृपालुरपालयत् ॥ श्रीरामचंद्रस्य
करेण चंद्रहासाद्धतः प्राप्य पदं मुरारेः । स शम्बु(म्बु) कः शूद्रमुनिर्महीध्र-
राजेऽत्र धूम्राक्ष इति प्रसिद्धः ॥ पश्यन्ति मुक्तीश्वरनामधेयं शिवं शिवा—
46 नाथमिहाचलेंद्रे । शिवव्रतस्थाः शिववासरे ये शिवत्वमायांति शिवालये
ते ॥ गोपीजनानंदसमुद्रपूर्ण्णचंद्रो विनिद्रोज्व(ज्ज्व) लपद्मनेत्रः । गोपाल-
मूर्तिर्जगदेकमूर्त्तिर्व्वसत्यसावत्र धराधरेंद्रे ॥ अतीवतेजः प्रसरप्रतप्तं जग-
त्समग्रं कृपया ररक्ष । योऽयं चतुर्थोऽवतरोऽच्युतस्य श्री—
47 मान्नृसिंहोपि वसत्यमुष्मिन् ॥ सतांभोनिधिपूरदूरपिहितं वि(बि)भ्रद्धरां
दंष्ट्रया योऽयं भाति सरोजिनीदलनिभो दन्तेन यद्व§न्मयन् । यं रोमान्तर

$ पुण्यराशेःफलप्रदाता—असें वाचावें.

§ कदाचित् 'उन्मज्जयन्' असा पाठ विवक्षित असेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुप्तवासस्सुखिनो देवर्षयस्तुष्टुवु[1]ष्कल्पान्ते दशकंधरारिसदने सोऽत्रादिकोलः प्रभुः ॥ अनन्यलभ्यामतुलां सपर्यां नित्यं

48 परित्यज्य महेन्द्रदत्तां । श्रीमान्नृप[2]ष्पंक्तिरथोपि पुत्रप्रीत्या वसत्यत्र गिरीन्द्रसानौ ॥ सुतौ श्रीरामचंद्रस्य गिरौ कुशलवाविह । दधाते कल्पवृक्षत्वं भक्तिभाजां जगत्प्रभू ॥ मातरोष्टा महासिद्धिनामधेयोपलक्षिताः । अत्र तिष्ठंति भक्तानामणिमाद्यष्टकप्रदाः ॥ कल्पान्ते कवली-

49 करोति सकलं त्रैलोक्यमल्पेतरज्वालाजालकरालकालवदनो य[3]ष्कालि काकेलिभूः । सिन्दूराचलमीक्षणं क्षणमपि क्षीणास्य (?) वासस्पृहः श्रीरामस्पृहया करोति भगवान्किं वा महाभैरवः ॥ पंचास्यं चंद्रमौलिं दशभुजमुदयत्कोटिभानू—

50 दयश्रीः...वरशरधनुः शूलष (ख) ट्वांगहस्तं [।] हृत्पद्मे भक्तलोकाभयवरदकरं चिन्तयन्यं नरः स्यात्त्रैलोक्ये सिद्धिसम्राड्वसति पवनजः सोऽत्र रामैकभृत्यः ॥ मालां पुष्पमयीमिव क्षितिमिमां वि (बि) भ्रच्छिरोभिर्व्विभुः श्रीरामावतरे हरेः सहचरः शंखोऽप्यशंखात्मकः । आस्ते सोऽ [त्र] स—

51 मस्तभक्तजनतातत्तन्मनोवांछितं संयच्छ[4]न्जनकाधिराजतनयानाथांतिकेलक्ष्मणः ॥ यन्नामस्मरणात्प्रयाति निषि (खि) लः पापाद्रिरुच्चैः क्षयं या विश्वैकपतिव्रताध्वनि गुरुर्देवी दयैकापगा [। *] या शापेन निनाय भस्मकणिकाभूयं न लंकापतिं कर्त्ता मे दयिताऽ [स्य]

52 नाशमिति साप्यत्रास्ति रामान्तिके ॥ इहाचलेंद्रे दशकंठशत्रोर्व्विलोक्य मूर्तीः खलु...सत्यैः । [प्रयाण ?] काले न करोति भीतिं [कान्तासमं ?] संहतिघोरमूर्त्तेः ॥ भक्त्या महत्या प्रभुमादिरामं जगत्सुषा (खा) रामतनुं निरीक्ष्य । नरः सुरेंद्रादिकरोपनीतपूजाग्र्यपात्रत्वमु [पैति] [नि ?]

53 त्यं ॥ श्री [भो] गराममभिरामतनुं निरीक्ष्य क्षीणाषि (खि) लाघसरणिः शरणे मुरारेः । भोगा [नभंगुररसा]न्सुचिरं विचित्रान्प्राप्नोति कल्पशतमलिपतदेवराजः ॥ दृष्ट्वा प्रकृष्टमहिमानमनन्तभक्त्या तं गुप्तराममतिगुप्तपदंच किंचित् । प्राप्नोति यत्तदिह किं ननु देवरा [जो]........

१ स्तुष्टुवुः कल्पान्ते असें वाचावें.

२ ...श्रीमान्नृपपंक्तिरथो—असें वाचावें.

३ ' य ≍ कालिका—' असें वाचावें.

४ ' संयच्छञ्जनकाधिराज ' असें वाचावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

54 तद्गुरुरथांगिरसोऽपि सोऽपि ॥ श्रीशंखरामं प्रणिपत्य मर्त्यः पदं स
भ्येति हि शंखपाणेः । विशुद्धभावेन हृदा महेंद्रमुख्यादिदेवैरभिवंद्यमान
जगन्महानंदनिदानमीशं श्रीमैथिलीलक्ष्मणदेवयुक्तं । श्रीरामदेवं प्रणिप
मूर्द्ना नमस्करिख्ये (ष्ये) ल्पतरैर्व्व ॥

55 देव श्रीरघुनंदन तृ(त्रि)जगतामद्वैतवादप्रभो भास्वद्वंशमहाविभूषण
कारुण्यरत्नाकर । त्रैलोक्यारिदशास्यकंठदशकच्छेदोल्लसत्पाणये पा
....................ते त्रैलोक्यगोप्त्रे नमः ॥ देव [क्षी] रसमुद्रसांद्र
हरी......[नि]र्मथ्य हृत्कीर्त्तयेत्ताद्दग्गुण—......

56 विश्वैकभर्त्रे नमः ॥ श्रीरामाय हनूमदादिवदनांभोज ⏑ — — ⏑— भं
श्रीजनकक्षितींन्द्रतनयानंदैककंदायच । देवत्वां स्फुरदुग्रशोषण ⏑——
— ⏑ — — ⏑—, — — दारचाद्दुस्तु...

57 ध्वस्ता (?) त्यन्तसुजात्यरत्नचयभाभ्राजिष्णुपादांवु(बु)जं..........
................रि......पाद......ल.......... जाम्रुधिप्रहारो........
....निषि(खि)लं विलोक
नाशक्षमं धाम्ना येषु सहस्त्रपूर्णरुचिस..........मं नुमः ॥............

58 विसर्परोगं जगतीनाथ...........भक्तजन.........नामस्मृतेः । गत्
तिप्र ....
देवत्वां करुणां............................सिंदूरजं रेणा शमयन्तम...

59 क्षो भुजा (?) तेजसां । कुर्व्वाजेन मदिष्टवृष्टिमभृतासारा......प्रोन्म
थिनीं.........प्रार्थितदा (?) प्रभाकर......................................
.... म्वि (म्बि)कासूनु.....
सिंदूराचलमौलिकलिप...

60 प्रतिष्ठं विभुं कुंभोद्भूतमुनीश्वरेण भगवन्वंदे मुदे नित्यशः..........त्वां पुरुष
पुरातनमजं तत्त...
भगवते भक्त्या नमोऽस्तु प्र [भो*]...

61 रामदेवं य [:] स्तौति मर्त्यः पवित्रधीः । सिंदूराचलमौलि..............
.... काशीप्रभृ ....
कल्पांतावधिनिर्मलाखिलजला वृक्षा...

62 लः । आस्ते वा (बा)लसमुद्र एष विलसद्देवालयाली मिल..............
...जलो जलेक्षणकृतां देवा..
..................घ[?]न्यया समभ्यचर्य नरोभक्त्यान.............................

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

63 विद्वान् । दुर्लभां लभेत कां कां न हि सिद्धिं विशुद्ध [धीः ? ¶]
............रगणितानि देवश्चिरा..
............भरणं गरीयः श्रीराघवोऽमंस्त कृतार्थमुच्चैः । ¶

परिशिष्ट

शिलालेखांत उल्लेखिलेल्या देवळांची, नद्यांची व तीर्थांची यादी.

रामेश्वर रामटेक गांवांत रामाळें नांवाच्या तळ्याजवळ असलेलें हें शिवलिंग होय. सिं. मा.§ (अ. ६, ओ. ४) मध्यें ही रामेश्वर नामक शिवलिंगाचा उल्लेख आहे, पण तें नंदिवर्धन गांवांत आहे असें म्हटलें आहे.

घंटेश्वर सिंदूरमाहात्म्यांत (२,१) हा रामटेकच्या पूर्वेस आहे असें म्हटलें आहे. अ. २ श्लो. १९ वरून हा कलिपा व सुरनदी यांच्या संगमाजवळ होता. तें देवालय आतां खिंडसी तलावांत बुडालें आहे.

सुधेश्वर सिं. मा. (२,१) मध्यें याला सिद्धेश्वर म्हटलें आहे. अ. ३ श्लो. २२ वरून सुधेश्वराचें मंदिर दक्षिणेस होतें असें दिसतें. नंदिवर्धनांत पुष्करणीजवळचें मंदिर विवक्षित असावें.

केदारेश हें मनसर येथील शिवालय होय.

आंजनेय याचें मंदिर उत्तरेस होतें, (सि. मा. २,१) सध्यां जपाळें तीर्थांजवळ हनुमान आहे तोच येथें विवक्षित असावा.

शंखतीर्थ हें अंबाळ्याच्या पूर्वेला आहे (सि. मा. ५,४).

अग्नितीर्थ हें अंबाळ्याच्या आग्नेयेस आहे (सिं. मा. ५,४).

अंबतीर्थ हें अंबाळा तळ्याच्या दक्षिणेच्या काठावर आहे (सिं. मा. ५,४).

वरुणतीर्थ हें अंबाळा तळ्याचा पश्चिम काठावर आहे (सिं. मा. ५,५).

¶ या पुढील बारा (६४–७५) ओळी अतिशय खंडित झाल्या आहेत त्यामुळें त्या येथें दिल्या नाहींत. ६९ व ७१ व्या ओळींत. माइदेव नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. ७० व्या ओळींत 'मैथिली नाथस्तुष्यति येन मे कुरु...' असे शब्द स्पष्ट वाचतां येतात, त्यावरून श्रीरामचंद्रास संतोष होईल असें एखादें कृत्य गडावर करण्याविषयीं राघवदेवानें माइदेवास आज्ञा केलेली दिसते.

§ श्रीयुत जोशी यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं छापलेल्या पोथीचा येथें सिं. मा. असा निर्देश केला आहे. कंसांतील आंकड्यांपैकीं पहिला अध्यायाचा व दुसरा श्लोकाचा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुक्लतीर्थ हें अंबाळ्याच्या पश्चिमेस आहे. (सिं. मा. ५,५) येथें यात्रेच्या सहाव्या दिवशीं स्नान करतात (सिं. मा. ५,२२).

नृसिंहतीर्थ हें अंबाळ्याच्या उत्तरेला आहे (सिं. मा. ५.५;२५).

कुरुक्षेत्र हें अंबाळ्याच्या उत्तरेस आहे (सि. मा. ५,६).

लक्ष्मीतीर्थ
हंसतीर्थ } यांचीं स्थानें सध्यां निश्चितपणें समजत नाहींत.

चक्रतीर्थ याला सिं. मा. (७,२६)त चक्रालय म्हटलें आहे. येथें चक्रेश्वर नामक शिवालय होतें. (सिं. मा. ७,२६) सध्यां याला चाकोरडें म्हणतात. हें रामगिरीच्या दक्षिणेस एक मैलावर आहे.

धनुस्तीर्थ हें चक्रतीर्थाजवळ आहे. (सिं. मा. ७,२८) याच्याजवळ धन्वीशाचें मंदिर आहे. (सिं. मा. ७, ३४) याच्याजवळ पिप्पल नामक तळें होतें (सिं. मा.७,३५).

पितृतीर्थ सिं. मा. (४,५) त हें तीर्थ पर्वतामध्यें (शैलस्याभ्यन्तरे) आहे असें म्हटलें आहे. याला रामगया असें नंतर म्हणूं लागले (सिं. मा. ४,१५). सध्यां अंबाळ्यापासून खिंडसी तलावाला जाण्याचा जुना मार्ग आहे त्या मार्गावर हें तीर्थ आहे. सध्यां त्याला गायखुरी म्हणतात. कारण सिंदूरगिरिमाहात्म्यांत वर्णिलेल्या पादुका खडकावर उमटलेल्या गाईच्या पावलांसारख्या दिसतात.

वाजिमेध हें गडाच्या पश्चिमेस आहे असें प्रस्तुत शिलालेखांत (ओ. ३९) म्हटलें आहे. नंदिवर्धनास राज्य करणाऱ्या राजानें येथें अश्वमेध केला, त्याचा यूप व विहार जवळ दिसतात असें सिंदूरमाहात्म्यांत (८–७,१४) म्हटलें आहे. हें रामटेकहून नंदिवर्धनास जाण्याच्या वाटेवर लागतें.

कलिपा नदी रामटेकच्या उत्तरेस वाहणारी नदी–प्रस्तुत लेखांत कलीपासून धर्माचें रक्षण केलें म्हणून तिला हें नांव प्राप्त झालें असें म्हटलें आहे. याच्या उलट सिं. मा. (३,२–२६) मध्यें धर्माचा पाठलाग करणारा कलि रामाच्या हुंकारानें नदी झाला. त्यामुळें सुरनदीशीं संगम होईपर्यंत कलिपेचें जल अपेय आहे असें म्हटलें आहे.

सुरनदी हिला सिं. मा. मध्यें एके ठिकाणीं सूर्यनदी (२,२) व इतरत्र सुरनदी (२,१६) म्हटलें आहे. हिचा पुढें कलिपेशीं संगम होतो.

मणिकालकुंड मणिकालांत स्नान करून हिडिंबेची पूजा करावी असें सिंदूरमाहात्म्यांत (२,६) म्हटलें आहे. सध्यां याला मनसर म्हणतात. सध्यां येथें हिडिंबेचें मंदिर नाहीं, पण या तीर्थाला हिडिंबातीर्थ असेंहि म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोक्षकुंड हें दक्षिणेस आहे असें प्रस्तुत शिलालेखांत म्हटलें आहे (ओ. ४१). हें दक्षिणद्वाराजवळ आहे. त्याजवळच्या देवीला मोक्षजा म्हणतात (सिं. मा. २,४). हें नगरधनच्या किल्ल्यामध्यें असावें.

रामतीर्थ याचें प्रथम ईशाल असें नांव होतें. यालाच पुढें पुष्कर व शेवटीं रामतीर्थ म्हणूं लागले. (सिं. मा. १५,४०) कार्तिक महिन्यांत विशेषतः शुक्लपक्षांत येथील स्नानाचें विशेष महत्त्व आहे (सिं. मा. १५,५१). सध्यां याला रामतळें किंवा रामपुष्कर म्हणतात.

सिंदूरवापी ही गडावर नृसिंहमंदिराच्या ईशान्येस आहे (सिं. मा. ५,२). सध्यां हिला सेंदूरबावली म्हणतात व येथून पूजेचें व पिण्याचें पाणी नेतात. हिला स्थानपोथींत सिंदुर्वावी म्हटलें आहे.

कर्पूरवावी ही गडाच्या खालीं जैनमंदिराहून घंटेश्वरास जाण्याच्या रस्त्यावर आहे. हिला स्थानपोथींत कापूरवावी म्हटलें आहे.

गजेंद्रवदन याचें मंदिर शेवटच्या प्राकारांत मारुतीच्या मंदिरासमोर आहे.

धर्मेश्वर याचें मंदिर लक्ष्मण–मंदिराच्या दक्षिणेस आहे.

धूम्राक्ष याला सिं. मा. (५,८) मध्यें धूम्रपंकेश्वर म्हटलें आहे. प्राकाराबाहेर दक्षिणेच्या पठारावर याचें मंदिर आहे.

मुक्तीश्वर रामलक्ष्मणांच्या देवळांना प्रदक्षिणा घालतांना पश्चिमेस याचें मंदिर लागतें.

गोपाल नगारखान्याजवळ याचें मंदिर आहे.

आदिकोल (वराह) याचें मंदिर पूर्वदिशेस आहे (सिं. मा. १६,६५). गडावर पूर्वेकडून जातांना तें उजव्या बाजूस लागतें.

दशरथ याचें मंदिर सध्यां गडावर नाहीं. सध्यां दशरथाचें म्हणून जें मंदिर दाखवितात त्यांत हरिहरांच्या मूर्ति आहेत.

कुशलव ह्यांचें मंदिर सध्यां गडावर नाहीं. सध्यां यांचें म्हणून दाखवितात त्या मंदिरांत गरुडारूढ नारायण आहे.

महाभैरव याचें मंदिर उत्तरेस होतें (सिं. मा. १६,६५). भैरवदरवाज्याजवळ याची मूर्ति आहे. भैरवाचें मंदिर भोगरामाच्या मंदिराजवळ होतें असें स्थानपोथींत म्हटलें आहे.

चंद्रमौलि अंबाळ्याचे पश्चिमेस सूर्यनारायणाच्या देवळाजवळ पंचमुखी महादेवाचें देऊळ आहे.

भोगराम अंबाळ्याकडून गडावर जाणाऱ्या रस्त्यावर डाव्या बाजूस लागणारें हें मंदिर होय. याच्याजवळ महानुभावांचें देवालय आहे. ' भोगरामाच्या मंदिराजवळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीचक्रधरांनीं दहा महिने वास्तव्य केलें. भोगरामाचें देऊळ पूर्वाभिमुख आहे असें स्थानपोथींत म्हटलें आहे.

गुप्तराम याचें मंदिर पुष्करतीर्थाजवळ आहे (सिं. मा, १०–११). सध्यां याला कपटराम म्हणतात. धूम्रेश्वराच्या मंदिराला गांवांतून गेलेल्या वाटेवर हें मंदिर लागतें. स्थानपोथींत याचा उल्लेख आहे. पण तेथें गुप्तरामाचें मंदिर भोगरामाच्या ईशान्येस आहे असें म्हटलें आहे तें बरोबर दिसत नाहीं.

शंखराम याचें निश्चित स्थान सापडत नाहीं. कदाचित् शंखतीर्थाजवळ असावें§

§ याशिवाय सिंदूरगिरिमाहात्म्यांत मार्कंडेयतीर्थ, बृहदालं सरः, गुरुतीर्थ, ऋणमोचनतीर्थ, पापमोचनतीर्थ, पापदाहतीर्थ, नागार्जुन वगैरेंचा उल्लेख आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठशाही लष्कर

(इ. स. १७९५)

[खडर्याच्या मोहिमेवर हजर असलेल्या मराठी लष्कराबाबत मॅलेटनें सादर केलेला रिपोर्ट]

[लेखक—**वि. गो. दिवे**, M. A., पुणें]

[" मराठशाही लष्कराची उभारणी, घटना, त्याची शिस्त, व्यवस्था ही पाश्चात्य पद्धतीपेक्षां अगदीं निराळी आहे, मी स्वतः जातीनें मराठी सैन्याबरोबर हजर राहून प्रत्येक गोष्ट पाहिली आहे, याचें विस्मरण होऊं नये म्हणून हें टिपण तयार करतों. " अशी सुरुवात करून पुणें दरबारीं अकरा वर्षे (१७८६–१७९७) वकिलीवर असलेल्या सर **चार्लस मॅलेट** यानें एक अत्यंत महत्त्वाचा, माहितीपूर्ण रिपोर्ट आपल्या वरिष्ठांना सादर केला. पेशव्याच्या निशाणाखालीं एकत्र होऊन सर्व मराठी फौजा लढल्याचा खर्ड्याचा रणसंग्राम हा शेवटचा प्रसंग होय. यानंतर आठच वर्षांत **वसई**चा तह मान्य करून बाजीराव आपलें स्वातंत्र्य गमावून बसला व **असई, लासवारी, आडगांव** या ठिकाणीं शिंदे भोसल्यांचा पाडाव करून इंग्रजांनीं मराठी संयुक्त साम्राज्याचा निकाल लावला. साहजिकच इंग्रजांपुढें मराठे इतके निष्प्रभ कां ठरले असा मनांत विचार येतो. मराठ्यांचे गुणदोष, त्यांच्या लष्कराचें स्वरूप, त्यांची शिस्त याचा अभ्यास चिकित्सापूर्वक, शास्त्रशुद्ध, झाल्याशिवाय या प्रश्नाचें समाधानपूर्वक उत्तर मिळणार नाहीं. राष्ट्राचा उत्कर्षापकर्ष व्यक्तींवर फार थोड्या प्रमाणांत अवलंबून असतो. मराठी लष्कराबाबतचा हा महत्त्वाचा खलिता सर **जदुनाथ सरकार** यांनीं इंडिया ऑफिसच्या दप्तरांतून मिळविला व तो पुणें रेसिडन्सीच्या निवडक पत्रव्यवहाराच्या चौथ्या भागांत प्रसिद्ध झाला आहे. वाचकांच्या सोयीसाठीं त्याचा अनुवाद येथें दिला आहे. सुरवातीस मॅलेटनें दिलेली पागा पथक्यांची याद गाळली आहे.]

प्रथमच या लष्कराचें संख्याबल किती असावें हा प्रश्न उद्भवतो. या वेळीं पेशव्याच्या निशाणाखालीं गायकवाड व बुंदेले सोडून मराठशाहींतील बहुतेक प्रमुख सरदार जमा झाले आहेत. माझ्या माहितीप्रमाणें हुजरात व पथकें मिळून खुद्द पेशव्याचे सत्तर हजार, हिंदुस्थानांतील फौज सोडून शिंद्याचे पंचवीस हजार, होळकर दहा हजार, भोसले पंधरा हजार,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व परशुरामभाऊ पटवर्धन सात हजार म्हणजे सर्व मिळून एक लाख सत्तावीस हजार सैनिकांचा तळ येथें पडला आहे.

ही सर्व फौज एका सेनानीच्या हाताखालीं नाहीं. शिंदे, होळकर, भोसले, पटवर्धन यांचे आपापल्या विभागावर पूर्ण हुकमत चालत असून, कित्येक पथक्येहि आपल्या पथकांपुरते स्वतंत्रच आहेत. राहिलेली पेशव्याची सरंजामी व नकदी किंवा इतलाखी फौज. या फौजेच्या खर्चाकरितां सरंजाम तरी लावून दिलेला आहे किंवा सरकारी तिजोरींतून पैसा मिळतो. ज्या धर्तीवर पेशव्याची फौज उभारली आहे त्याच पद्धतीवर सरदारांच्या सैन्याची उभारणी झाली आहे. उदाहरणार्थ, मराठी लष्करांत शिंदे होळकरांसारखे, मोठाले सरंजाम जहागिरी मिळालेल्या सरदारांच्या फौजा आहेत; परगण्यांचें उत्पन्न खर्चाकरितां लावून दिलेल्या पाग्यांच्या पागा आहेत आणि शाह मीरखान, मसिअ नोऱ्होना, बाबा शिरोळकर यांची इतलाखी किंवा नकदी फौजही आहे. हाच प्रकार खुद्द शिंदे-होळकर यांच्या फौजांत दृष्टीस पडतो. सरदारांच्या फौजांत छोट्या जहागिरदारांचीं पथकें, सरंजामी पागा व इतलाखी फौज हे सर्व प्रकार आढळून येतात. जहागीर देतांना ठरलेली संख्या पथकांत नेहमीं आढळेल असा मात्र नेम नाहीं. बहुशः ही संख्या कमीच भरते. पथक्यांत नकदी व इतलाखी फौज ही सरंजामी फौजेपेक्षां कमी दर्जाची समजतात. पण त्यामुळें नकदी फौजेच्या सरदाराच्या अधिकारास बाध येत नाहीं, त्याची आपल्या पथकावर इतर सरदारांप्रमाणें पूर्ण सत्ता असते. त्याच्या मार्फतच पथकांतील लोकांना पगार मिळतो. दर माणसीं ठराविक मासिक वेतन व सरदारांना सालीना तैनात अशी योजना असते. देखरेख राहावी म्हणून सरकारांतून प्रत्येक पथकाला दिवाण, फडणीस इत्यादि अधिकारी नेमलेले असतात. पण सरकारांतून पैसा नियमितपणें मिळण्याची मारामार असल्यामुळें इतलाखी फौजेचे सरदारसुद्धां, सरकारी तपासणी चुकविण्याकरतां अनेक युक्त्या लढवितात. लांचलुचपत सर्व अधिकाऱ्यांत सर्रहा चालू असल्यानें १०० चे पथकांत जेमतेम निम्मे लोक असावयाचे. बिचाऱ्या शिपायांच्या हातांत पगाराची पुरती रक्कम कधींच पडावयाची नाहीं.

पथकांत शिपायांची संख्या ठराविक असावी असा सुद्धां निर्बंध नाहीं. एका पथकांत पन्नास स्वार असतील तर दुसऱ्यांत पांचशें! प्रत्येक पथक्या आपल्या मगदुराप्रमाणें आपलें पथक तयार करील. दरमाही शिरस्ता वाटतांनादेखील तो एकाला वीसच रुपये देईल तर दुसऱ्याला दोनशें! वास्तविक पाहिलें असतां पागांची उभारणी करतांना जनावर व हत्यार, सरदाराचें वा सरकारी असावें असा सामान्य नियम; पण तो नेहमींच पाळला जातो असें नाहीं. प्रत्येक पथकांत स्वतःच्या मालकीचा घोडा व हत्यार असलेले किती तरी शिलेदार असतात, आणि मराठी सैन्यांतील प्रत्येक शिपाई जरी आपल्याला सरदाराच्या तोलाचा समजतो, तरी बारगिरापेक्षां § शिलेदाराचा दर्जा मोठा समजतात. इतलाखी फौजेप्रमाणें देखरेख ठेवण्यासाठीं प्रत्येक सरंजामी पागेवर दिवाण, फडणीस इत्यादि सरकारी अधिकारी असतात. पण देखरेख करण्याऐवजी हे अधिकारी लांचलुचपतीला इतके सोकावलेले असतात कीं,

§ सरकारी जनावर व हत्यार वापरणारा सैनिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घोड्याच्या दाणाचंदीमध्यें नेहमींच गफलत होते. खोगीरभरतीपुरती घोडीं हजर करणें, घोडीं मेल्याचे खोटेच दाखले देणें, इत्यादि प्रकार हमेशा उघड उघड चालतात. सरकारहि हें सर्व जाणून असतें आणि कांहीं वेळेला पागेच्या तैनातीची रक्कम देण्याचें नाकारतें. पैसा न पोंहोच- ल्यामुळें सैन्यांत वारंवार दंगेधोपे होतात. बराच पैसा फसवून हाताआड केला असल्यामुळें पथक्यासुद्धां प्रसंग सहसा निकरावर येऊं देत नाहीं. बरें, सरकारांतून पैका नियमित न आल्या- मुळें त्याला शिपायांना वाटेल त्या सबबी सांगतां येतात. गरीब बिचारा शिपाई, एक पथक सोडून दुसरीकडे नोकरी पाहातो व अशा रीतीनें त्याची सर्वस्वी नागवणूक होते, किंवा खर्च भागविण्याकरितां आपल्या पथकाच्या जमादारांकडून किंवा कारकुनाकडून भारी दरानें कर्ज काढतो.

बारगीर शिलेदारांशिवाय मराठी सैन्यांत एकांड्यांचा आणखी एक वर्ग आहे. एकांडा म्हणजे एकटा. हे एकांडे मोठ्या खानदानीच्या घराण्यांतील असून आपल्या तैनातीकरितां दोन चार पोगें बरोबर घेऊन चाकरीकरितां बाहेर पडतात. मोठाले पगार, व बसावयाला आपल्या पागेंतील निवडक घोडीं देऊन, जिवास जीव देणार स्नेही म्हणून या एकांड्यांस मातबर सरदार आपल्याजवळ चाकरीस ठेवतात.

मराठी राउतांचीं हत्यारें म्हणजे तलवार, भाला, तोड्याची बंदुक आणि क्वचित् धनुष्य- बाण. तलवार ही प्रत्येकाजवळ असावयाचीच; भाल्याची जागा आतां तोड्याच्या बंदुकीनें पटकावली आहे. प्रत्येक जण बहुतेक बंदुक बाळगतो. पण जातिवंत एकांडा किंवा शिलेदार फार झालें तर दोन पल्लेदार तलवारीशिवाय दुसरें हत्यार जवळ ठेवणार नाहीं. शिलेपोस व हत्यार स्वाराच्या मालकीचें असल्यामुळें त्यांच्यांत एक तऱ्हा कधीं आढळावयाची नाहीं. प्रत्येक जण आपल्या आवडीप्रमाणें व मगदुराप्रमाणें आपला जामानिमा तयार करील.

प्रत्येक पथकाबरोबर फक्त एक राहुटी, शामियाना याशिवाय डेरे तंबू दिसावयाचे नाहींत. राउतांचे घोडे समोरासमोर बांधून जो रस्ता तयार होतो त्या रस्त्याच्या टोकाला राहुटी उभी करतात. या राहुटीचा उपयोग राऊत फक्त पाऊस वाऱ्याचे वेळीं करील, इतर वेळेला सकाळ- संध्याकाळ ही राहुटी म्हणजे शिलेदारांची बसण्याउठण्याची जागा. राउतांचा मुक्काम नेहमीं आपल्या घोड्याजवळ. तेथेंच तो आपलीं हत्यारें, जामानिमा ठेवील, तेथेंच जेवणखाण उरकेल व तेथेंच तो रात्रीची विश्रांति घेईल. पथकाबरोबर कणखर तट्टें असतात. कूच करून दुसरा मुक्काम सैन्य गांठतें तों मोतद्दार हीं तट्टें आसपास फिरवून कहीकबाड, घासदाणा जमा करून आणतात. किंवा स्वाराचें सामानसुमान मुक्कामाला पोंचतें करून घासदाण्याच्या शोधार्थ बाहेर पडतात. इतकेंहि करून जनावराच्या चारापाण्याची सोय झाली नाहीं तर स्वतः राऊत बाहेर पडून आपल्या जनावराची सोय लावील आणि नंतर स्वतःच्या सोईकडे पाहील.

आतांपर्यंत मराठी फौजेचें म्हणजे घोडदळाचें वर्णन झालें. अलीकडे मराठ्यांनीं पायदळ व तोफखाना उभारण्यास सुरुवात केली आहे, पण या बाबतींत त्यांनीं सर्वस्वी पाश्चात्यांच्या पद्धतीचें अनुकरण केलें आहे. एथें त्याचें वेगळें वर्णन करण्याची जरुरी नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सैन्याचें कूच

आदल्या दिवशीं चिठ्या पाठवून सरदारांना कूच करण्याचा हुकूम कळविण्यांत येतो व रात्रीं फौजेंत दवंडी पिटून सर्वांना तो जाहीर करतात. दुसऱ्या दिवशीं पहाटे चार वाजतां मोठी नौबत वाजते व सर्वांना सूचना मिळते. थोड्या वेळानें दुसऱ्यानें नौबत झडतांच बिनीवाला पेशव्याचें निशाण घेऊन बिनीच्या पथकासहित कूच करतो. शत्रूपासून धोका असल्यास बिनीच्या पथकास दुसऱ्या पथकांचें साह्य मिळतें. बिनीच्या पथकांबरोबर सरदारांच्या बिनीहि बरोबर पडतात व त्यांच्याबरोबर लष्करचा बाजार, बाजे लोक, प्यादे, तोफखाना व बहिरबुणगे मुक्काम हालवितात. पेशव्याचा बिनीवाला पुढें जाऊन पाण्याची सोय पाहून निशाण रोवून नवीन मुक्कामाची जागा कायम करतो. त्याच्या पाठोपाठ बाजारबुणगे येऊन पोहोचतात. कूच करतांना शिस्तीचा अभाव असल्यामुळें बुणग्यांत एकच गर्दी होते. पेशव्यांच्या ढालाच्या रोखानें प्रत्येक सरदार आपले डेरे तंबू उभारतो. तळावर डेरे तंबू उभारतांना शिस्त किंवा व्यवस्थितपणा कसा तो बिलकूल दिसावयाचा नाहीं. घोडीं, तट्टें, गाडे, उंट, तोफखाना यांचा एकच खच पडतो. नाहीं म्हणावयास मुख्याच्या तंबूसमोरील बाजारचा रस्ता मात्र याला अपवाद असतो. प्रत्येक सरदारानें मुख्याच्या डाव्या किंवा उजव्या बाजूस आपल्या दर्जाप्रमाणें ठराविक अंतरावर डेरे द्यावे हें ठरलेलें असतें व प्रत्येक जण आपल्या मानाप्रमाणें आपला मुक्काम 'हेड क्वॉर्टर्स' नजीक राखण्यास जागरूक असतो. सरदाराची मुक्कामाची जागा कोठें असावी हें ठरलेलें असलें तरी डेरे उभारतांना ती कायम करून अंतर आंखलेलें नसतें; तसेंच कोणाची फौज किती आहे हेंसुद्धां निश्चित नसल्यामुळें एकच बजबजपुरी माजते. नदीकाठीं उताराच्या ठिकाणावर मुक्काम झाल्यास दोन्ही तीरांवर फौजा उतरून आघाडी व पिछाडीकडे पसरलेल्या असतात. उजवी किंवा डावी सांभाळली जात आहे किंवा नाहीं इकडेच फक्त सर्वांचें लक्ष असतें.

ढाला देऊन मुख्याची जागा निश्चित झाली म्हणजे सरदारांचीं निशाणें त्यांच्या त्यांच्या जागेवर उभारलीं जाऊन त्याच्या अनुरोधानें सरदारांचे तंबू ठोकतात व त्यांचे बहिरबुणगे त्यांच्या आसपास उतरतात. इतकें होतें तरी सरदाराचा मुक्काम अद्याप पहिल्या तळावरच असतो आणि एथेंच तो स्नान, पूजा व सकाळची न्याहारी एका लहानशा राहुटींत आटपतो. सामानसुमान, राहुट्या सर्व कांहीं बिनिवाल्याबरोबर पाठवून, फौज सरदाराच्या निघण्याची वाट पाहात तयारीनें राहते. स्नान, न्याहारी आटपून सुमारें ९–९॥ चे सुमारास सरदाराची स्वारी गजारूढ होऊन मोठ्या थाटानें आपल्या फौजेसहित निघते व दुपारीं आपल्या नवीन मुक्कामात पोहोचते. ही वेळ सरदारांना सोईची पडते, त्यांना मुक्कामावर स्नान, न्याहारी करतां येते व वाट चालतांना हत्ती किंवा पालखीसारख्या वाहनाची सोय असते. फौजेची याविरुद्ध मोठी ओरड आहे. एक तर सामानसुमान पुढें गेल्यामुळें राबतांना आडोशाला कांहीं राहात नाहीं व भर उन्हाच्या तापांत कूच करावें लागतें. यामुळें वैराण मुलखांतून कूच होतांना माणसांचा फारच गळाठा होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वि. गो. दिघे

लष्कराची छावणी

पेशव्याच्या किंवा मुख्याच्या ढाला नवीन मुक्कामावर दाखल झाल्या कीं पाठोपाठ लहान मोठ्या सरदारांचे बिनीवाले आपापल्या मुख्याच्या ढाला घेऊन हजर होतात व आपली नवी जागा कायम करतात. या नवीन जागा ठरतांना दंगेधोपे ठरलेले. गोटांतील एका भागामध्यें मात्र व्यवस्थितपणा दृष्टीस पडतो, तो म्हणजे लष्करचा बाजार. मुख्य सेनानी व सरदार यांच्या डेऱ्यासमोर रुंद रस्ता आंखून त्याच्या दोहीं बाजूस पाल उभारून वाणी, उदमी आपलीं दुकानें मांडतात. या बाजारांत हरएक जिन्नस खरेदी करता येतो. हा भाग सोडला तर मात्र बाकीच्या तळास विस्कळित पसरलेल्या जत्रेच्या बाजाराचें स्वरूप येतें. व गर्दींतून मुक्कामाच्या मध्यभागीं पोहोचणें मोठें मुष्किलीचें होतें. शत्रूची जर का एकाकी आवई आली तर गोंधळ विचारायला नको! तोफांचे गाडे या गर्दींतच कोठें तरी मिसळलेले असल्यामुळें तोफा बाहेर काढतांना अपघात होण्याचा फार संभव असतो.

डेरे तंबू उभारले गेले कीं, भारदारीचीं तट्टें, उंट, घासदाणा जमा करण्याकरितां बाहेर पडतात. सरदाराची स्वारी मुक्कामावर दाखल होते तों घासदाणा सैन्यांत येऊन पोहोचतो. घासदाणा जमा करणाऱ्या टोळ्या मोठ्या घटाईनें गांवावर, खेड्यांवर, हल्ला करून टोळधाडी-प्रमाणें वाटेवरील मुलुख लुटून फन्ना करतात. या वेळीं शत्रूचा मुलुख लुटावयाचा, आपल्या मुलखाला हात लावावयाचा नाहीं असा कांहीं निर्बंध राहात नाहीं. दिसेल तेथून लाकूड, सर्पण, गवत, गोळा करावयाचें हें तेव्हढेंच कहीचे लोक जाणतात. या मोहिमेंत पेशव्याच्या तळाच्या १०-१५ मैलांच्या परिघांत फौजेच्या पायमल्लीखालीं कित्येक खेडीं उध्वस्त झालीं असून एक तसूभर लांकूड किंवा गवताची काडी या लोकांनीं शिल्लक ठेविली नाहीं असें मला वाटतें. बहुतेक कारभार फौजेचा म्हणजे राउतांचा. हा असंख्य राउतांचा जमाव कित्येक कोसावर पसरला असल्यामुळें मार्गाच्या (Line of communications) संरक्षणाची काळजी राहात नाहीं. तसेंच लमाणांचे तांडेच्या तांडे हजारों बैल घेऊन सैन्याबरोबर हिंडत असल्यामुळें मार्ग चालतांना पाण्याशिवाय दुसरी सोय पाहण्याचें कारण नसतें. माघार घेण्याची वेळ आल्यास पिछाडीस वाटेवर तटबंदीच्या जागा, धान्यसामुग्रीचे साठे तयार ठेवण्याची त्यांना या कारणानें जरूर भासत नाहीं. गोटाच्या सुरक्षितपणामुळें सैन्याबरोबरील बाजारांत सर्व प्रकारचे व्यापार-उदीम, धंदे चालतात. तेथें हरएक जिन्नस मिळतो. त्यामुळें इतर राष्ट्रांप्रमाणें मराठ्यांना शिपाईगिरी खडतर, कष्टाची वाटत नाहीं आणि वर्षेंच्या वर्षे मराठा शिलेदार घरीं आपल्या गांवीं जितक्या सुखानें राहातो तितक्याच मजेंत तो सैन्यांत असतो. मराठ्यांची राहाणी साधी, त्यांच्या गरजा किती तरी थोड्या व फौजेबरोबर मोठाले बाजार असल्यामुळें लष्करीपेशा पतकर-णाऱ्या शिलेदाराच्या रोजच्या राहाणींत कांहीं विशेष फरक पडत नाहीं, परप्रांतांत सुद्धां तो देशावर असल्याप्रमाणें सुखी असतो. याचा परिणाम म्हणजे इतर राष्ट्रांत दिसून न येणारी अशी शिलेदारीची आवड मराठ्यांत सर्वत्र दिसून येते. या बाबतींत मराठी लष्कर आपल्या इंग्रजी लष्करापेक्षां वरचढच म्हटलें पाहिजे. सरहद्दीच्या प्रांतांतील आपल्या लष्करी छावण्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐषआरामाच्या जागा बनल्या आहेत. सैनिकांना जादा भत्ता चालू असल्यामुळें कामगिरी करून दाखवावी अशी ईर्ष्या राहिली नाहीं. स्वारी शिकारी न करतां चैनबाजीकडे सर्वांचे प्रवृत्ति आहे. डी बॉयननें शिंद्याकरितां उभारलेली ब्रिगेड सुरवातीपासून कामगिरीवर दाखल आहे. आमच्या शिपायांना ज्या सुखसोई आहेत त्या डी बॉईनच्या पलटणांना नाहींत, असें असूनसुद्धां आमच्या पलटणांत ज्या सारख्या तक्रारी, कुरकुरी चालू असतात त्या मराठी पलटणांत ऐकूं येत नाहींत. §

राउतांची ही अफाट फौज समुद्राप्रमाणें चोंहोकडे पसरलेली असल्यामुळें गोटाच्या संरक्षणाकरतां आपल्या इंग्रजी लष्करांभोंवती ज्याप्रमाणें खंदक, चौक्या, नाकीं दृष्टीस पडतात तसें मराठ्यांच्या छावणीभोंवती दिसत नाहींत. नाहीं म्हणावयास रात्रीच्या वेळीं छबिन्याच्या तुकड्या चोंहोकडे हिंडून गस्त घालतात. शिवाय फौजेचा जथ दांडगा असल्यामुळें एक भाग नेहमीं हरोल म्हणून आघाडीस कूच करतो. जसजशी शत्रूशीं समीपता होते तसतशी या हरोलची पुनः विभागणी करून नुसत्या सड्या फौजेच्या तुकड्या आघाडीस राहातात. हत्यारांशिवाय सर्व सामानसुमान कांहीं अंतरावर पिछाडीस ठेवून ही जरिदी म्हणजे सडी फौज नांवाप्रमाणें अगदीं सुटसुटीत राहाते. ११ मार्चला निजामाशीं जें युद्ध झालें त्या वेळीं मराठी सैन्याचे तीन गोट (कँप) होते. सड्या फौजेच्या पिछाडीस २० मैल पाठीमागें मुख्य सैन्याची छावणी होती व या दोहोंमध्यें आघाडीस असलेल्या विभागाचे बाजारबुणगे होते. या सैन्यविभागणीचा फायदा मराठ्यांप्रमाणें घोडदळ वरचढ असलेल्या शत्रूला मिळेल. पण ज्या सैन्यांत पायदळ मुख्य आहे किंवा घोडदळ असूनसुद्धां तें मराठ्यांपेक्षां हलकें आहे त्याला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. इंग्रजी पलटणांची पायदळाची छावणी घेरून वेढा बसविणें मराठी फौजांना संख्याबलामुळें सुलभ आहे. आधींच मराठी फौज म्हणजे स्वारांचा कारभार आणि त्यांत पेंढाराची भर पडते. या पेंढाऱ्यांना पगार तर नसतोच, उलट लुटालूट करण्याला मुभा मिळावी म्हणून लुटीचा भाग ते सरदारांना नजर म्हणून कबूल करतात. शत्रुमुलखांतून मिळणारी लूट हीच या लुटारूंच्या प्राप्तीचें मुख्य साधन असल्यामुळें मुख्य सैन्यापेक्षां यांचाच उपद्रव मुलखाला फार होतो. हे पेंढार, प्रांतच्या प्रांत जाळून लुटून फन्ना करतें. लूटमार करण्यामध्यें पेंढार मोठे वाकबगार; पण शिपाइगिरीचें शौर्य त्यांच्या अंगांत जेमतेमच. लूट मिळविण्याकडे त्यांचें लक्ष असल्यामुळें जीव धोक्यांत पडेल असे प्रसंग ते हटकून टाळतात. छावणींत यांचा विभाग वेगळा असून ते आपापल्या सरदाराच्या गोटाबरोबर राहातात. माझ्या दृष्टीस जे पेंढारी पडले ते बहुतेक मुसलमान होते. पण सर्वच पेंढारी मुसलमान असतात असें नाहीं. लूटमारीची ज्यांना आवड आहे असे सर्व जातीचे व सर्व धर्मांचे लोक त्यांच्यांत आढळतात. बहुतेक पेंढारी माळव्याचे रहिवासी असून ते विशेषतः शिंदेशाही व होळकरशाही म्हणून ओळखले जातात. दिसायला तर ते शुद्ध भणंग दिसतात. त्यांचीं जनावरें लहान पण काटक, हत्यारें हलक्या दर्जाचीं

§ हें मॅलेटचें विधान वस्तुस्थितीला सोडून आहे. मराठी पलटणांत शिस्त कमी दर्जाची व पगार जास्त अशी खरी परिस्थिति होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यामुळें कोणत्याहि सुसज्ज फौजेबरोबर सामना देण्याची त्यांची ताकद नसते. लोकांना या लुटारूंची इतकी धास्ती बसली आहे कीं, ज्या मुलखांत मराठ्यांच्या स्वाऱ्या नेहमीं होतात तिकडील बहुतेक गांवांना तटबंदी घातली आहे. कांहीं ठिकाणीं कसब्याच्या गांवीं तटबंदीशिवाय मध्यभागीं गढ्या बांधल्या आहेत.

युद्धाच्या वेळची सैन्यरचना

मराठी सैन्यांनीं समोरासमोर शत्रूंशीं सामना केल्याचीं आतांपर्यंत फक्त दोन उदाहरणें आहेत. पहिलें म्हणजे पानपतचें युद्ध. अब्दुल अफगाण व मोगल घोडेस्वारांनीं मराठ्यांना घेरून त्यांची रसद बंद करून उपासमारीची वेळ आणली तेव्हां बाहेर पडण्याकरितां जिवावर उदार होऊन मराठे लढले. या लढाईंत त्यांचा अत्यंत नाश झाला. दुसरा प्रसंग म्हणजे मोतीतलाव एथें त्रिंबकराव मामानें हैदराचा पराभव केला तो. या दोन्ही वेळेला मराठी सैन्याची मांडणी कशी होती याची मला माहिती नाहीं. § अलीकडे मराठ्यांनीं पायदळ व तोफखाना मोठ्या प्रमाणावर उभारण्यास सुरुवात केली असल्यामुळें सैन्याच्या मांडणींत पूर्वीपेक्षां बराच फेरफार झाला असल्याचा संभव आहे. आतां मराठी फौजेला एक प्रकारचा पाया अगर मध्यबिंदु निर्माण झाला आहे. साहजिकच त्यांच्या धावपळीच्या व लुटालुटीच्या लढाईच्या पद्धतींत आमूलाग्र फरक झाला आहे. त्यांनीं तोफखाना उभारून जे नवीन फेरफार केले आहेत; त्यामुळें एतद्देशीय लहानसहान राजेरजवाड्यांविरुद्ध त्यांचें सामर्थ्य वाढलें, पण **माझें असें ठाम मत आहे कीं, पायदळ, तोफखाना जवळ बाळगल्यामुळें त्यांच्या हालचाली पूर्वीच्या चपळाईनें होणें शक्य नाहीं. अवजड तोफखाना व मंदगति पायदळ यामुळें चपळाईच्या भराऱ्या आतां गेल्या, आणि जर कां आपल्या राष्ट्रासारख्या सुधारलेल्या राष्ट्रांशीं त्यांची गांठ पडली तर तोफखाना व पायदळें हीं मराठ्यांना मारकच होतील.** ज्या वेळीं कंपनीचें मराठ्यांशीं युद्ध जुंपेल त्या वेळीं हा मुद्दा निकालांत निघेल. हा समय मोठा आणीबाणीचा ठरून याच्या निकालावर आपल्या पूर्वेकडील साम्राज्याचें भवितव्य अवलंबून राहील. मराठ्यांची साधी राहणी, कपडेलत्त्याच्या बाबतची काटकसर, सारखे स्वारींत राहिल्यानें अंगांत आलेला सोशिकपणा हे त्यांचे गुण पाहिले, आपली कवायती पलटणांचीं छोटीं सैन्यें व त्यांचा घोडेस्वारांचा अफाट सेनासमुद्र यांतील विषमता ध्यानांत आली कीं कांहीं काळ या निकालाबद्दल चित्त साशंक होतें.

पण ११ मार्चला युद्धप्रसंगीं या सैन्याची मांडणी कशी होती हा आपला प्रस्तुत विषय पुरा करतों. वास्तविक पाहिलें असतां या वेळीं दोन्ही पक्षांचें विशेष नुकसान न होतां निजामाच्या केवळ भित्रेपणामुळें मराठ्यांना अकल्पित यश मिळालें. माझ्या माहितीवरून असें दिसतें कीं ११ तारखेला मराठ्यांचा हरोल निजामापासून ६ मैलांवर होता. निजामाचें $ सैन्य

§ ही माहिती अभ्यासकांस काशीराजाची पानपतची बखर व भाऊसाहेबांची बखर यांत मिळेल.

$ परिंडा किल्ल्याचा आश्रय घ्यावा हा निजामाचा विचार. त्या रोखानें तो चालला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मार्ग चालू लागलें अशी बातमी येतांच आघाडीवरील ही मराठी फौज ¶ पुढें सरकतांच तिनें निजामाच्या फौजेला सतावून सोडण्यास सुरुवात केली. मराठ्यांची आघाडी ज्या प्रदेशांतून पुढें सरकली तो खडकाळ, लहान मोठ्या टेकड्या व खांचखळग्यांनीं भरलेला, फौजेच्या कुचाला अत्यंत गैरसोईचा होता. आघाडीच्या फौजेची संख्याहि कांहीं लहान नव्हती. यामुळें या सर्व फौजेच्या हालचाली सारख्या व्हाव्या व ती एकाच वेळीं मोगल फौजेनजीक पोंचावी हें संभवनीय नव्हतें. मध्यभागची तुकडी परशुरामभाऊ पटवर्धनाच्या हाताखालीं होती, तिच्यांत भरणा निव्वळ राउतांचा होता, पायदळ किंवा तोफा मुळींच नव्हत्या. यामुळें साहजिक ही तुकडी सर्वांआधीं निजामाच्या फौजेजवळ जाऊन धडकली आणि मार खाऊन परत फिरली. या अनपेक्षित प्रकाराचा परिणाम मात्र मराठ्यांना अनिष्ट न होतां फायदेशीर झाला. कारण परशुरामभाऊची मोडलेली फौज मागें फिरते तों दुसऱ्या तुकड्या मोगलानजीक जाऊन पोंहोचल्या. भाऊच्या पाठीवर असलेली मोगली फौज थोडकी असल्यामुळें तिला परतावें लागलें. या वेळीं हुजरातची पागा एकदम उठून तिनें शत्रूवर हल्ला चढविला असता तर या मोगली टोळीची केव्हांच धूळधाण झाली असती. पण भाऊनें माघार घेतल्यावर मराठ्यांनीं आपलीं घोडीं कांहीं रणांत घातलीं नाहींत. पुढें वाढून आलेली मोगलांची फौज मागें फिरली ती शिंद्यांच्या तोफांच्या व भोसल्याच्या बाणांच्या माऱ्यानें एक विचारानें योजना ठरून लढाई करावयाची असा बेत आखलेला दिसला नाहीं. कूच झाल्यानंतर प्रत्येक सरदाराला योग्य वाटलें याप्रमाणें त्यानें लढाई केली. बाजार व बहिरबुणग्यांच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या लहान चौक्या व वीस मैल पिछाडीस पेशव्याबरोबर असलेली फौज सोडली तर राखीव फौज म्हणून विभाग वेगळा काढला नव्हता, माघार घ्यावी लागल्यास सैन्यानें कोणत्या मार्गानें कसें परतावें, पराभव झाल्यास पुनः कोणत्या ठिकाणीं एकत्र व्हावें, यासंबंधीं कांहीं एक योजना तयार नव्हती. सर्व फौजेकरितां लढण्याची शिस्त व विशिष्ट योजना नव्हती, तरी शिंद्यांच्या विभागांतील योग्य ती लष्करी टापटीप व बंदोबस्त मात्र नजरेंत भरण्यासारखा होता. पेरॉनची ब्रिगेड आणि मायकेल व जॉनच्या हाताखालील भरभक्कम तोफखाना यांच्या कुचाच्या व लढाईच्या वेळीं हालचाली पद्धतशीर झाल्या. कवायती पलटणांना बाजूंनीं घेरा घालून पिछाडीकडून शत्रूनें हल्ला चढवूं नये म्हणून दोन्ही बाजू व पिछाडी यांचें संरक्षण करण्यास शिंद्यांचीं कित्येक पथकें तेथें तयार ठेविलीं होतीं.

असो. मराठ्यांच्या स्वभावाची विशिष्ट ठेवण, त्यांच्यांतील शिस्तीचा पूर्ण अभाव, विशिष्ट हेतु नजरेपुढें ठेवून आधीं लढाईची योजना आंखून त्याप्रमाणें वागण्याचें त्यांना असलेलें वावडें, या गोष्टी मी पाहिल्या असल्यामुळें माझा असा अंदाज आहे कीं, जर कां या मराठ्यांची एकाद्या कजाख शत्रूशीं गांठ पडली आणि त्याच्याजवळ मराठ्यांच्या घोडदौडीला अटकाव करील इतकें वरचढ घोडदळ असलें तर त्यांची कांहीं धडगत नाहीं.

¶ डावीकडे दौलतराव शिंदे, उजव्या बाजूस भोसले व मध्यभागीं परशुरामभाऊ, तुकोजी होळकर वगैरे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवाजीपंत चोरघोडे यांचें एक वाङ्मयस्मारक

[लेखक—सदाशिव लक्ष्मीधर कात्रे, एम्. ए., उज्जयिनी]

प्रास्ताविक

इसवी सनाच्या अठराव्या शतकाचा उत्तरार्ध बृहन्महाराष्ट्रास अत्यंत धामधुमीचा व आणीबाणीचा असा गेला. या काळांत मराठेशाहींत व संबद्ध प्रदेशांत दिग्विजयाच्या अनेक प्रयत्नांबरोबरच उलट–सुलट राजकीय डावपेच, हल्ले–फेरहल्ले, जय–पराजय, संधि–विग्रह, फितुरी–सचोटी, धरसोड–चिकाटी, देवाण–घेवाण, इत्यादि प्रकार अतोनात झाले. त्या ओघानें मुत्सद्देगिरीचें म्हणजे राजकीय शहाणपणाचें मनस्वी पीक येणें अपरिहार्यच होतें. त्या पिकाचा मुख्य यशाचा बहर बहुतेक प्रसंगीं अर्थात्च पुण्याच्या वाट्यास येई. तरी पण आड राहून मुख्य व्यक्तीच्या नांवानें सूत्रें हालविणाऱ्या दुय्यम शहाण्यांचीहि या काळांत सर्वत्र गर्दी होऊन त्यां पैकीं 'साडेतीन शहाणे' म्हणून ख्यात झालेल्या चार व्यक्तींस अतिशय महत्त्व आलें. या साडेतीन शहाण्यांपैकीं **सखाराम बापू** व **नाना फडणीस** या दीड शहाण्यांचा वाटा पुण्यास मिळाला आणि **विठ्ठल सुंदर** व **देवाजीपंत** असा एकएक सबंध शहाणा अनुक्रमें निजामाच्या व नागपूरकर भोसल्यांच्या भागास आला. या चारहि इसमांमुळें वरील काळांत बृहन्महाराष्ट्राच्या इतिहासांत फार महत्त्वाच्या घडामोडी झाल्या असल्याचे दाखले सापडतात.

पूर्वपीठिका व उदय

नागपूरकर भोसल्यांच्या भागास आलेला सबंध शहाणा देवाजीपंत याचें संपूर्ण नांव **दिवाकर पुरुषोत्तम चोरघोडे**. तत्कालीन ऐतिहासिक वाङ्मयांत किंवा पत्रव्यवहारांत याचा निर्देश 'दिवाकरपंत,' 'दिवाकर पंडित,' 'देवाजी पंडित' 'दिवाकर पुरुषोत्तम' 'देवाजी पुरुषोत्तम,' इत्यादि संकेतानें केलेलाहि आढळतो. हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून नागपूर जिल्ह्यांतील नरखेडचा राहाणारा. याचा जन्म इ. स. १७०० च्या जवळपास झाला असावा, पण इ. स. १७५५ सालापूर्वीच्या त्याच्या हालचालींचा मागमूस फारसा लागत नाहीं. नागपूरकर भोसल्यांचा सरदार **त्रिंबकजी राजे भोसले** वावीकर यांच्या **कोन्हेरराम उमरेडकर** या कारकुनाकडे देवाजीपंत हा यापूर्वी शागिर्द म्हणून होता इतकीच माहिती नागपूरकर भोसल्यांच्या बखरींत सापडते. इ. स. १७५५ सालीं पहिला **रघूजी भोंसले**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मरण पावल्यानंतर त्याच्या मुलांपैकीं **जानोजी** व **मुधोजी** यांचीं सेनासाहेबसुभा–पदासाठीं भांडणें चालू असतां जानोजीच्या पक्षाचे त्रिंबकजी राजे व बाबूराव कोन्हेर हे जानोजीसाठीं रीतसर वस्त्रें मिळविण्यास पुण्यास गेले होते. त्या वेळीं वस्त्रांबद्दल पेशव्यांचा नजराणा किती ठरवावा यासंबंधीं वाटाघाट चालू असतां देवाजीपंतानें मध्यें पडून उभय पक्षांस संमत आणि सोइस्कर अशी रकम ठरवून दिली. या कामगिरीमुळें देवाजीपंतावर जानोजी व **नानासाहेब पेशवे** या दोघांचाहि लोभ जडून येथूनच त्याच्या उदयास प्रारंभ झाला. ¶

इतिहासकार श्री० यादवराव काळे यांनीं देवाजीपंताच्या भाऊबंदांच्या नागपूर व नरखेड येथील विद्यमान वंशजांकडे देवाजीपंतासंबंधीं जुने कागदपत्र मुळींच सापडत नसल्याबद्दल निराशेचे उद्गार काढले आहेत.§ पण आणखी प्रयत्न झाल्यास किंवा योगायोगानें नागपुरांतील इतर प्राचीन घराण्यांच्या दप्तरांतून देवाजीपंताविषयक जुनें वाङ्मय अजूनहि मिळणें शक्य आहे याचें प्रत्यंतर देतांना आज मला आनंद वाटत आहे. नागपूर येथील ऐतिहासिक महत्त्वाच्या ' जामदार ' † घराण्याच्या दुय्यम शाखेंतील सुप्रसिद्ध कै. श्री. मोरेश्वर आत्माराम ऊर्फ मोतीबाबासाहेब जामदार यांजकडील प्राचीन पोथ्यांचें निरीक्षण त्यांचे पौत्र श्री. आत्माराम बळवंत ऊर्फ तात्यासाहेब जामदार, ॲड्व्होकेट, यांच्या परवानगीनें ऑक्टोबर १९३६ च्या सुमारास मी करीत असतां त्यांत ' **पुरञ्जनचरित** ' नामक एका पंचांकी संस्कृत नाटकाची हस्तलिखित प्रत मला आढळली. नाटक अप्रसिद्ध दिसल्यावरून तें बारकाईनें वाचूं

¶ नागपूरकर भोंसल्यांच्या इ. स. १७५५-१७८१ च्या इतिहासांतील महत्त्वाच्या बहुतेक सर्व घडामोडींत देवजीपंताचें अंग प्रामुख्यानें असलेलें दिसतें. या लेखांत त्या सर्व घडामोडींचा परामर्श घेणें शक्य नाहीं व आवश्यकहि नाहीं. देवाजीपंताच्या कामगिरीची संदर्भासह माहिती करून घेण्यासाठीं जिज्ञासूंनीं ' नागपूरकर भोंसल्यांची बखर, ' ' नागपूरकर भोंसल्यांचा ऐतिहासिक पत्रव्यवहार, ' ' कॅलेंडर ऑफ पर्शिअन करेस्पॉन्डन्स, ' बंगालचे जुने इंग्रजी रेकार्ड, ' पेशवे दप्तर ' भाग २०, तसेंच राजवाडे व खरे यांनीं संपादिलेले मराठ्यांच्या इतिहासाचे साधनग्रंथ किंवा सरदेसाई यांच्या रियासतींचे विविध भाग, राखालदास बानर्जी यांच्या ओरिसाच्या इतिहासाचा द्वितीय भाग, या. मा. काळे यांचा ' नागपूर प्रांताचा इतिहास ' इत्यादि उत्कृष्ट इतिहास-ग्रंथच वाचले पाहिजेत.

§ ' नागपूर प्रांताचा इतिहास ' प्रस्तावना, पृ. ४.

† हें ' जामदार ' घराणें कऱ्हाडे ब्राह्मणांचें असून यांचें मूळ आडनांव ' बखले ' असें आहे. या घराण्याच्या नागपुरांतील मुख्य शाखेचा मूळ पुरुष **नारो शंकर बखले** यास पहिल्या रघूजीनें ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकरांच्या शिफारसीवरून अकोटच्या एका मुसलमानाच्या अटकेंतून सोडवून नागपूरास आणलें व कांहीं काळानंतर त्याजकडे भोंसल्यांच्या जामदारखान्याचा मुख्य अधिकार देण्यांत आला. श्री. यादवराव काळे यांनीं ' नागपूर प्रांताचा इतिहास, ' पृ. ५७३, येथें या ' जामदार ' घराण्याची वंशावळ दिली आहे, पण तिच्यांतील कांहीं तपशील चुकीचे व अपुरे असावेत असें वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागलों तों त्याच्या प्रस्तावनेंत व अन्तिम प्रशस्तींत भोसल्यांच्या नागपुरांतीलच कांहीं निर्देश आढळले व थोड्या विचारानंतर तें नाटक देवाजीपंत चोरघोडे यांच्याच एका आश्रितानें रचिलेलें असल्याबद्दल पूर्ण निश्चय करतां आला.

' पुरञ्जनचरित ' नाटकाची पोथी

' पुरञ्जनचरित ' नाटकाची ही ' जामदार ' प्रत बाळबोध (देवनागरी) लिपींत लिहिलेली असून दिसण्यांत १००–१२५ वर्षेइतकी प्राचीन वाटते. तिचीं अदमासें १३/४×५१/४ इंच आकाराचीं प्रारंभींचीं वीस पत्रें विद्यमान आहेत. तेवढ्या भागांत नाटक संपूर्ण लिहिलें गेलें आहे, पण अन्तिम प्रशस्तिपद्याचे दोनच चरण विसाव्या पत्रावर दिसत असल्या-वरून त्यानंतरचें एक पत्र गहाळ झालें असावें असें वाटतें. पोथींत वापरलेली शाई काजळी रंगाची असून हस्ताक्षरादिकांच्या दृष्टीनें पोथीचे दोन भाग पडतात. पहिल्या पत्राच्या द्वितीय पृष्ठाच्या प्रारंभापासून पंधराव्या पत्राच्या प्रथम पृष्ठाच्या अखेरपर्यंतच्या भागांत नाटकाचे प्रारंभींचे चार अंक आले असून पहिल्या पत्राचें प्रथम पृष्ठ व पंधराव्या पत्राचें द्वितीय पृष्ठ कोरींच सोडलेलीं आहेत. या भागांत पत्रांच्या प्रत्येक लिखित पृष्ठावर प्रत्येकीं सुमारें तीस अक्षरें असलेल्या चौदा ते सतरा ओळी आहेत व लेखकाचें हस्ताक्षर सुवाच्य असून लिहिण्यां-तील अशुद्धें अगदीं स्वल्प आहेत. या भागांत पृष्ठांच्या चारहि बाजूंस सोडलेल्या सुमारें एक इंचाच्या मर्यादेच्या जागेंत लेखकानें नाटकांतील प्राकृत स्थळांची संस्कृत छाया व इतर कांहीं संस्कृत टिपणेंहि दिलेलीं आढळतात. सोळाव्या पत्राच्या प्रारंभापासून विसाव्या पत्राच्या अखेर-पर्यंतच्या भागांत नाटकाचा शेवटचा पांचवा अंक अन्तिम प्रशस्तिपद्याच्या दोन ओळींसह आलेला आहे. या भागांत पत्रांच्या प्रत्येक पृष्ठावर प्रत्येकीं सुमारें अठ्ठावीस अक्षरें असलेल्या अकरा ते तेरा ओळी आहेत. लेखकाचें हस्ताक्षर वाईट असून लेखनप्रमाद अतोनात आढळतात. या भागांतहि पृष्ठांच्या चारहि बाजूंस सुमारें एक इंचाची मर्यादा सोडलेली आहे, पण त्या जागेंत लेखकाचीं टिपणें मुळींच दिसत नाहींत व पांचव्या अंकांत प्राकृत स्थळेंच नसल्यामुळें संस्कृत छाया देण्यास मुळांतच अवसरहि नाहीं. पोथीचें शेवटचें पत्र गहाळ असल्यामुळें ही प्रत कोणीं, कोणत्या काळीं व कोणत्या स्थळीं लिहिली तें समजत नाहीं. मात्र दोनहि भागांचे लेखक महाराष्ट्रीय असावेत असें वाटतें. पोथी दिसण्यांत बरीच प्राचीन असली तरी अद्याप साधारण बऱ्या अवस्थेंत आहे.

' पुरञ्जनचरित ' नाटकाची रूपरेखा

भागवतपुराणाच्या स्कंध ४, अध्याय २५ ते २९ या भागांत मूळ पुरञ्जनो-पाख्यान संवादरूपानें सविस्तर दिलेलें आहे व त्यांतच अध्याय २९ मध्यें त्या समग्र आख्यानाचें तत्त्वज्ञानपर निरूपणहि केलेलें आहे. त्याच आख्यानाच्या आधारावर **कृष्णदत्त** नामक मैथिल कवीनें प्रस्तुत नाटक रचिलें आहे. पुरञ्जन राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागांच्या ‡ नगरांत जाऊन तेथील राजकन्या पुरञ्जनीशीं गांधर्वविवाह करतो व त्यांनं तिजबरोबर अंतःपुरांतच सर्व काळ घालवितो. ही संधि साधून गंधर्व, यवन, इत्यादि श चढाई करून पुरञ्जनाचें राज्य हस्तगत करतात व पुरञ्जन स्त्रीवेष घेऊन पळून जातो. त्य वेषांत त्यास खरोखरच 'वैदर्भी' नांवाखालीं स्त्रीत्व प्राप्त होऊन त्याचें **मलयध्वज** राजा लग्न होतें ! नंतर वैदर्भीरूपधारी पुरञ्जन मलयध्वजाच्या विरहामुळें अत्यंत व्याकुळ झा असतां त्याचा प्राचीन मित्र योगिराज अविज्ञातलक्षण यास त्याची कींव येते व तो **नवलक्षणा** नामक कामधेनूच्या द्वारें वैदर्भीरूपधारी पुरञ्जनास कृष्णभक्ति करावयास लावतो. पुरञ्जनानें इतकी तयारी झाल्यानंतर अविज्ञातलक्षण त्यास योगबळानें सत्यपरमात्मज्ञान म्हणजे अद्वैतज्ञा प्राप्त करून देतो. अशा प्रकारचें हें कथानक असून त्याची 'अविज्ञातलक्षण म्हणजे परमात्मा,' 'पुरञ्जन म्हणजे जीवात्मा,' इत्यादि वेदांतपर उपपत्ति लावण्यांत आली आहे. त्यावरून प्रस्तुत 'पुरञ्जनचरित' साधारणपणें कृष्णमिश्राच्या 'प्रबोधचन्द्रोदय' नाटकाच्या धर्तीचे एक दार्शनिक नाटक आहे असें म्हणतां येईल. नाटकाचें कथानक भागवतांतील मूळ आख्यानास धरूनच असून त्यांत प्रायः कांहीं फेरफार केलेले दिसत नाहींत. तरी पण कवीनें त्यांतच मधून मधून स्वतःच्या प्रतिभेची चुणूक दाखविणारे व स्वतःच्या विद्वत्तेचें आणि बहुश्रुतपणाचें प्रदर्शन करणारे प्रसंग निर्माण केलेले आढळतात. दर्शनें, व्याकरण, अलंकारशास्त्र, इत्यादि विषयांचा हा कवि चांगला पंडित असून त्यानें विविध प्रांतांतून बराच प्रवासहि केला असावा असें दिसतें. त्याची गद्यपद्यरचनाशक्ति उत्तम असून नाटकांत इतस्ततः विखुरलेल्या एकंदर १२९ पद्यांत त्यानें बरेच अलंकारहि साधलेले दिसतात. यांपैकीं बहुसंख्य पद्यें संस्कृत भाषेंत असून कांहीं प्राकृत भाषेंतहि आहेत.

नाटकारंभींचा प्रस्तावनेचा भाग ऐतिहासिक महत्त्वाचा असल्यामुळें तो व पांचव्या अंकांतील शेवटचा भरतवाक्यादिकाचा भाग खालीं उद्धृत करीत आहें.

नाटकाचा प्रास्ताविक भाग

श्रीगणेशाय नमः ॥

नित्यानन्दचिदात्मकस्य कलया यस्याच्युतस्याखिलं
विश्वं चेतितमप्यचेतनमिव द्राग्भ्राम्यति भ्राम्यति ॥
यो गृह्णात्यकरश्चलत्यचरणः पश्यत्यचक्षुः शृणो—
त्यश्रोत्रो मनसो गिरोऽप्यविषयो भक्तेर्वशोऽव्यात्स वः ॥ १ ॥

---

‡ मुख्यतः या 'नागपुरा'शीं संबद्ध असल्यामुळेंच पुरञ्जनोपाख्यानाचा विषय भोसल्यांच्या नागपुरांत तयार झालेल्या प्रस्तुत नाटकास घेण्यांत आला असावा असें वाटतें.

§ "**मा शङ्कीः**" इत्यादि अपाणिनीय प्रयोग प्रस्तुत नाटकांत क्वचित् दिसतात. पण त्यांसहि इतर व्याकरणकारांचा आधार असणें संभवनीय वाटतें. बंगाल, मिथिला, इत्यादि भागांत पाणिनीतर प्राचीन व्याकरणकारांच्या ग्रंथांचें आजमितीसहि अध्ययन केलें जातें व प्रामाण्य मानलें जातें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपि च ।

एकं वृक्षमधिष्ठितौ सहचरौ दिव्यौ सुपर्णौ भजे
पक्वं पिप्पलमत्त्यदन्निह ययोरेको गुणैर्बध्यते ॥
नाश्नन्नप्यतिदीप्तिमश्नुति परो बुध्वा ततः तमेव श्रितो
बद्धोऽसावपि मुक्तिमेति न परो मोक्षाय पन्था मतः ॥ २ ॥

(नान्द्यन्ते) सूत्रधारः—अलमतिविस्तरेण । भक्तिभावनाविभाकरविभाविभासितशुद्धमानससारससारसंचारितरमारमणपदचरणस्य क्षणक्षणविलक्षणविनयविवेकदयादानदाक्षिण्यादिगुणगणस्य निरुपधिपरोपकारजागरूकयशोभारघनसारप्रसारसुरभीकृतसंसारस्य परमरमणीयाकारस्य श्रीदिवाकरपुरुषोत्तमस्य सभायां मङ्गलमयमूर्तिश्रीव्यङ्कटेशकेशवसंनिवेशनद्वारसन्निधाने विशदपदकदम्बडम्बरसंवलितसंस्कृतप्राकृतमयनिरवद्यहृद्यगद्यपद्यप्रबन्धसमुदायेन वेदान्तसिद्धान्तसारसम्बन्धप्रायेण भार्गववासरीयं हरिदासवितन्यमानं लक्ष्मीनिवासकीर्तनामृतमतिनिभृतमापीय मुदितानां विविधोपधानान्यवलम्ब्य सुखोपविष्टानां विशिष्टानां शिष्टानां देशविदेशवास्तव्यानां शास्त्रिब्राह्मणानां राजकार्यभारिणां व्यापारिणां च मण्डली समुल्लसति । तदत्र किमपि नवीन नाटकमभिनेतव्यमिति (नेपथ्याभिमुखं) आर्ये । इतस्तावत् ।

(प्रविश्य) नटी—अज्ज ! एसह्मि । आणवेदु अज्जो को णिओओ अणुचिट्ठिअदुत्ति, (आर्य ! एषास्मि, आज्ञापयत्वार्यः को नियोगोऽनुष्ठीयतामिति ।)

सूत्रधारः—आर्ये ! साधुसमाजमेतमाराधयितुमिच्छामि ।

नटी—कदरं उण पओअं समस्सिअ एदस्स आराहणं करिस्सदि अज्जो । (कतरं पुनः प्रयोगं समाश्रित्यैतस्याराधनं करिष्यत्यार्यः ।)

सूत्रधारः—यत्किल कृष्णदत्तकविना मैथिलेन पुरञ्जनचरितं नाम नाटकमस्मासु समर्पितं तदभिनयेनाराधनमस्य सम्भविष्यति ।

नटी—विविहविमलविज्जाविलास (विस्स) विदितपवित्तकित्तीणं बह्मसुत्तीणं एदाणं इध कधं सवणसमुस्सुअं हिअअं हविस्सदि । (विविधविमलविद्याविलासविश्वविदितपवित्रकीर्तीनां ब्रह्ममूर्तीनामेतेषामिह कथं श्रवणसमुत्सुकं हृदयं भविष्यति ।)

सूत्रधारः—हरिभक्तिकथैवात्र शुश्रूषामुत्पादयिष्यति । उक्तं च तेन कविना ।

हरिपदभजनात्तशुद्धिमेतां लघुमपि मद्गिरमाद्रियेत सभ्यः ॥
शिरसि शशिकलां त्रिमार्गगां च त्रिदशनुतोऽपि बिभर्ति हि त्रिनेत्रः ॥ ३ ॥

देवाजीपुरुषोत्तमो गुणवतां वाणीरसास्वादवि—
त्तत्सभ्याः सदसद्विवेकपटवः सर्वे गुणग्राहिणः ॥
लोके हारि पुरञ्जनस्य चरितं प्रौढः कविर्मैथिलो
नाट्ये दक्षतमा वयं च तदयं स्वर्णेन योगो मणेः ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नटी—अज्ज ! को एसो **देआजीपण्डिओ** जस्स पसंसा सव्वदो सुणिअदि । (आर्य ! क एष **देवाजीपण्डितो** यस्य प्रशंसा सर्वतः श्रूयते ।)

सूत्रधारः—नाम्नैव दत्तमुत्तरम् ।

> **देवोऽजः परमेश्वरः परहितोऽस्त्यस्मिन्स्वभक्ते यतो**
> **यद्विप्रावनबुद्धिमत्युदयते देङ्गोऽवजेश्चान्वयः ॥**
> **अर्थी यत्स्फुटमाह देहि हयमित्यर्थे प्रकृत्युक्तिभि-**
> **र्देवाजीति यथार्थमेव वलते नामास्य तत्सर्वथा ॥ ५ ॥**

किं च, योऽसावुद्धव इव यदुवीरस्य, सुमन्त्र इव रघुवीरस्य, बृहस्पतिरिव सुनाशीरस्य, बीरबल इवाकब्बरसाहस्य, अमर इव साहसाङ्कस्य, चाणक्य इव चन्द्रगुप्तस्य **नागनगरनाथस्य भोसलावंशसिन्धुसम्भवराजन्यचन्द्रस्य साचिव्यमवलम्ब्य** नरपतिजनपदहितप्रिय-कार्यकारितयोभयोरपि प्रीतिप्रतीतिपात्रमतिमात्रमुल्लासते ।

नटी—तं आरम्भीअदु पओओ । उस्सुअहिअओ विअ सअलो समाजो दीसइ । (तदारभ्यतां प्रयोगः । उत्सुकहृदय इव सकलः समाजो दृश्यते ।)

सूत्रधारः—

> **यदपि जगति सन्तः शीलयन्तः सुशीलं**
> **परगुणपरमाणूनप्यमी शीलयन्ति ॥**
> **तदपि मनसि शङ्का वर्त्तते मे किमेषा—**
> **मभिमतमभिनेयं दुर्विदं ह्यन्यचेतः ॥ ६ ॥**

नटी—ता सअलसिद्धिमूलं हिसीकेसं पसादेदु अज्जो । (तत्सकलसिद्धिमूलं हृषीकेशं प्रसादयत्वार्यः) ।

सूत्रधारः—(सानन्दं) सम्यगभिहितम् ।

> **वैकुण्ठे व्रजवल्लभाजनहृतस्वान्तस्य वृन्दाटवी—**
> **संवासे कमलागृहीतमनसो ह्यन्मात्रदैन्यं तव ॥**
> **वेदः शास्त्रमिह प्रमाणमिति ते श्रीनाथ ! किं दीयता—**
> **मव्याजप्रिय ! दीयते बत मया चेतस्तदादीयताम् ॥ ७ ॥**

अपि च ।

> **अघटितघटनापटीयसीयं नटयति ते जगदेव देव ! माया ॥**
> **भ्रमणशतपरिश्रमेण तत्र क्वचिदपि कस्यचिदेषि तोषमेषः ॥ ८ ॥**

नटी—अज ! अदो वरं किं विलम्बीअदि । (आर्य ! अतःपरं किं विलम्ब्यते ।)

सूत्रधार—सखा मम गुणाकरो नाम मामनापृच्छ्य व्यापारानुरागतो नन्दिवर्धननगर-मागतो दर्शितकामरूपगुणप्रकाशया कयापि कामकन्दलया वशीकृतो वलीभूय किमपि न प्रति-सन्दधातीति चिन्तामापन्नोऽस्मि ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नटी—अज्जस्स आणणए मये तुह समीवं सो आणीअदि । अज्जेण उण पडिवोहणिज्जोत्ति । (आर्यस्याज्ञया मया तव समीपं स आनीयते । आर्येण पुनः प्रतिबोधनीय इति ।)

सूत्रधार—(सहर्षं) तर्हि सर्वं सम्पन्नम् ।

पुरञ्जनीसङ्गविपाकजां रुजं
पुरञ्जनो भक्तिरसायनामृतैः ॥
भवैकवैद्योपहृतैर्यथा जहौ
चिन्तामिमां त्वद्वचनैरहं तथा ॥ ९ ॥ (इति निष्क्रान्तौ ।)

आमुखम् ॥

(ततः प्रविशति पुरञ्जनो राजा सचिवश्च इ०).

……——……

नाटकाचा अन्तिम भाग

………………………………………

पुरञ्जनः—

सखे ! सत्यप्यस्मिन्मम तव च भेदव्यपगमे
त्वदीयोऽहं नाथ ! त्वमसि न मदीयः क्वचिदपि ॥
तरङ्गः सामुद्रो भवति न च तारङ्ग उदधिः
स्फुलिङ्गश्चाग्नेयो दहनकणकीयो न दहनः ॥ ३७ ॥

अविज्ञातलक्षणः—सखे ! किं ते भूयः प्रियमुपकरोमि ?

पुरञ्जनः—अतः परमपि किं प्रियमस्ति ? यतः,

भवानेतावन्तं समयमुपकुर्वन्नपि सुहृ—
न्ममान्धस्येवासीद्गृहमणिरविज्ञातचरितः ॥
अथ श्रुत्वा मत्वा किमपि सुनिदध्यास्य सुरस—
स्पृशि प्रोन्मीलन्त्यां दृशि सपदि साक्षात्प्लुत इति ॥

तथापीदमस्तु ।

श्रीतनुच्छविसुवर्णरेखितस्वांशुकात्तसतडिद्घनश्रियि ॥
कृष्णरूपनिकषे निवेशितं प्रेमहेम सुपरीक्ष्यतां मम ॥ ३९ ॥

अपि च ।

काले काले तडित्वानमृतरसमयीं वृष्टिमिष्टां विधत्ता-
मुर्वीं सस्यौघगुर्वीं सचिवजनहितं भूमिपाः पालयन्तु ॥
सर्वः सर्वत्र नन्दत्वखिलगुणगुरौ विन्दतु प्रेमभक्तिं
देवे श्रीव्यङ्कटेशे प्रचरतु परितः कृष्णदत्तस्य सूक्तिः ॥ ४० ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अविज्ञातलक्षणः—एवमस्तु ।

(इति निष्क्रान्ताः सर्वे ।)

इति श्रीपुरञ्जनदुःखभञ्जनो§ नाम पञ्चमोऽङ्कः ॥ ५ ॥

शाके नन्दनवावनीपतिमिते शुक्लद्वितीयाबुधे

चैत्रे **नागपुरे**...रघुनृपावासादयोध्यासमे ॥

(यानंतरचा भाग गहाळ)

उद्धृत स्थळाचा निष्कर्ष

वर उद्धरिलेल्या भागांतील महत्त्वाच्या माहितीचा निष्कर्ष खालीं दिल्याप्रमाणें काढतां येईल. प्रस्तुत नाटक मिथिलेच्या कृष्णदत्त कवीनें रचिलें असून त्याचा रंगभूमीवरील प्रथमच प्रयोग नागपुरांत देवाजीपंताकडे व्यंकटेशकेशवाच्या † देवघरापुढील मंडपांत झालेल्या महोत्सवाच्या प्रसंगीं करण्यांत आला. हा महोत्सव बरेच दिवसांचा असून त्यांत अगोदरच्या शुक्रवारीं कोणा तरी उत्कृष्ट हरदासाचें विष्णूच्या आख्यानावर अद्वैतब्रह्मनिरूपणपर संस्कृत व प्राकृत मजकुरानें भरलेलें, विद्वत्ताप्रचुर व मनोरंजक असें संगीत कीर्तन झालें होतें. महोत्सवांतील सभासदांत निरनिराळ्या देशांतून आलेले प्रतिष्ठित व महत्त्वाचे असे विद्वद्धुरीण शास्त्री, ब्राह्मण (वैदिक ?), राज्याधिकारी व व्यापारी आहेत व ते सर्व गुणग्राहक व सरसनीरसाचे परीक्षक असून या नाट्यप्रयोगाच्या वेळीं निरनिराळ्या लोडांस टेकून ऐटींत बसले आहेत असा देखावा वर्णिला आहे ! स्वतः देवाजीपंताविषयीं, तो अत्यंत देखणा व भव्य असून विष्णूचा परमभक्त आहे; त्याचे विनय, विवेक, दया, दानदाक्षिण्य, इत्यादि गुण अद्भुत असून तो निष्कपट परोपकार करण्यास नेहमीं सिद्ध असतो; त्याच्या कीर्तीचा डंका सर्व जगांत दुमदुमत असून सर्वत्र त्याची प्रशंसा ऐकूं येते; त्याची वाङ्मय-रसज्ञता उत्कृष्ट असून त्यास त्याच्या कार्यांत परमेश्वरी साहाय्य मिळतें; तो ब्राह्मणांच्या रक्षणांत तत्पर व पराक्रमी असून पराकाष्ठेचा उदार आहे; तो नागपूरकर भोसल्यांच्या क्षत्रिय राजकुलांतील विद्यमान राजाचा दिवाण असून राजा व प्रजा या दोघांसहि प्रिय आणि हितकर अशीं कामें करण्यामुळें दोघांच्याहि प्रेमास आणि विश्वासास पात्र होऊन अतिशय महत्त्वास चढला आहे; इत्यादि माहिती सापडते. ‘ देवाजी ’ या मराठी नामाच्या तीन संस्कृत

---

§ ‘ पुरञ्जनचरित ’ नाटकाच्या पांच अंकांचीं नांवें अनुक्रमें पुरञ्जनप्रसञ्जन, पुरञ्जनरञ्जन, पुरञ्जनपुरगञ्जन, पुरञ्जनसमञ्जन व पुरञ्जनदुःखभञ्जन अशीं असून मुख्य पात्रें सूत्रधार, नटी, पुरञ्जन (राजा किंवा वैदर्भी), पुरञ्जनी, सचिव, प्रजागर, चेटी, वृत्तिमत्तिका, रसज्ञ, द्युमान्, अवधूत, श्रुतधर, चर, सितपक्ष, सेनापति, विलक्षण, अविज्ञातलक्षण, नवलक्षणा, अमितलक्षणा, सुरोचन, हीं आहेत.

† व्यंकटेशकेशव म्हणजे गिरीचा बालाजी. संस्कृतांतील शुद्ध रूप ‘ वेङ्कटेशकेशव ’ असें आहे, पण पोथींत ‘ व्यंकटेशकेशव ’ असें मराठी रूपच लिहिलेलें आढळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्तुतस्याहि दिल्या असून देवाजीपंताची उद्धव, सुमन्त्र, बृहस्पति, बीरबल, अमर व चाणक्य या प्रख्यात प्राचीन राजमंत्र्यांशीं तुलना केलेलीहि आढळते. भरतवाक्यांत इतर मागण्यां-बरोबर "राजे लोकांनीं सचिवमंडळीच्या हितास जपावें" अशी मागणीहि केलेली आढळते. तिच्या द्वारें कवीनें "भोसल्यांनीं देवाजीपंताचा उत्तम सन्मान ठेवावा" अशी स्वतःची इच्छा ध्वनित केली असल्याचा भास होतो!

महोत्सवास ऐतिहासिक पुरावा

नाटकाच्या प्रस्तावनेंत निर्देशिलेला प्रसंग काल्पनिक नसून तसा महोत्सव देवाजीपंताकडे मोठ्या प्रमाणावर बरींच वर्षें होत असे असें दाखविण्यास ऐतिहासिक आधार आहे. जानोजीनें स्वतःच्या कारकीर्दीच्या अखेरीस देवाजीपंतास कैद करून व त्याचें सर्व घर लुटून त्यास फार त्रास दिला. तो प्रसंग माधवराव पेशव्यांस कळवितांना पेशव्यांचा नागपूरचा वकील **विठ्ठल शामराज** हा आपल्या सविस्तर पत्रांत लिहितो§—

"........दिवाकरपंताचा मजकूर, कांहीं नग जडावाचे व सोनें, रुपें, राहिलें होतें तेंहि घेऊन गेले. **नवरात्रांत उछाहासाठीं पांच हजार रुपये ठेविले होते तेहि नेले. उछाहास त्यांचे घरीं कोण जातो म्हणाले. तमाम ब्राह्मण ज्यांस गांव स्वास्ती वृत्ती ज्यास आहेत व आपले चाकर जितके आहेत तितके कोनी देवाजी-पंताचे येथें न जावें; गोसावी कोनी न जावे अशी परिछिन्न ताकीद केली आहे...**"

या प्रसंगीं देवाजीपंतानेंहि स्वतःचें वृत्त वरील विठ्ठल शामराजामार्फतच माधवरावास कळविलें. त्यांत तो म्हणतो †—

"........येथवर केल्यास धैर्याधिष्टित चित करोन श्रीहरीसेवेत सादर आहे. **पुढें विजेयादशमीचा उत्साह आहे. प्रतिवर्षीं पंडित आदीकरोन येत असतां त्यास सहा हजार रु. मात्र ठेविले. हेंहि त्या दिवसपर्यंत राहून उपेगी पडतील येसे निश्चये करणियांत येत नाहीं. अर्थहरण तो जालें.** पुढें प्राणाचाहि संकल्प केला. परंतु आतःपर याचा कारभार नको. येविषईची प्रतिज्ञा समर्थाचे पायासी ती खरीखुरी आहे. शरीरीहि शूळ निर्माण जाला. श्रेम होत आहेत. **मोहात्साह मात्र जाला पाहिजे येवढी वासना. हे सिधीस गेल्यावर मग कांहीं आस्छा राहिली नाहीं.**"

.. या दोन उताऱ्यांवरून देवाजीपंताकडे नवरात्राचा उत्सव किती मोठ्या प्रमाणावर दरसाल साजरा होत असे. व त्यासाठीं किती दूरदूरचे पंडित व इतर लोक नागपुरास येत असत, तसेंच अत्यंत बिकट परिस्थितींत असतांहि देवाजीपंतास स्वतःच्या घरीं तो उत्सव साजरा होण्याबद्दल किती तळमळ लागली होती तें स्पष्टपणें दिसून येतें. मुधोजीच्या कारकीर्दींत

§ पेशवे दप्तर, भाग २०, लेखांक १९८, पृष्ठ १९१.

† कित्ता, लेखांक १९७, पृष्ठ १८४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवाजीपंताचा पुनरुदय झाल्यावर त्याजकडे हा उत्सव पुन्हा होऊं लागला असावा. या लेखांत वर निर्देशिल्याप्रमाणें इ. स. १७७९ च्या ऑगस्ट महिन्यांत देवाजीपंत दसऱ्याचें निमित्त काढून तांतडीनें पुण्याहून निघून नागपुरास परत आला तो मुख्यतः त्याजकडील या उत्सवासाठींच आला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. देवाजीपंताकडील नवरात्र देवीचें नसून बालाजीचें असावें व बालाजी हेंच त्याचें कुलदैवत असावें असें प्रस्तुत 'पुरञ्जनचरित' नाटकांतील वर्णनावरून दिसतें. देवाजीपंताची वपुष्मत्ता, त्याची ईश्वरभक्ति, त्याची रसिकता, त्याचें संस्कृत वाङ्मय व वेदान्तशास्त्र यांजवरील प्रेम, इत्यादि गोष्टींवरहि हें नाटक चांगला प्रकाश पाडतें.

नाटकाविषयीं जुनी चुकीची माहिती

'पुरञ्जनचरित' नाटकांत आढळणाऱ्या देवाजीपंतविषयक माहितीकडे यापूर्वी कोणाचें लक्ष गेलें असल्याचें दिसत नाहीं. पण हें नाटक अगदींच अज्ञात असें मात्र नाहीं. दोन पिढ्यापूर्वीचे प्रख्यात विद्वान् व संशोधक **बाबू राजेन्द्रलाल मित्र** यांनीं संपादिलेल्या वर्णनात्मक विस्तृत संस्कृत ग्रंथ-सूचींत या 'पुरञ्जनचरित' नाटकाची संक्षिप्त माहिती दिलेली आढळते.§ ही माहिती दरभंगा जिल्ह्यांतील त्या वेळचे प्रसिद्ध मैथिल पंडित **हर्षनाथ** झा यांच्या संग्रहांत असलेल्या या नाटकाच्या एका मैथिल लिपींतील प्रतीवरून दिली आहे. पण बाबू राजेन्द्रलाल मित्रांच्या हाताखालील ज्या इसमानें प्रस्तुत नाटकाच्या माहितीचें हें टिपण तयार केलें त्यानें नाटकाची प्रस्तावना समग्र वाचली नसावी किंवा त्यास महाराष्ट्राच्या इतिहासाचें ज्ञान अगदीं नसावें असें वाटतें. कारण त्यानें "या नाटकाचा प्रथम प्रयोग **ओरिसाचा राजा पुरुषोत्तम देव** याच्या दरबारांत प्रथम करण्यांत आला होता," अशी माहिती सदर टिपणांत दिली आहे! या लेखांत नाटकाच्या वर उद्धृत केलेल्या समग्र प्रस्तावनेवरून हें नाटक **नागपूरकर भोसल्यांचा दिवाण देवाजीपंत चोरघोडे** याजकडील बालाजीच्या नवरात्राच्या महोत्सवप्रसंगींच कोणत्या तरी वर्षीं रंगभूमीवर प्रथम आणलें गेलें व तें ओरिसाचा राजा पुरुषोत्तमदेव याच्याशीं कोणत्याहि प्रकारें संबद्ध नाहीं याबद्दल शंकाच राहात नाहीं.

नाटकरचनेचा किंवा प्रतलेखनाचा काळ

नाटकाच्या 'जामदार' प्रतींतील अंतिम प्रशस्तिपद्याच्या विद्यमान दोन ओळींत "रघुराजाच्या (=दुसरा रघूजी भोसले याच्या) वास्तव्यामुळें अयोध्येशीं सादृश्य पावलेल्या नागपूर शहरांत चैत्र शुक्ल द्वितीया शके १६९९ बुधवार या दिवशीं..." इतकाच वाक्यांश समाविष्ट झाला आहे. नंतरचा वाक्यांश "......कृष्णदत्तकवीनें प्रस्तुत नाटकाची रचना पूर्ण केली" किंवा "......अमुक लेखकानें कृष्णदत्तकवीच्या प्रस्तुत नाटकाच्या प्रस्तुत प्रतीचें

§ *Notices of Sanskrit Manuscripts*, Vol. VI (Calcutta, 1882), Pages 20–22., No. 2000. येथें दिलेल्या स्वल्प उताऱ्यांवरून या प्रतींत कांहीं पाठभेदहि असावेत असें दिसतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखन पूर्ण केलें " या दोहोंपैकीं कोणत्या तरी आशयाचा असावा. पण तो निर्देश नाटकरचना किंवा प्रतलेखन या दोहोंपैकीं नक्की कशाचा असावा तें या नाटकाची नागपुरांतील दुसरी एखादी प्रत उपलब्ध होईपावेतों सांगतां येणार नाहीं. निर्देशिलेला काल इ. स. १७७७ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारास असून देवाजीपंत त्यानंतर पुढें चार साडेचार वर्षे हयात होता. त्यावरून हा नाटकरचनेच्या समाप्तीचा निर्देश असणें जास्त संभवनीय वाटतें. कदाचित् हा प्रतलेखनाचाच निर्देश असला तर तो प्रस्तुत 'जामदार' प्रतीचा नसून 'जामदार' प्रतीस आधारभूत असलेल्या मूळ प्रतीचा असावा असें वाटतें. कारण 'जामदार' प्रतीच्या अन्तिम भागांत अशुद्धें अतोनात दिसत असल्यामुळें त्या लेखकाकडून संस्कृत प्रशस्तिपद्याची मौलिक रचना होणें अगदीं अशक्य दिसतें. तरी पण 'जामदार' प्रत बरीच प्राचीन आहे यांत संशय नाहीं.

बाबू राजेन्द्रलाल मित्र यांच्या सूचींत उपयोगिलेल्या प्रस्तुत नाटकाच्या 'मिथिला' प्रतींत तिचा लेखनकाल इत्यादि निर्देशिणारी प्रशस्ति आढळते ती अशी—

शाकेऽब्दे धरणीवियन्मुनिधरासम्भासमाने शुभे
माघे मासि दिवामणौ मकरगे विष्णोस्तिथौ सादरम् ॥
श्रीमन्मैथिलकृष्णदत्तकृतिना यन्निर्मितं नाटकं
प्रालेखीत्तदिदं मुदा द्रुततरं श्रीहेमनाथद्विजः ॥ शुभमस्तु ॥

"शके १७०१ सालीं माघ शुक्ल एकादशीस सूर्य मकरराशींत असल्या वेळीं हेमनाथनामक ब्राह्मणानें कृष्णदत्तमैथिलाचें हें नाटक घाईनें व उत्साहानें लिहून काढलें" अशा आशयाचा हा निर्देश आहे. हा काळ म्हणजे इ. स. १७८० सालाच्या जानेवारीअखेरचा सुमार. त्यावरून प्रस्तुत 'मिथिला' प्रत आमच्या 'जामदार' प्रतींत निर्देशिलेल्या काळानंतर पावणेतीन वर्षांनीं लिहिली गेली असल्याचें उघड होतें.

नाटककाराविषयीं माहिती

याप्रकारें हें संस्कृत पुरञ्जनचरितनाटक देवाजीपंत चोरघोडे याचें एक समकालीन उत्कृष्ट वाङ्मयस्मारकच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाटककारानें या ग्रंथांत स्वतः विषयीं विशेष कांहींच माहिती दिली नाहीं. "त्याचें नांव कृष्णदत्त व देश मिथिला असून तो एक प्रौढ कवि आहे" इतकीच माहिती प्रस्तावनेंत असून भरतवाक्यांत "कृष्णदत्ताच्या वाङ्मयाचा सर्वत्र प्रसार होवो" अशी इच्छा प्रकट केलेली आढळते. कृष्णदत्ताचे देवाजी-पंताशीं संबद्ध नसलेले तीन इतर ग्रंथ हस्तलिखित उपलब्ध असून त्यांपैकीं दोन ग्रंथांतून त्यानें स्वतःविषयीं अधिक तपशील दिलेले आढळतात.

जयदेवाच्या '**गीतगोविन्द**' काव्याचे कृष्णपर आणि शिवपर असे दोन अर्थ लावणारी 'गङ्गा' नांवाची संस्कृत टीका या कृष्णदत्त मैथिलानें रचिलेली असून तिची एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत लंडनच्या इंडिया ऑफिस लायब्ररींत आहे.‡ तिजमधील कांहीं स्थळांत कवीनें स्वतःच्या मातापितरांचीं व वडील भावांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांपैकीं दोन पद्यें—

"ताममम्बां पतिदेवतां भगवतीदेवीं भवेशं गुरुं
भक्त्यानम्य पुरन्दरं कुलपतिं श्रीमालिकं चाग्रजान् ॥
गङ्गाख्यां जयदेवदिव्यकविताव्याख्यामिमां मैथिलो
बह्वर्थप्रतिपादनाय तनुते श्रीकृष्णदत्तः कविः ॥" (प्रारंभींचा द्वितीय श्लोक)

आणि

"माता पुण्ययशस्वती भगवती–देवी भवेशः पिता
सन्तो यस्य पुरन्दरः कुलपतिः श्रीमालिकश्चाग्रजाः ॥
तेने मैथिलकृष्णदत्तकविना तेनेह गङ्गाभिधा
टीकाया लहरी समाप्तिमगमत्तस्यामियं द्वादशी ॥

इति भगवतीभवेशसम्भव श्रीकृष्णदत्तकृतायां श्रीगीतगोविन्दव्याख्यायां द्वादशी लहरी..." (अन्तिम भाग)

अशीं आहेत. त्यांजवरून कृष्णदत्त मैथिलीच्या बापाचें नांव 'भवेश,' आईचें नांव 'भगवतीदेवी' व विद्यमान ज्येष्ठ भावांचीं नांवें अनुक्रमें 'पुरन्दर', 'कुलपति' व 'श्रीमालिक' अशीं असल्याची माहिती मिळते. या टीकेंत प्रारंभींच्या चतुर्थ श्लोकांत इसवी सनाच्या सतराव्या शतकांतील मधुसूदनसरस्वतीचा उल्लेखहि आलेला दिसतो.

कृष्णदत्त मैथिलच्या इतर दोन ग्रंथांच्या मैथिल लिपींतील प्रती मिथिलेंतच कै. पं. हर्षनाथ झा यांच्या संग्रहांत असल्याबद्दल माहिती बाबू राजेन्द्रलाल मित्र यांच्या वर निर्दिशिलेल्या वर्णनात्मक संस्कृत-ग्रंथ-सूचींतून मिळते.$ त्यांपैकीं प्रथम ग्रंथ म्हणजे मार्कण्डेय पुराणांतील दुर्गासप्तशतीच्या आधारानें रचिलेलें देवीचरित्रवर्णनपर '**चण्डिकाचरितचन्द्रिका**' नांवाचें अकरा सर्गांचें व ७३४ पद्यांचें एक संस्कृत काव्य होय. पण त्यांत कवीनें स्वतःविषयीं विशेष तपशील दिलेले दिसत नाहींत. दुसरा ग्रंथ म्हणजे कुवलयाश्व व मदालसा यांच्या प्रसिद्ध प्रेमकथेवर रचिलेलें '**कुवलयाश्वीय**' नांवाचें सप्तांकी संस्कृत नाटक होय. त्यांतहि कवीनें स्वतःविषयीं विशेष माहिती दिली नाहीं. पण नाटकाच्या प्रस्तावनेंतील

"कृष्णदत्त इति मैथिलः कविर्बालभावसुलभात्कुतूहलात् ॥
नाटकं यदभिनव्यमातनोत्कोऽत्र सम्प्रति गुणागुणग्रहः ॥"

---

‡ J. Eggeling: *Catalogue of Sanskrit Manuscripts in the Library of the India Office*, Volume VII (London, 1904), p. 1458, Ms. No. 197.

$ *Notices of Sanskrit Manuscripts*, Vol. VI, (Calcutta, 1882,) Nos. 2008 (p. 30) and 2035 (p. 64–66).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सदाशिव लक्ष्मीधर कात्रे

या श्लोकावरून कृष्णदत्त मैथिलानें हें नाटक तो स्वतः "प्रौढ" झाल्यानंतर रचिलेल्या 'पुरञ्जनचरित' नाटकाच्या अगोदर रचिलें असलें पाहिजे असें दिसतें. या 'कुवलयाश्वीय' नाटकांतील शेवटचें

"काले काले तडित्वानमृतरसमयीं वृष्टिमिष्टां विधत्तां
पृथ्वी सम्पन्नशस्या भवतु विजयिनः पान्तु लोकं नरेन्द्राः ॥
सर्वः सर्वत्र नन्दत्वखिलगुणगुरौ विन्दतु प्रेमभक्तिं
तद्विश्वेशे दयार्द्रे प्रसरतु परितः सत्कवेः सूक्तिरत्नम् ॥"

हें भरतवाक्यहि महत्त्वाचें आहे. त्यांत कृष्णदत्त मैथिलानें स्वतःची शिवभक्ति प्रकट केली आहे. त्याच्या या इतर तीनहि ग्रंथांतील प्रारंभींच्या मङ्गलाचरणांतून शिव आणि पार्वती यांनाच वंदन केलेलें दिसत असल्यामुळें 'पुरञ्जनचरित' नाटकांत आढळणारी विष्णूची किंवा व्यंकटेशकेशवाची भक्ति वस्तुतः ग्रंथकाराची नसून ती त्याचा आश्रयदाता देवाजीपंत चोरघोडे याचीच असावी हें निःसंशय सिद्ध होतें. कृष्णदत्त हा वस्तुतः इतर मैथिल ब्राह्मणांप्रमाणें शैव किंवा शाक्त असून त्यानें देवाजीपंताचा तोंडपुजेपणा करण्याच्या उद्देशानेंच 'पुरञ्जनचरित' नाटकांत व्यंकटेशकेशवाविषयीं उसना किंवा भाडोत्री जिव्हाळा दाखविला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं!

कृष्णदत्त मैथिलाच्या तीन ग्रंथांच्या मैथिल लिपींतील वर निर्देशिलेल्या हस्तलिखित प्रतींचा सध्यांचा ठावठिकाण माहीत करून घेण्यासाठीं व त्याजविषयीं इतर माहिती मिळविण्यासाठीं म्हणून कांहीं दिवसांपूर्वीं मी आमच्या अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे माजी व्हाइसचॅन्सेलर व कै. पंडित हर्षनाथ झा यांचे जामात परमपूज्य विद्वद्वर्य महामहोपाध्याय डॉ. **गंगानाथ झा** यांची प्रयाग येथें मुद्दाम भेट घेतली. कृष्णदत्त मैथिलाचें प्रचारांतलें नांव 'कृष्णदत्त झा' असें होतें, तो कै. पं. हर्षनाथ झा यांच्या पूर्वजांपैकींच असून त्या काळांतील नामांकित विद्वान् होता; तो नागपुरास कांहीं वर्षें राजाश्रयानें राहिला असल्याची परंपरागत माहिती मिथिलेंत त्याच्या घराण्यांत अद्याप रूढ आहे; तसेंच कै. पं. हर्षनाथ झा यांच्या मालकीचे वर निर्देशिलेले कृष्णदत्ताचे ग्रंथ त्यांच्या मालकीच्या इतर अनेक ग्रंथांसह मिथिलेंतच त्यांच्या विद्वान् चिरंजीवांनीं सुरक्षित ठेविले आहेत, इत्यादि माहिती त्या भेटींत त्यांजकडून मिळाली. पुढें मागें 'पुरञ्जनचरित' नाटक छापून काढण्याचें जुळल्यास त्या वेळीं त्याची 'मिथिला' प्रत पाठभेदांच्या तुलनेसाठीं म्हणून मिळवितां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजपूत-मराठे युद्ध

(इ. स. १७५४-इ. स. १७५६)

[लेखक— मा. वि. गुजर, बी. ए.]

औरंगजेब बादशहानें दक्षिणेंत स्वारी करून, मराठ्यांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याकरितां अव्याहत वीस वर्षें मोठ्या निकरानें लढा चालू ठेविला होता. या प्रसंगीं अनेक राजपूत संस्थानिक आपआपल्या फौजेनिशीं, मुसलमानांबरोबर खांद्याशीं खांदा देऊन लढले. राजपुतांचा पराक्रम स्वधर्मीयांचें यवनापासून संरक्षण करण्याचे कामीं उपयोगी न पडतां स्वधर्मीयांचें खंडण करून यवनांचें साम्राज्य वाढविण्यासाठीं गाजला. पुढें इ. स. १७१४ मध्यें शाहूमहाराजांनीं स्वराज्याच्या मतलबाची यादी बाळाजी विश्वनाथ पेशवे यांना करून दिली. त्या यादीबरहुकूम मोगलांचे ताब्यांतील गुजराथ व माळवा ह्या दोन प्रांतांत मराठ्यांचा अंमल जेथवर बसवितां येईल तेथवर बसवावा, असा मराठ्यांचा मनसुबा ठरला. मराठ्यांनीं दिल्ली दरबारांत माजलेल्या अराजकतेचा फायदा घेऊन आपला हात दिल्लीचे राजकारणांत शिरकविला, आणि वरील मनसुबा पार पाडण्यासाठीं इ. स. १७१९ मध्यें अनुरूप भूमिका तयार केली. बाजीराव बल्लाळ पेशवे यांनीं नर्मदा नदी ओलांडून गुजराथ व माळवा या प्रांतावर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली. या प्रसंगीं पेशव्यांना मराठ्यांचा अंमल या प्रांतांत बसविण्यासाठीं निजामाशीं, मोगल सुभेदाराशीं व प्रसंगोपात्त राजपुतांशीं, अनेक वेळा राजकारणें लढवावीं लागलीं; परंतु हीं सर्व राजकारणें, मराठ्यांनीं राज्यवृद्धीसाठीं आरंभिलेले प्रयत्न केवळ यशस्वी होण्यासाठीं म्हणून होतीं, त्यांचें अधिष्ठान धर्म नव्हे.

जयपुरचा राणा सवाई जयसिंग यानें मराठ्यांशीं राजकारण करून त्यांना माळव्यावर स्वाऱ्या करण्यास प्रोत्साहन दिलें. ह्या राजकारणाचे बुडाशीं राजपूत मराठे एक होऊन यवनाक्रांत मुलुख जिंकावा व हिंदूंचा अंमल जारी करावा हें नव्हतें. सवाई जयसिंगास आपला मुलुख यमुना व नर्मदा नद्यांस भिडवून, मोगल दरबारांत स्वतःची प्रतिष्ठा वाढवावयाची होती. पुढें त्या प्रतिष्ठेच्या जोरावर सर्व राजपूत राजांचें धुरीणत्व संपादावें ही सवाईजीची जबर मनीषा होती. परंतु मोगल बादशाही संकटपरंपरेंत सापडून मेटाकुटीस आल्याशिवाय ती कशी साध्य होणार ? तेव्हां सवाई जयसिंगानें ह्या स्वार्थीबुद्धीनें बादशहास सतावून सोडण्याचे कामीं मराठ्यांचेंहि साह्य घेण्याचें ठरविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७२९ मध्यें बादशहानें जोधपुरचा महाराजा राजराजेश्वर अभयसिंग यास गुजराथचा सुभेदार नेमलें, आणि त्या प्रांतांत मराठ्यांचा उच्छेद करण्याचें कार्य त्याच्यावर सोपविलें. सन १७३० च्या ऑक्टोबरांत त्यानें या प्रांताचा अधिकार स्वीकारिला. पुढें दोन वर्षांच्या कारभारानंतर सुद्धां त्याला मराठ्यांस पायबंद घालतां येईना. तेव्हां शेवटीं मराठ्यांना चौथाई देणें कबूल करून तो कारभार सोडून परत गेला.

प्रांतिक सुभेदारांकडून मराठ्यांच्या गुजराथ–माळव्यावरील स्वाऱ्यांस प्रतिबंध होत नाहीं हें उमजल्यावर बादशहानें मराठ्यांचा प्रतिकार करण्यासाठीं वजीर कमरुद्दिनखान व सवाई जयसिंग यांना फौज देऊन सन १७३२–३३ त मराठ्यांवर चाल करून पाठविलें. त्या वेळीं मराठ्यांना सवाई जयसिंग व त्याचे राजपूत शिपाई यांच्याबरोबर लढणें भाग पडलें. या लढाईत राजपुतांचा पराभव होऊन सवाई जयसिंगानें मराठ्यांस सहा लक्ष रुपये रोख व सुरत अठाविशीची खंडणी देण्याचें कबूल केलें. §

सन १७३४ मध्यें मराठ्यांनीं बुंदी संस्थानचा पूर्वींचा राजा बुधसिंग याची बुंदीचे गादीवर स्थापना करण्याचें कार्य हातीं घेतलें व त्यांनीं राजपूत राजकारणांत प्रथम प्रवेश केला. त्यामुळें राजपूत राजांचे डोळे उघडले. मराठ्यांचा वेळींच बंदोबस्त करण्यासाठीं काय धोरण योजावें, ह्याचा विचार करण्याकरितां सवाई जयसिंगानें पुढाकार घेऊन सर्व राजपूत राजमंडळाची बैठक मेवाडांतील हर्दा गांवीं तारीख १७ जुलै १७३४ रोजीं भरविली. तींत सर्व राजपूत राजांनीं एकी करून पावसाळ्यानंतर मराठ्यांना नर्मदेपार घालवून देण्यासाठीं स्वारीवर निघण्याचा करार केला. कराराप्रमाणें सर्व राजपूत राजांनीं फौजेसह स्वारीच्या सिद्धतेनें रामपुरा येथें जमा होण्याचा बेत केला होता. परंतु या योजनेंत सवाई जयसिंगाचा स्वार्थी हेतु आहे असें दिसतांच इतर राजपूत राजांनीं त्याला मदत करण्याचें नाकारिलें. सवाई जयसिंगानें निरुपाय होऊन फिरून मराठ्यांशीं तडजोडीचें बोलणें सुरू केलें. सवाईजीचा असा डाव होता कीं, सर्व राजपूत राजेरजवाड्यांची एकी करून मराठ्यांना विरोध करावा आणि त्यांचें माळव्यांतून उच्चाटन करावें. पुढें सर्व माळवा आपल्या हाताखालीं आणावा. हा डाव सिद्धीस नेण्यासाठीं सवाई जयसिंगानें सर्व राजपूत रजवाड्यांची एकी करण्याचा पुन्हा प्रयत्न केला; परंतु त्याला यश आलें नाहीं. $

सन १७३५ त बादशहानें वजीर कमरुद्दिनखान व मीर बक्षीखान डौरान यांच्या नेतृत्वाखालीं प्रचंड सैन्य मराठ्यांवर चाल करण्यास रवाना केलें. मोगल साम्राज्याचा मीर बक्षीखान डौरान याचे हाताखालीं जयपुरचा राणा सवाई जयसिंग, मारवाडचा राणा अभयसिंग व बुंदी कोटा येथील राजपूत रजवाडे आपआपल्या फौजेनिशीं जमा झाले. मराठ्यांनीं गनिमी काव्यानें लढून या राजपूत राजेरजवाड्यांचे मुलुखांत लुटालूट आरंभिली. तेव्हां मराठ्यांबरोबर

---

§ पे. द., भा. १४, ले. १, २; पे. द., भा. १५, ले. ६.

$ *Malwa in Transition*, pp. 227–230. पे. द., भा. ३०, ले १०८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालू असलेली मोहीम सोडून ते सर्व आपआपल्या मुलखाचा बंदोबस्त करण्यासाठीं निघून गेले. पुढें मीर बक्षीखान डौराननें सवाईजीचे मध्यस्थीनें मराठ्यांस माळव्याचे चौथाईबद्दल २२ लाख रुपये देण्याचें कबूल केलें. ‡

त्यानंतर अयोध्येचा नबाब सादतखान व वजीर कमरुद्दिनखान यांनीं सवाई जयसिंगाची बादशहाजवळ या अपजयाबाबत नालस्ती केली. तेव्हां आग्रा व माळवा प्रांत, बादशहा आपल्याकडून घेणार ह्या भीतीनें सवाईजीनें सादतखान व कमरुद्दिनखान यांच्या खटपटी हाणून पाडण्यासाठीं, आपल्या दरबारीं असलेल्या मराठ्यांच्या वकिलामार्फत बाजीराव पेशव्यांकडे राजकारण लाविलें कीं " आम्हीं (सवाईजी) रायाचा (बाजीराव पेशवे) उत्कर्ष रक्षिला सबब कीं तुर्कांचा (बादशहाचा) भरवंसा नाहीं. जर (मोगल) दक्षिणी फौजांवर (मराठ्यांवर) शेर होते, तर आम्हासही न मानते. यामुळें सर्वस्वी रायाचा बोल उपर केला. " §—

पुढें १७३५ सालच्या ऑक्टोबरांत बाजीराव पेशवे उत्तर हिंदुस्थानचे स्वारीवर निघाले. या स्वारींत सन १७३६ मध्यें मराठ्यांनीं उदेपुरच्या राण्यावर खंडणी बसविली. बाजीराव पेशव्यानें ३ मार्च १७३६ रोजीं सवाई जयसिंगाची भेट घेतली, आणि त्याच्याकडून माळव्याचे चौथाईबद्दल त्या वर्षाचे २२ लाख रुपये घेतले. या समयीं सवाईजीनें मराठ्यांस माळव्याचे सुभेदारीचें फर्मान ६ महिन्यांत बादशहाकडून मिळवून देण्याचें कबूल केलें. त्यानंतर मारवाडचा राणा अभयसिंग मराठ्यांविरुद्ध मोगल दरबारांतील तुराणीपक्षास सामील झाला होता; सबब सन १७३६ च्या एप्रिल महिन्यांत मराठ्यांनीं मारवाडचा प्रदेश उध्वस्त केला. सवाई जयसिंगाशीं केलेल्या राजकारणानें मतलब साध्य होत नाहीं हें उमजल्यावर बाजीरावानें सन १७३६ च्या नोव्हेंबरांत फौजेच्या जोरावर मोगल दरबारांतून आपलें कार्य करून घेण्याचें ठरविलें. त्या प्रसंगीं बादशहानें मराठ्यांचे प्रतिकारार्थ जी तमाम फौज जमा केली, तींत सवाई जयसिंग तोफखाना व पंधरा हजार फौजेनिशीं आणि राणा अभयसिंग दहा पंधरा हजार फौजेनिशीं डेरे दाखल होऊन, मराठ्यांशीं टक्कर देण्यासाठीं आग्र्यानजीक येऊन, खान डौरान व नबाब सादतखान यांना सामील झाले. पुढें मराठ्यांना नर्मदेपार काढून लावण्याचें कार्य निजामानें शिरावर घेतलें. तेव्हां मराठे व निजाम यांच्यामध्यें भोपाळ येथें १६-१२-१७३७ रोजीं लढाईस सुरवात झाली. ह्या लढाईंत राजपूत राजेरजवाड्यांनीं मराठ्यांविरुद्ध निजामाचा उपराळा केला. तेव्हां निजामाचा पराभव केल्यानंतर मराठ्यांनीं निजामास सामील झालेल्या राजपूत राजांचा सूड घेण्याचें कार्य आरंभिलें. त्याप्रमाणें बाजीरावानें कोट्याचा राणा दुर्जनसाल याच्यावर चाल करून त्याचा पराभव केला. राण्यानें १० लक्ष रुपये खंडणी देण्याचा करार केला. †

‡ पे. द., भा. १४, ले. २४, २६, २७

§ पे. द., भा. १४, ले ४७, ३१.

† पे. द., भा. १५, ले. ६५, ६८, ६९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १७४१ मध्यें मराठे उत्तर हिंदुस्थानांत गेले. तेव्हां मराठी फौज अंतर्वेदींत उतरून बादशाही मुलुख उध्वस्त करणार ही बातमी बादशहास पोहोंचली. त्यानें ह्या मुलुखाचें संरक्षण करण्यासाठीं, प्रयागचा सुभा, अयोध्येचा सुभा व सवाई जयसिंग या तिघांना मराठ्यांवर चाल करून जाण्यास सांगितलें. परंतु प्रयागचा सुभा व अयोध्येचा सुभा सवाईजींच्या मदतीस न आल्यामुळें, सवाईजीस मराठ्यांचा प्रतिकार करणें अशक्य झालें. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें नानासाहेब पेशव्यास सलुखासाठीं भेटीस बोलावून भेट दिली.¶

मराठे गुजराथेंत मुलुख जिंकीत. त्या मराठ्यांना पायबंद देण्यासाठीं बादशहानें मारवाडच्या राण्याचा भाऊ बख्तसिंग यास तारीख २९ जून १७४८ रोजीं गुजराथचा सुभेदार नेमलें. पुढें मारवाडचा राजा अभयसिंग २१ जून १७४९ रोजीं वारला. तेव्हां बख्तसिंगानें आग्रा व अजमीर सुभ्यांचे मराठ्यांच्या स्वाऱ्यापासून संरक्षण करून, त्या सुभ्यांत राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठीं बादशहाचे अधिकाऱ्यास मदत करावी म्हणून, बादशहानें बख्तसिंगास मारवाडचें राज्य मिळवून देण्यासाठीं, मीर बक्षी सलाबतखान यास १८००० फौजेनिशीं बख्तसिंगाचे मदतीस पाठविलें. $

अशा प्रकारें मराठ्यांच्या राजवृद्धीच्या कार्यांत, राजपूत आरंभापासून मोगलांचे वतीनें मराठ्यांस कसून विरोध करत होते, हें स्पष्ट निदर्शनास येतें. सवाई जयसिंग मराठ्यांशीं सलूख राखण्याचा प्रयत्न करी; याचा भावार्थ इतकाच कीं मराठ्यांच्या मदतीनें, दिल्ली दरबारांत स्वतःचें वर्चस्व प्रस्थापित करून, आपला मुलुख यमुनेपासून नर्मदेपर्यंत वाढवावा आणि मराठ्यांस खंडणीवजा रोख रक्कम देऊन त्यांना ठिकाणीं बसवावें. त्याप्रमाणें मराठ्यांनीं सवाई जयसिंगाशीं राजकारण राखिलें तें एवढ्याच उद्देशानें कीं आपली बाजू उचलून धरणारा एक पक्ष दरबारांत असावा. नाहीं तरी शेवटीं ही मध्यस्थी सोडून, स्वतःचे सैन्याचे जोरावरच आपले हेतू त्यांना पार पाडणें भाग पडलें.

बादशाही सत्ता क्षीण करून स्वतःचें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करावयाचें हें मराठे व राजपूत या दोघांचें उद्दिष्ट; दोघांचा शत्रू जरी एक असला तरी धोरण परस्पर विरोधी. राजपुतांच्या साह्यानें मोगल बादशाहीचे वाभाडे काढण्यास मराठे तयार झालेले, तर मराठ्यांच्या मदतीनें माळवा, आग्रा, राजपुताना या भागांत आपली स्वतंत्र सत्ता उभारावयाची अशी राजपुतांची इच्छा. अशा परिस्थितींत राजपूत राजेरजवाड्यांत एकी शाबूत ठेवून त्यांचें सामर्थ्य वाढविणें म्हणजे मराठ्यांनीं स्वतःस पेंच निर्माण करण्यासारखें होतें. राजपुतांस देखील, मोगल दरबारांत आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याची हाव होती. तेव्हां अठराव्या शतकांत मारवाडचे राठोड, जयपुरचे कछवा आणि बुंदीचे हाडा या तीन प्रमुख पराक्रमी राजपूत घराण्यांत, भांडणें माजून जो भेदभाव उत्पन्न झाला होता, त्या संधीचा फायदा घेऊन, नानासाहेब पेशव्यानें राजपुतांस

¶ पुरं. द., भा. १, ले. १४९

$ *Fall of the Mughal Empire*, Vol I, p. 307.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न केला. त्यानें सन १७४२ च्या एप्रिल महिन्यांत, राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर या उभयतांना मारवाडचा राणा अभयसिंग याबाबत जें पत्र लिहिलें त्यांत पेशव्याचें धोरण स्पष्ट होतें.

"अभेसिंगाचे मैत्रिकीची ममता सर्वार्थी न धरतां, जोतपुरावर शह देऊन, दोन च्यार जागे मातबर जरबेखालीं आणून, द्रव्य साध्य होये तो अर्थ करणें. तुम्हीं (शिंदे, होळकर) त्यासीं (अभयसिंगाशीं) निष्ठुरता केलियाखेरीज ते राजकारणावर येऊन, पच्याचे व सध्याचे कार्य करून देत नाहींत. त्याजकडील वकील येथें आले आहेत; परंतु ते कामावर येत नाहींत. तुम्हांकडील अवलंब धरतात. तरी राठोड बेइमान, त्यांची माया किमपि न धरतां साफ उत्तर लिहिणें."

त्यावर शिंदे व होळकर या उभयतां सरदारांनीं पेशव्यास समजाविलें कीं "स्वामीचें नांव आमचे पदरीं याजमुळेंच या रजपुतांसीं स्नेह अगर कोण्हासी विरूध. त्यास हे रजपुत ज्याजपासून निर्मान जाले अथवा साक्षांत बंधू ते परस्परें येकाचे येक नव्हेत, तेथे आमचे कोठून होणार ? आम्ही याचा भरवंसा कोठें धरणार ? अभेसिंगानें आपणांवर कधीं कुतोपकारहि केला नाहीं अथवा लालचेचा प्रसंगही आहे नाहीं. त्यांस कायावाचामनेंकरून येकनिष्ठा स्वामीचें पायीं आहे."§ यावरून नानासाहेब पेशवे व मराठे सरदार यांचें राजपुतांविषयीं काय मत होतें आणि त्यांनीं काय धोरण स्वीकारिलें हें पूर्णपणें निदर्शनास येतें.

राजपूत राजेरजवाडे देखील जूट करून, उत्तर हिंदुस्थानांतून मराठ्यांचा अंमल उठविण्याचा वारंवार कसा प्रयत्न करीत हें शिंद्यांचा कारभारी रामचंद्रबाबा यांस लिहिलेल्या पत्रांतील मजकुरावरून तात्काळ समजून येतें.

"येथिल (सवाई जयपुर) वर्तमान—तरी गुलाबसिंग याजला शिरपाऊ देऊन, चार हजार फौज देऊन, तुम्हांस (मराठ्यांस) तंबी पोहोचाऊन, भदावर व कछवा धारेत अंमल करावा, व किले जातीचा बंदोबस्ती करून, बुंधेल्यासी सामील व्हावे. त्यांनीं यानीं (गुलाबसिंग व बुंधेले) मिलोन, तमाम बुंधेलखंड व दतिया, वोडस, भदावर, व कछवा धार, मालवेसुधा गनीमाचा (मराठ्यांचा) नीर काढावा यैसा करार करून, सर दरबारांत विडा घेऊन आला आहे."—¶

तेव्हां मराठे व राजपूत यांचे परस्पर हितसंबंध एकोपा घडवून आणण्यास अनुकूल असे नव्हते. प्रत्येकास स्वतःचें हित लढूनच साध्य होणें शक्य होतें. तेव्हां मराठ्यांनीं राजपुतांतील एकीचे अभावाचा फायदा घेऊन, अवघ्या राजपूत राजांकडून आलेलीं राजकारणें नेमस्त करून, त्या राजांना पदरीं पाडून, शिवाय द्रव्य आणि मुलुख साधून, आपल्या हातांनीं त्यांना स्थापित केलें. राजपुतांना आपले अंकित बनवून मराठ्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत, मराठेशाहीची सत्ता वाढविण्याचें कार्य असें साधलें. ह्या राजपूत प्रकरणांत मराठ्यांनीं एका गोष्टीस महत्त्व देऊन,

§ पे. द., भा. २७, ले. २

¶ पे. द., भा. २१, ले. ८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ती त्यांनीं पूर्णपणें अंमलांत आणिली. ती म्हणजे खुद बादशहाशीं, किंवा मोंगल दरबारांत अधिकारावर असलेल्या उमरावाशीं ज्या राजकारणानें विरोध येणार नाहीं तेंच राजकारण स्वीकारावयाचें.

जयपुरचा राणा ईश्वरसिंग याचा धाकटा भाऊ माधोसिंग याचें राजकारण मल्हारराव होळकरामार्फत, जेव्हां नानासाहेब पेशव्यांकडे आलें, तेव्हां पेशव्यानें केवळ द्रव्यलाभाकडे दृष्टि देऊन, पूर्वींचा ईश्वरसिंगाचा पक्ष सोडून, माधोसिंगाची बाजू पतकरली, असें म्हणतां येत नाहीं. माधोसिंगाचे राजकारणांत, नानासाहेबानें आंखलेल्या धोरणास पोषक अशा अनेक गोष्टी साध्य होत होत्या. होळकरानें माधोसिंगाचेबाबत पेशव्यास येणेंप्रमाणें कळविलें—

" राणाजीनें आम्हासी करार केला आहे कीं पंचवीस लक्षाचा माधोसिंगाचा पटा करून द्यावा, वीस लक्ष नजर घ्यावी, येविसी तिळतुल्य असत्ये नाहीं. आणखीही एक अर्धा साधेल तेथवर साधूनच; परंतु हा निश्चये इत्यर्थ जालिया उपरीं. हाडे व राठोड येक (आहेत जर) त्यासी आम्ही सामील जालिया. तेव्हां ईश्वरसिंग सहजच सला करून, विल्हे लावतील. काडीचा कलह होत नाहीं. जाला तर आपला नफाच आहे. दिल्लीकडील अनुसंधान तर सर्व अमीर (तुम्हासी काडीमात्र दुसरा अर्थ धरीत नाहींत. आपले) आज्ञेवरून मनसुर अलीखान व अमीरखान, माधोसिंगाचे साहित्यावरच आहेत. येविसी त्यांचीं पत्रें आम्हांस येतात. ईश्वरसिंगाचे कलहामुळें कोणी अमीर आदीकरून पातशाहा बिघाड करितो ऐसे नाहीं. हा निश्चये असो द्यावा. बुंदीचा मजकूर गुदस्तां जाला. जो करार केला त्याप्रमाणें आपला पैका न आला; आणि कलहही न तुटीला. बुधसिंगाचा पुत्र उमेदसिंग बुंदीप्रांतें धामधूम करून कजिया करीत आहे. त्यासी त्याची (उमेदसिंगाची) समजावीस करावी ऐसे ईश्वरसिंगाचे मानस आहे. ऐस्यास हेहि राजकारण आपले (मराठ्यांचे) हातें. विल्हे लावलियानें कार्यसिधी चांगलीच होईल. अवघे राजे (मराठ्यांच्या) पदरीं पडून, द्रव्य साध्य होऊन, लौकिक उत्तम होतो. सेवटीं (राजपूत) आपआपल्यामध्यें समजून राजकारणें विल्हे लागतील; परंतु आपले (मराठ्यांचें) कार्ये ये गोष्टीनें साधत नाहीं. यास्तव आपले हाते स्थापित केलीया आपली कार्यसिधी होऊन येईल आणि सर्व राजे अंकित होतात." §

यावरून बादशाहा किंवा कोणी अमीर यांच्याशीं बिघाड न करतां सर्व राजपूत राजे अंकित करण्याची संधि माधोसिंगाचे राजकारणानें पेशव्यास प्राप्त होत होती. शिवाय जयपुरचें राज्य दोन भावांत विभागल्यानें त्याचें सामर्थ्य खच्ची होणार हें उघड होतें. या गोष्टीस अनुसरूनच नानासाहेबानें शिंद्यांचा कारभारी रामचंद्रबावा यांस लिहिलें कीं माधोसिंगास राज्याचा हिस्सा प्राप्त करून देण्यांत दोन्ही गोष्टी साधतात. ¶

असलें धोरण मराठ्यांनीं अखेरपर्यंत ठेविलें होतें हें इ. स. १७९० मध्यें महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबावा उत्तरेंत असतांना त्यांनीं लिहिलेल्या पत्रांवरून कळतें.

---

§ पे. द. भा. २७, ले. १९.

¶ ऐ. प. ले. ६८, ७६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" उदेपुरकर व कोटेकर हे पहिल्यापासून सरकार लक्षांत. त्यांचे व जयपुरकर, जोधपुरकर, यांचे विरूध होते ते सरकार उपयोगी होते. परस्परें राजेरजवाडे यांत फूट असलियानें यांत सरकार उपयोग असें आहे. हल्लीं उदेपुरकरांचे व उभयेतांचे ऐक्य करून दिले. त्यांत सारे राजे एक, ठीक नाहीं. दिल्लीचा बंदोबस्त जो करील, त्यांस हे सारे एक असल्यानें ठीक पडणार नाहीं, कोणे समयी काय करतील हा भरवंसा नाहीं. यांत फूट असल्यानें चांगले असें आहे. आपण पहिल्यापासून यांचे (रजपुतांचे) रीतीस व चालीस माहीतच आहेत. त्या हावे असें नाहीं. व आपण असें करणारही नाहीत. तर कोटेकर यांस उपद्रव लागूं नये. व उदेपूरकर व कोटेकर यांची व जोधपुरकर व जयपुरकर यांची एकी असूं नये, असे करावें. कोणास दुखावूं नये. " †

मराठ्यांचें मुख्य धोरण बादशाही कारभाराचा बंदोबस्त करण्याचें होतें. त्या कार्यांत राजपूत राजेरजवाडे अडथळे उत्पन्न करीत, सबब मराठ्यांनीं त्यांच्यांत बेकी राखून, त्यांना निर्माल्यवत् करून, शेवटीं अंकित करण्याचें धोरण स्वीकारिलें. या धोरणानुसार जयाप्पा शिंदे यांनीं मारवाडचा राणा विजेसिंग याच्याबरोबर युद्ध आरंभिलें. तें युद्ध जुलै १७५४ ते फेब्रुवारी १७५६ पर्यंत चालू राहिलें. या युद्धाचा वृत्तांत येणेंप्रमाणें आहे.

युद्धाचा वृत्तान्त

जोधपूरचा राणा अभयसिंग ता. २१ जून १७४९ रोजीं वारला; व त्याचा मुलगा रामसिंग गादीवर बसला. पुढें रामसिंग व चुलता बख्तसिंग यांच्यामध्यें गादीबद्दल तंटा उत्पन्न झाला. बख्तसिंगानें ता. ८ जुलै १७५१ रोजीं जोधपुरचें राज्य मिळविलें. तेव्हां रामसिंग स्वसंरक्षणासाठीं आपला सासरा ईश्वरसिंग याच्याकडे जयपुरास पळून गेला. ता. २३-९-१७५२ रोजीं बख्तसिंग महामारीचे उपद्रवानें मेला; नंतर त्याचा मुलगा विजेसिंग गादीवर बसला. सबब रामसिंगानें बापाचें राज्य मिळविण्यासाठीं मराठ्यांची मदत मागितली. आरंभीं स. १७५२ च्या जून महिन्यांत जयाप्पा शिंदे यांनीं साबाजी शिंदे व राणोजी भोइटे यांच्याबरोबर स्वतःची पांच हजार फौज व होळकरांची एक हजार फौज देऊन रामसिंगास मदत करण्यासाठीं मारवाडांत रवाना केलें. त्यांनीं रामसिंगाचे वकिलासह दिल्लीहून अजमीरकडे कूच केलें. मराठयांनीं अजमिरास वेढा दिला; त्या शहरांतील घरेंदारें जाळलीं आणि शत्रूचे जे लोक आडवे आले त्यांना कापून काढिलें; आसपासचा मुलुख लुटून उजाड केला. तेव्हां बख्तसिंग अजमीरच्या संरक्षणासाठीं मराठयांवर चाल करून गेला. राजपुतांच्या तोफांच्या आगीपुढें मराठयांना हार खावी लागली. मराठयांनीं राठोडांच्या मुलुखांतून पाय काढून दक्षिणेकडे मोर्चा फिरविला. ‡

---

† ऐ. टि., भा. १, ले. ३

‡ शि. मु. प. व्य., ले. २०४; F. M. E., Vol. II, p. 173

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण रामसिंगाचा राज्याचा हव्यास सुटला नव्हता. तो पुनः १७ डिसेंबर १७५३ रोजीं राघोबा दादास भेटला आणि आपलें राज्य परत मिळविण्यासाठीं त्यानें साह्याची याचना केली. दादानें रामसिंगाचा पक्ष उचलला. ता. २३ जून १७५४ रोजीं जयाप्पा शिंद्यास दहा हजार फौज बरोबर देऊन त्यास त्यानें मारवाडांत रवाना केलें, व रामसिंगास जोधपुरच्या गादीवर बसविण्यास सांगितलें. जयाप्पाजवळ एकंदर चाळीस हजार फौज जमली. बिजेसिंगास गांठून त्याचा निकाल लावण्याकरितां मराठे सांभरच्या मार्गानें कूच करून निघाले. मराठ्यांच्या थोरल्या फौजेशीं तोंड देण्याची तयारी नसल्यामुळें बिजेसिंगानें मेडत्याचा आश्रय केला, तेव्हां जयाप्पानेंहि मेडत्याकडे आपला मोर्चा वळविला. वाटेंत बिजेसिंगाचा कृष्णगड (किल्ला) मराठ्यांनीं ऑगस्टांत सर केला. मेडत्याजवळ मराठे येऊन पोहोंचतात तों तेथें ६ ऑगस्ट रोजीं रामसिंग बारा पंधरा हजार राठोड फौजेनिशीं त्यांस सामील झाला. राजपूत मराठ्यांच्या संयुक्त फौजांनीं ठाण्यास वेढा दिला, तेव्हां बिजेसिंग आंतून बारा पंधरा हजार फौजेनिशीं चालून आला. ता. १५ सप्टेंबर रोजीं दोन्ही सैन्यांत तुंबळ युद्ध झालें. मराठे बिजेसिंगावर चालून जाऊन नीट घोडे घालून त्यांनीं त्यास मोडिलें. बिजेसिंगाची फौज लुटली गेली आणि त्यास नागोरला पळून जाणें भाग पडलें. मेडतें शहर काबीज केल्यावर जयाप्पा व रामसिंग यांनीं १७ सप्टेंबर १७५४ रोजीं शहरांत प्रवेश करून तें तीन तास लुटलें. त्यानंतर या विजयी फौजांनीं नागोरकडे कूच करून त्या शहरास शह दिला.§

या मारवाडचे मोहिमेसंबंधीं एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन, राठोडाशीं लढण्याच्या ईर्ष्येंत न पडतां आपलें हित साधावें असें नानासाहेब पेशव्यानें लिहिलें होतें. नानासाहेबानें जयाप्पास इषारा दिला कीं,

" मारवाडी रजपुत अद्याप गर्विष्ट (आहेत) तरी त्यास तजविजीनें दमवून, युक्तीनें समय पाहून, जरब देऊन, स्वकार्यसिद्धि करावी. श्रीकृपेनें सरदारी व शिपायगिरी व दाव उपाय जाणणें सर्व गुण तुम्हांस आहेत. तदनुरूप साध्य असाध्य विचार करून कार्य करणें. जर जोधपूर निम्मे राज्य द्यावेसें (बिजेसिंगाचा) विचार जहाल्यास उत्तम आहे. दाटून अगदीं घ्यावयासाठीं कलहवृद्धी न करावी, हा थोरांचा संप्रदाय आहे. जर युद्धावांचून साम न होयेसेंच असलिया सावधतेनें आपले रीतीनें त्यास (बिजेसिंगास) आयास आणून नम्र करून कार्य संपादावें. "

पुढें बिजेसिंगाचा मेडतें येथें पराजय झाल्याचें वर्तमान पेशव्यांस कळल्यावर, त्यानें जयाप्पास सुचविलें कीं, पूर्वीं बख्तसिंग व राजे अभयसिंग यांची वाटणी झाली आहे, त्यास अनुसरून बख्तसिंगाचा वाटा त्याचा पुत्र बिजेसिंग यांस द्यावा आणि अभयसिंगाचा वाटा त्याचा पुत्र रामसिंग यांस द्यावा. या दोघांचा एक विचार परस्परें करून देऊन, बिजेसिंगापासून आपलें स्वकार्य होईल तें करून घ्यावें, व रामसिंगापासून कराराप्रमाणें कार्य करून घेऊन

---

§ शि. मु प. व्य., भा. ३, ले. १५२, ४७, ५५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोकळें व्हावें. कारण बिजेसिंगाची बाजू उखडून टाकणें हा दीर्घ प्रयत्न असून त्यास फार दिवस लागले असते. शिवाय पेशव्याची अशी इच्छा होती कीं जयाप्पानें मारवाडांत गुंतून न राहातां थोर मनसुबे शिरावर घेऊन विशेष फलप्राप्ती करून दाखवावी. या वेळीं गोहदकर राणा ग्वालेरीस आपल्या मुलखांत बळावला होता. त्याचें पारिपत्य करणें जरूर होतें. अंतरवेदींतील रोहिले शिरजोर झाले होते. त्यांचा पाडाव करण्याचें काम मराठ्यांना हातांत घ्यावयाचें होतें. तसेंच अयोध्येचा सुभेदार वजीर सफदरजंग हा नुकताच वारला होता; आणि त्याचा पुत्र सुजाउद्दौला हा अयोध्या अलाहाबाद प्रांताचा सुभेदार झाला होता. तेव्हां सुजाउद्दौल्याकडून भली मोठी रक्कम व प्रयाग, बनारस, अलाहाबाद वगैरे हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें मिळविण्याची ही संधि होती. हे उमदे मनसुबे साधण्यासाठीं दिल्लीकडे राघोबाच्या मदतीस जयाप्पा शिंदे व त्याच्या हाताखालील मराठी फौज यांची जरूर होती. पण नागोरास अडकून पडल्यामुळें दिल्लीकडील कार्यास शिंद्यास हातभार लावतां येईना. $

मारवाडच्या मोहिमेचें काम लांबणीवर पडूं नये, व तें स. १७५५ च्या जानेवारी-फेब्रुवारीचे सुमारास संपावें अशी इच्छा राघोबा व मल्हारराव होळकर यांचे कारभारी सखाराम भगवंत बोकील व गंगाधर यशवंत चंद्रचूड यांची होती. तेव्हां या कारभाऱ्यांनीं जयाप्पा शिंद्याचा कारभारी रामाजी अनंत दाभोळकर यांस लिहिलें कीं,

" आपल्या साहित्यास येऊन कोणेहि प्रकारें तूर्त निकाल काढावा असे असिले तरी सत्वर लिहावें. येथून चार मजली तुमच्या शाहावरी आल्यानें निकाल पडत असला तर तसेंच लिहावें. जो विचार जयाप्पाचें ध्यानांत असेल तोच लिहावा. दिल्लीचे कार्यभागाचा निकाल महाप्रयासें होऊन मल्हारराव होळकर जयनगरचे रोखें गेले. राघोबा दादाहि सत्वरच येतील. मुख्य गोष्ट जयाप्पास येथें ठेवून श्रीमंतानी (राघोबा दादानीं) जावें, हें आमच्या (सखाराम बापूच्या) चित्तांत येत नाहीं. त्याहीमध्यें श्रीमंत व सुभेदार मिळोन ग्वालेरीच्या रोखें विठ्ठल-पंताचे (विंचूरकर) साहित्यास गेलियानें त्याचे काम खामखा होते असे असिले तरी तोही प्रकार आपण जयाप्पास पुसावा. सारांष ज्याप्रकारें करून मातबर सरदार पेचांतून निघत ते जरूर केले पाहिजे. सर्व एकरूप जालिया उत्तम आहे. "

पुढें जयाप्पा शिंद्यानें राघोबास समजाविलें कीं,

" राघोबा दादा धनी आहेत, त्यांनीं येथें राहावें आणि मारवाडचा कारभार विल्हे लावावा; परंतु त्यानी मल्हारबास आणूं नये व मल्हारबाचा पाय यांत नसावा. मल्हारबास आणावयाचें चित्तांत असले तर श्रीमंतांनींही जावें. आमचे आम्ही विल्हेस लावूं. "

त्यावर राघोबानें होळकरांचा कारभारी गंगोबा तात्या यांस बोलावून खलबत केलें. खलबत झाल्यावर सर्वांनीं एकत्र होऊन विचार केला कीं राघोबानें रूपनगरास मोर्चे लावून तें स्थळ हस्तगत करावें. गंगोबा तात्यानें मल्हारबाकडे जाऊन त्यांस आणावें; व जयाप्पाचे चित्तांत

$ काव्य. सं., ले. १२५, १३५. शि. मु. प. व्य., भा. ३, ले. ५९, ६१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनसबे आहेत त्याप्रमाणें मल्हाररावानें ऐकून विल्हेस लावावें. मग सर्वांनीं एकत्र होऊन देशास जावें. परंतु जयाप्पा शिंद्यानें सखाराम बापूस स्पष्ट लिहून कळविलें कीं, "तुम्ही जिकडे जाणें तिकडे जावें, आमच्या मनसब्यांत चित्त न घालावें." अशा प्रकारें सन १७५५ च्या फेब्रुवारी व मार्चमध्यें मराठे सरदारांत भेदभाव उत्पन्न होऊन गोष्टी ह्या थरास आल्या. §

इकडे राघोबा व गंगाधर यशवंत यांनीं अंतरवेदींतील रोहिले पठाण यांचा तह कायम केला. तसेच मल्हारजी होळकर व सखाराम बापू या उभयतांनीं रेवाडी व पाटोदि या ठिकाणीं राहून, सर्वांचा परामर्ष करून जयपुरच्या माधोसिंगाकडे मामलत ठरविली. त्यानंतर सांभर प्रांतीं येऊन त्यांनीं नागोरच्या रोखें जावयाचा विचार केला. राघोबा सांभरजवळ येऊन पोहोंचल्यावर राजे बिजेसिंगाकडील बिजेभारती गोसावी सालजाबाकरितां त्यांच्याकडे आला. तेव्हां राघोबानें विचार केला कीं बिजेभारतीचें मानस घेऊन, नागोराकडे जाऊन, जसें बनेल तसें जयाजी शिंदे यांचें व बिजेसिंगाचें सख्य करून देऊन, रामसिंगास जोधपुरी स्थापून पुढें जो कर्तव्यार्थ तो करावा. यास्तव राघोबानें मल्हाररावास व सखाराम बापूस पत्रें पाठवून पुष्करास येऊन सामील होण्यास सांगितलें. पुष्करास येऊन पावतांच जयाजी शिंदे यांचें पत्र येऊन पावलें कीं,

"अजमेरच्या गडांत तर ठाणें कायम झालें. ज्याकरितां बिजेसिंगानें इतकी खराबी भोगली त्या स्थळाचें बळहि मोठें होतें. बिजेसिंगाचें जन्मसंचित व त्याचे पित्याचें वित्तविषय देखील सर्व त्याच ठिकाणीं होतें. ह्या स्थळाची मोठी आड पडली होती. परंतु तें स्थळ रामसिंगजीच्या राजपुतांच्या हातासीं आलें. तेव्हां नागोर आतां फत्ते झाली म्हणून जाणावें. बिजेसिंगाकडून पांचजण भले माणूस येऊन सलुखासाठीं रदबदल करीत आहेत. मनसबा ठराव होईल. आतां थोडक्याच दिवसांत इकडील गुंता उरकून तुम्हांस (राघोबा दादास) सामील होतों. तोंवर तुम्ही रूपनगरासी शिक्षा देऊन ती जागा काबीज करावी हेंच उत्तम."

अशा प्रकारें जयाप्पा शिंद्यानें अजमीर किल्ला फाल्गुन शुद्ध दशमीस फत्ते केल्याचें वर्तमान राघोबा दादास कळविलें. पुढें जयाप्पानें नागोरला छावणी करण्याचा निश्चय केला. $

बिजेसिंगास सर्व बाजूंनीं कोंडून त्याचें दाणापाणी बंद करून त्यास आयास आणण्यासाठीं मराठे जालोर, जोधपूर वगैरे ठिकाणांसहि वेढे देऊन बसले. अशा प्रकारें बिजेसिंगाचे लोकांस मराठी फौजेनें सर्व बाजूंनीं घेरल्यामुळें त्यांजवर स. १७५५ च्या मार्चचे सुमारास, धान्याच्या महर्गतेमुळें व पाण्याच्या तुटवड्यामुळें कठिण प्रसंग गुदरला. तेव्हां बिजेसिंगानें जयाप्पाबरोबर सलुखाचें बोलणें सुरू केलें. बिजेसिंगाकडून बिजेभारती गोसावी, राजसिंग चव्हाण व जगनेश्वर मध्यस्थीस आले होते. या त्रिवर्गांनीं कांहीं दिवस सलुखाच्या गोष्टी

---

§ शिं. मु. प. व्य., भा. ३, ले. २९०, २९३–२९६, २९८, २९९.

$ पे. द., भाग २७, ले. १०५, १०७; शिं मु. प. व्य., भा. ३, ले. २११, २४१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व रदबदलींत घालविले. या समयांत गोसावी व चव्हाण यांच्या अंगभूतें मारेकरी माणसें होतीं. त्यांनीं संधि पाहून ता. २४ जुलै १७५५ रोजीं दगा करून जयाप्पाचा खून केला. जयाप्पा स्नानास चौकीवर उघडे बसले; त्यासमयीं रजपुत दंगेयासी आला. सुरी घेऊन, अस्तनींत लपवून त्यानें पोटांत दोन सुरी चालविली. या प्रकारें जयाप्पास दगा झाला. राजपूत व त्याबरोबरील दुसरे चौथे राजपूत मारेकरी मृत्यु पावले. मराठ्यांच्या लष्करांत एकच हाहाःकार झाला. जयाप्पाच्या मृत्यूमुळें तमाम जाट, रजपूत, मोगल शेर झाले. तेव्हां प्रसंगावधान राखून दत्ताजी शिंद्यानें मोर्चे कायम केले. नागोरची फौज नागोरास, जालेरची जालेरास व जोधपुरची जोधपुरास कायम केली. अजमिरास जावयाचा विचार झाला होता तो रद्द केला; कारण आतां फुटून फळी उचलावी तर अब्रू जाते. तेव्हां दत्ताजी शिंद्यानें असा करार केला कीं, शह न सोडितां रांगडे कापून काढावेत; नाहीं तर तमाम हिंदुस्थानास जोर येईल व सारे फितूर करतील. त्यानें नानासाहेब पेशव्यास लिहून कळविलें कीं, "बिजेसिंगास उत्तम प्रकारें तंग केलें आहे. वरकड कोणाच्यानें कांहीं त्याची कुमक करवत नाहीं. स्वामींनीं (पेशव्यानें) त्याचे (बिजेसिंगाचे) वकिलास साफ सांगून निरोप द्यावा. कैलासवासी आप्पांनीं जो अभिमान धरिला होता तो शेवटास नेलियानें लौकिक व स्वामीकार्य, सर्वांस जय आहे." तेव्हां पेशव्यानें दत्ताजीचा परामर्ष काळजीपूर्वक घेऊन, जयाप्पाच्या धोरणांत किंवा वर्तनांत काय दोष होते हे गोड शब्दांत वर्णन करून, राज्यचालकानें आपला शह कसा ठेवावा याविषयीं मार्मिक पत्र दत्ताजीस लिहिलें—

"आप्पानी जे अवलंबिले ते आम्हांस (पेशव्यास) सर्व प्रकारें करणें. परंतु हा राजकार्य प्रसंग आहे. तुम्ही अवलंबिले कार्य तें अगत्य आम्हांस करणें. परंतु होणारानुरूप आपानी (जयाप्पा) हातेर वोढिले. शिपायगिरीची रीत केली. सरदारगिरीचा प्रकार न केला. जेव्हां प्रथम भारथी लढाई मारली त्या उपरी नव्या दबावांत तूट सोसून, सल्ख हरप्रकारें, पुढील संकट दूरदर्शीनें जाणून, करून मोकळे जाहले असते तर आज प्रयाग, अंतरवेद व अलीकडील खेचीचा मुलख सोडविणे वगैरे कामें सर्वही सरकार किफायतीची होऊन गेली असती. परंतु होणारास इलाज नाहीं. तुम्हींही आजपावेतों शिपायगिरी केली. आतां सरदारीची रीत धरून तजविजीनेंच कांहीं कामें करावीं. जरूर संकट पडेल तेथेंच नेटून शिपायगिरी करावी. तीन पिढ्यांचे एकनिष्ठ सेवक कामाचें असतां, तुमचा अभिमान नसावा हें कधींही या घरांत घडणार नाहीं. सर्व प्रकारें समाधान चित्ताचें करून, अष्टपैलूचे रीतीनें जसा जे समयीं प्रसंग पहाल तसा मनसबा करीत जाणें. सत्वरच दीढा महिन्यांत पांच सहा हजार फौज घेऊन पावेल. मागाहून खासाही वीस हजार फौजेनिशीं येतच आहे. बिजेसिंगाचा वकील पन्नास लक्ष (रुपये) द्यावे, रामसिंगास थोडीशी जागा पोटापुर्ती द्यावी, ऐसे बोलत होता. आम्ही ते गोष्ट मान्य केलीच नव्हती. सांप्रत हा प्रसंग (जयाप्पाचा खून) जहाला. याजमुळें आम्ही साफच त्यास (वकीलास) जाब दिला कीं याउपर आम्हांस तह कर्ता अनकूल पडत नाहीं; तुम्ही (वकील) जाणें. ऐसें म्हणोन निरोप दिला. तेथें ते (बिजेसिंग) आतां चढी लागले असतील, व मध्यस्थ मारले गेले त्यामुळें मध्यस्तीतही कोणी शिरत नसेल. अद्याप त्यानीं (बिजेसिंगानीं) रामसिंगास पंधरा विसांची

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागा दिली व तुमचा (दत्ताजीचा) शिबंदीखर्च मसलतखर्च फिटोन दहा लाख जाजती दिल्हे, तर घेऊन सलूख करून त्या संकटांतून सुटावें हे राज्यभार अष्टपैलूपणास उचीत आहे. तेथील प्रसंगानुरूप करणें."

पुढें पेशव्यानें, दत्ताजी शिंदे यांनीं हिंमत धरून मनसुबियास आव घातला होता तो प्रकार सिद्धीस पावावा यासाठीं ग्वाल्हेरहून अंताजी माणकेश्वरास मारवाडांतील मराठे फौजेच्या मदतीस पाठविलें. तसेंच यशवंतराव पवार आणि समशेर बहाद्दर यांना दहा हजार फौजेनिशीं कुमकेस रवाना केलें. शिवाय शिंद्याचा कारभारी रामाजी अनंत यांना पेशव्यानें राठोडांचा पाडाव करण्यासाठीं सुचविलें कीं,

"राजपुतांमध्यें जाटाशीं राजकारण राखून, एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, एकदांच सर्वांशीं कजिया करूं नये. तूर्त तोंडानें वरकडाशीं फारच गोड बोलून राजकारण राखावें. दत्तबाचा स्वभाव शिपायगिरीचा आहे, यास्तव रागें करून असमयीं अस्थानीं निकडीस प्रवर्ततील. त्यास समजावून गोड बोलूनच सांगत जाणें. दोन चार मिळून पंचवीस चाळीस हजार (राजपुत) जमा होऊन आले तर गनिमी तऱ्हेनें तीन महिने संभाळणें."†

जयाप्पाचा काळ झाल्यानंतर विजेसिंगानें मराठ्यांना शह देण्याकरितां जयपुरचा राणा माधोसिंग यांस आपल्या बाजूस वळविलें. माधोसिंगानें आपला वकील दिल्लीस पाठवून, पातशहा व वजीर यांना विनंती केली कीं "आपण मराठे याचा खून केला, तुम्हीं बाहेर निघावें. आम्ही सामील होतों." वजिरानें माधोसिंगास सांगितलें कीं "आपणांवर सिबंदीचा पैसा चढला आहे. पोटास नाहीं." त्याजवर माधोसिंग वगैरे यांनीं सांगितलें कीं "तुम्हीं (वजीर, बादशहा) बाहेर निघा. आम्हीं (राजपुत राजे) खर्च चालवूं." अशा प्रकारें माधोसिंग, जाट, वजीर व रोहिले, या चौघांची मराठ्यांविरुद्ध जूट झाली; आणि बादशहा तोफखाना घेऊन मराठ्यांवर चाल करण्यास बाहेर निघणार असा बेत मुक्रर झाला. मारवाडमध्यें राठोड व राजपुतांनीं एकजुटीनें मराठ्यांवर सर्वत्र हल्ले करण्यास आरंभ केला. स. १७५५ च्या ऑक्टोबरचे सुमारास विजेसिंगाचे लोकांस जेसलमेरकर भाटी व पोखरणकर सामील होऊन जालोर स्थळाकडे गेले. ही सर्व राजपूत फौज एकत्र होऊन, जोधपुरास वेढा दिलेल्या मराठे फौजेवर चालून येणार ही बातमी दत्ताजी शिंद्यास येतांच, त्यांनीं जोधपुरास जगन्नाथ पुरोहित, जानराव वाबळे व सटवोजी बांडे या त्रिवर्गास जमावासुद्धां ठेवून, संताजी वाबळे, मालजी शिंदे, हुजरातीचे लोक व जिवाजी पवार व तुकोजी पवाराचे लोक असे त्यांच्यावर रवाना केले. या मराठे फौजेची व राजपुतांची गांठ गोदेजेवर पडली. तेथें निकराची लढाई झाली. मराठ्यांनीं राजपुतांची माणसें मारिलीं व जखमी केलीं. राजपुतांना बहुत फजित करून गोदेजेंत कोंडिलें आणि गांवाभोंवतीं लोकांच्या चौक्या उभ्या करून, राजपुतांची रसद व कही बंद केली. त्यामुळें राजपुतांचे लष्करांत धारण रुपयास दोन अडीच शेर झाली ! नंतर दत्ताजी शिंद्यानें नागोरचा बंदोबस्त

† पे. द., भा. २, ले. ४८; भा. २७, ले. ११६; का. सं. प. ले. १३९, १४१, १४२; शिं. मु. प. व्य. भा. ३, ले. ३२०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राखून, रांगड्यांनीं जागजागा हुल्लड करून डोकीं उचललीं होतीं त्यांच्यावर फौज पाठवून, त्यांचें पारिपत्य केलें. परंतु राणा माधोसिंग यानें अनरुधसिंगाबरोबर फौज देऊन, विजेसिंगाचे मदतीस पाठविलें म्हणून हा कालपावेतों विजेसिंगास दम धरणें शक्य झालें. §

शहापूरवाला उमेदसिंग, रूपनगरवाला बहादुरसिंग, करोलीकर गोपालसिंग आणि बुंदीवाला उमेदसिंग याचा भाऊ दीपसिंग हे राजपूत संस्थानिक आपल्या लोकांसह अनरुधसिंगास रामगड येथें सामील झाले. मागाहून बिकानेरचा दिवाण बख्तवरमल व मारवाडच्या विजेसिंगाचे लोक त्याला येऊन मिळाले. अशा प्रकारें अनरूधसिंग पंचवीस तीसहजार फौज भारी जमाव करून स. १७५५ च्या ऑक्टोबर आरंभीं मारवाडच्या सरहद्दीवर येऊन पोहोंचला. अनरूधसिंगाचा मनोदय होता कीं, नागोरास जाऊन बिजेसिंगास सामील होऊन, मराठ्याशीं लढाई करून, त्यांना मारवाडांतून उधळून लावावें. परंतु नरसिंगराव शिंदे, खानाजी जाधव, व राणोजी भोइटे आणि दुसरे सरदार यांनीं राजपूत सैन्याचे पिछाडीस गांठ घालून युद्ध केलें. राजपुतांची फौज सहा सात हजार व तोफखाना होता. ता. १६ ऑक्टोबर १७५५ रोजीं मराठ्यांचें व राजपुतांचें युद्ध बहुत उत्तम प्रकारें झालें. राजपुतांजवळ तोफांच्या आगीचें बळ फार होतें. परंतु मराठ्यांनीं छातीचा मोठा कोट करून, राजपुतांच्या तोफखान्यावर चालून जाऊन, पहिलेच उठावणीस तोफखाना ताब्यांत घेऊन, तीन चार घटकापर्यंत तरवार चालविली. मराठ्यांनीं राजपुतांचे सात आठशें माणूस कापून काढिले, त्यांचे हजार बाराशे घोडे व ४०–५० उंट लुटून आपले लष्करांत आणिले आणि दोन तोफा व दारुगोळ्यानें भरलेल्या गाड्या घेऊन, त्यांना मोडून माघारें घातलें. अशा प्रकारें राजपूत सैन्याचा चंडोल बुडविला गेला आणि मराठ्यांची फत्ते झाली. चार घटका झुंज झालें. राजपुतांकडील मुडदे देखील काढूं दिले नाहींत. त्यानंतर अनरूधसिंग जीव वांचविण्यासाठीं दीडवाण्याचे रोखें चालूं लागला. वाटेनें मराठे त्याचे आसपास होते. त्यांनीं संधि साधून राजपुतांचीं तट्टें, उंट व बैल लुटून आणिले. अनरूधसिंह दिडवाण्यास येऊन पोहोंचला त्या दिवशीं मराठ्यांनीं मार्गांतील विहिरी बुजविल्या आणि जागजागचीं तळीं रोखून उभे राहिले. मराठ्यांनीं बहुतच निकड करून, कछव्याचे तीन चारशें राजपूत मारिले, शंभर सवाशें घोडे घेतले आणि तीन तोफा आणिल्या. राजपूत लष्करांतील माणसें, घोडीं, उंट व बैल वगैरे मार्गामध्यें पाण्यावांचून बहुत मृत्यु पावले. त्यामुळें अनुरूधसिंग जिकीरीस आला. त्याचे लोकांस दीडवाण्याहून पुढें यावयाची हिंमत राहिली नाहीं. मराठ्यांनीं दिडवाण्याच्या आसपास रात्रंदिवस चौक्या उभ्या करून, राजपुतांस जाणारी रसद व कही बंद केली. त्यामुळें राजपुतांचे लष्करांत महर्गता विशेष झाली. तेव्हां अनरूधसिंगानें अगतिक होऊन आश्विन वद्य एकादशीस मराठे सरदारांची भेट घेतली व सलुखाचा संदर्भ लाविला. $

---

§ [पे. द, भा २१, ले. ७३; पे. द , भा. २, ले. ४९]

$ [पे. द., भा. २१, ले. ७४, ७७; पे. द., भा. २, ले. ५०; पे. द., भा. २७, ले ११७.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिजेसिंगानें दिल्लीस वकील पाठवून वजीराचे विद्यमानें पातशहास पांच लाख रुपये नजराणा पाठविला आणि अर्जी केली कीं, "दिल्लीहून वजीरानें पातशहास अजमीरची यात्रा व बिजेसिंगाची कुमक ऐसा मनसुबा योजून अजमीरचे सुमारें कूच करून आणावें. दरोज दरकूच दहा हजार रुपये देत जाऊं." बिजेसिंगानें पठाण रोहिले यांच्याकडे राजकारण करून त्यांस मदतीस बोलाविलें. याखेरीज त्यानें आपला वकील लाहोरप्रांतीं अब्दाली पठाण याच्याकडे पाठविला आणि त्यास खर्चवेचाचे ठरवून मदतीस आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास ह्या राजकारणांत यश आलें नाहीं. नानासाहेब पेशव्यानें दत्ताजी शिंद्याचे कुमकेस रवाना केलेल्या फौजेपैकीं एकटा अंताजी माणकेश्वर दहा हजार फौजेनिशीं नोव्हेंबर ४ तारखेस दीडवाण्यावर मराठ्यांचे लष्करांत येऊन सामील झाला. त्यानें मार्गी माधोसिंगाचा जयनगरचा मुलुख मारून जाळून फस्त केला. दिडवाण्यास आल्यावर त्यानें शत्रूस जाणारी रसद मारली. पुढें आठ रोजानें नोव्हेंबर १२ तारखेस नागोरांतून बिजेसिंग ३०० प्यादे व १०० स्वार बरोबर घेऊन रात्रीं पळाला आणि अनरूधसिंगाच्या फौजेंत येत होता. परंतु मार्गांत मराठ्यांची फौज भोंवतीं असल्यामुळें तो मार्ग फिरला आणि बिकानेरास गेला. मराठ्यांनीं दिडवाण्यास जी राजपूत फौज घेरली होती तींत बिजेसिंगाचे लोक, बिकानेरवाले व रूपनगरवाले झाडून पंचवीस हजार होते. या मराठी फौजेपुढें आपला टिकाव लागणार नाहीं अशी माधोसिंगाची खात्री पटली. तेव्हां माधोसिंगानें—दिडवाण्यांतून स्वतःचे फौजेची सुटका करण्यासाठीं मराठ्यांस पांच लाख रुपये दंड देण्याचें कबूल केलें. अनरूधसिंगानें तहाची वाटाघाट स. १७५६ चे जानेवारींत चालू ठेविली. पुढे जनकोजी शिंद्यानें अंताजी माणकेश्वरास जोधपूर प्रांतीं पाठवून राठोड राजपुतांची फौज मारून काढण्यास सांगितलें. अंताजीपंत जोधपूर प्रांतीं कूच करून गेल्यावर, मराठ्यांच्या फौजेची आवई ऐकून बिजेसिंगाचा पुत्र फौजेसुद्धां पळून गेला. मराठ्यांनीं अंमल जागोजाग पूर्ववत् बसविला. पुढें जनकोजी शिंद्यानें अंताजी माणकेश्वरास नागोरास भेटीस बोलाविलें. दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांची भेट झाली. व कोणत्या अटींवर तह करावा याबाबत मराठे सरदारांत वाटाघाट सुरु झाली. सैन्यें पोटावर चालतात या नेपोलिऑंच्या वचनाला मराठे अपवाद नव्हते. संबंध वर्षभर चाललेल्या मोहिमेंत मुलुख बेचिराख झालेला, लष्करांत एक रुपयास चार शेर दाणा व चार शेर वैरण, तींहि कष्टप्राप्य. एका रुपयाचें गवत एका घोड्यास पुरेना. पाणी दीडशें हातावर खोल! लष्करांत दुष्काळ, फौज बुडाली, बाकी कांहीं राहिली नाहीं, असें चहूंकडून संकट जाणून बिजेसिंगासी तहाचें बोलणें लावलें. बिजेसिंग नागोरहून बिकानेरला पळून गेल्यावर त्यानें मराठ्यांस तोंड देण्यासाठीं सैन्य उभें करण्याचा प्रयत्न केला. परंतु बिकानेरभोंवती बारा कोस पाणी किंवा विहीर देखील नव्हती. त्यामुळें त्याला पळत सुटावें लागलें. शेवटीं निरुपाय होऊन तो स. १७५५ च्या डिसेंबरांत नागोरास परत आला; आणि स. १७५६ चे फेब्रुवारी अखेरीस त्याला मराठ्यांशीं तह करणें भाग पडलें.

या तहानें अजमीरचा किल्ला व परगणा मराठ्यांचे पूर्णपणें ताब्यांत आला. बिजेसिंगानें लढाईचे खर्चाबद्दल मराठ्यांस पन्नास लाख रुपये खंडणी द्यावयाचें कबूल केलें. या खंडणीपैकीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंचवीस लक्ष रुपये साल मजकुरी द्यावे, व पंचवीस लाख राहिले ते पुढील दोन सालांत द्यावे असा करार झाला. निम्में राज्य व जालोर किल्ला रामसिंगास द्यावा; आणि निम्में राज्य व जोधपूर, नागोर व मेडता हीं शहरें बिजेसिंगाकडे राहावीं. ह्या युद्धांत मराठयांनीं अजमीर प्रांत मात्र मिळविला; परंतु बाकीच्या अटी बिजेसिंगानें परिपूर्ण केल्या नाहींत.§

या युद्धांत मराठयांचें शौर्य, हिंमत, व चिकाटी हे गुण पूर्णपणें निदर्शनास आले. बिजेसिंग आदिकरून मारवाडच्या राजपुतांची तरवार मशहूर. फार करून राजपुतान्यांतील मर्द मनुष्य समशेरीचें काम पडल्यास कोणेविषयीं चुकतील हें होणेंच नाहीं. असें असतां मराठयांनीं बिजेसिंगाचा व राजपूत लोकांचा पराभव करून यश संपादिलें. शिवाय जयाप्पासारखा मोहरा दगा होऊन मृत्यू पावला तरी खचून न जातां, मराठे खळी खणून शत्रूच्या मानगुटी बसले व बेडरपणें अधिक त्वेषानें लढून त्यांनीं शत्रूस नामोहरम केलें. विद्युल्लतेच्या वेगानें होणाऱ्या मराठयांच्या घोडदौडीपुढें शत्रूचा तोफखाना निरुपयोगी ठरला.

अशा प्रकारें या युद्धानें मराठयांच्या अंगीं असणारे राज्य जिंकण्यास उपयुक्त असे जे गुण, त्यांची तावून सुलाखून पारख झाली. त्याचप्रमाणें शिंदे व होळकर यांची आपसांतील चुरस व वैमनस्यें आणि प्रत्येकाची महत्त्वाकांक्षा यामुळें राष्ट्राची एकी व प्रगति होण्यास अडचण उत्पन्न करणारे दुर्गुण देखील पूर्णपणें निदर्शनास आले. परस्पर विश्वास हें राष्ट्रीय नीतिमत्तेचें मुख्य जीवन असतें याची जाणीव दौलतीचे आधारस्तंभ जे शिंदे, होळकर यांना पटली नव्हती.

§ [पे. द., भा. २१, ले. ८०, ८२, ८३; पे. द., भा. २१ ले. ५४; पे. द., भा. २७, ले. ११९, १२८; शिं मु. प. व्य., भा. ३ ले. १७५; २१८; २१९.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नानासाहेब पेशवे यांचा द्वितीय विवाह

[लेखक–श्री. यशवंत खुशाल देशपांडे, एम्. ए., एल्एल्. बी., यवतमाळ]

रा. सा. गोविंदराव सरदेसाई यांनीं मराठी रियासतीचे मध्यविभाग भाग २ व ३ लिहिले. त्यानंतर पेशवेकालीन इतिहासाची साधनसामुग्री उत्तरोत्तर जास्तच उपलब्ध होत आहे. पेशवे दप्तराचे अनेक प्रकाशित खंड या गोष्टीची साक्ष देत आहेत. रा. सा. सरदेसाई यांनीं तत्कालीं उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीवरून जीं अनुमानें काढिलीं होतीं त्यापैकीं कांहीं अनुमानें, नवीन सामुग्री व पुरावा उपलब्ध झाल्यामुळें त्यांना बदलावीं लागलीं आहेत. यासंबंधानें मी मालव साहित्याच्या एका विशेषांकांत मल्हारराव होळकरावरील एका लेखांत समाधानात्मक उल्लेख केला आहे.

आजहि मराठी राज्याच्या इतिहासाची अशी स्थिति आहे कीं अनेक घराण्यांतून निरनिराळ्या प्रसंगावर नवीन प्रकाश पाडील असा अस्सल पत्रव्यवहार अप्रकाशित पडून आहे. अद्याप त्यास संशोधकाचा हस्तस्पर्शसुद्धां झाला नाहीं. मराठी इतिहासाच्या संशोधनक्षेत्रांत कार्य करणाऱ्या ज्या थोड्या बहुत संस्था आणि व्यक्ति महाराष्ट्रांत आहेत त्यांचे संग्रहांतहि इतिहासावर नवीन प्रकाश पाडील असा बराचसा अस्सल पत्रव्यवहार संग्रहित आहे. तथापि तो प्रकाशित न झाल्यामुळें त्याचा इतिहासलेखकास उपयोग होऊं शकत नाहीं. सातारा येथील पारसनीस म्यूझिअममध्यें नागपूरकर भोसल्यांच्या राजकारणासंबंधीं ३००–३५० अस्सल पत्रें आहेत. पण तीं प्रकाशित होऊन त्यांचा इतिहासलेखकास उपयोग होईल असा सध्या तरी योग दिसत नाहीं.

यवतमाळच्या शारदाश्रमाच्या ऐतिहासिक पत्रसंग्रहाचीहि तीच स्थिति आहे. त्या संग्रहापैकीं एका महत्त्वाच्या अस्सल पत्रासंबंधानें आज लिहावयाचें योजिलें आहे. प्रस्तुत पत्र नानासाहेब पेशवे यांच्या लष्कराचा राक्षसभुवन येथें तळ असतांना देवकाते सरदार यांचा वकील चिंतोराम यानें आपल्या मालकास वरील मुक्कामावरून लिहिलें आहे. या देवकाते सरदारांचे वंशज निजाम स्टेटमध्यें सेंदुरसणी म्हणून एक गांव आहे तेथें असतात. यांच्याजवळ पेशवे अमदानींतील आणि इतरहि बराचसा अस्सल पत्रव्यवहार आहे. त्यापैकीं बरींचशीं पत्रें या देवकाते सरदारांच्या वंशजानें हैदराबाद येथें कै. केशवराव कोरटकर, माजी न्यायाधीश, निजाम हायकोर्ट यांच्या स्वाधीन केलीं होतीं. त्यांपैकीं सरासरी २५ पत्रें कै. केशवरावसाहेब यांनीं प्रस्तुत लेखकास शारदाश्रमाच्या संग्रहाकरितां दिलीं होतीं. त्यांतच हें प्रस्तुतचें पत्र आहे. (या चिंतोराम वकिलाच्या स्वदस्तुरचीं आणखींहि तीन चार पत्रें आपल्या मालकास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्याहून लिहिलेलीं अशीं आहेत व तत्कालीन राजकारणासंबंधीं त्या पत्रांतून उल्लेख आहे. प्रस्तुत पत्राच्या वैशिष्ट्यासंबंधीं लिहिण्यापूर्वी तें अस्सल पत्रच पुढें देत आहें. त्यानंतर या पत्रानें आपल्या इतिहासज्ञानांत काय नवीन भर पडते ती पाहूं.) तें पत्र असें आहे—

श्री

राजश्री सेटियाजी आपा बळवंत राव देवकाते गोसावी यास अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्ये श्रे ॥ चिंतो राम कृतानेक असिर्वाद विनंती उपरी येथील क्षेम त॥ मार्ग (सीर) वद्ये अस्टीमी पर्येत मुकाम राक्षेस भुवन येथे श्रीमंत राजश्री नानासाहेब यांच्या लस्करांत सनीध असो या नंतर साहेबी मेहरवानगी करून सटवाजी उगल याज बराबरी पत्र पाठविले पावोन परम संतोश जाला पत्री कितेक अर्थ लिहिला तयारी करून बाहेर निघाले परंतु मळसूरकरांची अद्याप तयारी जाली नाही अपणाकडे जावे काये मन (स) बा आहे ते वर्तमान लेहून पाठवणे त्या सारखे स्वार होऊन येऊ म्हणून लिहिले तरी येथील मनसबा तरी मार्गस्वर वद्ये सप्तमीस श्रीमंताचे लइन जाले नवरी पैठणची सावकारांची देशसस्ताची नवा वरसाची असे प्र...ध काल देवप्रतीस्टा जाली दो प्रहरा रात्री लइन जाले पाहटे साडे जाले नवरी घरास अणीली तमाम लोकाणी लाहाण थोर यानी श्रीमंतास अहेर केला त्यास आम्हीं ही अहेर केला येक तीवट उच व सेला उच १ येक पैठणचा शालु १ चोळीउ यैसी मीळोन सनगे रु॥ ७० सतरीस घेऊन आहेर केला असे ते संमई श्रीमंतानी पुसले जे देवकाते कोठें आहेत त्यास आम्हीं विनती केली जे गांव सोडून दो कोसावर जमावसुधा येऊन राहिले आहेत सत्वर दरशनासे येतील या प्रमाणें मनसबा जाला असे याउपरी सरलस्करचा मजकूर तरी बापुजी नाईक अकालकोटास गेले फिरते संमई वैरगास आले सरलस्करची भेटी जाली त्याज बरांबरी भुमे पावेतो आले त्यांस तेथून निरोप घेऊन माघारे वैरगास गेले. आठा रोजात येऊन दाखल लस्करात श्रीमंताचे भेटीस येतों यैसा निस्छाये केला असे तेही तयार होऊन येतील तरी तुम्ही अवघे भाऊ बंद तयारी करून जमावानसी येणें म्हणजे उत्तम राजश्री नरसींग राव धायेगुडे यास ××× बास पत्र पाठविले अद्यापी आले नाहीत ही विनंती"

हें पत्र मोडी लिपींत असून त्याची ही अस्सल बरहुकूम नक्कल येथें दिली आहे.

सदाशिवराव भाऊ पटदुराहून ता. १४-३-१७६० रोजीं उत्तर हिंदुस्थानकडे रवाना झाले. त्यानंतरच्या विजयादशमीनंतर नानासाहेब पेशवेहि पुण्याच्या बाहेर पडून अहमदनगरच्या बाजूस लष्करी तळ देऊन राहिले. सरंजामी सरदारांस आपापले जमान्यासुद्धां स्वारींत हजर राहाण्याबद्दलचीं अनेक आज्ञापत्रें त्या सुमाराचीं उपलब्ध आहेत. त्याबाजूस सैन्याची जुळवाजुळव करण्यामध्यें दोन हेतु होते. एक तर निजामावर जरब बसविण्याचा आणि दुसरा भाऊसाहेब यांना उत्तर हिंदुस्थानांतील स्वारींत सैन्य, युद्धसामुग्री आणि पैसा यांचा पुरवठा करण्याचा. तत्कालीन पत्रव्यवहारांत या संबंधानें अनेक उल्लेख आहेत. याबरोबरच दुसरी एक गोष्ट पेशवे दफ्तर खंडांतील लेखांवरून निष्पन्न होते ती ही कीं, मराठ्यांचें लष्कर उत्तर हिंदुस्थानांत लढत असतांना नानासाहेब पेशवे द्वितीय विवाहासंबंधानें खटपट करीत होते. पेशवे दफ्तराच्या खंडांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरनिराळ्या ठिकाणावरून मुली दाखविण्यास आणल्याचा आणि त्यानिमित्त मुलींना पोषाख, प्रवासखर्च इत्यादि दिल्याचा उल्लेख आहे.

नानासाहेब पेशव्यांचा जन्म ता. १२-१२-१७२१ चा आहे. त्यांचें गोपिकाबाईशीं ता. १०-१-१७३० रोजीं लग्न झालें. म्हणजे सन १७६० च्या डिसेंबरमध्यें नानासाहेबांचें ३९ वर्षांचें वय होतें. त्या वेळीं गोपिकाबाईचें सरासरी ३५-३६ वर्षांचें वय होतें. त्यांना पांच मुलें झालीं असून त्या वेळीं तीन मुलें हयात होतीं व वडील मुलगा विश्वासराव हा तर उत्तरेकडील स्वारींत काकांच्या तालमींत युद्धक्षेत्रावर होता. अशा परिस्थितींत नानासाहेब पेशव्यांनीं द्वितीय विवाहाच्या खटपटींत कां पडावें आणि लष्करी छावणींत असतांना द्वितीय विवाह कां घडून आणावा हें कोडें अद्याप उलगडलें नाहीं व त्यासंबंधानें उपलब्ध पत्रव्यवहारांत कोठेंच उल्लेख आढळत नाहीं. मराठी रियासत मध्यविभाग ३ मध्यें पान २११ वर "डिसेंबर २१ रोजीं पेशव्याचा मुक्काम राक्षसभुवनवर होता. २७ डिसेंबरास त्यानें पैठणास दुसरें लग्न केलें. मुलगी नारोबा नाईक वाखरे देशस्थ सावकाराची केली. नांव राधाबाई. पुढें लगेच पेशवा उत्तरेंत निघाला." येवढाच या लग्नासंबंधानें उल्लेख आहे.

पुढें २३५ पानावर नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूचीं कारणें दिलीं आहेत, त्यांत 'प्रधानपंत क्षयाची व्यथा होऊन वारले' ही गोष्ट नमूद करून क्षयाच्या वृद्धीची कारणपरंपरा दिली आहे. त्यांत "गोपिकाबाईशीं त्याचें बिनसलें असल्याचा उल्लेख नाना फडणिसाचा आहे. सन १७६० च्या डिसेंबरांत दुसरी तरुण बायको त्यानें केली आणि लवकरच अस्थि-चर्मावर शरीरस्थिति आली," अशीं वाक्यें आहेत. अशा प्रकारच्या वाक्यांमुळें द्वितीय विवाह हाहि नानासाहेबांच्या अकालीं मृत्यूचें एक कारण असावें असा वाचकांचा समज होण्याचा संभव आहे. नागपूर येथील मध्यप्रान्त संशोधन मंडळाच्या एका वार्षिक समारंभांत प्रस्तुत लेखक अध्यक्ष असतांना एका वक्त्यानें हें द्वितीय विवाहाचें एक कारण नानासाहेबांच्या मृत्यूच्या कारणपरंपरेंत समाविष्ट केलें होतें. परंतु या द्वितीय विवाहाचा नानासाहेबांच्या निधनावर कांहीं परिणाम होणें असंभवनीय आहे असें प्रस्तुत पुढें आलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें.

नानासाहेबांचें द्वितीय लग्न पत्राप्रों मार्गशीर्ष वा॥ सप्तमीस आणि भाग ३ मध्यें सांगितल्याप्रो॥ ता. २७-१२-१७६० रोजीं झालें आणि नानासाहेबांचा मृत्यु ज्येष्ठ व॥ ६ शके १६८३ म्हणजे २६-६-१७६१ ला झाला. म्हणजे लग्नानंतर नानासाहेब केवळ सहा महिन्यांनीं वारले. प्रस्तुत पत्राप्रों नवऱ्या मुलीचें वय 'नवा वरसाचें' होतें. म्हणजे नाना-साहेबांच्या मृत्यूच्या वेळीं या दुसऱ्या पत्नीचें वय फार तर जास्तींत जास्त १० वर्षांचें असेल. अशा स्थितींत या लग्नाचा नानासाहेबांच्या मृत्यूवर कांहीं परिणाम झाला असेल असें संभवत नाहीं.

सन १७६० मध्यें विजयादशमीस पुणें सोडल्यापासून परत जून १७६१ मध्यें पेशवा परत पुण्यास आला तोंपर्यंत प्रथम पत्नी गोपिकाबाईहि त्याच्या बरोबर होती असें तत्कालीन लिखाणावरून दिसून येतें. तथापि नानासाहेबांचें गोपिकाबाईशीं बिघडलें होतें असा नाना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फडणिसाचा उल्लेख असून उत्तरेकडून परत येतांना वाटेवर श्राद्ध झालें त्या वेळीं भोजन प्रसंगीं राधाबाई वाढीत होती असा नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांत उल्लेख आहे. तेव्हां गोपिकाबाईशीं बेबनाव झाला होता कीं काय ? व तसें असल्यास तें द्वितीय विवाहास कारणीभूत झालें असलें पाहिजे असें अनुमान क्रमप्राप्त आहे. तथापि या वयांत, पत्नी व मुलेंबाळें असतांना आणि शिवाय उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचें सैन्य गेलें असतां व आणखी मदत पाठविण्याबद्दल विचार सुरू असतां नानासाहेबांनीं ९ वर्षांच्या लहान मुलीशीं लग्न कां केलें हें कोडें असल पुराव्याच्या अभावीं उलगडतां येणें अशक्य आहे. नानासाहेबांच्या मृत्यूच्या वेळीं राधाबाईचें वय सरासरी १० वर्षांचें होतें व त्यांच्या पाठीमागें ९॥ वर्षें वैधव्य दशेंत काढून शेवटीं ता. १९-११-१७७० रोजीं राधाबाईचा अंत झाला. गोपिकाबाई मात्र नानासाहेबांच्या मागें २७ वर्षें जिवंत होती. तिनें आपलें उत्तर आयुष्य नाशिक पंचवटी येथें घालविलें.

नानासाहेबांच्या द्वितीय विवाहाचें समर्थन करणें ही गोष्ट त्यांच्या चरित्रकारास फार अवघड आहे. या द्वितीय विवाहापासून खुद्द नानासाहेबांस कांहीं कौटुंबिक सुख लाभलें असेल असें प्रस्तुत पत्रांत दिलेल्या मुलीच्या वयावरून संभवनीय दिसत नाहीं; उलट एका कोवळ्या वयाच्या मुलीच्या आयुष्याचें मातेरें करण्यास हा विवाह कारणीभूत झाला ही गोष्ट नानासाहेबांच्या चारित्र्यांत अपवादास कारण झाली हें निश्चित आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवभारतकार (अनुपुराणकर्ता)
कवीन्द्र परमानन्द आणि त्याचे वंशज

लेखक—श्री. कृ. ना. देशपांडे, बी. ए., एल्‌एल्. बी., कोल्हापूर

हिन्दुपदपादशाहीसंस्थापक छत्रपति शिवाजी महाराज यांचें महोदात्त, तेजस्वी व स्फूर्तिदायक चरित्र तत्कालीन प्रत्यक्ष पुराव्यावरून समजून घेण्याची इच्छा महाराष्ट्रीयांस व इतिहासज्ञांस किती आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. शिवाजी महाराजांच्या वेळीं त्यांचीं जीं चरित्रें छापलीं गेलीं त्यांमध्यें कवीन्द्र **परमानन्द** याचें **शिवभारत** अर्थात् अनुपुराण हें श्रेष्ठ मानलें जातें. कारण तें एका संस्कृत पंडितानें शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून आणि सर्व इतिवृत्त त्यांना प्रत्यक्ष विचारून लिहिलें आहे (शिवभारत १–२५). इतिहाससाधनांत अप्रत्यक्ष किंवा त्या व्यक्तीच्या देहावसानानंतर लिहिलेल्या प्रत्यक्ष अथवा ऐकीव माहितीवर आधारलेल्या कोणत्याहि चरित्रापेक्षां वा बखरीपेक्षां समक्ष भेटून समकालीनानें जेव्हांच्या तेव्हां लिहिलेल्या लेखनास अधिक महत्त्व असतें. हें अनुपुराण कवीन्द्रानें शताध्यायगर्भित लिहिलें होतें, पण त्यांपैकीं अवघे बत्तीस अध्यायच उपलब्ध होते. शिवभारतकार वा अनुपुराणकर्ता कवीन्द्र परमानन्द, त्याचे वंशज आणि त्याचें काव्य इत्यादिकाविषयीं, पूर्वींच संशोधित झालेले व मला जे नवीन कागदपत्र मिळाले त्यांवरून माहिती द्यावयाची आहे.

कवीन्द्र परमानन्द हा शिवाजी महाराजांचा समकालीन होता आणि तो महाराष्ट्रांत होता असा पुरावा उपलब्ध आहे. स. १६६४ (= वैशाख शके १५८६) मध्यें धर्मनिर्णयार्थ राजापूर येथें एक मोठी विद्वत्सभा भरली होती. त्या सभेंतील उपस्थित पंडितांची ¶ नामावली प्रसिद्ध झाली आहे, त्यांत कवीन्द्र परमानन्दाचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें शिवभारतांत प्रत्यक्ष कवीन्द्र परमानन्दानें

> “ **स (शिवाजी) एकदात्मनिष्ठं मां प्रसाद्येदमभाषत।** १-२५
> **यानि यानि चरित्राणि विहितानि मया भुवि।**
> **विधीयन्ते च सुमते तानि सर्वाणि वर्णय॥** १-२६ शिवभारत

असें लिहिलें आहे यावरून स्पष्ट आहे. महाभारतासारखा रचनेनें ग्रंथ निर्माण करणारा कवीन्द्र परमानन्द हा कांहीं सामान्य पंडित नव्हता. शिवाजी महाराज जसे मोठे तसा त्यांचा चरित्र-

---

¶ शके १८३५ भा. इ. सं. मं. इतिवृत्तांतील “ शिवकालीन शास्त्रीपंडित. ”

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारहि मोठा. शिवभारतांत जे उल्लेख सापडतात त्यावरून त्याची जाडी विद्वत्ता आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व दिसून येतें. त्यावरून त्याचें आत्मचरित्र थोडेंसें कळूं शकतें. अध्याय समाप्तीच्या वेळीं 'निधिवासकर' किंवा 'निवासकर' असे उल्लेख आलेले असल्यामुळें त्याचें आडनांव निधिवासकर = निवासकर = नेवासकर आहे हें उघड आहे. म्हणजे तो नगर जिल्ह्यांतील नेवासें येथील रहिवासी असावा. परमानन्दाच्या वडिलांचें नांव 'गोविन्दभट्ट' होतें असें "**पौराणिकानां प्रवरं भट्टगोविन्दनन्दनम्** । १-६" यावरून कळून येतें. परमानन्द 'गोत्र काश्यप शाखा तैत्तीरीय, सूत्र आपस्तंभ' ब्राह्मण होता. (पेशवे दप्तर, भाग ३१, पत्र क्रमांक ११७, ११८, १२२.) आद्य शंकराचार्य देखील याच शाखेचे ब्राह्मण होते. परमानन्द कवि ग्रंथारंभीं गोविन्दास (विष्णूस) नमन करतो.

वन्दारुविबुधोदारमौलिमन्दारदामभिः ।
स्विद्यत्पदारविन्दाय गोविन्दाय नमो नमः ॥ १-१

हीच प्रथा परमानन्दाच्या पुत्रांनीं अनुसरलेली पुढें दिसून येते.

'**एकवीराप्रसादेन लब्धवाक्सिद्धिवैभवम्**' १-६, त्याचप्रमाणें १-२२, १-३२ इत्यादि श्लोकांतील उल्लेखांवरून कवीन्द्रास एकवीरा देवीकडून वाणी प्राप्त झाली होती आणि हीच त्या घराण्याची कुलदेवता असावी. तो श्रेष्ठ ब्राह्मण (ब्राह्मणसत्तमः, १-२), धर्म जाणणारा (धर्मवित् १-४), मुखांतून ब्रह्मवाणी स्फुरणारा, सर्व शास्त्रांचा ज्ञाता, अध्यात्मज्ञानाचा ज्ञाता, पौराणिकांमध्यें श्रेष्ठ (१-५, १-६), त्याचप्रमाणें उत्कृष्ट काव्यकर्ता, जणुं काय बृहस्पतीचा अवतार (कर्तारं चारुकाव्यानामवतारं बृहस्पतेः १-१०), धर्मात्मा, कवीमध्यें श्रेष्ठ, वक्त्यांमध्यें पहिल्या प्रतीचा (प्रोक्तः प्रोवाच धर्मात्मा कवीन्द्रो वदतां वरः। १-२०), असा होता. याव्यतिरिक्त ब्रह्मन् (१-१६), शंसितव्रत (१-१९), स्तुत्याचरणी महाभाग, कवीन्द्र, (८-४५, ९-११, २३-६), सुमति (१-२६, २५-३१), महामति (२८-१), परमानन्द (८-१, १०-४, २५-३१, २७-३), "कवीन्द्र कुशलो ह्यसि" (२८-११), 'शिववीरयशःक्षीरनिधिप्लावितचेतसा, परमानन्द' (२७-३) अशा प्रकारचीं संबोधनें शिवभारतांत ठिकठिकाणीं काशीस्थ पंडित आणि शिवाजी महाराज यांनीं परमानन्दास लावलेलीं आढळून येतात. परमानन्दानें "चरितं शिवराजस्य भरतस्येव भारतम् । (१-२२)" असें शिवभारत रचिलें खरें, पण स्वतः त्यानें या चरित्रास 'शिवभारत' असें नांव मुळींच दिलें नसून 'अनुपुराण' असें नांव दिल्याचें प्रत्येक अध्यायसमाप्तीवरून दिसून येतें. म्हणून मी अनुपुराणकर्ता परमानन्द कवीन्द्र असें म्हटलें आहे.

'शिवभारत' असें नांव तामीळ भाषांतरावरून 'शिवभारता'चे संपादक कै. **स. म. दिवेकर** यांनीं दिलेलें आहे. 'शिवभारत अथवा अनुपुराण' हें शिवाजी महाराजांचें चरित्र शिवाजी महाराज राजगडावरून राज्यकारभार करीत असतां राज्याभिषेकापूर्वीं कवीन्द्रानें लिहावयास सुरवात केली असें 'राजा राजगिरीश्वरः' या उल्लेखावरून दिसून येतें. स्वचरित्र लिहिलें जावें अशी कल्पना राज्याभिषेकाच्या कल्पनेंत शिवाजी महाराजांना सुचली असली पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे इ. स. १६७२ ते १६७४ च्या मध्यंतरीं लेखनास सुरवात झाली आणि ह्या ग्रंथाचे राज्याभिषेकापर्यंत ३२ अध्याय लिहिले गेले असावेत §. लेखन तसेंच चालू ठेवून महाराजांच्या निधनानंतर अनुपुराण हा शताध्यायी ग्रंथ पूर्ण झाला असावा असा माझा कयास आहे. आज या अनुपुराणाच्या दोन प्रती उपलब्ध आहेत. त्यांत 'राजोपाध्येप्रत' आनन्दाश्रमानें प्रसिद्ध केलेली अधिक ग्राह्य वाटते. प्रस्तुत अनुपुराणाचा चार अध्यायात्मक नवा भाग मला कोल्हापुरचे राजोपाध्ये यांचे घरीं उपलब्ध झाला तो संभाजीसंबंधीं आहे आणि तो अनुपुराणाचा शेवटचा भाग असावा. यावरून परमानन्द कवीन्द्र स. १६६४ च्या राजापूर येथील पंडित सभेंत उपस्थित होता त्या वेळीं त्याचें वय ३०-३५ धरल्यास संभाजी महाराजांच्या वेळेपर्यंत तो जिवंत मानल्यास तो कमींत कमी ५५-६० वर्षें जगला असावा असें मानतां येईल.

अनुपुराणकर्ता परमानन्द यास श्रीधर आणि देवदत्त असे दोघे पुत्र असून तेहि आपल्या पित्याप्रमाणें विद्वान्, सुसंस्कृत आणि जाडे पंडित होते. या दोघांपैकीं धाकटा देवदत्त यानें संस्कृत बंध, मराठी काव्यें आणि हिंदी कवनें केलीं आहेत. त्यावरून त्याचें तिन्ही भाषांवरील प्रभुत्व दिसून येतें. त्यांपैकीं कांहीं अखेरीस दिलीं आहेत. हा सर्व भाग कोल्हापुरचे राजोपाध्ये यांच्या ग्रंथालयांत उपलब्ध झाला.

पेशवे दप्तराच्या ३० व्या भागामध्यें स. २८-१२-१७०८–१७१२ च्या क्रमांक ३०७ मधील पत्रांत 'सातार'चे शाहू महाराजानीं ज्या पंडितांचा सत्कार केला त्यांच्या नामावलीमध्यें कवीन्द्र श्रीधर आणि देवदत्त यांचा उल्लेख आहे. तसेंच पेशवे दप्तरच्या ३१ व्या भागामध्यें क्रमांक ११७ चें ता. २३-४-१७१६ चें सनदापत्र कोल्हापुरचा छत्रपति संभाजी यानें श्रीधर कवीन्द्रास दिलें आहे; त्यामध्यें संस्थान कोल्हापूर, जहागिर विशाळगडपैकीं "एकोली" हा गांव धारादत्त इनाम करून दिला आहे. त्याचप्रमाणें क्रमांक ११८ चे ता. १९-५-१७१८चे पत्रांत देवदत्त कवीन्द्रास वरील जहागिरीपैकीं पेदूर हा गांव कोल्हापुरच्या संभाजीची आई राजसबाई हिनें धारादत्त करून दिला आहे. "वेदशास्त्रसंपन्न श्रीधर आणि देवदत्त कवीन्द्र हे दोघेहि परंपरागत स्वामीचे राज्यांतील आश्रित, विद्वान्, भले सिष्ट जाणोन पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेनें अनुभवून स्नानसंध्यादिक सत्कर्म आचरोन स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून सुखरूप राहणें असा समक्ष निदेश" दिला होता. आणखी याच ३१ व्या भागांतील क्रमांक १२२ ता. १६-९-१७२० च्या पत्रामध्यें संभाजीनें

"तुम्हांस श्रीमंत मातुश्री (राजसबाई) आईसाहेबी विलंब नाम संवत्सरी वैशाख सोमवती अमवाशा पर्वकालीं मौजे पेतूर ता. सिराले हा गांव धारादत्त दिल्हा आहे. ऐसियासी तुम्ही बहुत भले सिष्ट, विद्यासंपन्न, तुमचे चालविल्यानें बहुत श्रेयस्कर यास्तव तुम्हास मौजे पेतूर (पेदूर) ता सिराले प्रा मजकूर हा गांव कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी जलतरु-पाशाण निधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौजे मजकूर पूर्वमर्यादेप्रमाणें

---

§ १-२६ शिवभारत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चतुःसीमा करून आपले स्वाधीन करून घेणें आणि इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंश-परंपरेनें अनुभऊन सुखरूप राहाणें." $

असा ' निदेश समक्ष ' दिला आहे. राजपत्र पुन्हां देण्याचें एक कारण असें दिसतें कीं, पूर्वी दिलेलें इनाम या राजपत्रानें कायम केलें आणि दुसरें असें कीं, कदाचित् राजसबाईनें दिलेला गांव देवदत्त कवीच्या प्रत्यक्ष ताब्यांत न येतां कागदावरच इनाम शिल्लक राहिलें असेल म्हणून पुनः दोन वर्षांनीं शंभु छत्रपतींनीं देवदत्तास हें पेतूर गांव इनाम देऊन स्वाधीन करून घेण्यास सांगितलें आहे. कवीन्द्र श्रीधर व देवदत्त यांस दान दिलेले एकोली आणि पेतूर अथवा पेदूर हे दोन्ही गांव हल्लीं टेकोली आणि पेरीड या नांवांनीं ओळखले जात असून त्या ठिकाणीं कवीन्द्र परमानन्दाचे कोणीहि वंशज नाहींत असें शोधाअंतीं कळून आलें आहे. ही दोन्हीं गांवें विशाळगड जहागिरींत असल्यानें विशाळगड जहागिरीचे पंतप्रतिनिधि यांचीहि कृपा संपादून देवदत्त कवि राहात असे, असें तत्कालीन गंगाधर पंतप्रतिनिधि याच्यावर कवीनें मराठी काव्य केलें त्यावरून दिसून येत आहे.

' गाजी गंगाधरा तूं मिरविसि बहुसा मित्र नाना कवींचा । '
किंवा **' होसी गंगाधरा तूं अतिचतुर भला श्रीकवीन्द्रासि थारा ॥ '**
अथवा **" आधी भेटीस यावे मग परनगरालागि देशावराला ।**
जावें ऐसें विशालाचल सगुणपति जाण वाटे मनाला ॥ ३ ॥
जो कीं भार्गवरामतुल्य विजयी श्रीपर्शुराम§ स्वयें ।
आजा बापहि कृष्ण कृष्णगुणसा वारी कवींचीं भयें ॥
आतां तत्पद राज्यभार अवघा स्वाधीन तूझा असे ।
यावे भेटिस हें लिहा कविसही इच्छा मनीं उल्लसे ॥ ४ ॥
पित्यानें कवीलागि जे अग्रहारें* । भले पुत्र ते चालवीती विहारें ॥
करूं शंभु कल्याण नाना रितीनें । स्मरावें कवीलागीं चित्तीं दयेनें ॥५॥

त्याचप्रमाणें—

जो भक्तास वरप्रदान करितो जो शुभ्रसा उल्लसे ।
गौरीवल्लभ तो तुम्हासि बहुसा लोकं तपालीतसे ॥
वाढे हे अति धर्मबुद्धि म्हणुनी तुझी कवी वानितो ।
श्रीगंगाधर जी म × × × × × ण आभावितो ॥

$ सनदापत्रें.

§ परशुरामपंत प्रतिनिधि.

* अग्रहार=भूमिदान.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या मराठी कवितेमध्यें पंत प्रतिनिधींनीं कवीन्द्रास अग्रहार=भूमिदान दिलें असलें पाहिजे; म्हणून शंभु छत्रपतिसहित गंगाधर पंतप्रीतीनीध आणि त्याचे आजाबाप यांचीहि स्तुति कवीनें केली आहे.

देवदत्त कवीनें संस्कृतमध्यें 'गोमूत्रिका,' 'पद्म', 'नाग' आणि 'शृंखला' इत्यादि बंध रचले आहेत, आणि त्यांवर अर्थस्पष्टीकरणार्थ संस्कृत टीकाहि लिहिल्या आहेत. "**श्री गोविंदो जयति । श्रीमत्कवीन्द्र परमानन्दतनयः कविकुलतिलकः परमकारुणिकः स्वविरचित गोमूत्रिकाबंधप्रतिपादकपद्यचयं व्युत्पादयति**" हा टीकेचा आरंभ



बालाभुजानंगरंगेकांतानिद्रासिसंमतम् ।
बालांबुजासंगभंगेबतभद्राणिसंततं ॥

या गोमूत्रिकाबंधावरील आहे. या व अशा संस्कृत बंधांवरून कवीच्या बुद्धीची कसरत चांगलीच दिसून येते. आणखी असें कीं, देवदत्त कवीचें संस्कृत भाषेवर उत्तम प्रभुत्व असून त्यानें स्वतःस "**कविकुलतिलकः**" ही पदवी लावून घेतल्यानें त्यास स्वतःच्या काव्यशक्ती-संबंधीं चांगलाच आत्मविश्वास असल्याचें स्पष्ट होतें. या संस्कृत लेखनाव्यतिरिक्त देवदत्तानें करवीर राज्यसंस्थापक महाराणी ताराबाई हिजवर मराठी आणि हिंदी भाषेंत कवन केलें आहे त्यावरून त्याची कवित्वशक्ति, हिंदवी स्वराज्य, शिवाजी महाराज, राजाराम, ताराबाई यांचे विषयीं आदर, स्वधर्म,–स्वाभिमान इत्यादि उत्तम रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतात. या मराठी कवनाचा आरंभ असाः—**श्रीगोविंदोजयति ।**

तुलजा प्रसन्न झाली, **पातशाही हातीं आली,** जयलक्ष्मी...चाली शिवाजीस आदरें ।
उभारितां भुजदंड रूमशा (म) दता दंडत, पतीप्रताप चंड धाके दिल्ली आगरें ।
जगीं शिवराज्य नांदेक्ष...सिंधु यशें कोंदे, द्विजकुलही विनोदे, होती वाद्यें सुस्वरें ॥
(दि)ल्ली झाली दीनवाणी, दिल्लीशाचें गेलें पाणी, **ताराबाई रामराणी**...भद्रकाली कोपली॥
जाणा तुम्ही आजी साची आज्ञा (ज्ञा)ली शंकराची **सर्व सेना दिल्लीशाची** अंतकास वोपली॥
(ता)राबाईच्या बखतें, दिल्लीपतीची तखतें खचों लागलीं तेंवि मतें कुराणे...खंडिलीं ॥
वजीरास झोडिजें तें, मुगलांस तोडिजे (ते) मशिदीस फोडिजे (ते) म्लेच्छकुलें दंडिलीं ॥
फिटे हिंदुंची शिराणी...सु...द्विजांची...जयवंत **रामराणी** पहा महीमंडलीं ॥
मानहा(नी) दिल्लींद्राची सभा हांसते इंद्राची आजि काल कवीन्द्राची सर्वचिंता हा(र)ली ॥
वसे रत्नसिंहासनीं **भोंसल्याचा शिरोमणी शिवराज चिंतामणी** दिनमणि उदयें ॥

इत्यादींवरून रामराणी ताराबाई हिचा अद्वितीय पराक्रम दिसून येतो. स.१७०० त राजारामाच्या मृत्यूपासून तों औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सातारचे शाहू महाराज सुटून येईपर्यंत (स. १७०८)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताराबाईनें मोगलाशीं लढाई करून त्यांचा पराभव केला, हिंदुपदपातशाही हातीं घेतली, औरंगजेबाच्या कृत्याचा सूड उगविला आणि पुत्र शिवाजीस सिंहासनावर बसवून राज्यकारभार केला, हा उज्वल इतिहास देवदत्त कवीनें स्फूर्तिदायक आणि अभिमानास्पद असा या काव्यांत लिहून ठेवला आहे. त्याचप्रमाणें अमदानगर (अहमदनगर) संकटीं असल्याचा उल्लेखहि आला आहे. दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं, हें कवन त्रुटित असें उपलब्ध झालें आहे. याच धर्तीचें हिंदी कवन स्वातंत्र्यवीरांगना रामराणी ताराबाई हिच्यासंबंधीं आहे. कवीन्द्र परमानन्दानें छत्रपति शिवाजी, संभाजी यांचें वर्णन अनुपुराणांत केलें, त्याचप्रमाणें बापास शोभणारा असा पुत्र देवदत्त यानें राजाराम, ताराबाई, शिवाजी इत्यादींचा पराक्रम वर्णन केला आहे. या देवदत्त कवीचें आणखी काव्य उपलब्ध होईल तर राजाराम, ताराबाई यांचा विस्तृत पराक्रम समजून येऊन इतिहासास महत्त्वाचें साह्य होईल.

या कवीन्द्र परमानन्दतनय कविकुलतिलक देवदत्तास एक सुपुत्र होता हें

श्रीदेवदत्तसुत अद्भुत वैभवाचा ।
जो भक्तराज अभयंकर शंकराचा ॥
हा ग्रंथ दिव्य रसपूर्ण निजाकरानें ।
वेगें असेल लिहिला अति कौतुकानें ॥

या श्लोकावरून सिद्ध होतें. हा श्लोक 'कुवलयानंद' ग्रंथाच्या शेवटच्या पानावर लिहिलेला आढळून आला. कुवलयानंदाचा ग्रंथकार दुसरा असून लिहणारा देवदत्तसुत होता असें सिद्ध होतें.

याच श्लोकाच्या शेवटीं " हें पुस्तक जो दुसऱ्यास देईल त्यास **एकवीरेचा** शपथ असें लिहिलें आहे आणि कवींद्र परमानन्दास **एकवीरा** देवीकडून " वाक्सिद्धिवैभव " प्राप्त झालें होतें, त्यावरून हा देवदत्तसुत म्हणजे अनुपुराणकर्ता (शिवभारतकार) परमानन्द कवीन्द्र याच्या देवदत्तनामक मुलाचाच मुलगा होय यांत संशय राहात नाहीं. आणि यानेंच साताऱ्चे शाहूमहाराज (१७०८ ते १७४९) यांची राणी सखवारबाई हिला दिलेल्या आशीवार्दात्मक संस्कृत श्लोकांतील " **अखंडितवज्रकंकणपरिमंडितकरकमलासु कमलावरासु सखवारबायिषु गोविन्द्रकवीन्द्रकृताः लसंत्वाशिषः ज्येष्ठ शुक्लदशम्यः...विशामस्मदीय तत्रत्यभाशास्महे विशेषस्तु** " या भागावरून देवदत्तसुताचें नांव **गोविन्द** कवीन्द्र असें होतें हें कळून येतें. त्याचप्रमाणें याच पुढें मराठी श्लोकामध्यें

" (तै) सी तूं शाहूकांता गिरिव ।...येहूनि अधिक दाता नेणे ।
अहंता कविस तिलभरी...मासी अनंता ॥ कविन्द्रा...ता अनुपम मतीमाजि ॥

इत्यादि उल्लेखांवरून ' शाहूकांता ' सखवारबाई आणि कवीन्द्र (गोविन्द) यांच्याविषयीं निश्चिति उत्पन्न केली आहे. आणखी असें कीं, " कवीन्द्र " ही पदवी किंवा उपनांव म्हणून त्याचा उपयोग परमानन्द, श्रीधर, देवदत्त आणि गोविन्द यांच्यासंबंधीं केलेला दिसून येतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परमानन्दानें अनुपुराण लिहिल्यामुळें त्यास " कवीन्द्र " पदवी प्राप्त झाली आणि त्याचें पुत्र-पौत्रांनाहि लागू झाली. पण परमानन्दाच्या बापास " भट्ट गोविन्दनन्दनम् " (१–६) लाविलेली नाहीं हें कालदृष्ट्या सरळच आहे. तेव्हां शाहुकांता सखावारबाईस ज्येष्ठ शुद्ध दशमी दिवशीं आशीर्वाद देणारा अद्‌भुत वभवाचा, ' अभयंकर शंकराचा भक्तराज ' देवदत्तसुत गोविन्द कवीन्द्र होय. हा गोविंद कवी चांगला संस्कृत व मराठी काव्य करणारा विद्वान् पंडित होता हें स्पष्ट होतें. या एकंदर लेखावरून वंशावळ खालीलप्रमाणें तयार होईल—



सारांश, गोविन्दभट्टाचा पुत्र, अनुपुराणकर्ता (शिवभारतकार) परमानन्द कवीन्द्र निवासकर हा काश्यप गोत्री, आपस्तंभ सूत्री, तैतिरीय शाखीय ब्राह्मण होता. श्रीधर आणि देवदत्त या त्याच्या पुत्रांना कोल्हापूर संस्थानांतील पंतप्रतिनिधींच्या विशाळगड जहागिरींत एकोली आणि पेदूर हे दोन गांव धारादत्त इनाम होते. देवदत्त यानें संस्कृत, मराठी आणि हिंदी भाषांमध्यें काव्य केलें आहे; देवदत्ताचा पुत्र गोविन्द हाहि आपल्या पूर्वजांप्रमाणें विद्वान् संस्कृतज्ञ कवि होता. मात्र हा गोविन्द कवि विशाळगड जहागिर सोडून सातारच्या शाहू महाराजांकडे आलेला दिसतो. कदाचित् वडिलार्जित धारादत्त गांव त्यास मिळालें नसण्याचा संभव आहे.

परमानन्द हा शिवाजी आणि संभाजी यांच्या कालीं होता. श्रीधर आणि देवदत्त हे राजाराम, ताराबाई व दुसरा शिवाजी यांच्या वेळीं १७२० च्या नंतर होते असें सनदापत्रांवरून कळतें. शाहू महाराजांच्या उत्तर कारकीर्दींत गोविन्द कवि होता. यांची कुलदेवता एकवीरा असून ग्रंथारंभीं प्रत्येक कवि ' गोविन्दा'स नमन करतो. वंशपरंपरागत ' कवीन्द्र ' ही पदवी उपनांवासारखी उपयोग केलेली आढळून येते. सर्वांना संस्कृत व मराठी भाषा अवगत असून सर्व विद्वान् पंडित होते. देवदत्त याच्या हिन्दी कवनावरून त्यास हिन्दी भाषाहि उत्तम येत होती. याचें कारण असें एक संभाव्य वाटतें तें असें कीं, परमानन्दानें शिवभारत वा अनुपुराण हा महाभारतासारखा शताध्यायी ग्रंथ काशिस्थ पंडितांस निवेदन केला, हा भाग खरा असल्यास परमानन्द कांहीं काळ काशींत राहिला असेल. त्यामुळें त्यास व त्याचे पुत्रांनाहि–देवदत्तासहि हिंदी भाषा अवगत झाली असावी. या सर्वांचा उदय शिवाजीच्या हिंदवी राज्यांत झाला असून ते सर्व मराठी राज्याचे आश्रित आणि अभिमानी तसेच आदरणीय संस्कृत पंडित होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी काव्य

१ श्रीगोविंदो जयति ॥

तुलजा प्रसन्न झाली पातशाही हातीं आली, जयलक्ष्मी ××× चाली, शिवाजीस आदरें ॥
रामराणी खुशहाल दत्तकवि ही निहा... ......पला हे कलिकाल कीर्तिचंद्रिका भरें ॥
उभारितां भुजदंड रूमशा (म) दता दंडत पतीप्रताप चंड, धाके दिल्ली आगरें ॥
जगीं शिवराज्य नांदे, क्ष... सिंधु यशें कोंदे द्विजकुलही विनोदे, होती वाद्यें सुस्वरें ॥१॥

रामराणी... बखताची वेल आली तखताची, जयलक्ष्मी पहा साची, करी मंगलारती ॥
दत्तकवि वर्णी सज अंगणी, झुलती गज दरबारीं ज... धजत कटी उभारती ॥
कांहीं मांडतां निदान अंबा देते वरदान... ले सदा हमेदान संकटें निवारती ॥
शिवराज महीपती झाला जगीं... पती रणरंगीं दिल्लीपति पातशाह हारती ॥२॥

दुंदुभींच्या भभका (रे)... चकित होय लंकेश भीति सकल नरेश सर्व मही चोपली ॥
झल व... खड्गकाला चहूंकडे मुंडमाला, महादेव घाली गळां, धूलि रक्तें लोपली ॥
(दि)ल्ली झाली दीनवाणी, दिल्लीशाचें गेलें पाणी, ताराबाई रामराणी...
भद्रकाली कोपली ॥
जाणा तुम्हीं आजि साची आज्ञा (झा)ली शंकराची सर्व सेना दिल्लीशाची
अंतकास वोपली ॥३॥

(ता)राबाईच्या बखतें दिल्लीपतीचीं तखतें खचों लागलीं तें विमतें कुराणें खंडिलीं ॥
वजीरांस झोडिजेंतें मुगलांस तोडिजे (ते) मशिदींस फोडिजे (ते) म्लेछ कुलें दंडिलीं ॥
उमराव दस्त झाले, देवद्विजां बकसिलें, दिगं (तीं) कीर्ति चाले यशें जगें मंडिलीं ॥
फिटे हिंदुची शिराणी सु... द्विजांची... जयवंत रामराणी पहा मही मंडलीं ॥ ४ ॥

दुंदुभी होती भी... भावला बिभीषण आरंभिली प्रतिक्षण पुष्पवृष्टि अमरी... ॥
ही उमराव घुमतात घेतां घाय हर्षें नाचतां न धाय नारदतो अ... ॥
... गडानां त वजीरांची विमानें तों पहा साचीं चिंतावली मुगलांची... ॥
... नगरी सुखें नाचे हर दिल्लीशावरी कहर, होतां राम (राणी)ची नजर जहराची लहरी ॥५

रामराणी कोपतांच दिल्लीशा... डिका. भूतनाथ करी नाच संगरीं चहुंकडे ॥
मुगुलांचा क्षय... उ रूधिराचे होति सडे धडावरि धड पडे भूतमंडलीं जुडे ॥
भैरवां... चा समुदाय सरज्याची कीर्ति... वेतालही सुखें धाप वाजवीत चौघडे ॥
... हांसतसे भद्रकाली योगिनी तों देती टाली, निरंतर युद्धकालीं, दत्त क (वि)
कौतुकीं बुडे ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीर्तिवल्ली सरज्याची जगतींत दाटे साची, ज्वाला भुज (ग) प्रतापाची दिगंतरीं भरली ।
धाकती दिगंत करी गर्जतात परोपर...सागरानेंही लहरी आवरून धरली ॥
असीधिग रामराणी नां...से वैभवानी, मूर्तिमंत हे भवानी, जगीं अवतरली ॥
मानहा (नी) दिल्लींद्राची सभा हांसते इंद्राची आजिकाल कवीन्द्राची सर्व चिंता
हा(र)ली ॥ ८ ॥

निरंतर चालि केली पातशाही तला नेली, दिल्लोची हील...गेली म्लेच्छ गर्व गलाला ॥
आतां तऱ्ही तुम्ही जागा निजहित मनीं आणा...मनोभावें करा आणा, न लगतां पलाला ॥
सांडून दुरभिमान मनीं धरा सामदान, दावा आपला इमान सोडून द्या कुचाला ॥
रामराणी भद्रकाली, रणरंगीं क्रुद्ध झाली प्रलयाची वेल आली ... मुगल हो सांभाला ॥९॥
वसे रत्नसिंहासनीं भोसल्याचा शिरोमणि शिवराज चिंतामणि दिनमणि उदयें ॥
फांफावले भुजधाम, भांभावले रूमशाम ..संत झा...फणकर स...सरज्याच्या विजयें ॥
करीं चढे पातशाही फिरे भुवनी दु...जेर झाल्या दिशा दाही दत्त वर्णिती स्वयें ॥
झाली बली गढप...काटला लंकापति बुडे भारी, दिल्लीपति चिंतासागरीं भयें ॥ १० ॥
शोकतुंडी गोलकुंडे तें परंडे निरंतर रेवदंडे दुःखानलीं पचते ॥
...अविचल देवगिररि होत आहे खालिवरि, अमदानगर तरि संकटांत गचतें ॥
संनद्धन तें निज ओज धाक वाहतें शिरींज रोजांतरि रोज रोज महाभय रचतें ॥
भोंसल्याची होतां चालि, अभिनव आजिकालि दत्त म्हणे दिल्लीशाचें तखतही खचलें ॥२१
युद्धसंनद्ध हा भोंसला रुद्रसा क्रुद्ध होतां विरुद्ध मग अविद्धशरविद्ध पावे...ति घेरी ॥
अटल फौज पेली वजीरांस ठेली कुबल मात केली अतुल कीर्तिकल्प...सर्वत्र पेरी ॥
त्यजून धीर युद्धीं महावीर तें कांपतती सकल मीर मधुर धीर गंभीर वाजेति भेरी ॥
प्रबल वाढती बस्त शिवराज मृगराज मृगराज समसक्त ज...रदस्तें दिल्लीचें तक्त घेरी ॥२२

२ श्रीगोविंद

काता तानां विविधवचन वक्र बीचिभिष्यमाणाः। केचित्स्युर्वयमादर वयमादर गिरिजा पादाम्बससेवनध्यांना ...इ. धियः सदा निज नमः रतपि प्रयाताः सखे ॥
गोविंद कवीन्द्र—

३ श्रीगोविंद

स्वस्ति श्रीमदगणित गुणमणि ग...
णश्रोणि विराज विराजमानासु समाना—
सु समस्त दिगंगनांगा वरणासु
सुकृत कीर्ति वसनासु स्वाश्रीत
...सरक्षण विचक्षणा सुक्षण
क्षण क्षपिताहित मंडलासु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलक्षण लक्षितासु स्वीय सौभाग्य—
...परंपराधरीकृत पुलो—
मजा खर्व गर्वासु कनकवितरणा
...नंदितार्थि पटलासु सकल—
जन जननीषु अखंडित वज्रकंकण—
परिमंडित करकमलासु कमलावरासु
सरवारबायिषु गोवींदकवीन्द्रकृताः
लसंत्वाशिषः ज्येष्ठशुक्लदशम्य
विशमस्मदीय तत्रत्य भाषास्महे विशेषस्तु ।

४ श्रीगोविंद

इंद्राणीहूनि सत्ता गणित गणितां, वानिति विप्रदाता
गांवोगांवीं अनंता, करि रिपुवधू सर्वदा, थोर चिंता ॥
(तै)सी तूं शाहूकांता गिरिव × × × येहूनि अधिक दाता
नेणे...अहंता, कविस तिलभरी...मासी निवंता ॥ १ ॥
कवींद्रा...ता अनुपम मतीमाजि ज...कवि
...कवित्वाची वार्ता म्हणविन...च बुडली ॥
अस्या सा...यकु अभिनव असे...॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रियासतकार सरदेसाई

लेखक—श्री. रा. टिकेकर

" इतिहास हा तुम्ही आपला मुलगा मानलेला आहे व तो अमर आहे. " असें श्री. न. चिं. केळकर यांनीं रियासतकार **गोविंद सखाराम सरदेसाई** यांस लिहिलें होतें, तें अगदीं खरें. इतिहासाचें पुत्रवत् लालनपोषण करणारे दुसरे विद्वान् गृहस्थ माझ्या तरी पाहण्यांत नाहींत. म्हणून रियासतकारांच्या कार्याची थोडक्यांत ओळख करून देण्याचें योजिलें आहे. त्यांच्या कार्याविषयीं लिहिण्यापूर्वीं त्यांचें चरित्र, कुलवृत्त, वगैरे आवश्यक माहिती देणें इष्ट होईल असें वाटतें.

सरदेसाई उर्फ मावळंकर हें महाराष्ट्रीय ब्राह्मण घराणें रत्नागिरी जिल्ह्यांतील मावळंगें गांवच्या जवळपास रहाणारें. सरदेसाई हा हुद्दा आहे. नरसिंह हें त्यांचें कुलदैवत. श्रीछत्रपति, पेशवे, बावडेकर पंत अमात्य अशा ऐतिहासिक राजघराण्यांचे पदरीं सरदेसायांनीं कामगिरी बनविली असल्याचे दाखले आहेत. छत्रपति संभाजीस मोगलांनीं पकडलें त्या वेळीं त्याचें वास्तव्य सरदेसायांच्या एका वाड्यांतच होतें. ऐतिहासिक काळीं विख्यात असलेल्या ह्या जुन्या घराण्याची कमाईही पूर्वीं चांगलीच होती. परंतु रियासतकारांच्या वडिलांना मात्र कठिण दिवस प्राप्त झाले. त्यांना शेतीवर राबल्याखेरीज प्रपंच चालविण्याची पंचाईत पडूं लागली आणि कोंकण प्रान्तीं शेतींतून उत्पन्न उत्पन्न तें काय येणार ? सखारामपंतांस कर्जवाम करावें लागलें, तरी शेतांतलें राबणें कांहीं चुकलें नाहीं. उलट सावकारांचा तगादा व त्यांची उणीं बोलणीं खाण्याचा त्रास तेवढा वाढला. तरी त्या थोर पुरुषानें आपलें सत्त्व सोडलें नाहीं. त्यांची नेकी, त्यांचा बाणेदारपणा व त्यांची सचोटी यांत या विपत्कालीं देखील अंतर पडलें नाहीं. किंबहुना असेंच म्हणतां येईल कीं, सखारामपंतांनीं आपल्या मुलांना औरस हक्कानें

न चोराला लाधे प्रकट न दिसे लेशहि कदा

अशा प्रकारची जी इस्टेट ठेविली ती शुद्ध सच्छीलाची, शुद्ध दानतीचीच होय. **गोविंदराव** (रियासतकार), **नारायणराव** (बिलिमोऱ्याचे कारखानदार), **गणपतराव** (मुंबईतील व्यापारी), **दिनकरराव** (नेत्रवैद्य) व **भास्करराव** असे पांच पुत्र त्यांस झाले. शिवाय त्यांस दोन कन्याही होत्या.

मूळचे मावळंग्याचे हे सरदेसाई पुढें वेरवली वगैरे ठिकाणीं राहूं लागले, पण सखारामपंतांनीं आपलें घर **गोविल** येथें बांधलें. कोल्हापुर–रत्नागिरी रस्त्यावर साखरप्यापासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोवलास जाण्यास रस्ता आहे. शिपोशीच्या पुढें तीन मैलांवर गोविल लागतें. येथेंच सखारामपंतांची बहुतेक हयात गेली. स. १९०७ मध्यें नातवाच्या (श्यामकान्तच्या) मुंजीसाठीं बडोद्यास जाण्याकरितां ते मुंबईस आले असतां दसऱ्याच्या आदले दिवशींच ते कालवश झाले! (ता. १५-१०-१९०७).

रियासतकारांचा जन्म ता. १७ मे, १८६५ मध्यें गोविलनजीक हसोळ मुक्कामीं झाला. दोन गांवामध्यें लहानसा पऱ्या तेवढाच आहे. धार्मिक समजुतीखातर आसन्नप्रसवा मातुःश्रीस गोवलाहून हसोळीं नेलें व तेथें सुखरूपपणें प्रसूति झाल्यावर बारशाचे दिवशीं बाळबाळंतणीस परत नवीन घरीं आणिलें. तसें म्हटलें तर गोविंदरावांचें बालपण कष्टांतच गेलें. अलीकडच्या विद्यार्थ्यांच्या मानानें त्यांनीं मनस्वी काबाडकष्ट केले असें म्हटलें पाहिजे. गुरें वळणें, शेतीवरील कामकाज करणें हें तर त्यांच्या बाळपणीं नित्यांतलें व मुलाला आवश्यक असें काम समजलें जाई. प्राथमिक शिक्षण शिपोशीस आटोपल्यानंतर पुढील इंग्रजी अभ्यासासाठीं रत्नागिरीस जाणें प्राप्त होतें. त्या वेळीं हायस्कुलांतलें शिक्षण कसें होतें याची कल्पना आजच्या विद्यार्थ्यांस यावयाची नाहीं. वर्गांतच मुलें रात्रीं झोपत. पहांटे लवकर उठून आपापल्या पथाऱ्या व्यवस्थित गुंडाळून एका कोपऱ्यांत लावून जागा साफसूफ करून ठेवणें भाग पडे. कारण तेथें नंतर वर्ग भरत असत. बाहेरगांवच्या विद्यार्थ्यांना खाणावळींत जेवणासाठीं जावें लागे. त्यावेळीं खाणावळींचा दर तरी काय असेल असें वाटतें? रियासतकार दरमहा चोवीस आणे (रुपये नव्हत) देऊन रत्नागिरीस खाणावळींत जेवीत आणि शाळेंतच राहून अभ्यास करीत. गोवलाहून रत्नागिरीस जायचें म्हणजे देखील मोठ्या मुष्किलीची मुशाफरी होती. गडी मिळाल्यास त्याच्याबरोबर बोजा देऊन देवळ्यापर्यंत मोठ्या सडकेवर जावयाचें. मग तेथून बैलगाड्यांच्या सोबतीनें पुढील वाट संपवावयाची. त्या वेळचें व हल्लींचें विद्यार्थी–जीवन यांतील तफावत केवढी मोठी वाटते. अशा जुन्यापुराण्या काळांत दीड रुपया दरमहा खाणावळीला देऊन रियासतकारांचें हायस्कूलचें शिक्षण चालू होतें.

रत्नागिरी हायस्कूलचा शैक्षणिक लौकिक पूर्वीपासूनचा असला तरी रियासतकार तेथें गेले तेव्हां अभ्यासाची घडी विस्कटली होती. शिक्षकांचेंही लक्ष शिकविण्याकडे नव्हतें–विद्यार्थ्यांना मग काय, चांगलेंच फावलें होतें. शिस्त अशी त्यांना ठाऊक नव्हती. म्हणून सरकारी अधिकाऱ्यांना रत्नागिरी शाळेकडे लक्ष देणें भाग पडलें. 'देवां'ची झोंप एकदाची उघडली. त्यांनीं तावडतोब चौकशी केली व रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी व मोरेश्वर वामन कीर्तने या दोन कार्यक्षम व विद्वान् शिक्षकांची योजना शाळेच्या कामीं झाली. जोशी मास्तरांची शिस्त, तींत काय उणें सांपडणार होतें? कुचकामी मास्तरांना बदलून त्यांचे जागीं त्यांनीं चांगले कार्यक्षम शिक्षक नेमले. अभ्यास व्यवस्थितपणें चालू झाला. मुलांच्या उनाडकीस पूर्ण आळा बसला. कीर्तने तेथें वर्षसुमारच राहिले. पण तेवढ्यांत त्यांनीं रत्नागिरी हायस्कूलची सुव्यवस्था लावून दिली आणि आपल्याही घरची व्यवस्था पाहिली. अकरा वर्षांच्या आपल्या उपवर (तेव्हांच्या दृष्टीनें) मुलीसाठीं जांवई हेरून ठेवला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridw...

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आज आपणांस रियासतकारांच्या श्वशुरांची दृष्टि लाभणें शक्य नाहीं. आणि लाभली तरी मॅट्रिकचे वर्गात असतांना कोणते विशिष्ट गुण त्यांच्या ठिकाणीं दिसून आले हें कांहीं सांगतां येणार नाहीं. इतक्या वर्षांच्या अभ्यासानें त्यांनीं संपादिलेले गुण बालपणीं बीजरूपानें त्यांचे ठायीं वसत असले पाहिजेत, हें तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीनें खरें ठरेल. परंतु आजच्या इतक्याच प्रभावानें ते गुण त्या वेळीं कीर्तन्यांस दिसून आले असें म्हणणें म्हणजे श्रद्धाळूपणाची कमाल होय. म्हणून जांवई शोधण्याची सासऱ्यांची दृष्टि कशी होती किंवा त्यांच्या पसंतीस हे हे जांवईबुवा कां आले, याबद्दल निश्चितपणें सांगण्याच्या भरीस पडूं नये हें बरें. परंतु कीर्तन्यांनीं केलेली ती निवड चुकली नाहीं असें म्हणतां येतें.

मॅट्रिक परीक्षा पास होण्यापूर्वीच रियासतकार चतुर्भुज झाले–कीर्तन्यांचे जांवई झाले (ता. २९-२-१८८४). कु. गंगूताई कीर्तने, सौ. लक्ष्मीबाई सरदेसाई झाल्यास आज पुरीं ५४ वर्षें होऊन गेलीं आहेत [तरी रियासतकारांच्या विवाहाचे वाढदिवस फक्त १४ च झाले !].

शिकत असतांना विवाह झाला म्हणून त्यांच्या अभ्यासांत कांहीं खंड पडला नाहीं. मॅट्रिक होतांच श्वशुरांच्या मदतीनें रियासतकार पुण्यास गेले व फर्ग्यूसन कॉलेजांत दाखल झाले. तेथील पहिलें वर्ष यशस्वी रीतीनें पार पाडून पुढील अभ्यासासाठीं त्यांना मुंबईस जावें लागलें. तेथें त्यांनीं एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें नांव घातलें व तेथून ते स. १८८८ मध्यें बी. ए. झाले. वडिलांना हायस्कूलचें शिक्षण पार पाडण्याचेंही सामर्थ्य नव्हतें, मग मुंबई पुण्यासारख्या ठिकाणचें त्या वेळचें कां होईना, कॉलेजचें शिक्षण त्यांना कसें झेंपणार ? रियासतकारांचे मामा बळवंतराव आठल्ये यांनीं त्यांस हा उच्च अभ्यास पुरा करण्यास बरीच मदत केली. शिकवण्यां-सारखे स्वावलंबनाचे मार्गही त्यांनीं अवलंबिले होते.

पदवीधर होतांच त्यांना बडोदें येथें राजवाड्यांत श्रीमंत सयाजीराव महाराजांना वर्तमानपत्रें वगैरे वाचून दाखविण्याचें रीडरचें काम मिळालें. स. १८८९ च्या सुरुवातीपासून ते तेथें रुजू झाले. त्या वेळीं त्यांचा पगार दरमहा ७० रु. होता. एक वर्षातच युवराज राजपुत्र फत्तेसिंहराव यांना शिकविण्याची कामगिरी महाराजांनीं त्यांना सांगितली. तींत रियासतकार छान रंगले. कुठलाही विषय शिकवावयाचा म्हणजे ते प्रथम स्वतः त्याचा अभ्यास करीत व कित्येकदां सर्व लिहूनही काढीत. ह्या लेखी टिपणांतून त्यांच्या रियासती जन्मास आल्या. " माझ्या टेबलावरचीं इतिहासाचीं टिपणं तुझ्या वडिलांनीं नेऊन छापखान्यांत टाकलीं आणि मला रियासतकार केलें, " असें तें अनेक वेळा मजजवळ बोलले आहेत. रियासतीच काय, पण एकादें इतिहासाचें पुस्तक आपण लिहावें असा आजच्या रियासतकरांचा बेत तेव्हां नव्हता. मुसलमानी रियासत अशी जन्मास आल्यानंतर लाभलेल्या आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनीं हळू हळू काम पुढें चालविलें आणि मग त्यांतून रियासतींचे खंड प्रसिद्ध झाले. स. १००० पासून पेशवाईच्या अखेरपर्यंतचा व '५७ सालच्या संग्रामापर्यंतचा इतिहास त्यांच्या हातून लिहून झाला आहे. मुसलमानी, मराठी व ब्रिटिश अशा तीन रियासती त्यांनीं पूर्ण केल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण हें तर त्यांचें जीवित कार्य झालें. आपणांस अजून त्यांच्या आयुष्यांतील बऱ्याच गोष्टींची माहिती मिळवावयाची आहे.

गायकवाडांच्या नोकरींत असतांना अनेक निमित्तानें त्यांचा प्रवास पुष्कळ व्यापक झाला. हिंदुस्थानांतलीं निरनिराळीं ठिकाणें, थंड हवेच्या जागा, ऐतिहासिक शहरें, हीं तर त्यांनीं पाहिलींच; पण सयाजीरावांबरोबर पांच वेळां युरोपमध्यें सफरीसाठीं त्यांना जावें लागलें. युरोपिअन प्रवासामुळें त्यांनीं किती तरी नव्या अनुकरणीय बाबी अंगिकारल्या. आधींच्या त्यांच्या पद्धतशीर स्वभावांत अधिकच सूक्ष्मता आली. वक्तशीरपणाचें महत्त्व सयाजीरावांच्या सहवासांत विशेष असे. तें विलायती अनुभवानें पुरेपुरे पटलें– व आंगींही छान बाणलें. कामाचा उरक, जेव्हांचे तेव्हां काम आटोपण्याची रीत, अशाच प्रवासानें वाढत गेली. खुद्द सयाजीराव प्रत्येक प्रवासांत "मधुमक्षिका" वृत्तीनें, थोडा कां होईना पण मधु गोळा करण्याच्या दृष्टीनें वागत असल्यानें, रियासतकारांसही त्यांच्याशीं तादात्म्य पावण्याची कला आत्मसात् करावी लागली. रोजच्या कार्यक्रमाचें टिपण, दैनंदिनी रोजच्या रोज लिहिण्याची सक्त संवय, हिशेबांतील कडकपणा, या सर्व गुणांचा विकास गायकवाड नरेशांच्या सान्निध्यांत झाला असें म्हणतां येतें. रियासतकाराची पहिली युरोपची सफर स. १८९२ त व शेवटची स. १९११ मध्यें झाली.

बडोद्याच्या राजघराण्यांतील मुलामुलींचे हे "मास्तर" सुमारें २५ वर्षे मास्तरकी करीत होते. त्यांच्या तालमींत तयार झालेल्यांचीं प्रमुख नांवें ध्यावयाचीं तर फत्तेसिंहरावाचे सर्व बंधु व मुलें, इंदिराराजे (कुचबिहारच्या राजमाता); देवास (छोटीपाती) च्या राणीसाहेब; सांडूरच्या विद्यमान अधिपतींची माता–शिवाय बडोद्यांतील कित्येक सरदारांचीं मुलें–अशीं सांगतां येतील. आजसुद्धां सर्व राजघराण्यांत रियासतकार "मास्तर" म्हणूनच ओळखले जातात. पुत्रशोकाचा जबरदस्त धक्का रियासतकारांना बसला तेव्हां इंदिराराजे बडोद्यांत होत्या (१९२६). तेथून त्यांनीं सांत्वनपर लिहिलेल्या पत्रांत याच आवडत्या नांवाचा उल्लेख केलेला आढळतो—

"Words fail me but, my dear Master, my heart is full of sympathy for you & your wife."

राजपुत्रांचे व राजकन्यांचे हे मास्तर. दोन तपाहून अधिक काळ राजघराण्यांत वागलेले; त्यामुळें साहजिकच राणीसाहेबांचा त्यांचेवर पूर्ण विश्वास असे. घरांतल्या वडील माणसाप्रमाणें त्यांना त्या मानीत. नाहीं तरी राजे लोकांचें आयुष्य म्हणजे एका प्रतिष्ठित बंधनासारखेंच असतें. जिवाभावाचीं माणसें अशीं त्यांना त्यांच्या परिस्थितीमुळें जोडतां येत नाहींत. उठतां बसतां नोकरांशीं व्यवहार आणि राजवाड्यांत तर चांगला चाकर मिळणें ही पूर्व पुण्याईची गोष्ट मानतात. तेव्हां रियासतकारांवर राणीसाहेबांचा विशेष लोभ जडला किंवा राजकन्या व राजपुत्रही त्यांच्याशीं विशेष ममत्वानें वागले याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

राजपुत्रांच्या शिक्षणाचें काम संपलें तरी सयाजीरावांच्या मनांतून रियासतकारांना सोडावयाचें नव्हतें. त्यांची नेमणूक खाजगी हिशेबखात्याचे मुख्य म्हणून केली (१९१२). तेंही काम ११–१२ वर्षे केल्यानंतर रियासतकारांनीं सेवानिवृत्त होण्याची इच्छा दर्शविली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व स. १९२५ मध्यें त्यांनीं बडोदें सोडलें. त्यांचा शेवटचा पगार दरमहा रु. ४८५ होता. ३७ वर्षांच्या नोकरीनंतरही त्यांना पगाराचे मानानें पेन्शन मिळालें नाहीं, हा संस्थानी न्यायाचा एक मासला होय !

बडोद्यास असतांना रियासतकारांनीं वाङ्मयीन विश्वांत अनेक प्रकारें पदार्पण केलें. नवीन नवीन विषयांवर आपल्या मराठींत पुस्तकें असावींत ही सयाजीरावांची इच्छा आतां सर्वांस ज्ञात आहे. रियासतकारांना इतिहासलेखनाची हौस कशी झाली हें कळण्यासाठीं त्यांच्या नांवानें प्रसिद्ध असलेलीं पुस्तकें कालानुक्रमें पहावीं. प्रथम मॅकिव्हलीच्या "Prince" चा "राजपुत्र" हा अनुवाद स. १८९० त व मग दोन वर्षांनीं 'सीली'च्या इंग्रजी इतिहासाचा मराठी अनुवाद "इंग्लंडदेशाचा विस्तार" (Expansion of England) हा स. १८९२ मध्यें प्रसिद्ध झाला. रियासतकारांच्या लेखनाचा 'श्रीगणेशा' ऐतिहासिक ग्रंथापासून झाला असला तरी महाराजांच्या आज्ञेनें देशी व 'उताणा रुपाया' ब्रिज, संकेत, चक्कर वगैरे युरोपीय हीं बैठ्या खेळांविषयींचीं अनुवादात्मक पुस्तकें १८९६ सालीं त्यांनीं प्रसिद्ध केलीं. मराठी इतिहासदेवतेस एकदम मोठी भीति वाटली. आपला निःस्सीम भक्त क्रीडादेवीच्या नादांत गुरफटतो कीं काय ? पण नाहीं. शेवटीं इतिहासदेवीचीच सरशी झाली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षी "हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास" या नांवानें मुसलमानी रियासत प्रथम खंड छापून तयार झाला. लगेच एक वर्षानें "शालोपयोगी भारतवर्ष" म्हणजे शाळांतलि विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असा छोटासा हिंदुस्थानचा समग्र इतिहास त्यांनीं लिहिला. अशा प्रकारें इतिहासदेवतेनेंच या भक्ताला शेवटपर्यंत आपल्या सेवेंत गुंतवून ठेवलें. रियासतींचे एकंदर ११ खंड, मुसलमानी रियासत–२ खंड, मराठी रियासत–८ खंड, ब्रिटिश रियासत– २ खंड (दुसऱ्या खंडाची मुद्रणप्रत सध्या तयार आहे)–तिच्या गळ्यांत पडावयाचे होते ना ! अस्तु.

रियासतकारांच्या ऐतिहासिक वाङ्मय–प्रपंचाची एक सूचि स्वतंत्रच करावी लागेल. त्यांच्या कौटुंबीय विस्ताराची माहिती सांगणें मध्येंच खंडित होऊन जेव्हां तेव्हां इतिहास पुढें येतो हें योग्यच नव्हे काय ?

बडोद्यास कामधंदा सुरू होताच रियासतकारांकडे त्यांचे धाकटे बंधू, मामेबंधू, वगैरे मंडळी त्यांचेजवळ अभ्यासासाठीं गेली. दरबारांत राजपुत्रांना शिकविण्याचें काम होतें–त्याचीच छोटी आवृत्ति घरीं. शिवाय वडीलकीच्या नात्यानें संसारवृक्षाचा सर्व भार रियासतकारांवरच होता. तो त्यांनीं न कुरकुरतां सोसला.

रियासतकारांस स. १८९९ मध्यें (५ मे) एक पुत्र झाला. तो **श्यामकान्त** होय. त्याचे पाठीवर चार एक वर्षांनीं (ता. २७-२-१९०३) रोजीं दुसरा मुलगा झाला. त्याचें नांव प्रो० जिनसीवाले यांच्या सांगण्यावरून **श्रीवत्सलांच्छन** असें ठेविलें. श्यामकान्तचें प्राथमिक व थोडेसें इंग्रजी शिक्षण संपतांच त्यास डॉ० रवीन्द्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनमध्यें पाठविलें. (१-१२-१९१२). तेथून तो कलकत्ता युनिव्हर्सिटीची प्रवेश परीक्षा बंगाली मातृभाषा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन यशस्वी झाला. शांतिनिकेतनमध्यें त्याच्याइतके गुण बंगालींत दुसऱ्या कोणासच मिळाले नाहींत. नंतर फर्ग्यूसन कॉलेजांत B. A., B. Sc. होईपर्यंत श्यामकान्तनें अभ्यास केला. लष्करी पलटणींतही तो दाखल झाला होता. पुढील अभ्यास जर्मनींत जाऊन त्यानें केला. जुलै १९२४त डॉक्टरेट पदवी मिळविली आणि दीड वर्षाच्या अवधींतच आंतड्याच्या विकारानें त्यास परदेशीं मृत्यु आला (२८–११–१९२५). रियासतकारांस हा एक जबरदस्त तडाखा 'नशीब' म्हणून कुणी शक्ति आहे म्हणतात तिनें दिला. हातातोंडास आलेला सद्गुणी व सर्वांचा आवडता मुलगा आईबापांच्या उतारवयांत परलोकवासी झाल्यामुळें त्यांच्या मनाची कल्पनाच केली पाहिजे.

श्यामकान्तचा हा विरह प्रेमळ आईबापांस विशेष जाणवला. तो अत्यंत सुस्वभावी व गोड मुलगा होता, असें त्रयस्थाचेंही मत होई. मग आईबापांना त्याबद्दल काय वाटत असेल बरें? मृत्युशय्येवर असतांना श्यामकान्तनें लिहिलेल्या पत्रांतील भाग उध्दृत केला म्हणजे त्याच्या थोर मनाची, व्यापक विचाराची व उदात्त ध्येयाची कल्पना थोडी तरी येईल—

" शस्त्रक्रियेंतून जर सुखरूप पार पडलों नाहीं तर या जगांत तुमची आमची पुन्हा
" गांठ नाहीं !!...आजपर्यंत लहानपणापासून तुम्ही उभयतां माझें मोठ्या काळजीनें व
" प्रेमानें लालन पालन केलें; उत्तमपैकीं शिक्षण दिलें. मला कोठेंही कांहींही कमी पडूं
" दिलें नाहीं. आईबापांपासून मुलांना जितकें म्हणून मिळणें शक्य असतें त्यांत तुम्ही
" कोठेंही न्यूनता दाखविली नाहीं. तुमच्यासारखे आईबाप लाभणें म्हणजे मोठें भाग्य
" होय आणि तें मला लाभलें हा केवढा तरी मोठा लाभ मी समजतों.

" नाना, माई ! माझी एवढीच विनंती आहे कीं, जर मला मृत्यूनें ग्रासलें तर
" शोक किंवा दुःख करीत बसूं नका. तुमच्यासारख्याच किंवा त्याहूनही जास्त दुःखी
" लोकांकडे दृष्टि फेंका. तुमच्या दुःखाची कल्पना माझ्या मनापुढें आली म्हणजे असह्य
" होतें. '**उदार चरितानां तु वसुधैव कुटुंबकम्**' असेंच मानून चाला.

" तुम्हा उभयतांस अत्यंत प्रेमपूर्वक व श्रद्धापूर्ण प्रणाम वरचेवर सांगून हा तुमचा
" आज्ञाधारी व आवडता मुलगा रजा घेतो. तुमचा शुभ आशीर्वाद सतत माझ्या-
" पाशीं आहे. "

मृत्यूपूर्वी कांहीं तास हें पत्र श्यामकान्तनें स्वदस्तुरनें लिहिलें असल्यानें त्यानें पितरांच्या मनांत केवढा उमाळा आणला असावा याचा वास्तविक अंदाज येण्यासाठीं पुत्रविरहाग्नीनें तसें होरपळलेंच पाहिजे.

श्रीवत्स हा तर बालपणींच म्हणजे साडेबारा वर्षांचा असतांना (स. १९१५ मध्यें) वारला. एवंच, रत्नासारखीं दोन मुलें असून सेवानिवृत्तीच्या वेळीं रियासतकार बडोद्याहून निघाले, ते तेथें प्रथम गेले तेव्हां होते तसेच, म्हणजे नुसते सपत्नीक. त्यांचा विवाह झाला स. १८८४ मध्यें. बडोद्यास ते कामावर लागले स. १८८९ त. आणि तेथून निघाले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स. १९२५ त. तेव्हां बडोद्यांतलें ३७ वर्षांचें वास्तव्य अथवा ४२ वर्षांचें वैवाहिक जीवन व्यतीत करून शेवटीं पुनः दोघेंही जसींच्या तशींच ! ! ही स्थिति मोठीच दुःसह म्हटली पाहिजे. पण इतक्या वर्षांच्या अनुभवानें रियासतकारांनीं जीविताकडे पहाण्याची आपली दृष्टि बनविली होती. जीविताचें तत्त्वज्ञान म्हणतात तें त्यांनीं पूर्ण विचारान्तीं ठरविलें होतें व तेंच त्यांच्या उपयोगी पडलें. संसार असार आहे, जग क्षणभंगुर आहे, सर्व मायेचा पसारा आहे, इत्यादि पोकळ वेदान्ताची कास त्यांनीं अशा दुःखद परिस्थितींतही धरली नाहीं, हा त्यांच्या मनाचा खंबीरपणाच म्हटला पाहिजे. सर्व साधारणरीत्या आपण असें पहातों कीं कसाही विचारी इसम परिस्थितीपुढें गोगलगाय बनतो. दुःखानें लवचिक बनतो. सारासार विचार असा त्याला उरत नाहीं. मग तो कुठल्या तरी अविचारी मार्गानें उर्वरित आयुष्य कंठतो. तसें रियासतकारांनीं कधीं होऊं दिलें नाहीं. त्यांची मनोवृत्ति शुद्ध तर्काच्या मजबूत पायावर उभी असल्यानें कसल्याही तुफानी दर्याला तिला कांहींच करतां येत नाहीं. म्हणून ते म्हणतात—

"दोन होतकरू मुलगे आम्हांस सोडून गेले ही गोष्ट अद्यापि आम्हांस पटत नाहीं....सर्वच प्राणी चिरंजीवी आहेत. प्रत्येक इसम आपल्या राष्ट्राचा एक घटक असून लाभलेल्या आयुर्भागांत ज्यानें त्यानें आपलें कर्तव्य यथायोग्य बजावलें कीं त्याचा कार्यभाग संपला."

एवढ्यावरच त्यांचें जीवित तत्त्वज्ञान थांबत नाहीं. पुढील जन्मीं आपल्या आप्तेष्टांची भेट होईल, हें वेडें समाधान कां होईना, पुष्कळांच्या मनास शांति देण्यास पुरेसें असतें. पण रियासतकार अशी आत्मवंचना करून घेण्यास मुळींच तयार नाहींत. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास बसत नाहीं असें ते सांगतात. या जन्मींच आपल्या कृत्यानें आपणांस अमर होतां येतें असा त्यांचा दृढविश्वास आहे. याच भावनेमुळें लौकिकी अर्थानें दिवंगत असलेल्या मंडळीचा समागम प्रसंगानुसार अद्यापि त्यांस घडतो. प्रचंड दुःखानलांतून शीरसलामत बाहेर पडण्यास मन व मनाची तयारीही तशीच चांगली खंबीर असली पाहिजे हें उघड आहे. ज्यांना त्यांच्या या स्वभावाची माहिती आहे त्यांनाच प्रारंभीं उद्धृत केलेल्या वाक्याचें स्वारस्य यथार्थ समजेल.

"इतिहास हा तुम्ही आपला मुलगा मानलेला आहे व तो अमर आहे." असें श्री. न. चिं. केळकरांनीं लिहिलें, तें अत्यंत समर्पक होय.

कौटुंबिक सौख्य म्हणतात तें रियासतकारांना कशा प्रकारें लाभलें हें आतां कळलेंच असेल. स. १९२५ मध्यें पुत्रविरहाचा वज्राघात झाल्यामुळें पुष्कळ हितचिंतकांना व आप्तेष्टांनाही त्यांच्या प्रकृतीबद्दल साहजिकच काळजी वाटली. पण इतिहासाची सुधावृष्टि त्यांचें चैतन्य कायम टिकवीत होती. इतिहासदेवतेच्या परमप्रिय उपासकावर काळानें आणलेली संकटें पाहून तिला वाईट वाटलें आणि म्हणून तर तिनें आपल्या अधिकारांत अमृतबिंदूचा वर्षाव चालू ठेवला नसेल ना, असें वाटतें. गेल्या १२-१३ वर्षांत रियासतकारांनीं अक्षरशः कामाचे डोंगर एकट्यानें उठविले आहेत. त्या कामाचा व्याप पाहूनच छाती दडपून जाते. रियासतीपैकीं मराठी रियासत उत्तरविभागांतील तीनही खंड याच काळांतले. मुसलमानी रियासतीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन्ही भागांची तृतीयावृत्तीसुद्धां याच अमदानींतली. "*Main Currents of Maratha History*" हीं पाटणा युनिव्हर्सिटींत दिलेलीं व्याख्यानें, त्यांची पहिली व दुसरी आवृत्तीसुद्धां त्याच १२ वर्षांतली आहे. पेशवेदप्तर संशोधन होऊन त्यांतून ४५ खंड बाहेर पडले; रेसिडेन्सी रेकॉर्डसपैकीं इंग्रजी पत्रव्यवहार पांच खंड अभ्यासकांस उपलब्ध झाला—हें सर्व रियासतकारांच्या सतत दीर्घोद्योगामुळें. नागपूर युनिव्हर्सिटींत मराठी इतिहासावरील व्याख्यानें- "अव्वल मराठशाहीचें अंतःस्वरूप"–हीं तर १९३६ मधलीं होत. मराठी रियासतींची नवी आवृत्ति शहाजी, शिवाजी, संभाजी व राजाराम अशा चार छोट्यामोठ्या खंडांत काढण्याचें कार्यही १९३५–३६ या दोन वर्षांत पुरें झालें. शालेय पुस्तकांच्याही अनेक आवृत्त्या या कालखंडांत निघाल्या.

असा त्यांच्या इतिहासप्रपंचाचा विस्तार बडोदें सोडल्यावर, सेवानिवृत्त झाल्यावर, वयाची साठी उलटल्यानंतर, विशेष जोमानें वाढला. फार काय, ऐतिहासिक क्षेत्रांत खरीखुरी कामगिरी त्यांच्या हातून या उतारवयांतच घडली आहे. इतरांच्या कर्तबगारीस जेव्हां ओहोटी लागते, तेव्हां रियासतकारांच्या मेहनतीचा भर दृष्टीस पडतो हें जरासें विलक्षणच, पण तें सत्य आहे. ज्या कामगिरीमुळें त्यांचें नांव सर्वत्र झालें, त्यांच्या मेहनतीची व अभ्यासाची ओळख अखिल हिंदुस्थानभर झाली, तें पुण्यांतील पेशवे दप्तरांतील कागदपत्रांचें संशोधन होय. रावबाजीकडून पुणें कबज्यांत घेतल्यानंतर सर्व कागदपत्र तत्कालीन अधिकाऱ्यांनीं एका इमारतींत आणून खेचून भरून ठेवले; सध्यां एलिअनेशन ऑफिस म्हणून ओळखतात त्याच इमारतींत सर्व कागदपत्रें भरलेलीं आहेत. सुमारें २७,००० रुमाल त्यांत असून त्याचें संपूर्ण संशोधन एकट्या अभ्यासकास जन्मभर राबूनही पुरें होणारें नाहीं. त्या कार्याचा अंदाज सरकारनें निरनिराळ्या वेळीं वेगवेगळ्या तज्ज्ञांकडून करवून पाहिला. एका विद्वानानें सरकारला कळविलें कीं, "तीस वर्षें हें काम चालेल व त्यास निदान आठ लक्ष रुपये खर्च येईल." अशा अंदाजामुळें व भिन्न भिन्न मतांमुळें असेल किंवा तिसरेंच कांहीं कारण असेल, सरकारनें त्या बाबतींत लक्ष घातलें नाहीं. हिस्टॉरिकल रेकॉर्डस कमिशननें वारंवार ठराव पास करून त्या साहित्याचें संशोधन ताबडतोब व्हावें, अभ्यासकांना तें उपलब्ध व्हावें, अशी मागणी अनेक वेळां केली. पण स. १९२९ मध्यें रियासतकार सरदेसाई यांस त्या कामावर एकदाचें नेमलें. त्यांच्या मदतीस प्रो. कृ. पां. कुलकर्णी, वि. गो. दिघे, गुजर, य. न. केळकर, पुरंदरे, इत्यादि अभ्यासू होते. त्यांनीं कार्य भराभर आटोपून निवडक कागद हातीं लागतील तसे छापून काढले. त्याचे एकंदर ४५ खंड भरले आहेत. प्रत्येक कागदपत्रावर तारीख, कोणांकडून, कोणास व त्याचा थोडक्यांत सारांश इंग्रजींत दिला असल्यानें हिंदुस्थानांतील सर्व प्रांतीय अभ्यासकांची सोय झाली आहे.

या कामासाठीं सरकारनें सालीना १० हजार रु. मंजूर केले होते. रियासतकारांचे मदतनीस निवडण्याचें स्वातंत्र्य त्यांनाच असलें तरी विशिष्ट तत्त्वांप्रमाणें ती निवड व्हावयास हवी होती. संपादक म्हणून रियासतकारांचें नांव छापावयाचें असें पहिले कांहीं खंड प्रसिद्ध झाल्यानंतर सरकारनें ठरविलें तरी त्यांत व्यक्त झालेलीं मतें सरकारचीं नव्हत असाही शेरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Harid...

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छापण्याची व्यवस्था केली. त्या दप्तरांत बसूनच सर्व काम करावयाचें होतें. नेहमीं लागणार संदर्भग्रंथ तेथें जवळपास नव्हते. त्यामुळें अडचण म्हटली तर पुष्कळच होती. तरी कार्याकडे लक्ष देऊन रियासतकारांनीं ती सर्व सोसली. पण या अडचणीपेक्षां अधिक त्रासदायक व असह्य असा अनुभव कायदे कौन्सिलांतून त्यांना मिळाला—त्याचीही त्यांनीं परवा केली नाहीं. पेशवे दप्तरांतून कांहीं ऐतिहासिक सामग्री अभ्यासकांस उपलब्ध होणार होती, हें राष्ट्रकार्य असलें तरी त्यांत वैयक्तिक हेवेदावे निघावे हें आश्चर्य होय. इतर अडचणींस न जुमानतां सरकारनें ही जबाबदारी अंगावर घेतली तेव्हां प्रथमतः एक दोन वर्षांपुरती बेगमी केली होती. तीप्रमाणें तीन वर्षें काम चाललें, आणि आर्थिक अडचणीमुळें काटकसरीची सक्ति झाली, तेव्हां ह्या दप्तरखान्यावर होणारा खर्च मंजूर होण्याची पंचाईत पडली. चौथ्या वर्षाच्या सुरुवातीस सर्व मंडळींना कमी करावें लागणार असें कळतांच सर जदुनाथ सरकार यांच्यासह रियासतकार कांहीं ठिकाणें हिंडून आले व श्रीमंत गृहस्थांच्या भेटी घेऊन या स्तुत्य कार्यासाठीं त्यांनीं स्वतःच्या हिमतीवर रु. १२,००० वर्गणीनें जमविले. एक वर्षाची बेगमी झाली. तेवढ्या अवधींत ४५ खंड व एक यादी मार्गदर्शिका म्हणून, इतकें ऐतिहासिक साहित्य छापून प्रसिद्ध झालें.

पेशवे दप्तरांतील कागदपत्रें तपासण्याचें काम रियासतकारांनीं कसें केलें हें पाहिलें म्हणजे त्यांच्या सूक्ष्म अभ्यासाची, दीर्घ व्यासंगाची व व्यापक वाचनाची साक्ष पटते. त्यांच्या संग्रहीं असलेलीं सर्व ऐतिहासिक पुस्तकें त्यांनीं वाचलीं असून त्यावर वाचल्याची तारीख आढळते. पुनर्वाचन झालें असल्यास तीही नोंद त्यांवर दिसते. त्यांतील मजकुराचा उल्लेख इतर कुठल्या पुस्तकांत असल्यास तसा निर्देश बाजूला केलेला असल्यानें कोणत्या पुस्तकांत काय आहे, हें त्यांना चटकन् सांगतां येतें. कुठली मिती बरोबर, कुठला वृत्तान्त विश्वसनीय, तो तसा कां इत्यादि चर्चा देखील थोडक्यांत लिहून ठेवण्याची त्यांची रीत आहे. तीमुळें त्यांचें वाचन किती चिकित्सक दृष्टीचें आहे तें आपोआप समजतें. तें असें असल्यामुळें त्यांना पेशवे दप्तरांतील कागद तपासून ते लावतांना सोईचें गेलें. मराठी इतिहासाचा व्यापक अभ्यास असलेला, फार काय, उपलब्ध सर्व मराठी साहित्याचें वाचन झालें आहे, असा एकही अभ्यासक महाराष्ट्रांत रियासतकारांविना दाखवितां येणार नाहीं. म्हणूनच त्यांचें महत्त्व विशेष वाढतें, त्यांचेबद्दलचा आदर दुणावतो. त्यांच्या चिकाटीचें, सतत मेहनतीचें व कार्यैकतेचें कौतुक वाटतें. पेशवे दप्तरांतील रेसिडेन्सि कागदांचें इंग्रजी काम करण्यास भरपूर वेळ मिळावा म्हणून दहाबारा वर्षांचा गरीब विद्यार्थी पूर्वी ज्या वैराग्यशीलतेनें रहात असे, त्या वृत्तीनें ते पुण्यास, हल्लीं कौन्सिल हॉल जवळ दिवाणांच्या खोल्या आहेत त्यांत, साठी उलटल्यानंतरही राहिले होते. तेथेंच रहाणें, तेथेंच दिवसभर काम व शेजारच्या वाडिया कॉलेज विद्यार्थ्यांच्या भोजनगृहांत जेवण, असा त्यांचा क्रम किती तरी दिवस चालू होता. या एका उदाहरणावरून त्यांची तन्मयता कळून येईल.

पेशवे दप्तरांतील कागदपत्रांचे खंड ज्या पद्धतीनें व ज्या घाईनें निघाले, त्यांवरून पहातां, त्यांत बरेच दोष राहणें अपरिहार्य होतें. पण त्यांची जाणीव खुद्द रियासतकारांसही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेवढी आहे, तेवढी काकदृष्टीच्या टीकाकारांसही नसेल. आज त्यांनीं पेशवे दप्तरांतील ४५ खंडांचें शुद्धिपत्र निरनिराळ्या विद्वान् अभ्यासकांकडून जमविलें आहे; महाराष्ट्रांतील कुणा तरी अभ्यासकानें तें केलें आहे काय याचा तपास केल्यास असें आढळेल कीं, ज्यांनीं ते वाचावयास पाहिजे होते, अशा विद्वानांनीं अजून ते समग्र चाळलेही नाहींत. मग शुद्धिपत्र करणें तर दूरच!

पेशवे दप्तराचें काम संपल्याबरोबर सातारकरांनीं रियासतकारांचा सन्मान श्रीछत्रपतींचे हस्तें साताऱ्यांतच केला (ता. ३-११-१९३४). रियासतकारांना साडेतीन वस्त्रें व एक चांदीचें तबक अर्पण करून त्यांचा गौरव केला. ऐतिहासिक कामगिरीबद्दल त्यांस धन्यवाद दिले. असला मानसन्मानाचा प्रसंग रियासतकारांवर पहिलाच असल्यानें त्यांना या वेळीं गहिंवर आला. शब्ददेखील तोंडांतून बाहेर पडेना. कारण त्यांना विरोध, उपरोध, अशीच संभावना त्या वेळपर्यंत मिळाली होती. त्या पार्श्वभूमीवर हा गौरव विशेष उठून दिसला. या समारंभास सर जदुनाथ सरकारही हजर होते.

महादजी शिंदे यांचीं कांहीं कागदपत्रें कै. रा. ब. पारसनीस यांनीं गुप्तपणें छापविलीं होतीं. त्याचे पांच खंड असावयास पाहिजे होते. तेही धडपणें उपलब्ध नसल्यानें अभ्यासकांस असून नसल्यासारखेच होते. त्यांची एक नवी संपादित आवृत्ति (९०० पृष्ठें) काढण्याचें काम ग्वाल्हेर दरबारनें रियासतकारांवर सोपविलें तेंही त्यांनीं नुकतेंच पार पाडलें (स. १९३८). या कार्यामुळें पारसनीस, शिंदे सरकार व मुंबई सरकार यांच्या आपसांतील कारवायांस जोर आला. तें एक स्वतंत्रच प्रकरण असून त्याबद्दल येथें लिहिण्याचें कांहींच कारण नाहीं.

एवढ्यानेंच भागलें असें नाहीं. रियासतकारांच्या कर्तबगारीची खात्री पटल्यामुळें एलिअनेशन ऑफिसमधील इंग्रजी पत्रव्यवहार संपादित करून प्रसिद्ध करण्याची विनावेतन कामगिरी त्यांनीं स्वीकारली. या कामीं त्यांचे जोडीदार सर जदुनाथ सरकार आहेत. उभयतांवर मिळून ही जबाबदारी सरकारनें टाकली आहे. पेशव्यांचे दरबारीं इंग्रज वकील होते. त्यांचे पत्रव्यवहार एकत्रित करून ते संगतवार लावून संपादण्याचें काम सध्या ते करीत आहेत. त्यांत स्वतः कार्य करावयाचें व इतर अभ्यासकांकडून करवून घ्यावयाचें, असें दुहेरी स्वरूप त्यांच्या कामाचें आहे. कारण सर जदुनाथ हे दूरप्रांतीं रहाणारे पडले. आतांपर्यंत रेसिडेन्सी रेकॉर्डसपैकीं पांच खंड छापून प्रसिद्ध झाले ते—

1 Mahadji Sindia & North Indian Affairs–Editor Sir Jadunath Sarkar.
2 Poona affairs 1786–1797 „ G. S. Sardesai
3 The Allies War with Tipu Sultan „ N. B. Roy
4 Maratha Nizam Relations „ V. G. Dighe
5 Nagpur Affairs „ Y. M. Kale
6 Poona Affairs 1797–1801 (now in press) „ G. S. Sardesai

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रियासतकारांच्या कार्याची किंवा त्यांच्या जीवनाची ओळख सर जदुनाथ सरकार यांच्या निर्देशाविना पुरी होणार नाहीं. वंगप्रांतीय हे विद्वान् इतिहासकार व त्यांचे महाराष्ट्रीय व्यवसायबंधु यांचें सख्य व उभयतांचा स्नेहसंबंध आज जवळ जवळ ३५ वर्षांचा आहे.

जीवा जीव एक कार्य भेटवितें

हा खाडिलकरी सिद्धान्त रियासतकार व सरकार यांचे बाबतींत सुरेख लागू पडतो. त्यांचे मतभेद होतात; एकमेकावर ते रागावताततही. एक थंड डोक्याचा, धिमेपणानें बहुतांचीं अंतरें राखणारा तर दुसरा नृपतियति संवादापैकीं

मय्येप्यास्था न चेतसा त्वयि मम सुतराम् एष राजन् गतोऽस्मि

असें खणखणीत बजावून स्वकार्यमग्न होणारा. तरीही आपलें कार्य परस्परांना पूरक आहे, आपल्या उभयतांच्या सहकार्यानें कामाचे डोंगर उठवितां येतील, हें जाणून त्यांनीं पूर्वी जडलेला प्रेमभाव कायम ठेवला आहे. श्यामकान्तला बंगाल्यांत पाठविल्यामुळें उभय विद्वानांत घरोबा जडला, तो दिवसानुदिवस वाढतच गेला. रियासतकारांनीं आपल्या प्रत्येक अडी-अडचणीचे वेळीं ऐतिहासिक प्रश्नांत सर जदुनाथांचा सल्ला घेतला आहे. कामाचा विलक्षण उरक, अत्यंत सूक्ष्म व्यासंग, कार्यतत्परता आणि कमालीची व्यवस्था व दूरदृष्टि यामुळें सर जदुनाथांशीं पत्रव्यवहारानें कां होईना संबंध ठेवणें म्हणजे एक मोठी अभिमानाची व आनंदाची बाब वाटते. त्यांचें औचित्य प्रशंसनीय आहे. स्मारकग्रंथ रियासतकारांना अर्पण करावयाचे त्या दिवशींचा कार्यक्रम कसा असावा याबद्दल त्यांस सल्ला विचारला असतां त्यांनीं मिनिटा-बरहुकूम तो लिहून तर पाठविलाच; पण प्रारंभीं वंदनपर मराठी पद्य कोणतें म्हणावें—ग्रंथार्पणा-साठीं उचित मराठी कविवचन कोणतें, हें सुद्धां कळविलें. आणि त्यांत सुधारणा करावी असें कुणालाही वाटलें नसतें. इतका तो कार्यक्रम सुंदर आहे. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, औचित्य व विद्वत्ता आणि व्यापक दृष्टि यांचा सुरेख संगम सर जदुनाथांच्या ठिकाणीं असल्यानें त्यांजबद्दल आदर चटकन् वाटतो.

महाराष्ट्रीय व वंगीय इतिहासकार यांचा हा स्नेहसंबंध कसा जडला व तो कसा वाढत गेला हें पहाणें उभयतांच्या चरित्रापैकीं महत्त्वाचा भाग होऊं शकेल खरें; पण तूर्त आपणांस तसें करावयाचें नाहीं व तितकी सवडही नाहीं. एवढें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पेशवे दप्तर, रेसिडेन्सी रेकॉर्डस, ग्वाल्हेरचा पत्रसंग्रह, इत्यादि कामें रियासतकारांनीं अंगिकारलीं त्यांत जदुनाथांचा कार्यभाग मोठा आहे. ते दोघे एकमतानें वागले म्हणूनच पेशवे दप्तरांतले ४५ खंड आज अभ्यासकांस उपलब्ध झाले—म्हणूनच रेसिडेन्सी रेकॉर्ड संपादून प्रसिद्ध करण्याचें कार्य एतद्देशीय इतिहासकारांस मिळालें. एरवीं तें सर्व बंद तरी राहिलें असतें किंवा कुणा गोऱ्या साहेबाची त्यावर वर्णी लागली असती. इतर कुणाचाही उपमर्द करण्याचा हेतु मनांत नसतांही असें म्हणतां येतें कीं, पेशवे दप्तर व रेसिडेन्सी रेकॉर्डस या दोन्ही कामासाठीं सरकार—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदेसाई यांचेविना दुसरी पात्र मंडळी मिळाली नसती. उभयतांना आहे तें संबद्ध विषयाचें सांगोपांग ज्ञान, ती मेहनत करण्याची तयारी व तो कामाचा उरक, इतर विद्यमान अभ्यासकांत इतक्या उत्कटत्वानें आहे असें वाटत नाहीं. सरकारी दप्तरांतले व्यवहार संभाळणें ही एक कला नसली तरी व्यवहारदक्षतेची बाब आहे आणि रियासतकारांना ती साधली खरी. असो.

सर जदुनाथ व सरदेसाई यांचे स्नेहसंबंध घरोब्यापेक्षांही निकटचे झाले आहेत. आणि उभयतांच्या चरित्रकारास, एकाचें चरित्र सांगतांना दुसऱ्याचेंही पुष्कळसें त्यांत गोवावें लागेल. असेंही म्हणतां येतें कीं, दोघांच्याही परम स्नेह्यांची प्रतवारी लावली तर पहिल्या दोघांत परस्परांचें नांव येईल. रियासतकारांच्या स्नेही मंडळींचा व आप्तेष्टांचा विस्तार तसा मोठा असून सर्वांशीं त्यांचे संबंध अगदीं प्रेमळपणाचे आहेत. तसें जदुनाथांचें नाहीं. उभय मित्रांच्या स्वभावांत पुष्कळ फरक आहेत. पण त्यामुळें परस्परांच्या लोभांत, सहकार्यांत किंवा प्रेमभावांत उणेपणा कधींच आला नाहीं. उलट, दिवसानुदिवस तो वाढीस लागलेला दिसतो. परस्परांचीं कार्यें एकमेकांच्या सल्ल्यानें झालीं आहेत. किंबहुना उभयतांनीं घरगुती अथवा व्यासंगिक असें एकही गौप्य लपविण्याचा प्रयत्न केला नाहीं. मात्र त्यांच्या या तीन तपाच्या स्नेहभावांत सर जदुनाथांनी दोन वेळां रियासतकारांना चकविलें. एकदा सातारला छत्रपतींच्या हस्तें त्यांना साडेतीन वस्त्रें देऊन त्यांचा गौरव झाला त्या वेळीं व दुसरा प्रसंग प्रस्तुतच्या स्मारक ग्रंथा-संबंधींचा. याच दोन 'कटां'ची खबर सर जदुनाथांच्या एका कानास कळली असून दुसऱ्या कानास—म्हणजे रियासतकारांस—त्यांनीं कळूं दिली नाहीं. हे दोन प्रसंग वगळले तर उभयतांनीं परस्परांपासून कांहींच छपविलें नाहीं—तशी त्यांची इच्छाही नव्हती, हें कळून येतें.

दोन विद्वान् इतिहासकारांचा हा शुद्ध स्नेह वास्तविक कौतुकास्पद व्हावयास पाहिजे होता. पण सखेदाश्चर्य हें कीं या त्यांच्या निकट स्नेहामुळेंच उभयतांवर महाराष्ट्रांतील भा. इ. सं. मंडळाचा रोष झाला आहे. मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची सामग्री सर जदुनाथांनीं एकट्यांनीं स्वकष्टानें स्वतःच्या पदरास खार लावून जेवढी जमविली आहे, तेवढी हिंदुस्थानांत इतर कुणालाच मिळवितां आली नाहीं ही गोष्ट कबूल केल्यानें, आपल्या कार्यास कमीपणा येतो असें वाटणारांनीं पाहिजे तर ती अमान्य करावी. पण वस्तुस्थिति तशी आहे यांत तिलप्राय संशय नाहीं. त्यांचीं कांहीं मतें, त्यांचे कित्येक निर्णय, हे फक्त त्यांनाच पटतात. खुद्द रियासतकारांनाही ते मान्य नाहींत. उभयतां आपापली बाजू मांडून एकमेकाची खात्री पटवीत असतात. पण तेवढ्यामुळें स्नेहांत अंतर आलें नाहीं, त्यांनीं येऊं दिलें नाहीं. हा सुज्ञपणा पुष्कळांत नसतो. म्हणूनच कदाचित् भारत इतिहास संशोधक मंडळांतल्या मंडळींचा या दोघांवर रोष आहे. कुणाच्याच रोषालोभाची परवा न करणाऱ्या या दोघांनीं मंडळींच्या रोषाकडे लक्षही दिलें नाहीं. मात्र तो रोष कां आहे, त्याची वाढ कसकशी झाली व तो अजूनही समूळ नाहींसा कां झाला नाहीं, याचा विचार केल्यास या पुण्यांतील विद्वान् मंडळीबद्दल हसूं येतें. रियासतकारांच्या या चरित्रविषयक धावत्या लेखांत ही विरोधाची हकीकत आणावी कीं न आणावी या विचारांत होतों. परंतु पुष्कळांना त्या वादाची नीट कल्पना नाहीं. रियासतकारांसारख्यांच्या कार्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Hari...

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विरोध कां व्हावा हेंच पुष्कळांना समजत नाहीं. त्यांच्यासाठीं ह्या वादाची भूमिका थोडक्यांत सांगणें जरूर आहे.

श्रीशिवछत्रपतींचें इंग्रजी चरित्र सर जदुनाथांनीं लिहिलें, त्यावरून पुष्कळांना त्यांचा राग आला. शिवाजीबद्दल आम्हां मराठ्यांना वाटतें तें विभूतिमत्त्व व वाटतो तो अभिमान जदुनाथांच्या तर्ककर्कश विचारी मनास वाटत नाहीं. आमच्या बखरी, पुराणें, कागदपत्रें, यांत त्यांचे दृष्टीनें ऐतिहासिक विश्वसनीय सामग्री कमी; पेशवाईबद्दल त्यांचा एक दुराग्रह झालेला; अशा बंगाली इतिहासकाराचा सल्ला मुंबई सरकारनें वारंवार घ्यावा, त्याचें म्हणणें मानावें, त्याच्या सल्ल्यानें चालावें, हीच 'मंडळा'ला न पटणारी गोष्ट आहे. मराठी इतिहासाबद्दल आत्मीयता नसलेला व ' मोडी वाचतां येत नसलेला ' इतिहासलेखक आमच्या ऐतिहासिक साधन–सागराची विल्हेवाट लावण्याचे कामीं सल्लागार असावा हें पुण्यांतील सोवळ्या मंडळींना पटत नाहीं.

रियासतकारांचा अपराध म्हणजे त्यांनीं सर जदुनाथ सरकारशीं संगनमत केलें व 'स्वतःची पात्रता नसतां, संशोधन कसें करावें हें ठाऊक नसतां, त्यांनीं पेशवे दप्तराचें संशोधन' करण्याचें काम पत्करलें. आपल्या रियासती आमच्या मंडळामार्फत प्रकाशित होऊं दिल्या नाहींत. कागदपत्र छापण्यांत, त्यांचा इंग्रजी मतलब लिहिण्यांत व एकंदर ४५ खंड प्रसिद्ध करण्यांत कुठलीच शास्त्रीय पद्धत त्यांनीं अवलंबिली नाहीं. सर जदुनाथांच्या कच्छपीं लागून त्यांनीं हीं कामें ' मिळविलीं. ' जदुनाथांचें मत बदलण्याचा रियासतकारांनीं प्रयत्न केला नाहीं. ' राष्ट्रीय वृत्ति ' त्यांचे अंगीं नाहीं. ते केवळ ' संकलनकार ' आहेत इत्यादि.

विरोधकांची भूमिका अशी आहे. रियासतकार व सर जदुनाथ यांनीं त्या विरोधकांशीं वागावयास पाहिजे होते तसेंच वर्तन ठेवलें. त्यांची परवा म्हणून केली नाहीं. आणि तेंच ठीक झालें. थोडासा समजूतदारपणा दाखवून अंगीकृत कार्यांत अनेकांचें सहकार्य मिळविणें, हा संस्थाचालकांच्या आंगीं असावयास पाहिजे तो गुण, चालकांच्या अंगीं नसल्यानें रियासतकार व सर जदुनाथ या उभयतांच्या मेहनतीचा फायदा भारत इतिहास संशोधक मंडळास मिळाला नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. असो

रियासतकारांचें प्रचलित जिवन जुन्या ऋषीप्रमाणें आहे. कामशेत येथें इंद्रायणीचें छोटेंसें पात्र. त्या तीरावर आश्रमवजा घर, तेथेंच असलेला लहानसा ग्रंथसंग्रह. जुन्या ऐतिहासिक व्यक्तींच्या सान्निध्यांत ते आपला काळ घालवीत असतात. ऋष्याश्रमाची तुलना पुरी होण्यास शिष्यांची तेवढी कमतरता आहे. आणि रियासतकारांच्या कार्यांत वैगुण्य आढळत असलें तर तें हेंच कीं, त्यांच्या एवढ्या अवाढव्य कार्यानंतरही त्यांची परंपरा चालविणारा शिष्यवर्ग त्यांनीं जमविला नाहीं. पुष्कळ कर्तबगारांची परंपरा त्यांचे पुत्रपौत्रच चालवितात. तेंही भाग्य रियासतकारांचें नाहीं. त्यांचे दोन पुत्र हुषार होते. पण आज एकही हयात नाहीं. त्यामुळें कदाचित् त्यांना आपल्या कार्यांत अपूर्णत्व राहिलें असें वाटत असेल काय, अशी शंका कित्येकांना येते. कारण शिष्यपरंपरा राखण्याची इच्छा जवळ जवळ स्वाभाविकच होय. सर जदुनाथांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक शिष्य आहेत. तसे रियासतकारांचे नाहींत याचें कारण उघड दिसतें. जदुनाथांचें जीवन विद्यालयांत व विद्यापीठाशीं निगडित होतें, तसें रियासतकारांचें नव्हतें व नाहींही. बडोदें संस्थानांत असतांना त्याचेकडे अभ्यासासाठीं कुणीं जाणें शक्य नव्हतें—आणि नंतरच्या त्यांच्या सध्यांच्या ऋष्याश्रमांतही तें शक्य झालें नाहीं. एवढ्यानें त्यांचें कार्य कमी ठरत नाहीं. उलट

अवघें विश्वचि माझें घर

याप्रमाणें सर्व विद्यार्थ्यांसाठीं आपलें कार्य त्यांनीं उपलब्ध करून दिलें आहे. शिष्यसंप्रदाय वाढवून काय फायदा ? कार्य महत्त्वाचें असेल तर तें चालविण्यास अभ्यासक आपण होऊन पुढें येतील आणि नसेल तर शिष्यांची परंपरा चालवूनही कांहीं उपयोग होणार नाहीं असें त्यांचें मत आहे. तेंच युक्त दिसतें.

ग्रँट डफच्या इतिहासाशिवाय मराठ्यांचा समग्र इतिहास लिहिलेला नव्हता, अशा काळांत रियासतकारांनीं मराठ्यांचा इतिहास रियासतींच्या रूपानें वाचकांस उपलब्ध करून दिला. त्याचीं गुजराती, हिंदी, कानडी भाषान्तरेंही झालीं आहेत. त्यांच्याशिवाय दुसरा मराठी इतिहासकार अद्याप पुढें आलेला नाहीं. त्यांच्या ग्रंथांवाचून ऐतिहासिक अभ्यासास दुसरें साधनच नाहीं, ही गोष्ट त्यांच्या मूठभर विरोधकांनाही नाकबूल करतां येत नाहीं. शिवजन्मतिथीच्या वादांत त्यांनीं नवा पक्ष स्वीकारला नसेल; शास्त्रशुद्ध संशोधन म्हणतात, त्यांत ते अनभिज्ञ असतील; त्यांच्या इतिहासांत मीठमसाला नसल्यानें तो खमंग लागत नसावा; लिहिण्याची पद्धत रूक्ष असल्यानें त्यांचें वाचन कंटाळवाणें होत असेल; मराठी भावनांचें आकलन नसलेल्या सर जदुनाथांसारख्या बंगाली, विद्वानाग्रणींशीं त्यांची जानी दोस्ती असेल; भारत-इतिहास-संशोधक मंडळांतील मंडळीशीं ते फटकून वागले असतील; आणखी देखील त्यांनीं सत्यासत्य अनेक 'गुन्हे' केले असें मानले, तरीसुद्धां त्यांचें एकंदर कार्यच इतकें श्रेष्ठ आहे कीं, त्याची योग्यता कशानेंही कमी होणार नाहीं. भावी पिढ्यांना व अभ्यासकांना रियासतकारांचें हें ऐतिहासिक ऋण मान्य करावेंच लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Hari...

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचि

अकबर (बादशाह) २१
अटक ४८-४९
अप्पा खंडेराव १०८
अफझलखान १०३
अवदली अहमदशहा (दुराणी) १०५
अल्-उतवी ९४
अलबिलादुरी ९४
अलेक्झान्डर (शिकंदर) ९१
अलाहाबाद (प्रयाग) १६५
अशिरगड ५७
असई १३५
अहमदनगर ८५-१०३,१७४-१८२
अहमदशहा वंगश ४८
आग्रा ७९,१५९
आडगांव १३५
आनंदीबाई (पेशवे) १०६
आपटे दत्तोपंत ८४
आल्बेरुनि ९४
आज्ञापत्र (राजनीति) ६७-७६
इंगळे अंबाजी १०८
इंपिरीयल गॅझेटिअर ९४
ईलियट ९४
ईस्ट इंडिया कंपनी १०७
उग्रप्रकृति संभाजी ७४
उज्जयिनी ११२,१२८
एपिग्राफिया इंडिका ११५,११६
एल्फिन्स्टन (मौंट स्टुअर्ट) ८४,८५
ऐतिहासिक पत्रव्यवहार
संपादक - सरदेसाई, कुळकर्णी, काळे. ३२-३५
ओरिसाच्या इतिहासाचा दुसरा भाग १४४
औरंगाबाद ५४,७९
औरंगजेब ५४,७८,१०४,१५७, १८१,१८२

कटक ४९
कनिष्क ९२
कवि कलश २१
कॅलेंडर ऑफ पर्शियन कॉरेस्पॉंडन्स १४४
काकडे खंडोजी ९८
काव्येतिहास संग्रह ३३,१६५
काशी १६५,१८३
काळे यादवराव १४४
क्लाइव्ह रॉबर्ट ४९
कॉर्नवालिस लॉर्ड ८६
किबे विठ्ठल महादेव ५७-६१
कील्हॉर्न ११७,११९-१२१
कोल्ब्रुक १२१
कोल्हापूर ७८,१७९,१८३
कोल्हापूरकर संभाजी ३१
कोसंबी धर्मानंद २०
कौटिलीय अर्थशास्त्र ४०
खरे (वासुदेवशास्त्री) ४५
खर्डा ४८,१३५
खेम सावंत २२,२३
गंगाधरशास्त्री ८१,८६-८९
गायकवाड ८३,१३५
गिरिधर बहादूर १०९-११४
गुरु नानक ५२
गोखले बापू ५६,८५,८७
गोपिकाबाई १७५,१७६
गोमांतक १७-३७,९३
ग्वाल्हेर १६५
घाटगे सर्जेराव ८६
घोरपडे दौलतराव (सोंडूर) ८५
— संताजी २३,७२,१०३
चतुरसिंग (भोंसले सातारकर) ८६
चंद्रगुप्त विक्रमादित्य ११५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

चिपळूणकर विष्णु कृष्ण ४६
चिमाजी अप्पा २५,२९,५२,१०६,११०, ११२-११४
चुनारगड ८४
चोरघडे, देवाजीपंत १४३-१५५
छत्रसाल राजा ५०
जयसिंग (सवाई) १११,१५७-१६०
जाधव चंद्रसेन १११,१५७-१६०
— धनाजी ७२,१०३
— पिलाजी ११३
जिंजी ६६
जेधे शकावली २१
जोधपूर १५८,१६७
टॉड ४५,९४
टिपू (सुलतान) ९४
डाका ७९
डिबॉइन १०७,१४०
डुले ४९
ड्यूक ऑफ वेलिंग्टन १०८
ढेंगळे त्रिंबकजी ८३-८७
डौसन ९४
तक्षशिला ९२
ताराबाई (रामराणी) ७२,७३,१८१-८४
तंजावर ९५
दयाबहाद्दर ११०-११४
दाभाडे खंडेराव १०३
दिघे वि. गो. ११४
दिल्ली ४६,५४,७९,९१,१११,१५७, १६०-१६४,१७०,१८१-८४
दिवेकर स. म. १७८
द्वारका ४९,१२८
देवगिरी १२०
दुर्दैवी मोहरे ८७-८८
धार ११०
नबाब केसर अलि ६१
नागपूर ८२,११५,१४६-१४८,१५०-१५३
नागपूर प्रांताचा इतिहास १४४
नागपूरकर भोंसल्यांचा ऐतिहासिक पत्रव्यवहार १४४
नागपूरकर भोंसल्यांची बखर १४४
नामदेव (संत) ५२
नालछा १०९,१११
नाशिक १७५
निजाम ४८,१०९,११०,१४१
निंबाळकर ९४
नीळो सोनदेव ६५-६६
नेपोलियन बोनापार्ट ९८,१०७
नोऱ्होना मासिअ १३६
पटवर्धन परशुरामभाऊ ४६,४८,७२,१३६, १४१,१४२
पत्रसारसंग्रह ९५
पन्हाळगड ११०
परमानंद कवीन्द्र ४७,१७७-८३
पवार आनंदराव १०९
पवार उदाजीराव १०९,११०,११२
पवार कैफियत ११४
पंतअमात्य (बावडा दप्तर-१) ६७,७१,७९
पानिपत ४६,४८,९५,१०६,१४१
पानिपतची बखर (काशिराज) १४१
पारसनीस (रा. ब.) ४६
पालकर नेताजी ९५,१०३
पालखेड ११०
पिंगळे नीलकंठ मोरेश्वर ७४-७५
पुरञ्जनचरित १४५-१५५
पुरंदर ६२
पुरंदरे अंबाजीपंत ११०
पुरंदरे दप्तर ३०,१६०
पुणें ८०,८४,१४३,१५२,१७४
पृथ्वीराज (चव्हाण) ४६
पेशवाई ४०
पेशवे २४,२६,१३५,१३८,१३९
पेशवेकालीन महाराष्ट्र ६५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेशवे दप्तर (निवडक कागद) २५, ८१,८२,८६,८९,११२-१३१,१४४, १५१,१५८,-६२,१६६,१६८-७१, १७४
पेशवे नानासाहेब (बाळाजी बाजीराव) ३३, ४८,५३,१४४,१६०,१६२,१६४,१७०, १७३-७६
— बाजीराव पहिले २५,२७,५७,८१, ८२,१०९-११,१५७-५९
— बाजीराव दुसरे ४७,५७
— बाळाजी विश्वनाथ ४८,१००,१५७
— माधवराव ३५-३६,१५१,१६४-६६
— सवाई माधवराव ८९
पेंढारी १४०
पैठण ९५,१२०,१७५
प्रभाकर शाहीर ८१,८७-८८
प्रभुणे रामशास्त्री ४०,४१
प्रभु बाजी ९८
प्रतापगड ४८
प्रतिनिधी श्रीपतराव १०९
प्रल्हाद निराजी ७५
फडके हरिपंत तात्या ४६-४८
फडणीस नाना ४६,१४३,१७५-७६
फाहिएन ९२
बर्निअर ९१
बऱ्हाणपूर ७९,११०
बहादुरशहा ४६
बक्षी खानडौरान १५८
बाबर ४६
बाळाजी बाजीराव–नानासाहेब–पेशवा पहा
बाळाजी विश्वनाथ–पेशवा पहा
बुंदेले गोविंदपंत १३५
बोकील सखाराम बापू १४३,१६५,१६६
ब्रह्मेन्द्रस्वामी (धावडशीकर) १०१
भरतपूर १०५
भाऊसाहेबांची बखर १४१
भारत इतिहास सं. सं. ११५
भोसले (नागपूरकर) १३५,१३६,१५०, १५२,१७३
— परसोजी १०३
— मुधोजी १४४
— रघूजी १०८,१४२,१४३,१४८
— संताजी ११०-११
मावजीकृत कैफियत ११४
मिराशी–कालिदास ११६
मिहिर–कुल ९२
मुजफरजंग १०६
मुंगी शेवगांव ११०
म्हैसूर ४९,७८
मथुरा ९२,१२८
मध्यप्रांत संशोधक मंडळ (नागपूर) १७५
मराठी रियासत (उत्तर विभाग)८१ ८४,८९, ११०,११२,१७३-१७५
महाड ८१
महीदपूर ५७,५९,६०,६२,६३
मॅलेट सर चार्लस १३५
रघुवीरसिंह १११
रणजितसिंह ४५
राघोबा दादा ४८
राजनीति, आज्ञापत्र पहा
राजसबाई ७७,१७९
राजवाडे कै. वि. का. ४६
राजाराम छत्रपति २२,२३,७२,७३
राजाराम स्थिरबुद्धि ७२,७३,७६,७९
राणा प्रताप ५०
रामचंद्रपंत अमात्य २३,६५-७१,७७,७८
रामायण वाल्मिकी १२२
रायगड २२,८६
रास्ते खंडेराव ८९
रोशन बेग ५८
लक्ष्मीबाई राणी (झांशीवाली) ४८,८४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लासवारी १३५
लाहोर ४९,७९
लोदी इब्राहिमखान ४६
वणी दिंडोरी ८४
वतनपत्रें निवाडापत्रें ४४
वसई २४,१३५
वसईची मोहीम २४
विजापूर ७९
विठ्ठलपंत १६५
विठ्ठल शामराज १६१
विठ्ठल सुंदर १४३
विविधज्ञानविस्तार ६६-६७
विशाळगड १७९-८०
विश्वासराव १७५
वेल्स्ली ८६
व्यंकोजी (तंजावरकर) ८४
शहाजहान ४७
शहाजी ४७,४८
शामराजपंत ९८
शाहू २७,४७,१०९,११०,११३,१७९, १८१-८२
शिवभारत ४७,१७७-७८
शिवाजी श्रीछत्रपति महाराज २०,२३,३६, ४७,४८;५०,५२,६५,७७,८४,९४, ९५-९८,१०३,१०४,१७७,१८१-८३
शिवाजी (कोल्हापुरकर) ६८,६९,७२, ७७,७९,१८२,१८३
श्रीपतराव - (प्रतिनिधी पहा)
श्रीचक्रधर ११६
श्रीरंगपट्टण ४९
शिंदे जनकोजी १७०
— जयाप्पा १६३-१६७,१७१
— दत्ताजी १६६-१६८,१७०
— दौलतराव ८१,८६,१०८,१४२
— महादजी ४८,१००,१०६,१०७, १३५-३६,१४०
— राणोजी १६१-१६२
शिं. सु. प. व्य. १६३,१६८,१७१
सकवारबाई १८३
सखाराम बापू (बोकील पहा)
सचिव शंकराजी नारायण ७२
सफदरजंग १६५
सदाशिवराव भाऊ ३२,५१,१०६,१७४,१७५
सरकार सर जदुनाथ १३५
सरदेसाई (रा. ब. गो. स.) ४६,६७,७२, ७७,७८,८१,८९,१११,१७३,१८७-२००
सरबुलंदखान ११०
संभाजी (छत्रपति कोल्हापूर) २०,२२, २७,३६,६५,१०४,११०,१७९,१८२, १८३
सातारा ४८,८४,८६,८८
साने. का. ना. ४६,६६
सारंगपूर १११
सिद्दी याकूतखान २१
सिंहगड ४८,६१,९८
सुजा उद्दौला १६५
सुंदर तुकदेव ७२
सें. झेविअर २०
हेमाद्रीपंत १२०
हैदरअली ३५,३६,४५,१४१
हैदराबाद ७९
होळकर अहिल्याबाई ४८
— तुकोजी ४८
— मल्हारराव १०५,१११,१६२, १६५,१६६,१७१
— यशवंतराव ५७,८१,१७५
ज्ञानेश्वर १२१

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

STOCK VERIFY
2020
G.K.V. Library

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Coll

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

STOCK VERIFY
2020
G.K.V. Library

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri